

# इतिहास

## शास्त्र आणि कला

विठ्ठल दत्तात्रय घाटे

किंमत तीन रुपये

REFBK-0009960

९९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम २३७५५ दि: ...
क्रमांक ...२५... नों: दि ...



# इतिहास

## शास्त्र आणि कला

REFBK-0009960

ात्रय घाटे

ोन रुपये

प्रकाशक :
एस. आर. देशमुख
देशमुख प्रकाशन
२२ कसबा, पुणे २

मुखपृष्ठ :
दीनानाथ दलाल

आलेख :
प्रभाकर जोशी

प्रथम आवृत्ति : १९५८

मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
टिळक रोड, पुणे २

अनुक्रम .................. दि: ..... ............
क्रमांक ......................... नों: दि: ..............

## माझे दोन शब्द

गेल्या चाळीस वर्षे इतिहासाचें मी वाचन चिंतन करीत आलों आहे. या चिंतनामधून कांहीं तत्त्वें, कांहीं मतें व विशेषतः इतिहासाकडे पाहण्याची एक दृष्टि फळास आली आहे. प्रस्तुत पुस्तकांत हीं तत्त्वें–मतें व दृष्टि माझ्या शिक्षक–मित्रांपुढें ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. माझ्या विवेचनांत आग्रह नाहीं; हटाग्रह तर नाहींच नाहीं. वाचक माझ्या खोलींत येऊन बैठकीवर बसून चहा पितां पितां माझ्याशीं जितक्या मोकळेपणानें बोलला असतां, किंवा मी त्याच्याशीं बोललों असतों, अगदीं तितक्याच मोकळेपणानें व प्रांजलपणानें या पुस्तकांत मी त्याच्याशीं हितगुज केलें आहे. त्यानें माझीं मतें व विचार जसेच्या तसे स्वीकारावेत असा माझा आग्रह नाहीं. माझी अपेक्षा एवढीच आहे; त्यानें शांतपणें मीं जें लिहिलें आहे तें वाचावें, त्यावर चिंतन करावें, आपल्या शिक्षक–मित्रांशीं चर्चा करावी व मग आपले स्वतःचे असे निर्णय घ्यावेत.

मी स्वातंत्र्याचा भोक्ता आहे–उपासक आहे. माझें शैक्षणिक जीवन प्रयोगशील होते. मला प्रयोग आवडतात; पण ते सरकारी हुकुमानें लादलेले आवडत नाहींत. ते माझ्या चिंतनांतून, माझ्या प्रेरणेंतून जन्माला आले पाहिजेत. मला स्वतःचें मूल आवडतें. पण दत्तक मूल आवडत नाहीं. आणि सरकारनें धाकधपटशा दाखवून दत्तक दिलेलें मूल तर अगदींच आवडत नाहीं. मग तें कितीका गुटगुटित असेना. माझें तें माझें ! जुलमाच्या रामरामाप्रमाणें

जुलमाचें प्रेमसुद्धां निषिद्ध आहे. सरकारनें–शिक्षण खात्यानें–शिक्षण संस्थांनीं–ट्रेनिंग संस्थांनीं शैक्षणिक विचारांवर व आचारांवर शिक्षकांचें प्रेम जडेल असें खुलें सुंदर वातावरण निर्माण करावें. येथें त्यांचें कर्तव्य व अधिकार संपला पाहिजे. पुढचें शिक्षक आपलें पाहून घेईल.

माझ्या या पुस्तकाकडेहि शिक्षकांनीं याच स्वतंत्र वृत्तीनें व चिकित्सक बुद्धीनें पहावें, अशी माझी त्यांना विनंती आहे. मी त्यांचा जुना मित्र आहे. मी त्यांच्यासह उणींपुरीं चाळीस वर्षें घालवलीं आहेत. मी त्यांचीं सुखदुःखें, त्यांची कुवत, त्यांच्या अडचणी जाणतो. कदाचित् ते स्वतः जाणत नसतील इतकीं जाणतो. त्यांच्यापुढें इतिहासशिक्षणाची शास्त्रीय दृष्टि मीं ठेवली आहे. हें अग्नि-दिव्य आहे, सुलभ नाहीं. कडक पथ्य पाळावें लागेल. संयम पाळावा लागेल. पण ही साधना केल्यावर गोड फळें चाखायास मिळतील. इतिहास हा अवकाश आणि काळ यांनींच मर्यादित आहे. तो सर्व काळचा आहे आणि सर्व जगाचा आहे. या दोन मर्यादांत तो विकास पावला आहे, ही दृष्टि शिक्षकांनीं पैदा करावी. इतिहास म्हणजे सत्याची उपासना आहे; ती कादंबरी, लघुकथा नाहीं. तेथें सद्धेतुनें प्रेरित होऊन अवलंबिलेल्या असत्यालासुद्धां स्थान नाहीं, हें पथ्य शिक्षकांनीं पाळावें; मन मोकळें ठेवावें, बुद्धि निर्मळ ठेवावी, म्हणजे यशाची चिंता नको.

हें पुस्तक मी लिहिणार नव्हतो. मला आतां ‘ शालेय ’ लिहिण्याचा कंटाळा आला आहे; दृष्टि दुसरीकडे वळली आहे. दुसरीकडे म्हणजे पैल तिराकडे नाहीं. त्याला अजून अवकाश आहे. सध्यां मन या जगांतच रमलें आहे आणि हें जग त्याला पुरेसें आहे. देशमूख पतिपत्नींनीं माझ्या मागें लकडा लावला; एक सच्चिदानंद बाबा दिला. गरीबबापडा मी त्यांच्या आहारीं गेलों. माझी ही खोड जुनीच आहे. तेव्हां हें पुस्तक लिहिलें गेलें याचें श्रेय किंवा त्याचा ठपका द्यायचा तो त्या उभयतांनाच द्यावा.

मला मात्र पुस्तक लिहितांना आनंद आणि समाधान लाभलें. कांहीं भाग लिहितांना तर सृजनाचा आनंद आणि गौरव लाभला. यांतच माझें समाधान आहे.

सुषमा
डेक्कन जिमखाना
७ जुलै १९५८

विठ्ठलराव घाटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ............ वि: ..................
क्रमांक ...................... नों: दि: ..............
८८३०

## प्रकरण पहिलें

# इतिहास म्हणजे काय ?

आधुनिक जगांत इतिहासाला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. इतिहासावर दरसाल मोठमोठे ग्रंथ होत आहेत. त्याचप्रमाणें इतिहास परिषदांमध्यें इतिहासाच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा होऊन सत्याचें संशोधन होत आहे. प्रत्येक राष्ट्र आपला इतिहास काळजीपूर्वक लिहून घेण्यास उद्युक्त असतें. याचें कारण उघड आहे. जुन्या काळीं धर्माला जें स्थान होतें तें आतां राष्ट्रवादाला मिळालें आहे. धर्माच्या छत्राखालीं आणि निष्ठेखालीं पूर्वीं अनेक राष्ट्रें एकत्र येत असत आणि कमीजास्ती प्रमाणांत एकत्र नांदत असत. आधुनिक जगांत स्वयंपूर्ण अशीं लहानमोठीं राष्ट्रें जन्माला आलीं आहेत. अनेक राष्ट्रांना आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढे द्यावे लागले आहेत. आणि हे लढे देतांना आपण कसे वेगळे आणि आगळे आहोंत हें सिद्ध करण्यासाठीं त्यांना इतिहासाची कांस धरावी लागली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यावरसुद्धा राष्ट्रांना स्वतःची जाणीव सदैव जिवंत ठेवावी लागते आणि त्यासाठीं वारंवार आपल्या इतिहासाकडे आणि विशेषतः त्यांतील स्फूर्तिदायक आणि उज्ज्वल प्रसंगांकडे लक्ष द्यावें लागतें.

या स्वत्वाच्या जाणिवेनें प्रेरित होऊनच सर्व आधुनिक राष्ट्रांनीं आपापल्या शिक्षणक्षेत्रांत इतिहासाला महत्त्वाचें स्थान दिलें आहे, आणि त्याच्या अध्यापनाकडे विशेष लक्ष पुरविलें आहे. बहुतेक राष्ट्रांत प्राथमिक शाळांपासून विद्यापीठापर्यंत कमीअधिक प्रमाणांत इतिहासाचें अध्ययन, अध्यापन होत असतें; इतकेंच नव्हे तर प्राथमिक आणि माध्यमिक शाळांत हा विषय बहुतेक ठिकाणीं सक्तीचा असतो. लहानपणीं मुलांचीं मनें कोवळीं आणि संवेदनाक्षम असतात; तेव्हां अशा वयांतच मुलांच्या मनांवर इतिहासाचे संस्कार घडावेत, त्यांना

त्यांच्या पूर्वजांचा आणि त्या पूर्वजांच्या मोठेपणाचा परिचय घडावा व त्यापासून स्फूर्ति आणि प्रेरणा मिळावी हेंच उद्दिष्ट राज्यकर्त्यांच्या मनांत असतें.

इतिहासाला आज जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें पूर्वी नव्हतें. शिक्षणक्षेत्रांत आणि इतरत्र त्याला आज जो मान मिळत आहे तो पूर्वी मिळत नसे. पूर्वीच्या काळीं इतिहासाविषयीं मोटमोठ्या लोकांच्या चमत्कारिक कल्पना होत्या. कांहीं मोठे लोक इतिहासाचा तिरस्कार करीत तर दुसरे कांहीं मोठे लोक त्याला डोक्यावर घेऊन नाचत. या बाबतींत कांहीं उदाहरणें मोठीं मनोरंजक आहेत. सर रॉबर्ट वॉलपोल हा इंग्लंडचा पहिला मुख्य प्रधान अठराव्या शतकांत होऊन गेला. त्याच्या शेवटच्या दुखण्यांत त्याचा वेळ जावा म्हणून त्याच्या पत्नीनें, 'मी तुम्हांला काय वाचून दाखवूं ?' असें विचारलें. तेव्हां वॉलपोलनें उत्तर दिलें, 'कांहींहि वाच, पण इतिहासाचें पुस्तक मात्र वाचूं नकोस.' फ्रान्सचा महान् योद्धा नेपोलियन यानें एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं नवा इतिहास निर्माण केला. तो अत्यंत पराक्रमी आणि कुशल असा सेनापति होता. त्याच्या आधिपत्याखालीं फ्रेंच शिपाई मोठ्या उत्साहानें आणि हिरीरीनें लढत आणि हमखास विजय मिळवीत. नेपोलियननें आपल्या पराक्रमानें युरोप खंडांतील बहुतेक राष्ट्रांवर विजय मिळविले आणि अनेक राष्ट्रांच्या सिंहासनांवर आपल्या मर्जीतल्या फ्रेंच माणसांना बसविलें. पण इतिहास घडविणाऱ्या या पराक्रमी पुरुषाचें इतिहासाविषयीं फार वाईट मत होतें. तो एके ठिकाणीं म्हणतो, "इतिहास म्हणजे काय ? इतिहास म्हणजे नुसत्या दंतकथा. त्यापलीकडे त्याला महत्त्व नाहीं." स्पेन्सर नांवाचा एक मोठा तत्त्ववेत्ता एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडमध्यें होऊन गेला. तो आपल्या एका निबंधांत म्हणतो, "इतिहास वाचायचाच असेल तर वाचा बापडे; त्यानें तुमची थोडीबहुत करमणूक होईल. परंतु इतिहासापासून तुम्हांला कांहीं बोध मिळेल, कांहीं मार्गदर्शन होईल अशी खुळी आशा बाळगूं नका." फ्रान्समध्यें एकदां अभ्यासक्रम तयार करण्याकरितां शाळाखात्याचे मोठमोठे अधिकारी एकत्र आले होते. कोणचे विषय शिकवावेत आणि कोणचे वगळावेत याविषयीं चर्चा करतांना एकजण म्हणाला, "शाळांत इतिहास शिकविण्याचा कांहींच उपयोग नाहीं. ज्यांना वाचतां येतें ते इतिहासाचीं पुस्तकें आपापल्या घरीं फुरसदीनें वाचतील." दुसरा म्हणाला, "इतिहासाचें अध्यापन ही एक

अशक्य गोष्ट आहे. " तिसऱ्यानें मुक्ताफळें काढलीं, " इतिहास शिकविण्यांत मोठा धोका आहे. त्यामुळें मुलें विनाकारण घमेंडखोर बनतील. "

ही एक बाजू झाली. विरूद्ध बाजूचीं मतेंसुद्धां अशींच एकांगी आहेत. उदाहरणार्थ, क्रॉमवेल हा इंग्लंडचा एक मोठा राष्ट्रपुरुष म्हणतो, " इतिहासांत आपल्याला प्रत्यक्ष देवाचें दर्शन घडतें. देव इतिहासामधून प्रकट होत असतो." फ्रूड (Froude) नांवाचा नामांकित इंग्रज इतिहासकार म्हणतो, " इतिहास हा चिरंतन अशा नैतिक मूल्यांची घोषणा करीत असतो. " झिलर नांवाच्या एका जर्मन शिक्षणशास्त्रज्ञानें तर इतिहास या विषयाला केंद्र-स्थान दिलें आणि इतर विषयांची त्याच्याभोंवतीं मांडणी केली.

चांगल्या शहाण्या माणसांत इतिहासाबद्दल जुन्या काळीं इतका तीव्र मतभेद कां असावा ? जुन्या काळच्या गोष्टी सोडून द्या. आजसुद्धां चांगल्या शिकल्या-सवरलेल्या समंजस माणसांना इतिहास म्हणजे काय आणि त्याचें उद्दिष्ट काय हे प्रश्न विचारले तर त्यांच्या उत्तरांत तीव्र मतभेद आढळले नाहींत तरी एकवाक्यता खास आढळणार नाहीं. जो तो आपल्या मताप्रमाणें आणि आवडीनिवडीप्रमाणें इतिहासाची वेगळी व्याख्या सांगेल आणि वेगळेंच उद्दिष्टहि सांगेल. इतिहासाची अशी ओढाताण कां होते ? गणिताची ओढाताण होत नाहीं. रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र अशा शास्त्रांची ओढाताण होत नाहीं. तेथें कोणाची गडबड चालत नाहीं. हजारों वर्षें लोटलीं तरी दोन आणि दोन चारच होतात. तीन होऊं शकत नाहींत, पांच होऊं शकत नाहींत; मतभेदाला स्थानच नसतें; किंबहुना मतालाच स्थान नसतें. दोन आणि दोन म्हणजे किती व्हावेत असें तुमचें मत आहे, असा वेडगळ प्रश्न आपण कोणाला विचारीत नाहीं. शास्त्रांचीं प्रमेयें आणि सिद्धान्त स्वयंसिद्ध असतात आणि अबाधित असतात. मानवी बुद्धीला तीं मुकाट्यानें पतकरावीं लागतात.

वर निर्दिष्ट केलेल्या शास्त्रांचे विषय संख्या, रासायनिक द्रव्यें, इत्यादि आहेत. याच्या उलट इतिहासाचा विषय मानवी समाज हा आहे. नुसत्या एकेकट्या माणसाचें जीवन घेतलें तरी त्यांतील घटना अनंत असतात. त्यांच्या बरेंवाईटपणाबद्दल आणि कमीजास्त महत्त्वाबद्दल हवे तितके मतभेद होऊं शकतात. मग असंख्य माणसें एकत्र येऊन जो समाज निर्माण होतो त्याचे सामाजिक व्यवहार आणि घटना यांच्या बाबतींत मतभेद होणें स्वाभाविकच आहे.

आणि म्हणूनच एकाच देशाच्या एकाच कालविभागाचा इतिहास दोन वेगवेगळ्या मताचे इतिहासकार लिहूं लागले तर ते अगदीं वेगळे होतील. एक उदाहरण घेऊं. इंग्लंडमध्यें १६ व्या शतकांत धार्मिक क्रांति झाली आणि इंग्लंडच्या राजवटीनें रोमन कॅथलिक धर्म झुगारून दिला. त्यामुळें पुढच्या पांचपन्नास वर्षांत प्रॉटेस्टंट आणि कॅथलिक या लोकांत संघर्ष उत्पन्न झाले आणि अनेक झगडे झाले. या धार्मिक क्रांतीचा आणि तदनंतर झालेल्या संघर्षांचा इतिहास प्रॉटेस्टंट इतिहासकार आपल्या मताप्रमाणें लिहितो आणि त्याच्या अगदीं उलट कॅथलिक इतिहासकार लिहितो. दूरचें उदाहरण कशाला, घरचेंच घेऊं या. १८५७ सालच्या घडामोडींना नुकतींच शंभर वर्षें झालीं. या महत्त्वाच्या प्रसंगा-निमित्त १८५७ सालच्या घटनांवर इतिहास लिहिले जात आहेत. कोणी त्या संघर्षाला केवळ शिपायांचें बंड म्हणतो, तर कोणी तें भारताचें पहिलें स्वातंत्र्ययुद्ध होतें असें म्हणतो. आणि आपआपल्या मताला अनुसरून घटनांची निवड करतो आणि त्यांना कमीजास्त महत्त्व देतो.

इतिहासांतलें हें अराजक पाहिलें म्हणजे चटकन् लक्षांत येतें कीं हीं वेग-वेगळीं माणसें इतिहासाचा वेगवेगळा अर्थ करतात. आणि म्हणून त्यांच्यांत मतभेद उत्पन्न होतात. प्रत्येकजण इतिहास या विषयाचा कांहीं वेगळाच अर्थ करतो आणि त्या अर्थाला अनुसरून इतिहासाची कमीजास्त किंमत करतो आणि ऐतिहासिक घटनांमध्यें ढवळाढवळ करतो. तेव्हां इतिहास कसा शिकवायचा, कोणता शिकवायचा किंवा इतिहास शिकवितांना कोणतें उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवायचें या प्रश्नांकडे वळण्यापूर्वीं इतिहास म्हणजे काय हेंच आपण आधीं निश्चित केलें पाहिजे, नाहींतर साराच घोटाळा होईल. नेपोलियन म्हणतो त्याप्रमाणें इतिहास म्हणजे जर नुसत्या दंतकथाच असतील तर तो विषय मग शिकवायचा कशाला ? त्यापेक्षां दुसरा एखादा उपयुक्त विषय शिकवितां येईल.

इतिहास म्हणजे काय याविषयीं आपण निर्णय घेतला म्हणजे तो कपोल-कल्पित दंतकथात्मक आहे का कांहीं वेगळाच आहे, हें आपल्याला समजेल. इतिहास या विषयाविषयीं अशीं परस्परविरुद्ध मतें कां रूढ झालीं हें आपण आतां पाहूं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे १९ व्या शतकापर्यंत जो इतिहास लिहिला गेला तो आणि १९ व्या शतकानंतर गेलीं दीडशें वर्षें जो इतिहास लिहिला जात आहे त्या दोहोंमध्यें जमीनअस्मानचें अंतर आहे. १९ व्या

शतकानंतर इतिहास हें एक शास्त्र निर्माण झालें आणि शास्त्रीय दृष्टीनें व शास्त्रीय तंत्राचा अवलंब करूनच इतिहास लिहिला गेला. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं इतिहास शास्त्रपूत झाला तेव्हांच त्याला वेगळें असें अस्तित्व मिळालें. पूर्वीच्या इतिहासाला इतिहास हें स्वतंत्र आणि वेगळें नांव देणेंसुद्धां चुकीचें ठरेल. तो वाङ्मयाचा एक भाग होता, आणि त्याचा बरेंवाईटपणा त्याच्या वाङ्मयीन गुणांवरून पारखला जात असे. तो जुना इतिहास म्हणजे गद्यांत किंवा पद्यांत सांगितलेल्या जुन्या कथा होय. या कथा व त्यांतील तपशील सत्य आहे किंवा नाहीं याचा त्यावेळीं विचारच केला गेला नाहीं. त्या मनोरंजक असल्या किंवा बोधप्रद असल्या म्हणजे काम भागत असे. मनोरंजक किंवा बोधप्रद होण्याकरितां त्या तथाकथित ऐतिहासिक कथांमध्यें भरपूर मालमसाला घालण्यांत येत असे. लिपींचा शोध गेल्या दोनतीन हजार वर्षांपूर्वी लागला. लिहिण्याचा कागद तर आपल्या देशांत हजार वर्षांपूर्वींच प्रचारांत आला. अशा परिस्थितींत ऐतिहासिक कथा आणि प्रसंग एक पिढी दुसऱ्या पिढीच्या तोंडून ऐकत असे आणि पुढच्या पिढीला तो वारसा तोंडींच देत असे. यामुळें शतकानुशतकें हें ऐतिहासिक वाङ्मय लिपिनिविष्ट न होतां तें कानानें ऐकूनच उपलब्ध होत असे. आपल्या संस्कृत भाषेंत शिकलेल्या ज्ञानी माणसाला बहुश्रुत म्हणजे पुष्कळ ऐकलेला म्हणतात तें याच कारणामुळें. धार्मिक वाङ्मय पवित्र असल्यामुळें त्याच्यांत सहसा ढवळाढवळ होत नसे आणि म्हणूनच हजारों वर्षें आपले वेद लिपिनिविष्ट नसतांनासुद्धां फेरफार न होतां तसेच राहिले. परंतु ऐतिहासिक कथा या केवळ मनोरंजनाकरितां आणि बोधाकरितां होत्या. साहजिकच प्रत्येक पिढी ऐकलेल्या कथांमध्यें आपल्या कल्पकतेप्रमाणें किंवा अनुभवाप्रमाणें कमीजास्त भर घालून त्या कथा पुढल्या पिढीच्या स्वाधीन करीत असे. या उपक्रमांत मूळच्या ऐतिहासिक कथा किंवा घटना यांच्यांत फार मोठे आणि चमत्कारिक बदल झाले असल्यास त्यांत नवल नाहीं. पुष्कळ कथांच्या बाबतींत तर पराचा कावळा झाला असेल हें उघड आहे.

आपल्या रामायण–महाभारताचींच उदाहरणें घ्या. या आपल्या दोन महाकाव्यांच्या मूळ कथा बऱ्याचशा खऱ्या असणार. परंतु अश्वमेधासारखे यज्ञ किंवा मोठमोठीं सत्रें जेव्हां अनेक महिनेपर्यंत चालू राहत तेव्हां सूत नांवाचे प्राचीन काळचे पोवाडे म्हणणारे लोक तेथें येत आणि जुन्या वीरपुरुषांच्या गाथा

म्हणजेच पोवाडे जमलेल्या लोकांना म्हणून दाखवीत. हा प्रकार अनेक शतकें चालला असणार आणि हळूहळू रामायण–महाभारताच्या ऐतिहासिक कथांत मालमसाला भरला गेला असणार. जुन्या सूतांची परंपरा मध्ययुगांत राजपूतांच्या चारणांनीं आणि त्यानंतर मराठ्यांच्या गोंधळ्यांनीं चालू ठेवली. हे चारण आणि गोंधळी राजेरजवाड्यांच्या आणि सरदार-दरकदारांच्या पदरीं असत. शांततेच्या प्रसंगीं ते जुने पोवाडे म्हणून नव्या पिढीला जुन्या इतिहासाचें ज्ञान देत आणि युद्धप्रसंगीं प्रत्यक्ष रणभूमीवर जाऊन आपल्या पोवाड्यांनीं लढवय्यांना उत्तेजन देत.

रामायण–महाभारतांतील जुन्या कथा किंवा त्यानतरचे पोवाडे यांचें उद्दिष्ट स्पष्ट होतें. जमलेल्या लोकांचें मनोरंजन करायचें, त्यांना आपल्या पूर्वजांचा अशा प्रकारें परिचय करून द्यायचा कीं त्या पूर्वजांविषयीं त्यांना अभिमान वाटावा आणि त्यांची परंपरा टिकविण्याची ईर्षा उत्पन्न व्हावी. या उद्दिष्टांत साहजिकच शास्त्रीय दृष्टीला स्थान नव्हतें. जे ऐतिहासिक प्रसंग निवडायचे आणि त्यांचे जे तपशील सांगायचे ते कितपत खरे आहेत हें पाहण्यांत येत नसे. त्यांच्यांत अनेक अद्‌भुत घटना खुशाल घुसडून देण्यांत येत असत. काल्पनिक प्रसंगहि रचण्यांत येत असत. साधेसुधे पराक्रम असले तरी त्यांना भलतेंच अतिरंजित स्वरूप देण्यांत येत असे. कलात्मक हेतु साधण्यासाठीं सद्‌गुणांचें आणि दुर्गुणांचें अवास्तव आणि अद्‌भुत चित्र रेखाटण्यांत येई. इतिहास आणि नवलकथा यांचें मनसोक्त मिश्रण होई. वीरांच्या तोंडीं मोटमोठीं वीररसात्मक भाषणें घालण्यांत येत आणि रणांगणावर व अन्यत्रहि संवादांचा उपयोग करण्यांत येई. जणूं काय तीं भाषणें आणि संवाद लिहून घेण्यास त्या त्या ठिकाणीं लघु-लेखक हजर होते ! कलेच्या दृष्टीनें इतिहासलेखनांत कांहीं कांहीं साचेबंद संकेतहि निर्माण झाले. उदाहरणार्थ, आपल्या मराठी बखरींत एखादा मोठा मनुष्य मेला कीं आकाशांतून रक्ताचा पाऊस पडे आणि दिवसां अंधार पडे.

एकोणिसाव्या शतकापासून विज्ञानयुगाचा आरंभ झाला असें म्हटलें तरी चालेल. वेगवेगळ्या शास्त्रांमध्यें संशोधन सुरू झालें, आणि सत्याकडे कटाक्षानें लक्ष पुरविण्यांत येऊं लागलें. साहजिकच संशोधकांची दृष्टि ऐतिहासिक पुराव्याकडे वळली आणि त्या पुराव्याची शास्त्रीय दृष्टीनें आणि पद्धतीनें तपासणी होऊं लागली. समकालीन अस्सल कागदपत्रें परिश्रमानें शोधण्यांत आणि तपासण्यांत आलीं आणि वेगवेगळ्या राष्ट्रांत त्यांचा दफ्तरखान्यांत काळजीपूर्वक संग्रह

करण्यांत येऊं लागला. आपले इतिहाससंशोधक राजवाडे नेहमीं म्हणत, " शंभर बखरींपेक्षां एक अस्सल चिटोरें अधिक मोलाचें असतें. " शास्त्रीय पद्धतीनें इतिहासलेखनाला सुरुवात जर्मनींत झाली आणि नीबूर ( Niebuhr ) हा जर्मन पंडित आधुनिक इतिहासशास्त्राचा जनक झाला. त्यानें जुने कागदपत्र, जुने इतिहास आणि इतर साधनें यांची काळजीपूर्वक तपासणी करून रोमच्या प्राचीन प्रजासत्ताक राज्याचा इतिहास सत्याच्या भूमिकेवरून लिहिला. नीबूरच्या या नव्या इतिहासपद्धतीचा प्रभाव सर्व युरोपखंडभर पडला. आणि निरनिराळ्या देशांतून व्यासंगी लोक जर्मनीच्या संशोधनकेंद्रांत इतिहासाचें नवें तंत्र शिकूं लागले. इंग्लंडमध्यें स्टब्ज्, गार्डिनर, मेटलँड आणि टाउट या प्रसिद्ध इतिहास-कारांनीं शास्त्रीय इतिहासाची परंपरा सुरू केली. स्टब्जनें सरकारी दप्तरखान्यांतील जुन्या कागदपत्रांची पंचवीस वर्षें तपासणी केली आणि ऐतिहासिक सत्य असलेले कागद कोणचे यांची निवड केली. स्टब्ज हा धर्मोपदेशक होता व त्याचीं स्वतःचीं अशीं धार्मिक मतें होतीं आणि तीं तीव्र होतीं. परंतु जुन्या धार्मिक विषयांवरील कागदपत्रांची तपासणी आणि निवड त्यानें इतक्या निर्विकार दृष्टीनें केली कीं स्टब्जच्या स्वतःच्या धार्मिक मतांचा त्याच्या लेखनांत मागमूस सापडणार नाहीं. स्टब्ज मोठ्या अभिमानानें म्हणे कीं त्याचा इतिहास वाचून तो कोणत्या राजकीय पक्षाचा आहे, हें कोणालाच सांगतां येणार नाहीं. इतका तो निःपक्षपाती आणि सत्यान्वेषी होता.

गार्डिनरनें स्टुअर्ट राजघराण्याचा इतिहास लिहिला. पण तो इतक्या निःपक्षपाती दृष्टीनें लिहिला कीं स्टुअर्ट राजघराण्याचा पक्ष आणि त्याच्याशीं झगडणारा पार्लमेंटचा पक्ष या दोन्ही पक्षांचा सारख्याच समजूतदारपणानें आणि सहानुभूतीनें त्यानें परामर्श घेतला. अशीं आणखी कितीतरी इतिहासकारांचीं उदाहरणें देतां येतील. आपल्या देशांतसुद्धां आस्ते आस्ते कां होईना परंतु शास्त्रीय ऐतिहासिक दृष्टि प्रस्थापित होत आहे. जुन्या कागदपत्रांचा कसोशीनें शोध आणि संग्रह होत आहे. त्यांच्या तारखा निश्चित होत आहेत. आणि या शास्त्रपूत साधनांचा उपयोग करून भारतांतील प्रदेशांचा शास्त्रीय इतिहास लिहिण्याचा उपक्रम सुरू झाला आहे.

जुन्या प्रकारच्या इतिहासांत ढोकळमानानें तीन दोष आढळतात. ( १ ) जुन्या इतिहासकारांनीं इतिहासाला स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण असें स्थान दिलें नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि: .......................

त्यांचे इतिहास, वाङ्मय किंवा कला यांचे अविभाज्य भाग होते. याच्या उलट नवे शास्त्रीय इतिहासकार, इतिहास हें एक स्वतंत्र शास्त्र आहे असें समजून त्याचा त्या दृष्टीनें अभ्यास करतात आणि लेखन करतात. (२) जुने इतिहास सामान्यतः वैयक्तिक आणि उथळ होते. ते राजे, राण्या, प्रधान, सेनापति इत्यादि बड्या लोकांचे इतिहास होते. सामान्य समाजाला व त्याच्या जीवनाला त्यांच्यांत स्थान नव्हतें. त्या इतिहासांत राजकीय आणि लष्करी गोष्टींचाच विचार केला जात असे. समाजाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची जुन्या इतिहासांनीं फारशी दखल घेतली नाहीं. (३) जुन्या इतिहासाची दृष्टि भोंगळ आणि भाबडी होती. तिच्यांत शास्त्रीय चिकित्सेचा अभाव होता. डोळे झांकून कसल्याहि साधनांचा न तपासतां स्वीकार आणि उपयोग केला जात असे. एवंच, जुन्या इतिहासक्षेत्रांत इतिहास आणि दंतकथा यांची भेसळ झाली होती.

आतां वरील विवेचनावरून इतिहास म्हणजे काय हें सांगणें सोपें आहे. इतिहास म्हणजे आपल्या सर्वांगीण भूतकालाचें समग्र चित्र. अर्थात् एखाद्या विशिष्ट देशाचें किंवा विशिष्ट काळाचें तें चित्र नव्हे. मनुष्यप्राणि पृथ्वीतलावर जन्माला आला आणि समाज करून राहूं लागला त्याच वेळीं इतिहास जन्माला आला. इतिहासानें माणसाची कहाणी त्याच्या जन्मापासून प्रामाणिकपणानें आणि शास्त्रीय पद्धतीनें सांगितली पाहिजे. इतिहासानें पूर्वीं होऊन गेलेल्या बड्या लोकांची अवश्य दखल घ्यावी, परंतु त्यांच्यांत रंगून आणि गुरफटून जाऊं नये. बड्या लोकांच्या कर्तबगारीनें समकालीन आणि नंतरच्या सामाजिक जीवनावर जे नानाविध परिणाम घडतात त्यांनाच इतिहासांत महत्त्व आहे. तेवढ्यापुरतेंच त्या बड्या लोकांना इतिहासांत महत्त्व आहे. बड्या लोकांच्या खाजगी जीवनाशीं आणि घटनांशीं इतिहासाला कांहीं कर्तव्य नाहीं.

इतिहासानें मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा परामर्श घेतला पाहिजे. तो नुसता राजकीयच असतां कामा नये; धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, कलात्मक, वाङ्मयीन, या सामाजिक जीवनाच्या अनेक बाजूंचा इतिहासानें राजकारणाबरोबरच समतोलपणानें विचार केला पाहिजे.

इतिहास हें शास्त्र आहे हें मानल्यावर कांहीं शास्त्रीय पथ्यें पाळलींच पाहिजेत. इतिहास हें नीतिशास्त्र नाहीं. आणि म्हणून त्यानें स्तुति व निंदा यांची खैरात

करण्याचें कारण नाहीं. शास्त्र या नात्यानें असंख्य व्यक्ति आणि घटना यांच्या अराजकांतून इतिहासानें व्यवस्था निर्माण केली पाहिजे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे मानवी प्राण्याचा पृथ्वीतलावरील उत्क्रांतीचा शास्त्रशुद्ध अभ्यास म्हणजेच इतिहास.

● ● ●

## प्रकरण दुसरें

# इतिहास : शास्त्र कीं कला ?

पहिल्या प्रकरणांत इतिहास हें शास्त्र आहेही भूमिका आपण स्वीकारली. पुष्कळ लोकांना ही भूमिका मान्य नाहीं. स्पेन्सरचें उदाहरण पूर्वी आलेंच आहे. त्याच्या मतें भूतकालाच्या इतिहासाचा वर्तमानकाळीं किंवा भविष्यकाळीं कांहीं एक उपयोग होण्यासारखा नाहीं. तो म्हणतो, प्रत्येक ऐतिहासिक घटना किंवा प्रसंग हा विशिष्ट स्वरूपाचा आगळा आणि वेगळा असतो. त्याच्यापासून कोणतेंच सामान्य तत्त्व किंवा सिद्धान्त काढतां येत नाहीं; आणि म्हणून अशा विशिष्ट व अनन्य घटनांपासून मार्गदर्शन होऊं शकत नाहीं. मागच्यास ठेंच लागली तरी तिच्यामुळें पुढचा शहाणा होऊं शकत नाहीं. कारण प्रत्येक ठेंच वेगळया प्रकारची असते. किंबहुना त्याच माणसाला आज लागलेल्या ठेंचीचा उपयोग उद्यां ठेंचा लागण्याचा प्रसंग आला म्हणजे होणार नाहीं. कारण प्रत्येक ठेंच वेगळी आणि आगळी. आणि म्हणूनच इतिहासाची पुनरावृत्ति होते असें जें एक भोंगळ मत आहे त्याला कांहीं अर्थ नाहीं. शास्त्र म्हटलें म्हणजे त्यांत सामान्य तत्त्वें व सिद्धान्त आलेच. परंतु इतिहासाच्या घटनांमधून वर उल्लेखिलेल्या कारणांमुळें सामान्य सिद्धान्त निघूं शकत नाहींत. ऐतिहासिक घटनांचा प्रयोगशाळेंतील प्रयोगासाठीं किंवा शास्त्रीय निरीक्षणासाठीं उपयोग होऊ शकत नाहीं. स्पेन्सरच्या मताप्रमाणें चालणारे लोक मानसशास्त्राचीहि मदत घेतात. ते म्हणतात, इतिहास म्हणजे मनुष्यप्राण्याच्या हातून घडलेलीं कृत्यें. मनुष्यप्राण्याची निर्णयशक्ति स्वतंत्र आहे; ती अमक्या अमक्या परिस्थितींत अमकाच निर्णय हमखास घेईल असें सांगतां येत नाहीं. त्यामुळें मनुष्याच्या इच्छाशक्तीच्या प्रेरणेनें त्याच्या हातून जीं कृत्यें घडतात त्या कृत्यांची

पुनरावृत्ति होईल हें मानणें चुकीचें होईल. याचाच अर्थ इतिहास हें शास्त्र नाहीं; असा झाला.

स्पेन्सरच्या सांप्रदायिकांचें हें म्हणणें अगदीं बरोबर आहे. इतिहास हें शास्त्र आहे असें जेव्हां आम्ही म्हणतों तेव्हां तें पदार्थविज्ञान किंवा रसायन या शास्त्रांसारखें प्रयोगसाध्य आहे, असें आम्ही म्हणत नाहीं. इतिहास हें ज्योतिष-शास्त्रासारखें निरीक्षणात्मक शास्त्र नाहीं; किंवा पदार्थविज्ञान आणि रसायन यांसारखें प्रयोगात्मकहि शास्त्र नाहीं. तें **चिकित्साशास्त्र** ( Science of criticism ) आहे. या शास्त्रांत तीन गोष्टी करायच्या असतात. (१) सर्व संबंधित गोष्टींचा काळजीपूर्वक शोध, ( २ ) त्या गोष्टी ( म्हणजे ऐतिहासिक घटना) कितपत खऱ्या, संभवनीय किंवा अजिबात खोट्या आहेत याविषयीं कसून तपासणी, आणि (३) त्या ऐतिहासिक घटनांचा अर्थ (Interpretation).

ऐतिहासिक सत्याच्या शोधार्थ निघालें असतां वरील तीन पथ्यें सांभाळलींच पाहिजेत. आणि या शोधाच्या मोहिमेमध्यें असतांना दृष्टि कोणत्याहि प्रकारें पूर्वग्रहदूषित असतां कामा नये.

इतिहासाला आम्ही शास्त्र म्हणतों याचा अर्थ एवढाच. ( अ ) इतिहासाचें उद्दिष्ट सत्याचा शोध असलें पाहिजे आणि शास्त्रीय इतिहासकाराची दृष्टि शास्त्रीय म्हणजेच वस्तुनिष्ठ असली पाहिजे. इतिहासकाराला अमक्या अमक्या परिस्थितींत अमकी अमकी ऐतिहासिक घटना घडेल असें भविष्य सांगतां येणार नाहीं, हें आम्हांलाहि मान्य आहे. परंतु शास्त्रीय पद्धतीनें तपासणी करून जें ऐतिहासिक ज्ञान उपलब्ध होईल तें शास्त्रीय नाहीं असें म्हणणें चुकीचें ठरेल. शास्त्राची पदवी मिळण्यासाठीं सामान्य सिद्धान्त प्रस्थापित करतां आलेच पाहिजेत असें नाहीं. हक्सले हा प्रसिद्ध शास्त्रवेत्ता म्हणतो, ' तावून सुलाखून निवडलेल्या साधनांच्या आधारानें आणि विवेकबुद्धीची कसोटी लावून जें ज्ञान मिळतें तें शास्त्रीयच असतें. ' इतिहासाला हक्सलेची ही कसोटी लागू पडते आणि म्हणून त्याला शास्त्र म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं.

जे इतिहासाचे अभ्यासक कलाप्रेमी आहेत त्यांची या बाबतींत भूमिका अगदीं सरळ आणि सीधी आहे. त्यांचें म्हणणें असें आहे; इतिहास हें शास्त्र असो वा नसो, आम्हांला त्या शुष्क वादांत पडायचें नाहीं. इतिहास ही एक कला आहे आणि तो मुख्यतः कलाच राहिला पाहिजे; म्हणजे त्याची रचना कलात्मकच झाली

पाहिजे. शास्त्राच्या भट्टींत ( किंवा सरणावर म्हणा ) इतिहासाला खुपसलें तर तो चांगला तावून सुलाखून निघेल; परंतु चितेंत जळणाऱ्या प्रेताची जी गति होते तीच गति शास्त्रीय भट्टींत जळणाऱ्या इतिहासाची होईल. त्या दाहक भट्टींत मेद, मांस, मज्जा सर्वच भस्मसात् होतील. फक्त खरपूस भाजलेलीं हाडें मात्र हातीं येतील. आम्हांला इतिहासाची अशी दशा करायची नाहीं. इतिहास हा जिवंत माणसांनीं घडलेला असतो. माणसाचा ध्येयवाद, भावना यांची प्रेरणा, ऐतिहासिक घटनांच्या मागें आणि भोवतीं असते. जिवंत माणसांनीं निर्माण केलेला इतिहाससुद्धां जिवंतच असला पाहिजे आणि त्याची रचना आणि उभारणी करतांना इतिहासकारांनीं कलाकार बनलें पाहिजे. कवीची कल्पकता आणि व्यापक सहानुभूति यांचा त्यांनीं अवलंब केला पाहिजे. असें झालें नाहीं आणि इतिहास केवळ रसायन किंवा पदार्थविज्ञान या शास्त्रांसारखा कोरडा, शुष्क, निर्विकार, निर्गुण झाला तर अशा शास्त्रीय इतिहासाची आम्हांला गरज नाहीं. आमच्या मुलांना आम्ही त्यापेक्षां दुसरा विषय शिकवूं. मुलांच्या संवेदनाक्षम मनावर जर योग्य संस्कार करावयाचे असतील, त्यांच्या भावनांचा परिपोष करायचा असेल, त्यांना आपला देश आणि आपले पूर्वज यांविषयीं निष्ठा आणि प्रेम उत्पन्न व्हावें अशी जर इतिहासापासून तुमची अपेक्षा असेल ( आणि ती असलीच पाहिजे ) तर मुलांच्या हातीं द्यावयाचा इतिहास सुंदर झाला पाहिजे, जिवंत झाला पाहिजे आणि म्हणूनच तो कलात्मक आणि कलाप्रधान झाला पाहिजे.

कलाप्रेमी ऐतिहासिकांचा हा दावा अगदीं बरोबर आहे. इतिहास हा जिवंत माणसांनीं घडला आहे आणि म्हणून तें भूतकालाचें जिवंत असें चित्रच असायला हवें, हें मान्य केलेंच पाहिजे. एतदर्थ इतिहासाच्या रचनेंत कांहीं इष्ट असे वाङ्मयीन गुण अवश्य आले पाहिजेत आणि इतिहास ही अवश्यमेव कलाकृति झाली पाहिजे.

आतां येथें एक भानगड उपस्थित झाली. आपण इतिहास हें शास्त्र आहे आणि त्यानें शास्त्राचीं अवश्य तीं पथ्यें पाळलीं पाहिजेत, हें पूर्वींच मान्य करून चुकलों आहोंत आणि आतां इतिहास ही कला असावी हेंहि आपण मान्य करतों. प्रश्न असा आहे कीं शास्त्रीयत्व आणि कलात्मकता या दोन्ही परस्पर विसंगत गोष्टी इतिहासाच्या ठायीं कशा संभवतील ? या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं **इतिहास हें शास्त्र आहे आणि कलाहि आहे.** भूतकालीन **सत्याचा शोध**

या दृष्टीनें इतिहास शास्त्र आहे. शास्त्रीय पद्धतीनें आणि कसोटीनें सांपडलेल्या सत्याचें **सुंदर चित्रण** या दृष्टीनें इतिहास ही कला आहे. थोडा स्वयंपाकघरांतला दाखला घेऊं. कोणचे पदार्थ खायचे हें अन्नशास्त्राच्या कसोटीनें ठरल्यावर त्याची पाकनिष्पत्ति कुशल गृहिणी रुचकर पद्धतीनें करील. म्हणजे शास्त्रानें बाजारहाट करायचा, पदार्थ निवडायचे आणि कलेनें ते रांधायचे. याप्रमाणें एकमेकांच्या क्षेत्रांत अतिक्रमण न करतां दोघांनीं आपापलीं कामें बिनबोभाट वांटून घ्यावीं.

इतिहास हें शास्त्र आहे का कला आहे या प्रश्नावर विनाकारण वादविवाद झाले. आणि याचें मुख्य कारण दोन भिन्न वस्तूंना व्यक्त करण्यासाठीं इतिहास हा एकच शब्द आपण वापरतों. इंग्रजींत इतिहासाला ‘ हिस्टरी ’ हा शब्द आहे. या इंग्रजी शब्दाचें मूळ Historia या ग्रीक शब्दांत आहे. Historia या शब्दाचा अर्थ ‘ सत्याचा शोध ’ असाच आहे. जर ‘ हिस्टरी ’ हा शब्द या मूळ अर्थींच वापरला असता आणि प्रत्यक्ष इतिहासरचनेसाठीं वेगळ्या शब्दाचा वापर केला असता तर गैरसमज झाले नसते, आणि भांडणेंहि उपस्थित झालीं नसतीं. अलीकडे प्रत्यक्ष इतिहासलेखनाला ( वरचा दाखला परत घ्यायचा झाल्यास पाकनिष्पत्तीला ) Historiography हा शब्द वापरूं लागले आहेत. History म्हणजे इतिहासशास्त्र व Historiography म्हणजे इतिहासकला असें आपण समजलों आणि दोघांनाहि वेगवेगळीं कामें सोपवून दिलीं व पृथक् ठेवलें म्हणजे सर्व यथास्थित चालेल; घोटाळे होणार नाहींत. आपण जो इतिहास हा शब्द वापरतों त्याचा अर्थ “ असें असें झालें ” असा आहे. आणि त्यांत शास्त्रीय दृष्टि अभिप्रेत आहे, ही एक समाधानाची गोष्ट आहे. हवें तर या शब्दाच्या जोडीला इतिहासाची लेखनकला व्यक्त करण्यासाठीं दुसरा एकादा शब्द तयार करावा.

आपल्याला शास्त्र आणि कला या इतिहासाच्या दोन्ही बाजूंची आवश्यकता आहे. आपल्याला भूतकाळाचें यथार्थज्ञान हवें आहे. भूतकाळापासून कांहीं बोध घ्यायचा असेल तर त्या काळांत निश्चितपणें काय काय घडलें याची आपल्याला बिनचूक माहिती मिळाली पाहिजे. तेथें कल्पनेची आणि असत्याची भेसळ असतां कामा नये. कल्पनेला आणि दुसऱ्या अन्य अशास्त्रीय भावनांना इतिहासांत स्थान दिलें कीं त्या अरेबियन नाइट्स्‌मधल्या म्हाताऱ्याप्रमाणें इतिहासाच्या मानगुटीला बसतील आणि इतिहासाची कादंबरी बनवतील. आपल्याला तें नको

आहे. आपल्याला सत्य पाहिजे आणि आपल्याला तें सत्य सुंदर रीतीनें, कलात्मक पद्धतीनें कथन केलेलें पाहिजे. सत्य रूक्ष असतें आणि असलें पाहिजे, हा समज चुकीचा आहे. आपल्या संस्कृतींत सत्यं, शिवं, सुंदरम् या त्रिमूर्तींचें ऐक्य आहे. इतिहासानें सत्य सुंदर रीतीनें व्यक्त केलें पाहिजे. तरच त्या सत्याचे मनावर योग्य ते संस्कार होतील.

● ● ●

## प्रकरण तिसरें

# इतिहासाचें उद्दिष्ट आणि फळ

आपण इतिहास कां शिकवितों, हा प्रश्न कधीं मनाला विचारून पाहिला आहे का? तसा प्रश्न मनाला विचारला तर हमखास एकच उत्तर येईल असें नाहीं. वेगवेगळया माणसांना वेगवेगळीं उत्तरें सुचण्याचा संभव आहे. इतिहास म्हणजे नक्की काय याविषयीं जसे निरनिराळे गैरसमज आहेत तसे इतिहास कशासाठीं शिकवायचा याविषयींहि अनेक गैरसमज आहेत. किंबहुना इतिहास म्हणजे काय याविषयीं स्पष्ट आणि यथार्थ कल्पना नसल्यामुळेंच तो कां शिकवायचा याविषयीं मतभेद संभवतात आणि गैरसमज उत्पन्न होतात.

इतिहासाच्या प्रयोजनाचा विचार करतांना एक घोटाळा प्रथमपासूनच दूर केला पाहिजे. इतिहास शिकविण्याचें प्रयोजन किंवा उद्दिष्ट आणि प्रत्यक्ष इतिहास शिकवितांना किंवा शिकवून झाल्यावर हातीं पडणारें फळ या दोन भिन्न गोष्टी आहेत. कांहीं प्रसंगीं उद्दिष्ट आणि फळ एकच असूं शकेल. परंतु नेहमींच तसें घडेल असें नाहीं; हा अनुभव आपल्याला पदोपदीं येत असतो. आपण उराशीं एखादा हेतु बाळगून एखादी गोष्ट करायला जातो; कांहीं वेळां आपल्याला जें हवें असतें तेंच नेमकें मिळतें; परंतु पुष्कळ वेळां जें फळ हातीं येतें तें थोडेंबहुत आपल्या उद्दिष्टापेक्षां वेगळेंच असतें. कधीं कधीं तर अगदीं भिन्न असतें. उद्दिष्ट आणि फळ कशीं भिन्न असतात याचें एक भौगोलिक उदाहरण देतों म्हणजे चटकन् समजेल. कोलंबस भारताच्या शोधासाठीं निघाला. भारत हें त्याचें उद्दिष्ट होतें. प्रत्यक्ष शोध लागला अमेरिकेचा. म्हणजे अमेरिका हें 'फळ' झालें. त्याला चुकून अमेरिका सांपडली हें कांहीं वाईट झालें नाहीं;

बरेंच झालें. परंतु अमेरिका हें त्याचें उद्दिष्ट नव्हतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. याच्या उलट गामाचें उदाहरण. गामाला भारत हवें होतें आणि त्याला नेमकें भारतच मिळालें. गामाच्या बाबतींत उद्दिष्ट आणि फळ एकच झालीं.

हें भाग्य सर्वांनाच लाभत नाहीं. जो बेत करावा तो पुरेपूर सिद्धीस जावा असें जीवनांत घडत असतें तर काय बहार झाली असती! पृथ्वीचें नंदनवन झालें असतें. फकीर अमीर बनले असते. तथापि जें नेमकें हवें असतें तेंच मिळत नाहीं हेंच एकंदरीनें बरें आहे. यामुळेंच ध्येयवाद आणि प्रगति यांना आपल्या जीवनांत स्थान मिळालें आहे. आणि फळाची अनिश्चितता जाणून भगवंतांनींच गीतेंत सांगून टाकलें आहे, "कर्तव्य करीत राहा; फळाची अपेक्षा धरूं नकोस." आपल्या देशांत राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, रानडे, टिळक, गोखले यांनीं भारताच्या स्वातंत्र्याचें उद्दिष्ट उराशीं बाळगून जिवाचें रान केलें. त्या महात्म्यांचें उद्दिष्ट सफल झालें नाहीं. प्रत्यक्ष फळ त्यांना काय मिळालें ? कांहीं किरकोळ तुटपुंज्या सुधारणा. आतां उद्दिष्ट आणि फळ यांतील भेद स्पष्ट झाला असेल असें मी धरून चालतों.

आपण आपल्या शाळांत इतिहास शिकवितों. शिकवितांना आणि शिकविल्यावर आपल्याला नाना प्रकारचीं भलींबुरीं फळें प्राप्त होतात. आपलें उद्दिष्ट कांहीं वेगळेंच असतें. त्या वेगळ्या उद्दिष्टासाठींच आपण इतिहास या विषयाचा अभ्यासक्रमांत समावेश केलेला असतो. पण प्रत्यक्ष वर्गांत उद्दिष्टाप्रमाणेंच फळ मिळत नाहीं. अनेक फळें मिळतात. कमीजास्त महत्त्वाचीं; कांहीं चांगलीं, कांहीं वाईट, असा आपल्याला अनुभव येत असतो.

इतिहासाचें उद्दिष्ट आणि फळ यांमधील भेद आपण कटाक्षानें पाळला पाहिजे. पुष्कळ लोक या दोहोंची गल्लत करतात आणि घोटाळा करून बसतात. इतिहास कां शिकवायचा, त्याचें प्रयोजन काय हा प्रश्न विचारला असतां अनेक लोक जीं वेगवेगळीं उत्तरें देतात त्यांवरूनच त्यांच्या मनांत उद्दिष्ट आणि फळ यांविषयीं कसा गोंधळ असतो तें दिसून येतें.

कांहीं संभाव्य उत्तरें खालीं नमूद केलीं आहेत: (१) विद्यार्थ्यांची स्मरणशक्ति, कल्पकता, तर्कशक्ति यांचा विकास करणें हेंच इतिहासशिक्षणाचें उद्दिष्ट आहे. (२) इतिहास आपण त्याच्या **नैतिक मूल्यांसाठीं** शिकविला पाहिजे. इतिहासांत चांगल्या माणसांना सद्गति मिळते, दुष्टांचा नाश होतो. एतदर्थ

ऐतिहासिक घटनांवरून प्रत्यक्ष नीतीचे पाठ देतां येतील. (३) मुलांच्या मनांत देशभक्तीचा विकास होण्यासाठीं आपण इतिहास शिकवावा. आपल्या मुलांना इतिहासावरून आपल्या मातृभूमीच्या उज्ज्वल भूतकालाचें दर्शन घडलें पाहिजे आणि मातृभूमीबद्दल प्रेम व पूर्वजांबद्दल अभिमान त्यांच्या मनांत उत्पन्न झाला पाहिजे. (४) प्रचलित राज्यसत्तेबद्दल आदर आणि सहानुभूति मुलांच्या मनांत उत्पन्न करणें हा इतिहासशिक्षणाचा एक हेतु असावा. (५) इतिहास म्हणजे भूतकाळांत जमा झालेलें राजकारण आणि म्हणून आपले भावी मुत्सद्दी आणि राजकारणी पुरुष तयार करणें हें इतिहासाचें प्रयोजन असावें.

आणखीहि कांहीं उत्तरें मिळूं शकतील; पण एवढीं पुरे. आतां प्रश्न असा आहे; वर निर्दिष्ट केलेले इतिहासशिक्षणाचे पांच हेतु उद्दिष्ट स्वरूपाचे आहेत का फल-स्वरूपाचे आहेत? इतिहास शिकविण्याचें हेंच एक उद्दिष्ट आहे असें त्यांच्यापैकीं कुणाच्या बाबतींत आपण छातीठोकपणानें सांगूं शकतों का? जर हें किंवा यांच्यापैकीं कोणतेंहि एक इतिहासशिक्षणाचें उद्दिष्ट आहे असें आपण मानलें तर आपल्यावर एक जबाबदारी पडते. आपल्याला असें सिद्ध करावें लागेल कीं केवळ या एका किंवा अनेक उद्दिष्टांसाठींच आपण इतिहास शिकवितों आणि केवळ इतिहास या विषयाकडूनच हीं उद्दिष्टें विशेषत्वानें साध्य होण्यासारखीं आहेत. जर आपल्याला असें दिसून आलें कीं इतिहास शिकवितांना केवळ अनुषंगिक फळ म्हणून वरील हेतू साध्य होत असले तर मग त्यांना विशेष महत्त्व देण्याचें कारण नाहीं. कारण उद्दिष्टासाठीं आपल्याला दुसरीकडे पाहावें लागेल. इतिहास कोणता शिकवायचा, कसा शिकवायचा, इतिहास शिकवितांना दृष्टि कशी ठेवायची, या सर्व गोष्टी इतिहासाचें उद्दिष्ट काय यावर अवलंबून असतात, फळांवर अवलंबून नसतात. फळें अनुषंगिक असतात; उद्दिष्ट हा प्रधान हेतु असतो, प्रेरणा असते.

आतां आपण वरील पांच उत्तरांची तपासणी करूं या. ही तपासणी करतांना आपण दोन प्रश्न विचारले पाहिजेतः (१) इतिहासशिक्षणाचे हे हेतु 'उद्दिष्टें' मानण्याइतक्या लायकीचे आहेत का? (२) हे हेतु इतर दुसऱ्या शालेय विषयांपासून साध्य होण्यासारखे आहेत का?

(१) आतां पहिला हेतु घ्या. आपण मुलांची **स्मरणशक्ति** वाढण्यासाठींच इतिहास शिकवितों काय? स्मरणशक्तीची जोपासना करणें हें काय उच्च दर्जाचें

प्रयोजन आहे ? गणित, भूगोल यांसारखे इतर विषय स्मरणशक्तीस अधिक पोषक नाहींत काय? आपल्याला हें कबूल करावें लागेल कीं बहुतेक शालेय विषय मुलांच्या स्मरणशक्तीची दखल घेतात. त्यासाठीं इतिहास या विषयाचीच निवड करण्याचें कारण नाहीं.

आतां **कल्पनाशक्ति** आणि **तर्कशक्ति** यांचा विचार करूं. इतिहास मुलांना अज्ञात अशा भूतकालाचा व त्यांतील बहुविध जीवनाचा परिचय करून देतो आणि कल्पनाशक्तीचा यथायोग्य परामर्श घेतो. परंतु वाङ्मयसुद्धां हेंच कार्य करतें. किंबहुना इतिहासापेक्षां वाङ्मय कल्पनाशक्तीचा अधिक विकास करूं शकतें, हें सर्वमान्य आहे. त्याचप्रमाणें इतिहासापेक्षां गणितशास्त्र कितीतरी पटीनें तर्कशक्तीचा विकास करूं शकतें हेंहि सर्वमान्य आहे. साहजिकच स्मरणशक्ति, कल्पनाशक्ति आणि तर्कशक्ति यांचा विचार हें इतिहासशिक्षणाचें उद्दिष्ट होऊं शकत नाहीं. तीं इतिहासशिक्षणाचीं फळें अवश्य आहेत, उद्दिष्टें नाहींत.

( २ ) आपण नीतीचे धडे देण्यासाठीं इतिहास शिकवावा काय? इतिहास मोठमोठ्या महात्म्यांची कहाणी सांगतो, त्यांचें उदात्त जीवन, त्यांचे स्वार्थत्याग, त्यांनीं केलेलीं अद्भुत कृत्यें यांचें दर्शन घडवितो. इतिहास सज्जनांचा अंतिम विजय आणि दुर्जनांचा पराभव कसा झाला हेंहि दाखवतो असें म्हणतात.

हें म्हणणें खरें नाहीं. इतिहास वस्तुनिष्ठ आणि प्रामाणिक असेल तर तो आपल्याला आणि आपल्या मुलांना स्पष्ट सांगेल, "बाबांनो, सज्जनांना निदान या इहलोकांत सद्गति मिळते व दुर्जनांना दुर्गति मिळते, हें खरें नाहीं. कधीं कधीं मिळते पण बहुतेक तसें घडत नाहीं."

इतिहासाचें हें म्हणणें कबूल केलें पाहिजे. या जगांत महात्म्यांना क्वचितच विजय मिळाले आहेत. कुणाला विष खावें लागलें आहे, कुणाला गोळ्या. कुणाला बळी जावें लागलें आहे. पुष्कळांची समकालीन समाजाकडून अवहेलनाच झाली आहे. हुतात्मा हा शब्द काय सांगतो? मोठ्या माणसांना आपल्या उद्दिष्टांसाठीं प्राण द्यावे लागले आहेत! आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं पुष्कळांच्या बाबतींत प्राणाहुति देऊन सुद्धां ध्येयपूर्ति झाली नाहीं. लोकांनीं घटकाभर त्यांच्या हौतात्म्याचें कौतुक केलें आणि त्यांना ते विसरून गेले. उलट अनेक दुर्जनांचा इतिहासांत विजय झाला आहे. लाखों माणसांची हत्या करणाऱ्या वीरांनीं

साम्राज्यें स्थापन केलीं आहेत. यांपैकीं कांहीं जणांनीं चांगल्या प्रकारें कारभार चालविला आहे. अनेक ज्ञानी पुरुषांचें, कलावंतांचें, संशोधकांचें खाजगी जीवन फारसें चांगलें नव्हतें. तेव्हां नीतिपाठासाठीं इतिहास शिकविणें थोडें गैर-सोयीचेंच होणार आहे. हा धोका आपण पत्करूं नये.

( ३ ) देशभक्तीच्या जोपासनेसाठीं इतिहास शिकवावा काय? हा हेतु खरोखर उदात्त आहे. आणि इतिहासापासून तो विशेषत्वानें साध्य होण्याजोगा आहे हें मान्य केलें पाहिजे.

परंतु देशभक्तीला इतिहासशिक्षणांत आपण **प्रधान** स्थान दिलें तर इतिहास हें शास्त्र आहे हें तत्त्व आपल्याला सोडावें लागेल. मुलांच्या मनांत देशभक्ति रुजवायची हाच प्रधान हेतु मानला तर मग इतिहासाच्या साधनांचा काळजी-पूर्वक तपास, त्यांची निवड आणि मूल्यमापन हीं शास्त्रीय पथ्यें पाळण्याचें कांहीं कारण उरत नाहीं. देशभक्ति हाच प्रधान हेतु असेल तर मग त्या इतिहासांत अद्भुत कृत्यें, अवास्तव घटना, वीरश्रीचे काल्पनिक संवाद यांना महत्त्वाचें स्थान मिळेल आणि इतिहासाचें रूपांतर कादंबरींत होईल. देश-भक्ति हेंच मुख्य प्रयोजन ठरलें तर आपल्या मातृभूमीच्या भूतकालीन घडामोडींत जें चांगलें आहे, स्फूर्तिदायक आहे तेवढेंच निवडावें लागेल; जें अनिष्ट किंवा लाजिरवाणें आहे तें टाळावें लागेल. रणांगणावरील विजय निवडावे लागतील, पराभव टाळावे लागतील. पुरूचा अलेक्झांडरच्या हातून झालेला झेलमकांठचा पराभव, पृथ्वीराज चव्हाणाचा महंमद घोरीकडून झालेला पराभव, पानपतचीं सारीं अपेशीं युद्धें, १८५७ चा उठाव—सारें काढावें लागेल. इतिहासांतले देशद्रोह टाळावे लागतील. कदाचित् अनर्थ टाळावे लागतील.

दुसरीहि एक अडचण आहे. प्रत्येक देशानें माझाच देश चांगला या दृष्टीनें आपला इतिहास देशभक्तीच्या भूमिकेवरून तयार करायचा आग्रह धरल्यास अराजक माजेल आणि खरा इतिहास काय याची कल्पना करणें अशक्य होईल. गेल्या चाळीस पन्नास वर्षांतला इतिहास घ्या. ह्या काळांत इंग्लंड आणि फ्रान्स एका बाजूस व जर्मनी दुसऱ्या बाजूस अशीं दोन महायुद्धें झालीं. या दोन महायुद्धांचे अधिकृत इतिहास त्या त्या राष्ट्रानें लिहिले आहेत. ते एकमेकांच्या अगदीं उलट आहेत. युद्धाचीं कारणें आणि त्यांतील प्रसंग याविषयीं जर्मनीची कैफियत वेगळी आणि इंग्लंडची वेगळी. त्यांत मेळ बसत नाहीं. कारण उघड

आहे. या अधिकृत इतिहासाचें उद्दिष्ट आपापल्या देशांची वकिली करणें हेंच आहे. आणि म्हणून यांत कमीजास्ती प्रमाणांत सत्याचे बेमालूम रीतीनें खून पडले आहेत. सत्य हें आपलें अधिदैवत आहे. त्याला दूर लोटून स्वदेश आणि स्वदेशभक्ति यांना आपल्याला सिंहासनावर बसवायचें नाहीं. त्यांना आपण महत्त्वाचें स्थान अवश्य देऊं. त्याची आपण वेळोवेळीं दखल घेऊं. परंतु सत्य आणि स्वदेशनिष्ठा यांच्यांत ज्या ज्या प्रसंगीं विसंगति व वितुष्ट निर्माण होईल तेव्हां तेव्हां आपण सत्यनिष्ठाच स्वीकारूं. किंबहुना सत्यनिष्ठा ही खऱ्या देशनिष्ठेंत अभिप्रेतच असते.

वरील विवेचनाचा अर्थ थोडा जपूनच घ्यावा. या विवेचनाचा अर्थ एवढाच समजायचा कीं स्वदेशाचा इतिहास लिहितांना किंवा शिकवितांना खोटें लिहूं नये आणि बोलूं नये. जें खरें असेल तेंच सांगावें. My country, right or wrong अशी इंग्रजींत एक म्हण आहे; तिचा अर्थ माझ्या देशानें कोणतीहि आणि कितीहि चूक केली असली तरी त्यानें जें केलें तें बरोबरच आहे आणि त्याची मी एकनिष्ठेनें तरफदारी करणार; अशी वकिली बाण्याची भूमिका शास्त्रीय इतिहासाला मंजूर नाहीं हें उघड आहे.

आतां प्रश्न असा आहे कीं इतिहासांत स्वदेशप्रीतीला कांहीं स्थान आणि वाव नाहींच काय? याचें उत्तर 'भरपूर स्थान आणि वाव आहे' हेंच आहे. आपल्या देशाचेंच उदाहरण घ्या. आपल्या इतिहासांत आपल्या विद्यार्थ्यांना अभिमान वाटावा आणि स्फूर्ति मिळावी अशा किती तरी गोष्टी आहेत आणि व्यक्ति आहेत. त्यांच्याविषयीं लिहितांना किंवा बोलतांना आपण सुंदर असें भावनिक वातावरण उत्पन्न केलें पाहिजे. थोडें रंगलें पाहिजे आणि मुलांना रंगविलें पाहिजे. ऐतिहासिक काव्यांचा, बखरींचा आणि पोवाड्यांचा उपयोग केला पाहिजे. या योगानें मुलांच्या मनांत स्वदेशप्रीतीचें बीज अवश्य रुजेल.

आपल्या देशाच्या हातून इतर देशांप्रमाणें अनेक चुकाहि घडल्या आहेत. आपले अनेक वेळां पराजय झाले आहेत. आपण जवळजवळ नेहमींच आपसांत भांडत आलों आहोंत. अनेक प्रसंगीं आपल्या इतिहासांत स्वदेशद्रोही निपजले आहेत आणि ते शत्रूस मिळाले आहेत. त्याचप्रमाणें अनेक युद्धांत आपल्या सैन्यांत शिस्तीचा अभाव होता आणि जवळ प्रभावी शस्त्रास्त्रें नव्हतीं. या अशा व्यंगांची इतिहासकारानें दखल घ्यावी कीं नाहीं? हे दोष अनुल्लेखानें टाळावे

का त्यावर पांघरूण घालावें? हे दोन्हीहि प्रकार आपण इतिहासाची जी शास्त्रीय भूमिका पतकरली आहे तिला विसंगत आहेत. इतिहासकारानें आपल्या इतिहासांत आपल्या पूर्वजांकडून ज्या कांहीं चुका घडल्या असतील त्या प्रांजलपणें कबूल केल्या पाहिजेत आणि त्या स्पष्टपणें मुलांच्या समोर मांडल्या पाहिजेत. मात्र हें करतांना त्याची भूमिका आणि दृष्टि त्रयस्थाची नसावी. या चुका आपल्याच बापजाद्यांनीं केल्या, त्यांचें प्रायश्चित्त त्यांना मिळालें, त्यांच्या वारसांना मिळालें आणि कमीजास्ती प्रमाणांत आपल्यालाहि मिळत आहे. आपल्या वाडवडिलांच्या चुका म्हणजे एका अर्थानें त्या आपल्याच चुका. आपण त्या पतकरल्या पाहिजेत. त्या चुकांपासून आपण धडा घेतला पाहिजे, तशा चुका आपल्या हातून होतां कामा नये अशी खबरदारी घेतली पाहिजे, हें कळकळीनें मुलांना सांगितलें पाहिजे. लॉर्ड ॲक्टन या इतिहासक्षेत्रांतल्या प्रसिद्ध तत्त्वज्ञाचें एक सुभाषित अशा प्रसंगीं मुलांना हमेशा सांगितलें पाहिजे. लॉर्ड ॲक्टन म्हणतो, "If the past has been an obstacle and a burden, knowledge of the past is the safest and surest emancipation." या गतकाळच्या पापांच्या व दोषांच्या ओझ्यापासून **मुक्त** होण्यासाठीं आपल्याला इतिहास शिकायचा असतो. अशीं पथ्यें पाळलीं म्हणजे इतिहासाच्या अध्यापनांत स्वदेशप्रीतीला आणि निष्ठेला महत्त्वाचें स्थान इतिहासकाराला अवश्य देतां येईल.

देशाबरोबर परदेश येतातच. कोणताहि देश स्वयंपूर्ण, बंदिस्त आणि अलिप्त असा नसतो. आपला भारत तर असा कधींच नव्हता. इतिहास सुरू झाला तेव्हां-पासून म्हणजे पांच हजार वर्षांपूर्वींपासून भारताचे अनेक देशांशीं संबंध आले आहेत. या पांच हजार वर्षांत लक्षावधि भारतीय अनेक परदेशांत गेले आहेत आणि लक्षावधि परके भारतांत आले आहेत व त्यांत मिसळून गेले आहेत. भारतांत अनेक वेळां परचक्रें आलीं आणि परक्यांपुढें भारताला नमावेंहि लागलें आहे. इतर देशांशीं आलेले संबंधसुद्धां सत्याच्याच भूमिकेवरून सांगितले पाहिजेत. परदेशांची बाजू केवळ वाईट रंगवायची आणि स्वदेशाला वेळीं अवेळीं सावरून धरायचें अशी वृत्ति आपण टाळली पाहिजे. परक्यांनीं आपले पराभव केले, आपल्यावर राज्यसत्ता प्रस्थापित केली आणि अनेक वर्षें ती टिकविली, ही इतिहासांतील वस्तुस्थिति आहे. तेव्हां या परकी लोकांमध्यें कांहीं प्रभावी असे

चांगले गुण अवश्य असले पाहिजेत. आणि आपल्या लोकांत त्या गुणांचा अभाव असला पाहिजे, हें आपण मोकळ्या मनानें मुलांना सांगितलें पाहिजे.

आधुनिक जगांत प्रचाराचीं साधनें फार वाढलीं आहेत. त्या साधनांचा आणि वाढत्या ज्ञानाचा उपयोग अलीकडे खोटे इतिहास बेमालूम रीतीनें तयार करण्यांत अनेक राष्ट्रांनीं केला आहे. आपल्याला प्रतिकूल असे पुरावे नाहींसे केले आहेत किंवा अनुल्लेखानें टाळले आहेत. गेल्या दोन महायुद्धांचे वेगवेगळ्या राष्ट्रांनीं तयार केलेले अधिकृत इतिहास वाचले म्हणजे हें सारें स्पष्ट होतें.

अलीकडे समंजस लोकांना खोटे इतिहास लिहिण्याचा आणि वाचण्याचा वीट आला आहे. आपल्या मुलांच्या मनांत परदेशांविषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न व्हावी आणि ती वाढीस लागावी हें त्या भल्या लोकांना मान्य नाहीं. त्यांना असें वाटतें कीं मुलांना लहानपणापासून असा इतिहास शिकवावा कीं ज्यामुळें त्यांच्या मनांत जगांतल्या सर्व देशांविषयीं सद्भावना आणि सहानुभूति उत्पन्न होईल. नुसता स्वदेशाचाच इतिहास वेगवेगळ्या प्रकारांनीं वारंवार उगळीत बसण्यापेक्षां जगाचा इतिहास लहानपणींच मुलांना सांगावा आणि त्या इतिहासांत जगांतल्या सर्व प्रगत राष्ट्रांनीं ज्ञानाच्या आणि कलांच्या संवर्धनासाठीं महत्त्वाची कामगिरी कशी बजावली आहे हें मुलांना समजावून द्यावें, असें या ज्ञानी माणसांचें म्हणणें आहे. राष्ट्रसंघाच्या सदस्यांवर या लोकांच्या विचारसणीचा योग्य तो प्रभाव पडला आणि राष्ट्रसंघानें " युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक ॲन्ड कल्चरल ऑर्गनायझेशन " ( म्हणजे थोडक्यांत 'युनेस्को' ) या नांवाची जी समिति स्थापन केली तिनें इतिहासाचें अभ्यासक्रम आणि क्रमिक पुस्तकें यांचा या भूमिकेवरून विचार केला. प्रत्येक राष्ट्र आपला इतिहास आपल्याच दृष्टीनें खुलवून लिहूं लागलें तर त्याचा परिणाम इतर राष्ट्रांविषयीं अज्ञान, गैरसमज आणि तेढ उत्पन्न होण्यांतच होतो असा आजवरचा अनुभव असल्यानें 'युनेस्को'नें इतिहासाचा अभ्यासक्रम कसा असावा, क्रमिक पुस्तकें कशीं लिहावीं यांविषयीं चर्चा करून फार चांगल्या पुस्तिका[१] प्रकाशित केल्या आहेत.

१ (अ) " History Text Books and International Understanding " by .A. Lauwerys

(ब) " Suggetions on the Teaching of History " by C . Hill

इतिहास लिहितांना आणि शिकवितांना International understanding हें उद्दिष्ट समोर ठेवावें, असा युनेस्कोचा आग्रह आहे आणि तो योग्यच आहे. understanding म्हणजे ज्ञान. स्वदेशाप्रमाणें इतर देशांचेंहि वास्तविक ज्ञान मुलांना मिळालें पाहिजे. असें ज्ञान मिळालें म्हणजे मग परस्परांविषयींचा गैरसमज, तेढ, किंवा द्वेष या भावनांना स्थान मिळणार नाहीं अशी युनेस्कोची अपेक्षा आहे. वेगवेगळ्या राष्ट्रांचें मुलांना ज्ञान द्यावयाचें म्हणजे त्या राष्ट्रांकडून जगाच्या इतिहासांत ज्या नांवाजण्यासारख्या गोष्टी घडल्या असतील त्या अवश्य निवडल्या पाहिजेत आणि त्या मुलांना सांगितल्या पाहिजेत. शहाणपणाचा आणि चांगुलपणाचा मक्ता कोणत्या एकाच राष्ट्राकडे कधीं नव्हता. हे गुण कमी जास्ती प्रमाणांत सर्व राष्ट्रांत दिसून येतात हें इतिहासानें सर्व मुलांना शिकविलें पाहिजे.

गीतेंत भगवंतांनीं, ‘ अवश्य असेल तेव्हां मी वेळोवेळीं अवतार घेतों ’ असें म्हटलें आहे. या दृष्टीनें अनेक संशोधकांनीं, तत्त्वज्ञांनीं, कलाकारांनीं, थोर पुरुषांनीं, अनेक संतांनीं आणि महंतांनीं वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या काळीं अवतार घेतले आहेत. याप्रमाणें कोणत्याहि प्रकारें असत्याचा अवलंब न करतां जागतिक सहकार्याची आणि ऐक्याची उभारणी इतिहासाच्या माध्यमांतून करतां येण्या सारखी आहे ही कल्पना आतां प्रबळ होत चालली आहे. या पुस्तकांत हेंच उद्दिष्ट डोळ्यांपुढें ठेवून जगाचा इतिहास शिक्षणक्रमाच्या आरंभीं व शेवटीं असा दोन वेळां तरी शिकवावा असें सुचविलें आहे. युनेस्कोनें आंतरराष्ट्रीयतेच्या भूमिकेवरून जगाच्या इतिहासाचा एक अभ्यासक्रम तयार केला आहे. त्याच्यांत आपल्या सोयीप्रमाणें योग्य ते बदल करून प्रकरण ६ परिशिष्ट ‘ ब ’ यांत तो दिला आहे, तो अवश्य पहावा.

तेव्हां स्वदेशप्रीति आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सहकार हीं उद्दिष्टे इतिहासाच्या अध्यापनांत डोळ्यांसमोर ठेवण्यासारखीं आहेत. मात्र हीं उद्दिष्टे दुय्यम असलीं पाहिजेत व एका सर्वव्यापी व सर्वसमावेशक अशा प्रधान उद्दिष्टाला तीं पूरक आणि पोषक अशींच असलीं पाहिजेत. त्या प्रधान उद्दिष्टाचा आपण लवकरच विचार करूं.

(४) प्रचलित राज्यसत्तेच्या स्वास्थ्यासाठीं आपण इतिहास शिकवावा काय? आपली सध्याची जी राज्यसत्ता असेल, जे राज्यकर्ते असतील त्यांच्याविषयीं

मुलांच्या मनांत सद्भाव आणि सहानुभूति उत्पन्न व्हावी हें उद्दिष्ट योग्य होईल काय ? अलबत् नाहीं. आपण स्वदेशासारख्या उज्ज्वल आणि उदात्त उद्दिष्टाला जेथें प्रधान स्थान देण्यास तयार नाहीं तेथें प्रचलित राज्यसत्तेची काय मातबरी ? राज्यकर्ते येतील आणि जातील; आपापल्या पक्षांच्या धोरणाप्रमाणें राज्यकारभार करतील, खुर्च्यांवर बसतील, वेळ आली म्हणजे खुर्च्या रिकाम्या करतील. पण सत्य अमर आहे. सत्य असें थोड्या काळाकरितां अधिकारारूढ होत नसतें आणि म्हणून प्रचलित राज्यसत्तेविषयीचा प्रचार हें उद्दिष्ट आपण कधींहि पतकरतां कामा नये.

(५) इतिहासाचा वर्ग हा भावी राजकारणी पुरुष तयार करण्याचा आखाडा बनवावा काय ? पूर्वी इतिहासशिक्षणाचा नेमका हाच हेतु होता. सर्वसामान्य शाळांत इतिहास या विषयाचा प्रवेश होण्यापूर्वी राजपुत्रांना राजवाड्यांत इतिहास शिकविला जात असे. त्याचप्रमाणें भावी सेनापति विद्यार्थिदशेंत युद्धशास्त्राचा अभ्यास करीत असत. पण ते दिवस गेले. कदाचित् पूर्वींच्या काळीं राजपुरुषांना राजकारणासाठीं इतिहास शिकविणें योग्य होतें. पण आता हा लोकशाहीचा जमाना आहे. आतां मतदानाचा हक्क असलेले सारे नागरिक राजपुरुष आहेत. इतिहास शिकवायचा तो सर्व लोकांना. आतां राजकारण हें इतिहासशिक्षणाचें प्रधान उद्दिष्ट होऊं शकत नाहीं. सुदैवानें थोडेच लोक राजकारणांत पडत असतात. बहुसंख्य लोक इतर चांगल्या व्यवसायांत गुंतलेले असतात. समाजाचें जीवन बहुविध आहे. राजकारण हें केवळ त्याचें एक अंग आहे. सामाजिक जीवनाचीं सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, औद्योगिक अशीं कितीतरी कमी जास्त महत्त्वाचीं अंगें आहेत. इतिहासानें या सर्व अंगांचा यथायोग्य परामर्श घेतला पाहिजे आणि म्हणून आपण नुसता राजकीय इतिहास शिकवितां कामा नये. आपल्या मुलांना समाजाचें साकल्यानें दर्शन झालें पाहिजे.

याप्रमाणें इतिहास शिकविण्याचें प्रयोजन काय असा प्रश्न विचारला असतां सामान्यतः जीं उत्तरें संभवतात त्यांची आपण येथपर्यंत वासलात लावली. वर निर्दिष्ट केलेले कोणतेच हेतु इतिहासशिक्षणाचें उद्दिष्ट होण्याच्या लायकीचे नाहींत. त्यांच्यांत तें सामर्थ्य नाहीं. फार तर इतिहास-शिक्षणाचीं तीं अनुषंगिक फळें होऊं शकतील. इतिहास लिहिणारा प्रतिभावान लेखक आणि इतिहास शिकविणारा कल्पक शिक्षक अनुकूल प्रसंगीं हीं फळें उपलब्ध करून देईल. स्वदेशप्रीति आणि आंतरराष्ट्रीय ऐक्य या गोष्टी महत्त्वाच्या असल्या आणि त्यांना

दुय्यम उद्दिष्टांचें स्थान देतां येण्यासारखें असलें तरी तींसुद्धां प्रधान उद्दिष्टें होऊं शकत नाहींत. एवंच, उद्दिष्टासाठीं आपल्याला दुसरीकडे पाहिलें पाहिजे.

इतिहास हें शास्त्र आहे ही भूमिका स्वीकारणारे तत्त्ववेत्ते इतिहासाचें एकच उद्दिष्ट मान्य करतात. त्यांच्या मतें इतिहासाचा प्रधान हेतु **वर्तमानकाळाचा गुंता** सोडवून **त्याचा उकल** करणें हाच होय. आपला देश, आपले लोक, आपल्या राष्ट्रीय समस्या, आपली राजकीय, सामाजिक, औद्योगिक, परिस्थिति जी आज आपल्या डोळ्यांसमोर दिसते तिचा उगम आणि तिचीं कारणें शोधून काढणें हाच इतिहासाचा प्रधान हेतु असला पाहिजे. आपल्याला वर्तमानकाळांत जगायचें आहे आणि काम करायचें आहे. वर्तमानकालीन अनेक प्रश्न आपल्याला भेडसावीत आहेत. तसे प्रत्येक पिढीलाच ते भेडसावीत असतात. कारण प्रत्येक पिढीच्या स्वतःच्या अशा कांहीं समस्या असतात. या वर्तमान परिस्थितीचा आणि प्रश्नांचा नीट उकल झाल्याखेरीज आपल्याला त्यांची दखल घेतां येणार नाहीं आणि त्यांचा मुकाबला करतां येणार नाहीं.

वर्तमानकाळ हें भूतकाळाचें मूल आहे. भूतकाळांतूनच तो जन्माला आला आहे; किंबहुना वर्तमानकाळ म्हणजेच एका अर्थानें **जिवंत असा भूतकाळ** आहे. कारण भूतकाळांतील जें कांहीं भलेंबुरें टिकण्यासारखें होतें त्या सर्वांचा वर्तमानकाळांत समावेश झालेला असतो. भूतकाळ तसा मरत नसतो. आपण सोयीसाठीं तो होऊन गेला, संपला, नाहींसा झाला, गेला असें म्हणतों. वास्तविक तो नाहींसा होत नाहीं. तो कितीतरी अवशेष पाठीमागें टाकून जात असतो. आणि आपल्या डोळ्यांसमोरचा वर्तमानकाळ हा या भूतकालीन सर्व अवशेषांचा समूह असेंच म्हटलें पाहिजे. वर्तमानकाळांत — वर्तमानकाळाच्या विविध अंगांत — भूतकाळ ओतप्रोत भरला आहे.

आजचा १९५८ सालचा वर्तमानकाळ याच्याकडे ५७ सालचा वारसा आला आहे. ५७ सालांत जें झालें किंवा आपण केलें त्याचे सर्व परिणाम ५८ सालामध्यें आपल्यासमोर उभे आहेत. ५७ साल हें ५६ सालचें मूल आणि वारसदार. याप्रमाणें आपल्याला कार्यकारणभावाच्या आधारानें मागें मागें जावें लागतें. ४७ सालची आपली स्वातंत्र्यप्राप्ति, हिच्या पाठीमागें गांधीजींची तपस्या, त्यापूर्वी लोकमान्यांचे परिश्रम, त्यापूर्वीं रानडे–गोखल्यांची धडपड, त्यापूर्वीं राममोहन रॉय

इत्यादि आरंभींच्या देशभक्तांची अंधारांतील प्राथमिक खटपट; असें हें जाळें लांबपर्यंत मागें मागें पसरलें आहे. स्वातंत्र्यप्राप्ति हा नुसता एक प्रश्न; पण या एका प्रश्नाचा नीट उलगडा करण्यासाठीं आणि गुंता सोडविण्याठीं आपल्याला एक एक पाऊल भूतकाळांत मागें जावें लागतें, तेव्हांच या प्रश्नावर प्रकाश पडतो आणि त्याचें यथार्थ स्वरूप समजतें. स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच देशाची फाळणी झाली. पाकिस्तान झालें. ही हिंदु-मुसलमान समस्या कशी उद्भवली, कशी वाढीस लागली हें समजून घेण्यासाठीं आपल्याला फार मागें जावें लागणार आहे. तुम्हांला कल्पना नाहीं इतकें मागें जावें लागणार आहे.

हिंदु–मुसलमानांचा प्रश्न, जातिभेदाचा प्रश्न, अस्पृश्यतेचा प्रश्न, हे प्रश्न आपल्यासमोर डोंगरासारखे उभे आहेत. आपल्याला ते सोडवायचे आहेत. आणि ते सोडविण्यासाठीं आपल्याला इतिहासाची मदत घेतलीच पाहिजे. कारण भूतकाळानेंच ते आपल्याला बहाल केले आहेत. भूतकाळांत ज्या कारणांमुळें हे प्रश्न उद्भवले आणि वाढीला लागले त्या कारणांकडे आपल्याला वळलें पाहिजे, त्यांचा अभ्यास केला पाहिजे. तरच आजचे आपल्या डोळ्यांसमोरचे प्रश्न आपल्याला सोडवितां येतील.

आपण इतिहासावर सोपविलेली ही कामगिरी फार महत्त्वाची आहे. केवळ भूतकाळांतल्या शिळोप्याच्या गप्पा, अद्भुत कथा यांची इतिहासाकडून आपण अपेक्षा करूं नये. उपयुक्ततावादाच्या दृष्टीनें आपण इतिहासाकडे पाहिलें पाहिजे आणि त्याला राबविलें पाहिजे. वर्तमानकाळाशीं ज्यांचा प्रत्यक्ष कांहींच संबंध जोडला जात नाहीं अशा भूतकाळाशीं आपल्याला कर्तव्य नाहीं आणि म्हणूनच भूतकालीन इतिहासाचा अभ्यासक्रम तयार करतांना फार कसोशीनें ऐतिहासिक घटनांची निवड करावी लागत असते.

कांहीं लोकांना या ऐतिहासिक कार्यकारणभावाचें इतकें महत्त्व वाटत असतें कीं ते म्हणतात, इतिहास कालक्रमाच्या दृष्टीनें उलटा शिकवा. त्यांच्या म्हणण्या-प्रमाणें प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, नंतर अर्वाचीन आणि शेवटीं अर्वाचीन काळामधला वर्तमानकाळ असा क्रम न ठेवतां, आधीं वर्तमानकाळ शिकवावा, नंतर वर्तमानकाळामागील अलीकडचा ताजा भूतकाळ घ्यावा, नंतर त्या पाठीमागील भूतकाळ घ्यावा. याप्रमाणें कारणें शोधीत शोधीत, गुंता उलगडत

उलगडत मागें मागें जावें. या मागें जाण्याच्या परावर्तनपद्धतीचा आपण योग्य वेळीं विचार करूं. सध्यां भूतकाळाचे आणि वर्तमानकाळाचे अन्योन्य संबंध किती जवळचे आहेत हें आपण समजून घेतलें पाहिजे. हें एकदां समजलें म्हणजे वर्तमानकाळाची उकल हेंच इतिहासाचें उद्दिष्ट आहे असें आपल्याला मान्य करावें लागेल.

हें उद्दिष्ट आपण मान्य केलें म्हणजे भारताचा इतिहास म्हणजे भारताच्या सद्यःस्थितीची उकल ही भूमिका आपल्याला घ्यावी लागेल.

● ● ●

## प्रकरण चौथें

# इतिहासाचे प्रकार

गंगा एकच आहे. कोठें तिला गंगा म्हणतात, कोठें भागीरथी, कोठें हुगळी. परंतु उगमापासून मुखापर्यंत सारी गंगाच. त्याचप्रमाणें महाराष्ट्राच्या उत्तरेपासून थेट कन्याकुमारीपर्यंत पसरलेला पर्वत एकच आहे. भूगोलाच्या सोयीसाठीं महाराष्ट्रांत त्याला सह्याद्रि म्हणतात; त्याच्याखालीं तो निलगिरी होतो आणि त्रावणकोरच्या हद्दींत " वेलदोड्याचा पर्वत " बनतो. परंतु अथपासून इतिपर्यंत पर्वतएकच. त्याचप्रमाणें इतिहास एकच आहे. **त्याची सुरुवात मनुष्यप्राणी समाज करूनराहूं लागला त्याच क्षणींझाली आणि शेवट मनुष्यसमाजाच्या अंताबरोबरच होणार आहे.**

**इतिहास म्हणजे मानवी समाजाचा इतिहास आणि सर्वकाळचा इतिहास.** हें इतिहासाचें " विश्वरूप, " – हेंअखंडत्व – लक्षांत ठेवणें अवश्य आहे. प्रत्यक्ष शाळा-कॉलेजांत **सार्वकालीन** आणि **जागतिक** इतिहासाचें ओझें आपल्याला मुलांच्या खांद्यावर देणें योग्य वाटत नाहीं. इतिहास-लेखकांना-सुद्धां इतिहासाच्या सर्व काळांची आणि सर्व देशांची माहिती नसते. त्यामुळें तेसुद्धां बहुधा जागतिक इतिहासाऐवजीं एखाद्या प्रदेशाचा किंवा देशाचा आणि सार्वकालीन इतिहासाऐवजीं एखाद्या विशिष्ट कालखंडाचा इतिहास लिहितात. हें खरें असलें तरी इतिहासलेखक जो इतिहास लिहितात आणि आपण शिक्षण-संस्थांत जो इतिहास शिकवितों तो केवळ या अखंड इतिहासाचा लहानमोठा तुकडा असतो. हें लक्षांत ठेवलें म्हणजे आपली दिशाभूल होणार नाहीं आणि तुकड्याला आपण तुकड्याचीच किंमत देऊं. अखंड इतिहासांत अशा प्रादेशिक किंवा देशिक इतिहासखंडाला जें महत्त्व द्यायचें तेवढेंच देऊं.

प्रयोगाच्या सोयीसाठीं इतिहासाचे आपण अनेक भाग पाडतों. त्यांची या प्रकरणांत चर्चा करूं. सर्वसामान्य भाग म्हणजे **देशाचा इतिहास.** उदाहरणार्थ, भारत, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, जपान, चीन हे सर्व देश आहेत. यांचे वेगवेगळे संपूर्ण इतिहास म्हणजे "**राष्ट्रीय**" (national) **इतिहास** असें आपण समजतों. हा झाला इतिहासाचा एक प्रकार. ज्या देशाचा विस्तार मोठा आहे आणि ज्याच्यांत बऱ्याच प्रमाणांत स्वयंपूर्ण असे अनेक प्रदेश आहेत त्यांच्या बाबतींत आपण "**प्रादेशिक**" **इतिहास** लिहितों. आपल्याच देशाचें उदाहरण घ्या. आपल्या भारतांत महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ, उत्कल, बंगाल, माळवा, आंध्र इत्यादि अनेक मोटमोठे प्रदेश आहेत. या बहुतेक प्रदेशांत पूर्वीच्या काळीं प्रादेशिक असे इतिहास घडले आहेत. तेव्हां या प्रदेशांच्या इतिहासाला आपण **प्रादेशिक इतिहास** म्हणतों.

इतिहासाचा तिसरा एक भाग आहे. त्याचें नांव **स्थानिक इतिहास.** प्रदेशाचा असा वेगळा इतिहास असतो, तसा सर्वच नाहीं पण कांहीं स्थानांचा, कांहीं गांवांचा, इतिहास लिहिण्यासारखा असतो. आपल्या महाराष्ट्राचाच दाखला घ्या. महाराष्ट्रांत जुनीं ऐतिहासिक अशीं अनेक गांवें आहेत. त्यांचा इतिहास मोठा बोधप्रद आणि मनोरंजक होऊं शकेल. पुणें जिल्ह्यांतील जुन्नर गांव, चंद्रभागेकांठचें पंढरपूर क्षेत्र, नाशिक, पैठण, पुणें, अशीं कितीतरी नांवें घेतां येतील. अशा महत्त्वाच्या स्थळांचा जो इतिहास तो **स्थानिक इतिहास.**

इतिहासाचे कालमानानेंसुद्धां भाग पाडतां येतात. अगदीं ठळक भाग म्हणजे **प्राचीन, मध्ययुगीन** आणि **अर्वाचीन** इतिहास. यापेक्षांहि लहान आटोपशीर भाग पाडतां येतात. आपला विशेष अभ्यास असेल अशा एखाद्या **राजवटीचा** किंवा **लोकांचा इतिहास** आपण लिहितों; उदाहरणार्थ, पठाण रियासत, मोगल रियासत, मराठा रियासत, शीखांचा इतिहास, मराठ्यांचा इतिहास, चालुक्यांचा इतिहास, राष्ट्रकूटांचा इतिहास, रोमन लोकांचा इतिहास, स्टुअर्ट घराण्याचा इतिहास, नॉर्मन घराण्याचा इतिहास, इ. इ.

इतिहासाचे दुसऱ्या प्रकारेंहि भाग पाडतां येतात. कोणत्याहि देशाचा किंवा प्रदेशाचा **आर्थिक, सामाजिक** किंवा **राजकीय** इतिहास लिहितां येतो. आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रांत त्या त्या प्रदेशांत किंवा देशांत जे

व्यवहार घडले, जी परिस्थिति उत्पन्न झाली तिचा यथाक्रम इतिहास लिहिणें शक्य आहे.

इतिहासाचे हे अनेक प्रकार सांगितले; परंतु मूळ गोष्ट आपण विसरतां कामा नये. इतिहास प्रादेशिक असो वा स्थानिक असो, प्राचीन असो, वा अर्वाचीन असो, राजकीय असो वा सामाजिक असो, तो जागतिक इतिहासाचा म्हणजे खऱ्याखुऱ्या इतिहासाचा केवळ एक भाग आहे. खरा इतिहास हा अखंड व अविभाज्य आहे हें आपण लक्षांत ठेवलें म्हणजे कोणत्याहि इतिहास-प्रकाराचा आपण अभ्यास करीत असलों किंवा शिकवीत असलों तर आपला समतोलपणा नाहींसा होणार नाहीं व त्या इतिहासप्रकाराला आपण अवास्तव महत्त्व देणार नाहीं. स्वदेशाचा इतिहास आपण शिकवीत असलों तर तो अवश्य जिव्हाळ्यानें व आपलेपणानें शिकवावा; परंतु तो शिकवितांना जगाच्या इतिहासाचा तो एक भाग आहे, जगाच्या पाठीवर भूतकाळीं प्रचंड घडामोडी झाल्या आहेत, आणि त्यांचे फार मोठे परिणाम जगांतील नाना देशांवर झाले आहेत आणि आपला देश हा त्यांतीलच एक आहे, ही जाणीव आपण ठेवली पाहिजे.

आपण पुष्कळ वेळां इतिहासाचा विचार करतांना वेगवेगळ्या देशांना कुंपण घालीत असतों आणि त्या कुंपणाच्या आंतील देशाचा बंदिस्त इतिहास लिहीत असतों. आपल्या हातून ही फार मोठी चूक होते. कोणचाहि देश कोणच्याहि काळीं असा बंदिस्त नव्हता. जुन्या काळापासून माणसें एका देशांतून दुसऱ्या देशांत व्यापारासाठीं, धर्मप्रचारासाठीं किंवा राज्यविस्तारासाठीं गेलीं आहेत. सर्व देशांत मधूनमधून बाहेरचे लोक आले आहेत, कायमची वस्ती करून राहिले आहेत, एतद्देशीयांबरोबर त्यांचे संघर्ष घडले आहेत आणि हळूहळू ते त्यांच्यांत मिसळून गेले आहेत, असेंच आपल्याला इतिहास सांगेल.

आपल्या देशाचेंच उदाहरण घ्या. पूर्वीच्या इतिहासकारांनीं भारताचा इतिहास अगदीं सोपा आणि सीधा बनविला होता. त्यांच्या सांगण्याप्रमाणें जुन्या काळीं भारतांत द्रविडांची वस्ती होती. मग आर्य आले. त्यांनीं द्रविडांना दक्षिणेकडे हुसकावून लावलें. अनेक शतकांनंतर शक, कुशाण आणि हूण आले. त्यांच्या-नंतर अनेक शतकांनीं मुसलमान आले, नंतर गोरे लोक आले. भारताचा इतिहास हा शहरांतल्या एकमार्गी ( one way ) रस्त्यासारखा कधींच नव्हता.

हजारों वर्षांपासून ज्याप्रमाणें भारतांत अनेक प्रकारचे लोक आले त्याप्रमाणें हजारों वर्षें भारतांतील असंख्य लोक पूर्वेकडे, उत्तरेकडे, पश्चिमेकडे गेले आहेत; तेथें त्यांनीं आपला धर्म नेला आहे, व्यापार केला आहे. कांहींनीं तेथें राज्यें, इतकेंच नव्हे तर साम्राज्येंसुद्धां स्थापन केलीं आहेत. भारत हा कधींच बंदिस्त नव्हता. जगाशीं त्याची हजारों वर्षें देवघेव चालली आहे आणि पुढेंहि चालू राहील; आणि म्हणून इतिहासकारांनीं आणि इतिहास-शिक्षकांनीं भारताच्या या देवघेवीचा इतिहास अवश्य लक्षांत ठेवला पाहिजे.

आपले लोक सयाममध्यें गेले, मलायांत गेले, जावा–सुमात्रांत गेले. जावा हें यव या संस्कृत शब्दाचें डच लोकांनीं केलेलें अपभ्रष्ट रूप आहे. आपणसुद्धां इतक्या दिवस यमुनेला जमुना म्हणतच नव्हतों का? जावा म्हणजे आपलें यवद्वीप. सुमात्रा हासुद्धां संस्कृत शब्दच आहे. परवांपर्यंत सयाम या देशाची अयोध्या राजधानी होती. नदीच्या पुरामुळें ती उध्वस्त झाल्यावर बँकॉक ही हल्लींची राजधानी झाली. आजहि इंडोनेशियांतील बली बेटांत हिंदुधर्म चालू आहे. तेथे शालिवाहन शक चालू आहे. घरोघर तुलसी-वृंदावनें आहेत. घरोघर रामायण-महाभारताचीं पारायणें होतातः ब्राह्मण यज्ञोपवीत घालतात. इंडोनेशियाच्या अध्यक्षांचें नांव सुकर्ण आहे, त्यांचा आपल्या देशांत एक सरकारी वकील येऊन गेला त्याचें नांव सुदर्शन होतें. इंडोनेशियांतील विमानवाहतुकीला 'गरुड' हें नांव आहे. सारांश, या आग्नेय दिशेकडील सर्व राष्ट्रांत भारतीय लोक गेले आहेत, राहिले आहेत; भारताचे धार्मिक आणि सांस्कृतिक संस्कार फार मोठ्या प्रमाणावर या देशांवर झाले आहेत.

त्याचप्रमाणें आपल्याकडील बौद्ध भिक्षू आणि आचार्य उंचउंच पर्वत-खिंडी ओलांडून बर्फांतून, वाळवंटांतून मध्य आशियांत, तिबेटांत आणि चीनमध्यें गेले आणि आपल्याबरोबर त्यांनीं बौद्ध धर्म नेला. त्यांनीं हजारों संस्कृत आणि प्राकृत ग्रंथांचीं तिबेटी आणि चिनी भाषांत भाषांतरें केलीं. अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. पांच सहा हजार वर्षांपूर्वीचा प्राचीन काळ घेतला तरी तेव्हांहि भारत बंदिस्त नव्हता. सिंधु नदीच्या कांठचें मोहेंजोदाडो हें बंदर पांच हजार वर्षांपूर्वीं एक भरभराटीस आलेलें शहर होतें. या शहरांतील व्यापारी सुमेर आणि अक्कड या युफ्रेटीस नदीकांठच्या देशांत आपल्या नावांमधून व्यापारासाठीं जात होते आणि आशियामायनर, सीरिया व मेसापोटेमिया या देशांतील धाडसी

व्यापारी त्या जुन्या काळीं खुष्कीच्या मार्गानें आणि समुद्रमार्गानें भारतांत येत होते. हा देवघेवीचा इतका प्रपंच एवढ्याचसाठीं केला कीं स्वदेशाचा इतिहास शिकविणें झालें तरी तो कुंपण घालून शिकवूं नये. इतर देशांशीं झालेली सांस्कृतिक आणि अन्य देवाणघेवाण यांचा योग्य स्थळीं अवश्य विचार केला पाहिजे.

**जगाचा इतिहास**–इतिहास म्हटला म्हणजे तो जगाचाच इतिहास हें आपण आतांपर्यंत पाहिलें आहे. तेव्हां इतिहासाची यथार्थ कल्पना येण्यासाठीं शिक्षण-संस्थांत केव्हां तरी हा इतिहास शिकविला जाणें अवश्य आहे. या बाबतींत थोडे मतभेद आहेत. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं जगाचा इतिहास हें एक अवाढव्य प्रकरण आहे. वास्तविक स्वदेशाच्या इतिहासाचें ओझेंसुद्धां मुलांना झेपत नाहीं आणि त्यामुळें त्यांचे कांहीं निवडक भाग शिकविण्याची पाळी येते. मग जगाचा समग्र इतिहास शिकविणें तर फारच दुरापास्त. त्यांत वेळ फार जाणार, आणि मुलांना तो भार सहनहि होणार नाहीं. त्यापेक्षां मुलांना स्वदेशाचा इतिहास शिकवावा. तीं मोठीं झाल्यावर मग हवा तर त्यांनीं जगाचा इतिहास वाचावा. शालेय जीवनांत हा अभ्यास ठेवूं नये. दुसऱ्या कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं जगाचा इतिहास मुलांना अवश्य शिकविला पाहिजे. परंतु तो अप्रत्यक्ष रीतीनें. स्वदेशाचा इतिहास शिकवितांना वेळोवेळीं असे प्रसंग येतात कीं तेव्हां त्या त्या वेळच्या इतर देशांतील घडामोडींचा उल्लेख करावाच लागतो आणि तो केला पाहिजे. अशा रीतीनें स्वदेशाच्या इतिहासाशीं जेथें जेथें आणि ज्या ज्या वेळीं जागतिक इतिहासाचा समन्वय होऊं शकेल तेथें तेथें तो अवश्य करावा. प्रत्यक्ष जगाचा इतिहास मात्र शिकवूं नये. स्वदेशाच्या मार्फत जगाचा परिचय करून द्यावा.

अलीकडे या बाबतींत शिक्षणतज्ज्ञांत बरीचशी एकवाक्यता दिसूं लागली आहे. जग हें एक आहे आणि आधुनिक प्रवासाच्या आणि माहितीच्या यांत्रिक साधनांमुळें पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देश परस्परांच्या अधिकाधिक जवळ येत चालले आहेत. शिवाय प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासावर अधिकाधिक संशोधन होऊं लागलें आहे. या संशोधनानें आजच्याइतकें नाहीं तरी आपल्याला कल्पना नाहीं इतक्या मोठ्या प्रमाणांत प्राचीन देशांना एकमेकांचा परिचय होता हें सिद्ध झालें आहे. भारताचें त्याच्या भोंवतालच्या देशांशीं भूतकाळीं

वेळोवेळीं कसे संबंध येत गेले याचा वर उल्लेख आलाच आहे. या तत्त्ववेत्त्यांचें म्हणणें आहे कीं जगाच्या इतिहासाची ढोबळ कल्पना असल्याखेरीज राष्ट्रीय इतिहासाचें योग्य आकलन होणार नाहीं. राष्ट्रीय इतिहास नीट समजण्यासाठीं त्याची आंतरराष्ट्रीय म्हणजेच जागतिक पार्श्वभूमिवर मांडणी करणें योग्य होईल. जगाचा इतिहास मुलांना समजणें कठीण आहे किंवा त्याचा भार त्यांना सहन होणार नाहीं, या आरोपाला त्यांचें उत्तर रोखठोक आहे. ते म्हणतात, हा प्रश्न केवळ जगाच्या इतिहासांतील योग्य त्या घटना आणि व्यक्ति निवडण्याचा आहे. अकरा वर्षांच्या मुलालासुद्धां समजेल आणि मौज वाटेल अशा प्रकारचा जगाच्या इतिहासाचा अभ्यासक्रम तयार करतां येतो. आणि अनेक देशांत असा अभ्यासक्रम माध्यमिक शिक्षणाच्या आरंभाला प्रचलित आहे. तो मुलांना चांगला समजतो इतकेंच नव्हे तर प्राचीन आणि मध्ययुगीन या रहस्यमय काळांतील विलक्षण आणि अद्‌भुतरम्य घटना आणि व्यक्ति यांच्या इतिहासांत मुलें रंगून जातात. त्यांना तो इतिहास एखाद्या कादंबरीप्रमाणें आकर्षक वाटतो.

या शिक्षणशास्त्रज्ञांचें असें म्हणणें आहे कीं जगाचा इतिहास दोनदां शिकवावा. प्रथम माध्यमिक शिक्षणाच्या आरंभाला-अकराव्या वर्षांच्या सुमारास आणि नंतर मुलें जाणतीं झाल्यावर १६–१७ या वयाच्या सुमारास; म्हणजे आपल्याकडील माध्यमिक शाळांच्या शेवटच्या वर्गात किंवा विद्यापीठाच्या प्रारंभिक वर्षांत. असें केल्यास मुलांना माध्यमिक शाळांत आरंभींच जगाच्या इतिहासाचा सामान्य असा आराखडा लक्षांत येईल. आणि या पार्श्वभूमीवर स्वदेशाच्या इतिहासांतील अनेक घटना त्यांना अधिक जाणतेपणीं समजूं शकतील. माध्यमिक शाळांत स्वदेशाचा आणि इतर आनुषंगिक देशांचा इतिहास वाचून झाल्यावर परत जागतिक इतिहासाकडे मुलांना न्यावें आणि त्याचा अधिक तपशीलवार व तात्त्विक परिचय करून द्यावा. या दुसऱ्या हप्त्यांत जगाच्या इतिहासाला स्वदेशाच्या इतिहासाची पार्श्वभूमि पाहिजे, इतकेंच नव्हे तर जागतिक घटनांचा विचार करतांना त्यांचे धागेदोरे स्वदेशाच्या समकालीन आणि आनुषंगिक इतिहासाशीं जुळविले पाहिजेत. या पुस्तकांत अकरा वर्षांच्या मुलाला समजूं शकेल इतका सोपा आणि सुटसुटीत जगाच्या इतिहासाचा अभ्यासक्रम दिला आहे त्याचें अवश्य अवलोकन करावें.

**स्वदेशाचा आणि प्रदेशांचा इतिहास :–** इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी-सारख्या छोट्या देशांत प्रादेशिक आणि राष्ट्रीय असे इतिहासाचे दोन प्रकार करण्याचें कारण पडत नाहीं. आपला देश खण्डप्राय आहे आणि त्याच्यांतील एक एक प्रदेश युरोपखंडांतील एकेका स्वतंत्र देशाइतका मोठा आहे. या प्रदेशांच्या स्वतंत्र अशा प्रादेशिक भाषा आहेत. आणि त्यांची कमीअधिक प्रमाणांत प्रादेशिक संस्कृति आहे. त्याचप्रमाणें आपल्या देशांतील बऱ्याच प्रदेशांचा स्वतःचा असा इतिहास आहे. ही प्रादेशिक संस्कृति आणि हा प्रादेशिक इतिहास राष्ट्रीय संस्कृतीचा आणि इतिहासाचा एक अविभाज्य भाग असला आणि त्या संस्कृतीचें आणि इतिहासाचें त्याच्यावर प्रतिबिंब पडलें असलें तरी त्या त्या प्रादेशिक संस्कृतींत आणि इतिहासांत बरेंचसें वेगळेंपण आहे आणि म्हणून आपल्याकडे स्वदेशाच्या इतिहासाबरोबरच स्वप्रदेशाचा इतिहासहि शिकविणें अवश्य आहे.

हे दोन इतिहास आपल्या शाळांत केव्हां आणि कसे शिकवावेत हा महत्त्वाचा प्रश्न आहे. देशाच्या ऐक्याकडेच निव्वळ पाहणारे लोक प्रादेशिक इतिहासाकडे दुर्लक्ष करतील. उलट प्रादेशिक इतिहासाला वाजवीपेक्षां अधिक महत्त्व दिलें तर देशाच्या एकात्मतेकडे दुर्लक्ष होईल. आपण या दोन्ही गोष्टी टाळल्या पाहिजेत आणि या दोन्ही इतिहासांना तारतम्य बुद्धीनें योग्य स्थान दिलें पाहिजे. अभ्यासक्रमाविषयीं तपशीलवार विचार करतांना या प्रश्नाचा सविस्तर विचार पुढें केला आहे. येथें एवढेंच सांगणें अवश्य वाटतें कीं आरंभाला सोप्या भाषेंत प्रदेशाचा गोष्टीरूप इतिहास शिकवितां येईल आणि त्याच्या आधारावर व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय इतिहासाची उभारणी करतां येईल. भारताचा इतिहास शिकवितांनासुद्धां त्या इतिहासांतील घडामोडींचा आपल्या प्रदेशाशीं म्हणजे महाराष्ट्राशीं जेथें जेथें विशेष संबंध पोहोंचत असेल तेथें तेथें प्रादेशिक म्हणजे महाराष्ट्राच्या तत्कालीन इतिहासाचा यथायोग्य परामर्ष घेण्याची संधि चतुर शिक्षकानें कधीं सोडूं नये. इतकेंच नव्हे तर अवश्य आणि अनुकूल त्या त्या ठिकाणीं भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या इतिहासाच्या माध्यमांतून शिकवावा.

**स्थानिक इतिहास:**–स्थानिक इतिहासाला प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इतिहास–शिक्षणांत विशेष महत्त्वाचें स्थान नाहीं. एक तर फार थोड्या स्थळांना पुरेसा किंवा विश्वसनीय असा इतिहास असतो. विनाकारण मारून मुटकून

कोणत्याहि स्थळाला ऐतिहासिक महत्त्व देऊं नये व त्याचा इतिहास शिकवीत बसूं नये. फुकट वेळ जाईल आणि मुलांच्या पदरीं कांहीं पडणार नाहीं. स्थानिक भूगोल फार महत्त्वाचा आणि अगत्याचा असतो. म्हणूनच भूगोलशिक्षणाला प्रारंभ स्थानिक भूगोलापासून करतात व मुलांना सहलीला नेऊन गांवाजवळचे व भोंवतालचे डोंगर, नद्या, नाले, झाडें, पिकें, जमीन इत्यादिकांचा प्रत्यक्ष परिचय करून देतात. परंतु स्थानिक इतिहासाचीं साधनें अशीं हमखास गांवगन्ना मिळतीलच असें नाहीं. एखाद्या गांवीं एखादा किल्ला गढी असेल, एखादी लढाई झाली असेल किंवा एखादें जुनें देऊळ अगर प्रसिद्ध साधूची समाधि असेल. अशा साधनांचा योग्य वेळीं उदाहरणादाखल अवश्य उपयोग करावा. परंतु अशा तुटपुंज्या साधनांच्या आधारावर स्थानिक सूत्रबद्ध इतिहास शिकवितां येणार नाहीं.

एवंच, स्थानिक इतिहासाचा एक साधन किंवा उदाहरण म्हणूनच योग्य त्या वेळीं प्रादेशिक किंवा राष्ट्रीय इतिहास शिकवितांना उपयोग करावा. त्यामुळें इतिहासाला एक प्रकारची वास्तविक बैठक मिळेल. स्थानिक इतिहासाचा पापड-लोणच्यांसारखा उपयोग आहे. बासुंदी-पुरीसारखा किंवा श्रीखंड-पुरीसारखा नाहीं. इतकेंच नव्हे तर भात-चपाती-भाज्याइतकाहि उपयोग नाहीं. स्थानिक इतिहास हें इतिहासक्षेत्रांतले केवळ तोंडीलावणें आहे, हा विवेक मनांत बाळगावा.

**राजकीय, आर्थिक व सामाजिक इतिहास**:– इतिहास हा व्यक्तींचा इतिहास नाहीं, बड्या राजे-महाराजांचा इतिहास नाहीं. तो तत्त्वतः समाजाचा इतिहास आहे व त्यानें समाजाच्या जीवनाच्या सर्व बाजूंचा यथायोग्य विचार केला पाहिजे अशी भूमिका पूर्वीपासून आपण घेतली आहे. या भूमिकेप्रमाणें व्यापक अर्थानें समाजाचा इतिहास शिकवितांना राजकीय व आर्थिक या समाज जीवनाच्या महत्त्वाच्या अंगांचा सामाजिक इतिहासांत समावेश होणारच. त्यासाठीं वेगळा राजकीय किंवा आर्थिक इतिहास शिकविण्याचें प्रयोजन नाहीं.

ही तात्त्विक भूमिका झाली. परंतु व्यवहारांत राजकीय इतिहासालाच प्रधानपद मिळालें आहे. आपण वाचतों व शिकवितों ते जवळजवळ सर्वच इतिहास राजकीय असतात. त्यांत एकामागून एक गादीवर येणाऱ्या राज-घराण्यांचीं व त्यांनीं केलेल्या घडामोडींची किंवा त्यांच्या राजवटींत झालेल्या

घडामोडींची माहिती आढळते. तत्कालीन समाजाच्या सांस्कृतिक किंवा आर्थिक जीवनाची माहिती तोंडीलावण्यापुरती कधींमधीं मिळते व तीहि एखादी राजवट किंवा कालविभाग संपल्यावर शिष्टाचार म्हणून देण्यांत येत असते.

याचें कारण उघड आहे. इतिहास सामाजिक असावा हें म्हणणें सोपें आहे पण तो लिहिणें व शिकविणें फार कठीण आहे. अर्वाचीन कालापर्यंत आपण येऊन पोहोंचलों म्हणजे इतिहासाचीं सांस्कृतिक व आर्थिक साधनें व माहिती पुरेशा प्रमाणांत मिळूं शकते. परंतु अर्वाचीन काळाच्या मागें गेलें कीं हीं साधनें फारच थोडया प्रमाणांत उपलब्ध असतात. पुष्कळ प्रसंगीं विश्वसनीय पुराव्याच्या अभावीं केवळ अनुमानावर अवलंबून राहावें लागतें. शिवाय सामाजिक किंवा आर्थिक सूत्रांत इतिहास गुंफूं म्हटलें तर तें जमत नाहीं. अखंड असें सूत्र सांपडत नाहीं. कालक्रमास धरून हजार दोन हजार वर्षांचा इतिहास आर्थिक किंवा सांस्कृतिक सूत्रांत गुंफणें फार कठीण आहे. इतिहासामध्यें कालक्रम हा एक आवश्यक भाग आहे. जेथें कालक्रम नाहीं तेथें इतिहासच नाहीं; म्हणून राजकीय सूत्रांतच बहुधा इतिहास गुंफला जातो. तें सोपें आणि सोयीस्कर पडतें. आधीं मौर्य घराणें घेतलें, मग कण्व, मग शुंग, मग गुप्त, मग हर्ष, अशी कालक्रमानें इतिहासाची रचना करता येते. परंतु या हजार वर्षांच्या प्राचीन काळाचा इतिहास सामाजिक किंवा आर्थिक माध्यमामधून लिहूं म्हटलें तर तें जमेलच असें नाहीं. अशा प्रकारचा प्रयत्न केलाच तर तो माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आवांक्याबाहेर जाईल असें वाटतें. पण तो प्रयत्न कोणीतरी प्रतिभावान् लेखकानें अवश्य करून पहावा.

आपद्धर्म म्हणून कां म्हणाना, परंतु प्राथमिक आणि माध्यमिक शाळांत शिकविला जाणारा इतिहास मुख्यतः राजकीयच ठेवावा लागेल. या योगानें कालक्रमाची सांगड घालतां येते व त्यामुळें इतिहासाचा प्रवाह कालगतीनें कसा वाहत आला आहे हें मुलांना समजूं शकतें. राजकीय इतिहास शिकवितांना, सामाजिक आणि आर्थिक बाजूंचा वेळोवेळीं आणि ठिकठिकाणीं पुरेसा परामर्श घेतला पाहिजे आणि या दोन बाजूंची सांगड राजकीय इतिहासाशीं बेमालूम घातली पाहिजे. एखादा कालविभाग संपल्यावर आर्थिक आणि सामाजिक जीवनावर वेगळीं आणि स्वतंत्र अशीं दोन-तीन पानें खर्ची घालणें योग्य नाहीं. त्या त्या बाबींचा विचार त्या त्या वेळींच झाला पाहिजे.

राजकीय इतिहास हा मध्यवर्ती आणि सामाजिक व आर्थिक इतिहास हा त्याच्या आजूबाजूला, ही एक सोपी आणि व्यवहारांतली तोड झाली. थोडेसें खोलांत शिरून आपण या प्रश्नाचा विचार केला तर या तीन इतिहासप्रकारांचा थोड्या वेगळ्या रीतीनें विचार करतां येईल. केवळ सर्व इतिहास राजकीय माध्यमांतून न सांगतां **जी बाजू—राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक – ज्या काळांत विशेष महत्त्वाची आणि प्रभावी असेल त्या बाजूला त्या काळापुरतें मध्यवर्ती स्थान द्यावें.** भारताचा इतिहासच घेतला तर असें आढळून येईल कीं **प्राचीन भाग** सामाजिक पद्धतीनेंच लिहावा लागेल. कारण प्राचीन काळचीं राजघराणीं, राजे, सेनापति, युद्धें व इतर राजकीय घडामोडी यांची आपल्याला सुदैवानें फार थोडी माहिती आहे. चंद्रगुप्त मौर्याच्या पाठीमागें आपला राजकीय इतिहास अद्याप तरी जाऊं शकला नाहीं. तो पाठीमागचा काळ राजकीयदृष्ट्या अंधारांत आहे. अधिक संशोधन होऊन जेव्हां आपल्या प्राचीन इतिहासावर प्रकाश पडेल तेव्हांच त्या काळचा राजकीय इतिहास लिहितां येईल.

उलट आपल्या प्राचीन काळचा सामाजिक इतिहास समृद्ध आहे. प्रसिद्ध इतिहासकार प्रा. गुच् म्हणतो त्याप्रमाणें जगाचा प्राचीन इतिहास हा नेहमीं सामाजिक संस्थांचा इतिहास असतो. हें विधान आपल्या प्राचीन काळाला विशेषत्वानें लागू पडतें. भारतांत आलेल्या आर्यांचा निसर्गधर्म व दैवतें, त्यांची वर्णव्यवस्था, त्यांची यज्ञसंस्था, त्यांचे सूत व त्यांनीं सांगितलेलीं पुराणें व इतिहास, हळूहळू विकास पावलेला जातिभेद आणि त्याच्या आधारावर विकसित झालेली कला, हुन्नर, धंदे यांचाच प्राचीन काळच्या इतिहासांत आपल्याला विचार करावा लागतो. त्यासाठीं साधनेंहि पुरेशीं आहेत. सारांश, आपल्या प्राचीन काळासाठीं सामाजिक इतिहासाला आपण मध्यवर्ती स्थान देऊं शकतों.

**मध्ययुगीन इतिहासांत** राजघराण्यांना, युद्धांना, तहांना महत्त्व आहे आणि म्हणून तो मुख्यतः राजकीयच राहणार. पठाणांचा अंमल, त्यानंतर मोगल, त्यानंतर मराठे या तीन राजकीय विभागांत हा इतिहास मांडला जाईल. **अर्वाचीन** म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासूनचा इतिहास **मुख्यतः सांस्कृतिक आणि सामाजिक** आणि राजकीय राहील. इंग्रजी शिक्षणाचा

आरंभ व त्याचे परिणाम, विद्यापीठांची स्थापना, विधवा-विवाह, संमतिवयाचा कायदा, आंतरजातीय विवाह इत्यादिबाबतचे सामाजिक कायदे, स्त्रियांची परवशता आणि त्यांची हळूहळू होत असलेली उन्नति, औद्योगिक युगाचा प्रारंभ, गिरण्या आणि कारखान्यांची स्थापना, मजूर आणि मालक यांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न, आयात आणि निर्यात माल, त्यावरील कर आणि देशी उद्योगधंद्यांना मिळालेलें संरक्षण, हे व इतर सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रश्न १९व्या व २०व्या शतकाच्या इतिहासांत प्रामुख्यानें चमकतात. त्याचप्रमाणें राजा राममोहन रॉयपासून दादाभाई, सुरेंद्रनाथ, रानडे, टिळक, गोखले, गांधी यांनीं राजकीय हक्क व स्वातंत्र्य यांसाठीं केलेले प्रयत्न या अर्वाचीन कालखंडांत महत्त्व पावले आहेत. या दीडशें वर्षांचा इतिहास समतोल पद्धतीनें लिहिला पाहिजे आणि शिकविला पाहिजे. इतिहासाच्या तिन्ही अंगांना या काळांत सारखेंच महत्त्व दिलें पाहिजे. मध्ययुगीन इतिहासांत एकामागून एक गादीवर येणाऱ्या राजघराण्यांचा आणि राजपुरुषांचा विचार करण्याची जी वाईट संवय लागली असेल ती अर्वाचीन क्षेत्रांत पदक्षेप करतांना सोडून दिली पाहिजे. विनाकारण एकामागून एक येणाऱ्या गव्हर्नर जनरल आणि व्हाईसरॉय यांच्या मालिकेला महत्त्व देऊं नये. आणि ज्या गव्हर्नर जनरलांनीं किंवा व्हाइसरॉयांनीं भारताच्या इतिहासांत विशेष परिणामी असें कार्य केलें नाहीं त्यांचा निर्देशसुद्धां करूं नये.

अर्वाचीन इतिहास शिकविणें कठीण आहे. कारण आपल्याला पुष्कळच गोष्टी माहिती आहेत, आणि त्या गोष्टींची गर्दी झाली आहे. तेव्हां त्या गोष्टींची काळजीपूर्वक निवड करावी लागेल आणि अभ्यासक्रम मोठ्या कौशल्यानें आंखावा लागेल. कालक्रमानें व्यक्ति आधाराला घेऊन हा इतिहास न लिहितां वेगवेगळे सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि राजकीय प्रश्न कालक्रमानें निवडून त्यांचा यथायोग्य परामर्श घ्यावा लागेल. ईश्वरचंद्र विद्यासागर, फुले, टाटा, गांधी आदि प्रभावी व्यक्तींभोवतीं सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय प्रश्न गुंफतां येतील; तें अशक्य नाहीं.

एवंच, भारताचा इतिहास असो किंवा जगाचा असो, ज्या काळांत इतिहासाचें जें अंग विशेष महत्त्वाचें आणि परिणामी असतें त्या काळांत त्या अंगाला मध्यवर्ती स्थान द्यावें व दुसऱ्या अंगांना दुय्यम स्थान द्यावें. या योजनेप्रमाणें

कालक्रमानें इतिहास लिहितांना किंवा शिकवितांना कधीं राजकीय बाजूला मानाचें स्थान मिळेल तर कधीं सामाजिक किंवा आर्थिक. अर्वाचीन इतिहासांत मात्र तिन्ही अंगें प्रभावी आहेत. त्यांना यथायोग्य स्थान दिलें पाहिजे. **अर्वाचीन इतिहास त्रिगुणात्मक आहे** असें म्हणा हवें तर ! हें सामान्य तत्त्व व्यवहारांत आणतांना मूळ भूमिका मात्र विसरूं नये. इतिहास हा एकच आहे व तो समाजाच्या समग्र जीवनाचा आविष्कार आहे. हेंच तें तत्त्व !

● ● ●

## प्रकरण पांचवें

# इतिहासाचें अभ्यासक्रम

आतांपर्यंत तात्त्विक चर्चा झाली. इतिहास म्हणजे काय, त्याचे प्रकार व अंगें कोणतीं, हें आपण पाहिलें. अद्याप आपण शाळांकडे आणि त्यांत आपली वाट पाहत बसलेल्या मुलांकडे पाहिलें नाहीं. आतां त्यांच्याकडे वळून त्यांच्या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. हे प्रश्न दोन प्रकारचे आहेत. पहिला प्रश्न मुलांना इतिहास **काय** शिकवायचा आणि दुसरा प्रश्न तो **कसा** शिकवायचा. म्हणजे शाळांसाठीं अभ्यासक्रम कसे तयार करायचे आणि ते वर्गांत कसे शिकवून दाखवायचे.

पहिला प्रश्न अभ्यासक्रमाचा. या प्रश्नाला इतर सुधारलेल्या देशांत फार महत्त्व आहे. कारण त्या देशांत शाळांना म्हणजे अर्थात् शिक्षकांना आपापले अभ्यासक्रम तयार करावे लागतात. त्यांचें सरकार फार झालें तर ठोकळ आराखडा त्यांच्या हातीं देतें. परंतु त्या आराखड्यांत तपशील शाळांनाच भरावा लागतो. आपल्याकडे हें सारें काम आपलें सरकार करीत आहे. असें असलें तरी अभ्यासक्रमाची तात्त्विक भूमिका माहीत असली तर शिक्षकांना तो शिकविणें थोडें सुलभ जाईल.

इतिहासाचा अभ्यासक्रम तयार करायचा, पण तो कशाच्या आधारावर, कोणत्या शैक्षणिक किंवा मानसशास्त्रीय सिद्धान्ताप्रमाणें ? हा प्रश्न कोणाच्या मतावर किंवा लहरीवर अवलंबून असतां कामा नये. मला महाराष्ट्राचा इतिहास फार आवडतो, म्हणून मी तो इतिहास कोणत्याहि वर्गांना आणि शाळांना शिकविणें योग्य होणार नाहीं. समजा, ईजिप्तचा प्राचीन इतिहास हा माझा आवडता छंद आहे. म्हणून काय मी तो इतिहास शाळांवर लादावा ?

तेव्हां इतिहासाचा अभ्यासक्रम कोणाच्या मर्जीखातर, कोणाच्या आवडीनावडी-खातर करायचा नसतो. मग तें कोणी सरकार असो किंवा चार शहाणीं माणसें असोत. त्याला कांहीं तरी तात्त्विक बैठक पाहिजे.

अभ्यासक्रम तयार करतांना आपली नजर एकाच बाजूकडे पाहिजे. ती बाजू म्हणजे ज्यांच्यासाठीं तो अभ्यासक्रम आपण तयार करतों तीं मुलें. त्यांना तो अभ्यासक्रम समजला पाहिजे, आवडला पाहिजे आणि पचला पाहिजे. अर्थात् मुलांकडे पाह्यचें म्हणजे त्यांच्या वयाकडे आणि मगदुराकडे पाहिलें पाहिजे. प्राथमिक चौथ्या इयत्तेच्या मुलांसाठीं जो अभ्यासक्रम तयार करायचा तो सातव्या आठव्या इयत्तेला चालायचा नाहीं; आणि दहाव्या अकराव्या इयत्तांना तर बिलकूल उपयोगी पडणार नाहीं. मुलांचें वय जसजसें वाढतें तसतशी त्यांची आकलनशक्ति, धारणाशक्ति आणि चिकित्सक वृत्ति वाढत असते. या वाढीची, अभ्यासक्रम तयार करतांना आपण दखल घेतली पाहिजे.

आजपर्यंत मुलांच्या वयोमानाप्रमाणें इतिहासाचा अभ्यासक्रम आखण्याचे प्रयत्न आणि प्रयोग फारसे झाले नाहींत. बहुधा जो इतिहास शाळांत शिकवावासा आपल्याला वाटतो त्याची सोपी आवृत्ति लहान मुलांसाठीं आणि कठीण आवृत्ति मोठ्या मुलांसाठीं असाच थोडास प्रकार होत आहे. इतकेंच नव्हे तर इतिहास शिकवायचा म्हणजे काय शिकवायचें याविषयीं खोलांत जाऊन विचार न केल्या-मुळें पूर्वी आपण प्राथमिक आणि माध्यमिक शाळा मिळून आठ वर्षे तोच तो भारताचा इतिहास फिरून फिरून शिकवीत होतों. फार तर लहान मुलांना तो पचावा म्हणून त्यांत थोडें सोपेंपणाचें पाणी घालीत होतों एवढेंच.

**संस्कृति-सोपान सिद्धान्त** :– स्टॅन्ले हॉल या शिक्षणक्षेत्रांतील एका फार मोठ्या अमेरिकन तत्त्वज्ञानें या बाबतींत फार महत्त्वाचा सिद्धान्त मांडला. त्या सिद्धान्ताला त्यानें 'Culture Epoch' असें नांव दिलें. कल्चर म्हणजे 'संस्कृति किंवा सुधारणा आणि इपॉक म्हणजे युग किंवा कालखंड. आपण त्याला संस्कृति-'सोपान सिद्धान्त' असें देशी नांव देऊं. सोपान म्हणजे जिना; जिन्याच्या एकावर एक पायऱ्या म्हणजेच संस्कृतीचे एकापुढें एक टप्पे. जगाच्या इतिहासांत मनुष्यप्राण्याची उत्क्रांति होत जाते ती कांहीं विशेष टप्प्याटप्प्यानें. हे टप्पे म्हणजेच स्टॅन्ले हॉलचे epochs.

हॉलने हजारों लहान मुलांचें निरीक्षण आणि अभ्यास करून असा सिद्धान्त काढला कीं मूल आपल्या लहानपणीं टप्प्याटप्प्यानें जीवसृष्टीच्या कोट्यवधि वर्षांच्या उत्क्रांतीचा अनुभव घेत असतें. उदाहरणार्थ, आरंभीं मनुष्यप्राण्याला उभें राहतां येत नव्हतें. बोलतां येत नव्हतें. तो चार पायांच्या प्राण्याप्रमाणें रांगत होता आणि आवाज काढीत होता. लहान मूलसुद्धां आरंभीं रांगतें आणि कांहीं तरी आवाज काढतें. रानटी मनुष्य जंगलांत भटकत असे, जें हातीं पडेल त्याचा संहार करीत असे. मूल जंगलांत भटकत नाहीं पण घरांत भटकतें आणि जें हातीं सांपडेल त्याची मोडतोड करतें. लहान मुलांना रक्तपाताच्या आणि मारामारीच्या गोष्टी फार आवडतात. साळसूद माणसापेक्षां अक्राळविक्राळ राक्षस त्यांना अधिक आवडतात. कदाचित् दहा तोंडांचा आणि वीस हातांचा रावण केवळ एक तोंडाच्या आणि दोन हातांच्या रामापेक्षां त्यांचें लक्ष अधिक वेधीत असेल. हॉलच्या सिद्धान्ताप्रमाणें याचें कारण मनुष्यप्राणी आरंभीं इतर प्राण्यांबरोबर झुंज खेळून टिकाव धरूं शकला हें होय. त्याला पदोपदीं रक्तपात करावा लागला. हॉल तर याच्याहि पुढें जातो. तो म्हणतो, आईच्या पोटांतील गर्भ गर्भाशयांत तरंगत असतो म्हणजे मनुष्यप्राणी जन्माला येण्यापूर्वीं जेव्हां जगांत पाण्यांत तरंगणारे नुसते मासेच असतील तेव्हांची ही स्थिति. स्टॅन्ले हॉलनें जीवसृष्टीची उत्क्रांति आणि लहान मुलांची वाढ या दोहोंमध्यें आणखी कितीतरी अनुबंध दाखविले आहेत.

स्टॅन्ले हॉलच्या या सिद्धान्ताचा इतिहासाचा अभ्यासक्रम ठरवितांना आपल्याला उपयोग करतां येईल का ? या सिद्धान्ताच्या आधारावर मनुष्य-प्राण्याच्या बाळपणाचा इतिहास म्हणजे प्राचीन इतिहास प्राथमिक शाळांसाठीं, मनुष्यजातीच्या कुमार अवस्थेचा इतिहास माध्यमिक शाळांसाठीं आणि प्रौढ दशेंतील इतिहास माध्यमिक शाळांसाठीं किंवा महाविद्यालयासाठीं, अशी सांगड घालतां येईल.

परंतु स्टॅन्ले हॉलचा हा संस्कृति–सोपान–सिद्धान्त म्हणजे एक सुंदर अशी कविकल्पना आहे. ती शास्त्राच्या कसोटीला उतरत नाहीं. लहान मूल हें जगाच्या आरंभीच्या जंगली माणासासारखें असतें ही कल्पनाच मुळीं चुकीची आहे. जंगली माणूस हा जंगली असला तरी प्रौढ होता आणि त्याच्या परिस्थितीस अनुरूप असा त्याच्या मनाचा आणि शरिराचा पूर्ण विकास झालेला होता.

त्यानें पुष्कळ अनुभव घेतलेला होता. त्याचें अवलोकन, निर्णय-शक्ति, चिकित्सक वृत्ति त्याच्या भोंवतालच्या परिस्थितिप्रमाणें आजच्या प्रौढ माणसाप्रमाणेंच विकास पावलेली होती. उलट लहान मूल मूलच असतें. त्याच्या मनाची वाढ झालेली नसते. त्याला अनेक प्रवृत्तींचा ( instincts ) वारसा मिळालेला असतो. पण त्या प्रवृत्तींच्या जोरावर त्याला आपल्या मनाची आणि शरिराची वाढ करून घ्यायची असते.

स्टॅन्ले हॉलच्या सिद्धान्तामध्यें दुसरेहि दोष आढळतात. पृथ्वीच्या पाठीवर माणसांचे अनेक वंश आहेत. कांहीं वंश उत्क्रांतीच्या फार पुढच्या टप्प्यावर पोंचले आहेत तर दुसरे कांहीं वंश अद्याप रानटी अवस्थेंत आहेत. कांहीं मानवी वंश उत्क्रांतीच्या सर्व पायऱ्या न चढतां कांहीं पायऱ्या गाळून वर येऊन पोंचले आहेत, असें इतिहास सांगतो. तेव्हां मनुष्यप्राणी सर्वत्र सारख्याच रीतीनें उत्क्रांत होत आहे हें म्हणणें चुकीचें आहे. स्टॅन्ले हॉलनें जो समन्वय साधला आहे तो फार तर मनुष्यप्राण्याच्या प्रारंभीच्या जीवनापुरता आहे. मनुष्य सुधारणेच्या मार्गाला लागला, शेती आणि व्यापार करूं लागला, गुरें बाळगूं लागला, लिहूं लागला. या उत्क्रांतीच्या पुढच्या मजलांना जोड मुलाच्या व्यक्तिगत जीवनांत सांपडणार नाहीं. मनुष्यप्राण्याच्या ऐतिहासिक काळाकडे आपण वळलों तर त्या काळांतील माणसांची संस्कृति आणि मुलांचें व्यक्तिगत जीवन यांच्यांत कांहींच साधर्म्य सांपडणार नाहीं. एवंच, स्टॅन्ले हॉलचा हा सिद्धान्त आकर्षक आणि सूचक असला तरी शाळांतील इतिहासाचाच नव्हे तर एकंदर सर्व अभ्यासक्रम निश्चित करतांना त्याचा फारसा उपयोग होणार नाहीं.

स्टॅन्ले हॉलनें शिक्षणक्षेत्रांत फार मोठी कामगिरी केली हें मात्र निःसंशय. त्याच्या अलौकिक प्रतिभेचा परिणाम जगांतल्या शिक्षणक्रमावर आणि अध्यापन-पद्धतीवर फार झाला आहे. स्टॅन्ले हॉलच्या प्रभावामुळें, आजकाल शिक्षणाचा कोणच्याहि अंगानें विचार करूं लागलों तरी हें शिक्षण ज्यांच्याकरितां आहे त्या मुलांचा आधीं विचार करावा लागतो. मुलांच्या भावना, त्यांच्या आवडी-नावडी, त्यांची कल्पनाशक्ति, त्यांच्या नानाविध प्रवृत्ति या सर्वांचा अभ्यासक्रम तयार करतांना आणि वर्गांत शिकवितांना अलीकडील शिक्षक जर यथायोग्य विचार करीत असतील तर त्याचें श्रेय स्टॅन्ले हॉलला दिलें पाहिजे. इतिहास-

शिक्षणांत पोवाडे, दंतकथा, गाणीं यांचा अनेक देशांत समावेश झाला तो स्टॅन्ले हॉलच्या सिद्धान्तास अनुसरूनच.

या सिद्धान्ताचा दुसरा एक स्पष्ट परिणाम झाला तो सांगितला पाहिजे. पूर्वी इतिहासाचा अभ्यासक्रम तयार करायचा म्हणजे ऐतिहासिक काळांतील राजघराणीं आणि राजपुरुष यांची माहिती सांगायची अशी पद्धत होती. स्टॅन्ले हॉलच्या सिद्धान्तामुळें प्रागैतिहास काळांतील (Pre-History) माणसाच्या आरंभीच्या धडपडीचा आणि घडामोडींचा इतिहास अभ्यासक्रमांत समाविष्ट करणें अवश्य झालें. आपणसुद्धां अभ्यासक्रमाची मांडणी करतांना स्टॅन्ले हॉलला विसरून चालणार नाही.

**विभूति–पूजनाचा सिद्धान्त :** अलीकडे पांचपन्नास वर्षांपासून, आपण लहान मुलांसाठीं पूर्वी होऊन गेलेल्या थोर माणसांच्या गोष्टींचा अभ्यासक्रम तयार करीत आहों. या गोष्टींच्या पाठीमागें एक सिद्धान्त आहे. तो आपण नीट तपासून पाहिला पाहिजे. या सिद्धान्ताला विभूति-पूजन हें नांव देतां येईल. या सिद्धान्ताप्रमाणें जगाच इतिहास म्हणजे जगांत होऊन गेलेल्या मोठ्या माणसांचीं चरित्रें होय. या मोठ्या माणसांची कालक्रमानुसार निवड करून त्यांचीं चरित्रें सांगितलीं म्हणजे त्यांत जगाचा इतिहास आला. भारतांत होऊन गेलेल्या मोठ्या माणसांचीं कालक्रमानें सांगितलेलीं चरित्रें म्हणजेच भारताचा इतिहास.

मोठीं माणसें आपापल्या काळाचे प्रतिनिधि आणि पुढारी असतात. हीं मोठीं माणसें आपल्या प्रतिभेनें किंवा पराक्रमानें महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना घडवीत असतात, किंवा त्यांना गति देत असतात, असा या सिद्धान्ताचा अभिप्राय आहे. या मोठ्या माणसांचा मुलांना परिचय करून दिला म्हणजे त्यांना त्या काळच्या इतिहासाची जाणीव होईल, अशी या सिद्धान्तापाठीमागें समजूत आहे. लहान मुलांना तात्त्विक विवेचन समजत नाहीं. तें त्यांच्या डोक्यांवरून जातें. तेव्हां आरंभीं, तात्त्विक इतिहास शिकविण्याच्या भानगडींत न पडतां, मुलांना थोर माणसांचीं चरित्रें, त्यांचें व्यक्तिगत जीवन, त्यांच्या हातून घडलेलीं कामें गोष्टीच्या रूपानें सांगितलीं तर तीं समजतील आणि त्या साऱ्या गोष्टीच असल्यामुळें आवडतीलहि.

या विचारप्रणालींत बरेचसें तथ्य आहे. पण तिच्यांत धोकाहि आहे. इतिहास म्हणजे बड्या लोकांचीं बडीं कृत्यें हें तत्त्व स्वीकारलें तर इतिहासांत समाजाला आणि त्यांतील सामान्य माणसाला स्थान राहत नाहीं. आपण तर आरंभींच भूमिका पत्करली आहे कीं इतिहास म्हणजे समाजाचीच कहाणी; इतकेंच नव्हे तर समाजाच्या सर्व अंगांची कहाणी. या बड्या लोकांच्या सिद्धान्तां-मध्यें दुसरेहि कांहीं दोष आहेत. थोर माणसें आपल्या काळाचे प्रतिनिधि असतात हा समजच मुळीं चुकीचा आहे. त्यांचें थोरपण बहुधा आपल्या काळाशीं बंडखोरी करून नवीन कांहीं निर्माण करण्यांत असतें. त्यांचें जीवन केवळ तत्कालीन समाजाच्या संस्कृतीचें प्रतिबिंब होऊं शकत नाहीं. मोठीं माणसें बहुधा आपल्या काळाचे, आपल्या काळाच्या सामाजिक जीवनाचे प्रतिनिधि नसतात. ते समाजाच्यापुढें गेलेले असतात आणि म्हणूनच मोठे असतात. दुसरी गोष्ट ही कीं मोठी माणसें कांहीं निवडक क्षेत्रांत मोठीं असतात; सर्व क्षेत्रांत मोठीं नसतात. कोणी धर्मसंस्थापक असतात, कोणी ज्ञानी पुरुष असतात, कोणी पराक्रमी राजे असतात, कोणी कुशल राज्यकर्ते असतात, कोणी समाजसुधारक असतात. परंतु जगांतला कोणताहि मोठा मनुष्य सर्व क्षेत्रांत मोठा नसतो आणि म्हणून तत्कालीन समाजाचें साकल्यानें तो प्रतिनिधित्व करूं शकत नाहीं.

बड्या लोकांच्या सिद्धान्तांतील हे दोष दाखवितांना थोडी अतिशयोक्ति होते. योग्य खबरदारी घेतली तर थोर माणसांचा गोष्टीरूप इतिहास इतिहासाच्या शास्त्रीय कसोटीला खास उतरूं शकेल; मात्र कांहीं पथ्यें पाळलीं पाहिजेत आणि कांहीं धोके टाळले पाहिजेत. पहिला धोका म्हणजे पुष्कळ वेळां आपण थोर माणसांचा परिचय करून देतांना त्यांच्या पुष्कळ खाजगी, किरकोळ भाकड-कथाच सांगतों. या कथांना इतिहासांत महत्त्व नाहीं. इंग्लंडमधील आल्फ्रेड राजानें धनगराच्या घरांतील तव्यावरची भाकर जळूं दिली, इंग्लंडमधील व्हिटिंग्टन या थोर पुरुषाच्या मांजरीची कहाणी, शहाजीनें केलेलें हत्तीचें वजन वगैरे कितीतरी भाकड गोष्टी आपण गोष्टीरूप इतिहासांत सामील करीत असतों. अशा गोष्टी कटाक्षानें टाळल्या पाहिजेत.

मोठीं माणसें सर्व क्षेत्रांत मोठीं नसतात आणि म्हणून त्यांची कहाणी ऐतिहासिकदृष्ट्या एकांगी ठरेल हें सत्य आहे. हा दोष आपल्याला टाळतां येण्यासारखा आहे. तो असा– (अ) त्या त्या काळच्या महत्त्वाच्या ऐतिहासिक

घटना आणि प्रसंग निवडावे आणि त्यांच्याभोंवतीं अनेक वास्तविक आणि काल्पनिक व्यक्तींची गुंफण करावी. अर्थात् काल्पनिक व्यक्ति इतिहासाला धरून असाव्या. (ब) एकच माणूस आपल्या काळाचें प्रतिनिधित्व करूं शकत नाहीं. म्हणून त्या त्या कालखंडाचा परिचय करून देतांना वेगवेगळ्या क्षेत्रांतील माणसांची निवड करावी. त्या कालखंडाचा परिचय करून देतांना त्या वेळचा मध्यवर्ती राजपुरुष, ज्ञानी पंडित एवढेंच निवडून भागायचें नाहीं. त्या वेळचा प्रातिनिधिक शेतकरी, मजूर, स्त्री, मूल, व्यापारी इत्यादि व्यक्तींची निवड केल्याखेरीज समाजाचें साकल्यानें ऐतिहासिक दर्शन होणार नाहीं. (क) अवश्य तेथें काल्पनिक अशा प्रातिनिधिक व्यक्तींचा उपयोग करावा. बौद्धधर्माचें उदाहरण घ्या. बौद्धधर्म ही भारताच्या इतिहासांतील एक प्रचंड शक्ति व घटना आहे. तिची स्पष्ट कल्पना राजपुत्र सिद्धार्थाचें जीवन सांगून होणार नाहीं. बुद्धाचे आनंदासारखे पट्टशिष्य, त्याचा न्हावी जातींतील प्रसिद्ध शिष्य, विहारांतील भिक्षू आणि भिक्षुणी, त्यांचें जीवन, त्यांचे प्रवास आणि प्रचार, पावसाळ्याच्या मुक्कामांत दर विहारांत होणारीं त्यांचीं ज्ञानसत्रें इतकेंच नव्हे तर बुद्धाला आणि बौद्धधर्माला विरोध करणारे देवदत्तासारखे इतर अनेक धर्मप्रचारक आणि त्यांचे पंथ, अशोक, हर्ष, कुमारिलभट्ट, शंकराचार्य, या बौद्धधर्माशीं जवळचा संबंध आलेल्या व्यक्ति आणि भिक्षू न झालेले परंतु जीवनावर बुद्धाच्या शिकवणीचा संस्कार घडलेलीं संसारी माणसें–या सर्वांचा यथायोग्य आणि यथाकाल परामर्श घेतल्याशिवाय बौद्धधर्माच्या भारतांतील एक हजार वर्षांच्या इतिहासाची मुलांना नीट कल्पना येणार नाहीं.

आपला मराठ्यांचाच इतिहास घ्या. नुसत्या शिवाजीमहाराजांच्या गोष्टी चालणार नाहींत. त्या अवश्य सांगाव्या, पण आणखी दुसरें पुष्कळ सांगावें लागेल. शिवाजीमहाराजांच्या वेळचे आपसांत भांडणारे देशमुख–देशपांडे, त्या वेळचे शेतकरी आणि उदमी, त्या वेळचे संत, त्या वेळचीं देवस्थानें आणि क्षेत्रें यांचाहि परिचय करून द्यावा लागेल.

याप्रमाणें पथ्यें पाळलीं आणि खबरदारी घेतली तर गोष्टीरूप इतिहास लहान मुलांना उपयुक्त आणि उद्बोधक होईल. इतकेंच नव्हे तर पुढें माध्यमिक शाळांतून अणि कॉलेजांतसुद्धां हीं "मोठीं माणसें" इतिहासाच्या फार उपयोगी पडणार आहेत. पहिली गोष्ट म्हणजे एकेक मोठा मनुष्य म्हणजे एकेक खुंटी. त्या

खुंटीवर त्या काळचा इतिहास टांगतां येतो. आणि या खुंट्यांमुळें इतिहासांतला कालक्रम व सातत्य मुलांच्या डोळ्यांसमोर ठेवतां येतें. कालक्रमाच्या दृष्टीनें या मोठ्या माणसांचा इतिहासांत रस्त्यावरील मैलांच्या दगडांसारखा उपयोग होतो; ते नसते तर काळाच्या बाबतींत गोंधळ झाला असता. प्रौढ माणसांनासुद्धां थोर माणसांच्या जीवनांतून इतिहासाचा परिचय मनोरंजक होईल. माध्यमिक शाळांत आणि कॉलेजांत तात्त्विक इतिहासाची चर्चा पुष्कळ वेळां मुलांच्या डोक्यावरून जाण्याचा धोका असतो. तात्त्विक चर्चेच्या धमालींत विद्यार्थी त्रिशंकूप्रमाणें आकाशांत घुटमळत राहण्याचा धोका आहे. अशा तात्त्विक धोक्याच्या प्रसंगीं कुशल शिक्षकानें त्या त्या काळच्या व्यक्तींचा आणि त्यांच्या कृत्यांचा उल्लेख केला म्हणजे मुलांचे पाय जमिनीला भक्कम लागतील आणि त्यांना तो तात्त्विक इतिहास समजेल.

स्टॅन्ले हॉलचा सिद्धान्त आणि विभूतिपूजनाचा सिद्धान्त या दोन सिद्धान्तांचा योग्य आणि बेताचा उपयोग करून आपल्याला आतां प्रत्यक्ष अभ्यासक्रमाकडे वळायचें आहे. आपलें उद्दिष्ट निश्चित आहे. आपल्याला मनुष्यप्राण्याच्या पृथ्वीतलावरील उत्क्रांतीचा कालक्रमानें इतिहास सांगावयाचा आहे. हा इतिहास रचण्याचे अनेक मार्ग आहेत. गोष्टीरूप इतिहास सांगावयाचा झाल्यास ऐतिहासिक महत्त्व असलेल्या नाना क्षेत्रांतील नाना व्यक्तींची कालक्रमानें निवड करतां येईल, किंवा एखादी मध्यवर्ति कल्पना घेऊन जगाच्या इतिहासांत तिचा उगम आणि विकास कसा होत गेला हें सांगतां येईल. मनुष्यप्राणी आजवर नाना प्रकारचीं अवजारें आणि हत्यारें वापरीत आला आहे. **माणसाचीं हत्यारें व अवजारें** या मध्यवर्ति कल्पनेच्या आधारावर लहान मुलांना जगाचा मजेदार इतिहास सांगतां येईल. आधीं मनुष्यप्राणी ओबडधोबड दगड वापरीत होता; मग साफसूफ करून धार लावून दगड वापरूं लागला. सारीं हत्यारें आणि अवजारें दगडाचींच. पुढें त्यासाठीं तांबें वापरूं लागला. पुढें लोखंड वापरूं लागला. आणि आतां कदाचित अणुशक्ति वापरील.

जगाचा इतिहास, मनुष्यप्राण्यानें क्रमाक्रमानें शोधून काढलेल्या आणि वापरलेल्या **वाहनांच्या इतिहासाच्या** रूपानेंसुद्धां सांगतां येईल. आणि तो सांगतांना आधीं कुंभाराच्या चाकाचा कसा शोध लागला, माणसानें तीं दोन चाकें उभीं करून गाडा कसा बनविला, इथपासून सुरुवात करतां येईल. ‘ **मनुष्य**

**आणि त्याचें अन्न**' या एका मध्यवर्ति कल्पनेच्या आधारानेंदेखील जगाचा इतिहास रचतां येईल. आरंभीचा, शिकार करून उपजीविका करणारा भटक्या मनुष्य, मग गुरेंढोरें पाळणारा भटक्या गुराखी, मग घर करून राहणारा स्थायिक शेतकरी असा क्रम साधतां येईल. एवंच, एखादी व्यापक अशी मध्यवर्ति कल्पना आधाराला घेऊन सोप्या आणि मनोरंजक भाषेंत मुलांना जगाचा इतिहास ९ व्या १० व्या वर्षांत्सुद्धां सांगतां येण्यासारखा आहे. विशेषतः मनुष्यप्राण्याच्या सांस्कृतिक जीवनाचा इतिहास मुलांना फार आवडतो. आणि येथें स्टॅन्ले हॉलच्या कल्पनांचा पुष्कळ उपयोग होऊं शकतो. झाडावर राहणारा मनुष्य, गुहेंत राहणारा मनुष्य, चार पायांवर चालणारा मनुष्य, अग्नीचा शोध करणारा मनुष्य, कुत्रा, घोडा, आणि गुरें यांना माणसाळगवणारा मनुष्य, शेती करणारा मनुष्य, लहान लहान गांवें वसवून राहणारा मनुष्य, हे सर्व टप्पे मुलांना परीकथेप्रमाणें मनोरंजक वाटतात.

एवंच, मुलांचें वय लक्षांत घेऊन त्यांना झेपेल आणि आवडेल अशा प्रकारचे अभ्यासक्रम आंखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे अभ्यासक्रम आंखतांना संस्कृति-सोपान-सिद्धान्तांतील कल्पना अवश्य विचारांत घ्याव्या. इंग्रजी भाषेंत या दिशेनें पुष्कळच प्रयत्न झाले आहेत. पीअर्स, प्लाउमन, ( Piers–Plowman ) या इतिहासमालेंत इंग्लंडमधील एका प्रातिनिधिक शेतकरी कुटुंबाचें जीवन कालक्रमानें दाखविलें आहे. या इतिहासांत राजे आणि युद्धें यांना प्राधान्य नाहीं. त्या शेतकरी कुटुंबालाच प्राधान्य आहे. याखेरीज The Headway Histories, Headway Biographies, The Kingsway Series, The March of History, इत्यादि इतिहास-मालांमध्यें केलेले प्रयोग विचार करण्यासारखे आहेत. आपणहि आपल्या देशांत अशा प्रकारचे प्रयोग अभ्यासक्रमांत केले पाहिजेत.

● ● ●

## प्रकरण सहावें

# अभ्यासक्रमाचे कांहीं नमुने

मागील प्रकरणांत अभ्यासक्रमावर जी तात्त्विक चर्चा केली तिला अनुसरून खालीं कांहीं अभ्यासक्रम सुचविले आहेत. कल्पक शिक्षकांना अशा प्रकारें दुसरे कांहीं अभ्यासक्रम सहज तयार करतां येतील. खूप वाचन, खूप मनन आणि हौस मात्र पाहिजे. आणि अर्थात् शाळाखात्यानें या क्षेत्रांत प्रयोग करण्यास स्वातंत्र्य दिलें पाहिजे.

| | |
|---|---|
| वय ७, ८ | (१) रामायण आणि महाभारतांतील गोष्टी. |
| वय ९ | (२) जगाचा, विशेषतः प्राचीन जगाचा, सोपा सुटसुटीत गोष्टीरूप इतिहास. |
| वय १० | (३) गोष्टीरूप प्रादेशिक इतिहास (महाराष्ट्र) |
| वय ११, १२, १३ | (४) भारताचा गोष्टीरूप किंवा कथनात्मक (narrative) इतिहास. |
| वय १४, १५ | (५) भारताचा प्रगत इतिहास. |
| | (६) इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास, किंवा भारताचा प्रगत इतिहास व त्यांमधून अवश्य तेवढा जागतिक इतिहास. |
| वय १६, १७ | (७) जगाचा इतिहास. |
| | (८) भारताच्या एका कालखंडाचा विशेष अभ्यास. |
| | (९) नागरिकशास्त्र. |
| | (१०) राज्यघटना व राज्यकारभार. |

वरील अभ्यासक्रमाबाबत आतां थोडी चर्चा करूं.

[ १ ] या अभ्यासक्रमांत **स्थानिक इतिहासाला** स्थान दिलें नाहीं हें लक्षांत येईल. स्थानिक इतिहास स्वतंत्रपणें प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांत शिकवितां येण्यासारखा नाहीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें सर्व स्थळांना तो उपलब्ध असतोच असें नाहीं. प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा जागतिक इतिहास शिकवितांना अनुकूल त्या प्रसंगीं स्थानिक इतिहासांतले दाखले अवश्य घ्यावे आणि त्या इतिहासाच्या अध्यापनाच्या प्रसंगीं वेळोवेळीं स्थानिक इतिहासाची पार्श्वभूमीहि तयार करावी. यापेक्षां म्हणजे तोंडीं लावण्यापेक्षां स्थानिक इतिहासाला स्थान नाहीं.

[ २ ] सात आठ वर्षांच्या मुलांसाठीं रामायण-महाभारतांतील गोष्टी सुचविल्या आहेत. या गोष्टी ही एक प्रकारची इतिहासाची पार्श्वभूमि समजण्यास हरकत नाहीं. या गोष्टींना सांस्कृतिक महत्त्व खास आहेच. पूर्वी आमच्या पिढीला लहानपणीं आजीबाई या गोष्टी सांगत असत. कथा-कीर्तनांतसुद्धां त्या गोष्टी रंगवून आणि खुलवून सांगण्यांत येत. त्या आजी गेल्या आणि तीं कथा-कीर्तनेंहि गेलीं. आतां बोलपट आले. पूर्वीच्या काळीं आमच्या मनावर लहानपणींच हे जे संस्कार घरीं आणि देवळांत होत असत ते नाहींसे झाले आहेत. आतां शाळांनींच त्या घरांची आणि देवळांची जागा घेतली पाहिजे.

या गोष्टींना ऐतिहासिक महत्त्वहि आहे. रामायण-महाभारतांतील सर्वच गोष्टी व व्यक्ति खऱ्या आहेत असें कोणीच म्हणणार नाहीं. बऱ्याच गोष्टी अद्‌भुत आणि अलौकिक आहेत. परंतु या महाकाव्यांतील मुख्य कथा ऐतिहासिक सत्याला धरून आहेत आणि त्यांत जी सामाजिक व सांस्कृतिक इतकेंच नव्हे तर राजकीय परिस्थिति वर्णिली आहे ती प्राचीन इतिहासाला धरूनच आहे. तेव्हां रामायण-महाभारतांतील कथांपासूनच इतिहास–शिक्षणाचा श्रीगणेशा करावा हें युक्त दिसतें. त्यांतील अद्‌भुत कथांना कितपत वाव द्यावा हा प्रश्न आहे. या वयांत लहान मुलांना लौकिकापेक्षां अलौकिकाचें आकर्षण अधिक असतें. आणि स्वाभाविकापेक्षां अद्‌भुतांत त्यांचें मन अधिक रंगतें. तेव्हां आरंभीच्या इतिहासांत अद्‌भुताचा मालमसाला थोडा मिसळला गेला तर बिघडणार नाहीं. वय वाढतें तसें मूल अलौकिकाकडून लौकिकाकडे आपोआपच वळत असतें. शिवाय स्टॅन्‌ले हॉलचीहि यांत बूज ठेवल्यासारखें होईल.

[ ३ ] रामायण–महाभारताच्या गोष्टींनंतर **जागतिक इतिहासाचा** प्राथमिक अभ्यासक्रम सुचविला आहे. आणि तोहि नऊ वर्षांच्या मुलांसाठीं. जागतिक हा शब्द भीति वाटण्यासारखा आहे. परंतु या प्रारंभीच्या जागतिक इतिहासांत घाबरण्यासारखें कांहींच नाहीं. हा गोष्टीरूप असणार. मात्र मुख्यत्वेंकरून या गोष्टी व्यक्तींच्या नसून समाजाच्या असतील आणि त्या रामायण-महाभारतांतील गोष्टीं-इतक्याच अद्भुत वाटतील. रामायण–महाभारतांतील गोष्टींत आणि या जागतिक गोष्टींत बराच मोठा फरक आहे. त्या महाकाव्यांतील कांहीं गोष्टी किंवा कांहीं प्रसंग काल्पनिक किंवा अवास्तव असतील, तर या जागतिक इतिहासांतील गोष्टी तपशिलासह खऱ्या असणार आणि खऱ्या असून अद्भुत असतील. हीच मोठी गंमत आहे. मुलांना या गोष्टी खास आवडतील. मनुष्यप्राणि आरंभीं झाडावर राहत होता, गुहेंत राहत होता. त्याला बोलतां येत नव्हतें, धान्य माहीत नव्हतें, वस्त्रें नव्हतीं, हत्यारें नव्हतीं. अशा अडचणीच्या परिस्थितींत माणसानें आपल्या बुद्धिबळानें इतर प्राण्यांवर मात केली आणि पृथ्वीच्या पाठीवर आपलें प्रभुत्व प्रस्थापित केलें. हा इतिहास मनोरंजक आहे तसाच स्फूर्तिदायकहि आहे. हा पराक्रमाचा आणि निर्मितीचा इतिहास आहे. आणि एवढें असून तो परीकथां-प्रमाणें चटकदार आहे.

भारताचा इतिहास शिकविण्यास घेण्यापूर्वीं जागतिक इतिहासाची पार्श्वभूमि मुलांच्या डोळ्यांसमोर तयार करण्यांत एक हेतु आहे. या व्यापक पार्श्वभूमीवर राष्ट्रीय इतिहासाचें चित्र रंगविलें म्हणजे मुलांना त्याचें यथार्थ असेंच दर्शन घडेल. त्यांत कमीजास्तपणा येणार नाहीं. प्रारंभिक जागतिक इतिहासाचा एक गोष्टीरूप अभ्यासक्रम खालीं सुचविला आहे; तो वाचल्यावर इतक्या लहानपणींसुद्धां जागतिक इतिहासाचा अभ्यासक्रम शिकविणें कसें शक्य आहे हें सहज पटेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. हस्तगत.
अनुक्रमांक ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

**जागतिक प्राचीन इतिहासाचा**
**प्रारंभिक अभ्यासक्रम**

(१) **शिकारी माणूस.** जिकडेतिकडे जंगल. घर ना दार; वस्त्र नाहीं, अन्न नाहीं. हत्यारें दगडाचीं. रात्रीं नक्षत्रांच्या साह्यानें शिकार करायची. दिवसा

झाडांवर किंवा गुहांत दडून वसायचें. अवतींभोंवतीं अजस्र प्राणी. अल्पायुषी जीवन.

(२) **अग्नीचा शोध.** जगांतला महत्त्वाचा शोध. त्याचे परिणाम – जगांतल्या थंड प्रदेशात वसाहती शक्य झाल्या. मास भाजतां येऊं लागलें. थंडीपासून बचाव. गुहेच्या तोंडाशीं शेकोटी पेटवून खुशाल निधास्त झोंप. गुहेच्या तोंडाशीं अग्नि आल्यापासून हिंस्र श्वापदें गुहेकडे फिरकेनाशीं झालीं. कदाचित् अग्नि हाच माणसाचा पहिला देव आणि मास भाजण्यासाठीं व श्वापदांपासून रक्षण करण्यासाठीं पेटविलेला अग्नि हाच मनुष्यप्राण्याचा पहिला यज्ञ.

(३) **कुंभाराच्या चाकाचा शोध.** फार मोठा क्रांतिकारक शोध. मातीचीं भांडीं घडवितां येऊं लागलीं. त्यांत पाणी व मास शिल्लक ठेवतां येऊं लागलें. कुंभाराचीं दोन चाकें उभीं केल्यावर गाडा तयार झाला. वाहनाचा शोध लागला. मनुष्य न थकतां लांबचा प्रवास करूं लागला.

(४) **कुत्रा, घोडा आणि गुरें मनुष्याचे मित्र होतात.** या प्राण्यांना मनुष्य प्रेमानें आणि धाकानें आपल्या आधीन ठेवतो. त्यांचा उपयोग गुरांचे खिल्लार; गुरांचा गोठा म्हणजेच गोत्र. सर्व नातेवाईकांचा गोठा एकच म्हणून गोत्र एकच. गाईची धार काढणारी मुलगी ती दुहिता ! असा गुरांचा मानवी जीवनावर परिणाम घडतो. गुरें हेंच व्यवहाराचें चलन. कांहीं घेणें असल्यास गुरांच्या रूपानें किंमत देणें. हुंडा देणें तोसुद्धां गाईच्या रूपानें.

(५) **शेतकरी माणूस.** जंगली तृणधान्यापासून शेतीचा शोध. शेतजमिनीचें आणि वेगवेगळ्या मोसमांचें ज्ञान. भटकें जीवन संपलें. घरें आणि गांवें यांची वसणूक. सामाजिक जीवन.

(६) **मनुष्याचीं आरंभीचीं वस्त्रें.** आधीं दागिने आणि मग वस्त्रें. पहिलीं वस्त्रें म्हणजे वल्कलें. आजहि नागडे, रानटी लोक खूप दागिने घालतात. आधीं लोकरीचीं आणि मग कापसाचीं वस्त्रें. घरोघर माग. कपाशीचा जन्म भारतांत.

(७) **धातूंचा शोध.** तांबें, सोनें; मग लोखंड. आर्य हे लोखंडाचे उत्पादक.

(८) **लिपीचा शोध.** बहुधा सुमेरमध्यें. चिकण मातीच्या विटांवर चित्रित केलेली चित्रलिपि. तिचा पुढें विकास.

(९) **प्राचीन ईजिप्त.** सूतकताई आणि वस्त्रें विणणें. पिरॅमिडस्-भूमितीचा जन्म.

( १० ) **बॅबिलोनमधील माणसें.** कालव्यांचा शोध.

( ११ ) **मोहेंजोदडोमधील माणसें.** व्यापारी आणि शेतकरी. विटांच्या इमारती. स्नानगृहें. कपाशीचा शोध.

(१२) **फोएनिशियन्स** म्हणजे पणी. हल्लींचा पॅलेस्टाईन व सीरिया या समुद्रकिनाऱ्याचे प्रदेशांतील प्राचीन दर्यावर्दी लोक समुद्रांतून लांबलांबचे प्रवास. प्राचीन देशांतील चांगल्या कल्पनांची परस्परांना ओळख करून देणारे धाडसी मध्यस्थ. मूळाक्षरांचे शोधक.

( ११ ) **ग्रीक.** सौंदर्याचे आणि आरोग्याचे उपासक. व्यायाम. खेळांचे आणि धांवण्याचे सामने. शिल्पकला आणि मूर्तिकला.

( १२ ) **रोमन.** रस्ते आणि पूल बांधले. जगाला कायदा दिला.

( १३ ) **हिब्रू.** एकेश्वरी कल्पनेचे जनक.

वरील अभ्यासक्रम आणखीहि वाढवितां येईल किंवा कमी करतां येईल. यांत चीन आणि इराण या प्राचीन देशांची भर घालतां येईल. हा जागतिक इतिहास प्राचीन आहे हें दिसून येईल. यांत बहुतेक प्राचीन देशांचा समावेश झाला आहे. प्राचीन इतिहास हा समाजाचा इतिहास. तेथें व्यक्तीला स्थान नाहीं. या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर पुढें राष्ट्रीय इतिहास शिकवावयाचा आहे.

### [४] प्रादेशिक इतिहास

आपल्या देशांतील प्रदेश विस्तृत असून त्यांना स्वतंत्र असे इतिहास आहेत. तेव्हां ज्या त्या प्रदेशांत राहणाऱ्या मुलांना आधीं स्वतःच्या प्रदेशाचा परिचय झालेला बरा. हा प्रादेशिक इतिहाससुद्धां गोष्टीरूप असावा. गोष्टी कालक्रमानें निवडाव्यात; आणि त्यांची संख्या ३०-३२ पेक्षां जास्ती नसावी. यापेक्षां जास्ती गोष्टी एक वर्षांत शिकवितां येत नाहींत असा अनुभव आहे. महाराष्ट्राच्या इतिहासांतील गोष्टींची आजपर्यंत सरकारनें आणि इतिहासकारांनीं अनेक वेळां निवड केली आहे. तेव्हां त्या अभ्यासक्रमावर विशेष सांगण्यासारखें नाहीं. गोष्टींची निवड करतांना सर्व प्रकारचीं माणसें निवडावीं. नुसते राजेच निवडूं नयेत.

### [५] भारताचा इतिहास

हा निदान आरंभीं गोष्टीरूप असावा. या प्रकरणाच्या परिशिष्टांत भारताच्या इतिहासाचा एक गोष्टीरूप अभ्यासक्रम सुचविला आहे. त्याचा केवळ सूचना

म्हणूनच उपयोग करावा, आणि त्यांत योग्य वाटतील ते फेरफार करावे. सदर अभ्यासक्रमांत द. भारतांतील पुरेशा गोष्टी आल्या नाहींत त्या अवश्य आल्या पाहिजेत.

या तीन वर्षांत पहिल्या वर्षी भारताच्या प्राचीन कालखंडाचा गोष्टीरूप इतिहास आणि पुढें दोन वर्षं मध्ययुगीन आणि अर्वाचीन भाग कथनात्मक पद्धतीनें घ्यावा, किंवा तिन्ही वर्षें सर्व इतिहास गोष्टींच्या रूपानें शिकवावा.

**[ ६ ] भारताचा प्रगत इतिहास आणि इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास.**

यापूर्वी भारताच्या इतिहासांतील गोष्टी सांगितल्या असतील किंवा कथनात्मक पद्धत अवलंबिली असल्यास ती गोष्टीवजाच सोपी अशी असणार. आतां चौदा आणि पंधरा या दोन वर्षांत भारताच्या इतिहासाचा परत आढावा घेतला पाहिजे आणि तोहि थोड्या उच्च अशा भूमिकेवरून. त्याचबरोबर ट्यूडर राजवटीपासून इंग्लंडचा अर्वाचीन इतिहास या दोन वर्षांत शिकवावा. या राजवटीमध्येंच इंग्लंडचा आणि भारताचा संबंध प्रथम आला.

**[ ७ ] जगाचा प्रगत इतिहास**

प्रादेशिक आणि राष्ट्रीय इतिहासानंतर हा इतिहास शिकवायचा आहे. माध्यमिक शाळांच्या शेवटच्या एक किंवा दोन वर्षांत हा अभ्यासक्रम घेतां आला तर बरें. आता माध्यमिक शाळांचें एक वर्ष वाढणार आहे. आणि कांहीं हायस्कुलांचें रूपांतर हायर स्कूलांमध्यें होऊन विद्यापीठांतील आजचें पहिलें वर्ष माध्यमिक शाळांत येणार आहे. या वरच्या वर्गांत जगाचा प्रगत इतिहास अवश्य शिकवावा. हा इतिहास अर्थात् पूर्वीप्रमाणें फक्त प्राचीन काळाचा असणार नाहीं, इतकेंच नव्हे तर प्राचीन काळाच्या इतिहासाच्या तपशिलांत फारसें शिरण्याचें आतां कारण नाहीं. तसेंच मध्ययुगीन इतिहासावरसुद्धां फारसा भर देऊं नये. हा इतिहास मुख्यतः अर्वाचीन असावा. आणि अर्वाचीन जगांतील महत्त्वाच्या घडामोडी, सुधारणा, शोध, परस्परांतील देवाणघेवाण आणि संघर्ष, समाजाच्या निरनिराळ्या वर्गांनीं स्वातंत्र्यासाठीं व अभ्युदयासाठीं केलेले प्रयत्न यांचें या इतिहासांत विवेचन असावें. हा इतिहास शिकवितांना त्याचा पदोपदीं राष्ट्रीय इतिहासाशीं समन्वय करावा. हा इतिहास गोष्टीरूप नसला तरी तो केवळ तात्त्विक स्वरूपाचा नसावा. महत्त्वाच्या व्यक्ति आणि त्यांनीं केलेली कामगिरी या इतिहासांतसुद्धां खुलवून सांगतां येण्याजोगी आहे.

## परिशिष्ट ( अ )

## भारताचा गोष्टीरूप इतिहास

खिस्तपूर्व सुमारें १०००० ते खिस्तपूर्व ५०००

( १ ) भारतांतील अश्मयुग. गुहेंतील माणसें, त्यांचें जीवन.

( २ ) **खिस्तपूर्व सुमारें २५००.** मोहेंजोदडोची सिंधु–संस्कृति. व्यापार आणि शेती. गहूं, जव, कपाशी यांची पैदास. व्यापारी व त्यांच्या नावा. इराणच्या आखातामधून बॅबिलोनशीं व्यापार. नगररचना. घरें; त्यांतील विहिरी. स्नानगृहें.

( ३ ) खिस्तपूर्व सुमारें २०००. एका वसिष्ठ-विश्वामित्रासारख्या आर्य पितामहाची कथा. लोकजीवन. शेतकरी आणि गुराखी. निसर्गपूजा. यज्ञसंस्था. वर्णाश्रम धर्माचा उदय.

( ४ ) अगस्ति आणि राम. विंध्याद्रीचा अडथळा. आर्यांचा दक्षिणदिग्विजय.

( ५ ) महाभारताची कथा.

( ६ ) बुद्ध. वर्णाश्रम धर्म आणि यज्ञसंस्था यांच्याविरुद्ध बंड.

( ७ ) चंद्रगुप्त मौर्य. अलेक्झांडर, नंद, मेगॅस्थिनिस, चाणक्य यांच्याशीं सांगड.

( ८ ) अशोक. बौद्धधर्माचा विस्तार.

( ९ ) गुप्त राजे. समुद्रगुप्त आणि चंद्रगुप्त.

( १० ) कालिदास आणि नवरत्नें. हिंदु कला आणि विज्ञान. ज्योतिषशास्त्र आणि गणित.

( ११ ) हर्ष. हूणांच्या स्वाऱ्या.

( १२ ) पुलकेशी. अजंठ्याचीं लेणीं.

( १३ ) शंकराचार्य.

( १४ ) पृथ्वीराज आणि जयचंद्र; रजपुतांचें जीवन, पराक्रम, भाऊबंदकी.

( १५ ) अकबर.

( १६ ) नानक आणि कबीर.

(१७) राणा प्रताप. राजपूतांचा देशाभिमान आणि स्वार्थत्याग यांचें उदाहरण. हळदीघाटाचें युद्ध.

(१८) शहाजहाँ. ताजमहालची निर्मिति.

(१९) औरंगजेब – शेवटचा मोगल.

(२०) शिवछत्रपति.

(२१) पहिला बाजीराव. मराठ्यांचा उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश.

(२२) रॉबर्ट क्लाइव्ह.

(२३) राममोहन रॉय. आधुनिक भारताचे जनक. इंग्रजी शिक्षणाचे पुरस्कर्ते. सामाजिक व धार्मिक सुधारणांचे अध्वर्यु.

(२४) जमशेटजी टाटा – औद्योगिक क्रांतीचे जनक.

(२५) न्यायमूर्ति रानडे.

(२६) ज्योतिराव फुले व लोकहितवादी.

(२७) आगरकर.

(२८) लोकमान्य टिळक.

(२९) महात्मा गांधी.

(३०) आचार्य विनोबा.

## परिशिष्ट (ब)

## जगाच्या इतिहासाचा 'युनेस्को' नें तयार केलेला अभ्यासक्रम

(१) मानवी समाजरचनेची सुरुवात

(२) मानवी संस्कृतीचीं चार प्राचीन केंद्रें : भारत, मेसापोटेमिया, (बॅबिलोन), ईजिप्त आणि चीन. (शेती, समाजरचना, शासनसंस्था (स्टेट), पुरोहित राजे किंवा देव–राजे (प्रीस्ट किंग्ज् आणि गॉड किंग्ज्), शहरें, लिपी.

(३) आर्यांचीं परिभ्रमणें, हिटाइट, (हत्ती) इराणी व भारतीय आर्य.

(४) ग्रीस (लोकशाही, कलाविज्ञान)

(५) रोम (शासनसंस्था आणि कायदा)

(६) बौद्धधर्म; त्याचा उगम, विकास आणि भारताबाहेर प्रसार. हीनयान आणि महायान पंथ

(७) ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म, सेंट पॉल. या धर्माची बांधणी आणि विकास

(८) अनेक वंशांचीं परिभ्रमणें आणि त्यांचे परिणाम

(९) फ्रँक लोकांनीं उभारलेलें साम्राज्य आणि नॉर्मन लोकांनीं स्थापन केलेलीं वेगवेगळीं प्रादेशिक राज्यें

(१०) मध्ययुगीन युरोपमधील जीवन

(अ) सरंजामशाही पद्धत; शिलेदारी (शिव्हलरी)

(ब) शेतकरी

(क) धर्मपीठ व त्याचें यूरपभर पसरलेलें जाळें

(११) पौर्वात्यांचे यूरप खंडावर घडलेले संस्कार

(अ) इस्लाम आणि धर्मयुद्धें

[ १ ] अरबी संस्कृति

[ २ ] धर्मयुद्धांचे आर्थिक व सांस्कृतिक परिणाम

(ब) तार्तर लोक रशिया पादाक्रांत करतात; त्यांच्या विजयाचे आणि राजवटीचे परिणाम

(१२) मध्ययुगापासून आधुनिक युगाकडे

(अ) शहरांचा उदय

(ब) सामाजिक क्रांति

(क) बादशहा आणि पोप यांचे संघर्ष

(ड) राष्ट्रीय राज्यांचा ( National States ) उदय

(१३) आधुनिक युग

(अ) शास्त्रीय संशोधन आणि शास्त्रीय व भौगोलिक शोध.

(ब) मानवतावाद आणि पुनरुत्थान म्हणजेच ग्रीक संस्कृतीचें पुनर्जीवन (Renaissance)

(क) प्रॉटेस्टंट धर्मक्रांति – जर्मनी आणि इंग्लंड

(१४) युरोपीय राजकीय विकासाचीं दोन अंगें : (i) एकतंत्री राज्यव्यवस्था आणि (ii) लोकशाही राज्यव्यवस्था

(अ) लोकशाहीचा उदय; हॉलंड, इंग्लंड

(ब) एकतंत्री राज्यें; स्पेन, फ्रान्स, प्रशिया, ऑस्ट्रेलिया आणि रशिया

(१५) सतराव्या आणि अठराव्या शतकांतील सामाजिक आणि आर्थिक विकास

(अ) सामाजिक जीवन : राजे आणि त्यांचे दरबार ( चौदावा लुई ) मध्यम वर्ग, खेडूत

(ब) व्यापाऱ्यांचे संघ व यंत्रणा आणि वसाहती संपादन करण्याची राष्ट्रांची चढाओढ

(१६) प्रबोधनाचें युग ( The Age of Enlightenment ) पश्चिम युरपमध्यें उदयास आलेले नवीन विचार आणि त्यांचा प्रसार

(१७) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांची उभारणी : स्वातंत्र्यप्राप्ति आणि राज्यघटना

(१८) फ्रेंच राज्यक्रांति आणि नेपोलियन. फ्रान्समधील क्रांतिकारक विचारांचा यूरपमध्यें प्रसार

(१९) औद्योगिक क्रांति

(अ) यंत्रयुग

(ब) इंग्लंड. युरपखंडांत औद्योगिक क्रांतीचा प्रसार

(क) औद्योगिक शहरांचा उदय, त्याचे सामाजिक परिणाम; कामकरी आणि यंत्रांच्या साह्यानें उत्पादन करणाऱ्यांचा नवा वर्ग.

(२०) १८१५ नंतरचे यूरपखंडांतील राजकीय प्रवाह

(अ) राजकीय सनातनवाद ( कॉन्झर्व्हेटिझम् ) : होली अलायन्सचें धोरण

(ब) राष्ट्रवाद : ग्रीस, लॅटिन, ( दक्षिण ) अमेरिका, बेल्जम, पोलंड इत्यादि

(क) उदारमतवाद : १८३०, १८३२

(ड) १८४८ ची क्रांति.

(२१) १८४८ ते १९१४ मधील प्रमुख आणि बलाढ्य देश

(२२) साम्राज्यवाद

(अ) खंडांच्या परस्परावलंबनाची सुरुवात

(ब) वसाहतींविषयींच्या स्पर्धा

(क) पहिल्या महायुद्धाचीं कारणें

(२३) १८४८ ते १९१४ मधील समाजस्थिति

(अ) सामाजिक सुधारणा आणि सामाजिक सुरक्षितता

(ब) गुलामांची मुक्ति

(क) १८६१ मध्यें रशियांत भूदासांना (Surf) मिळालेलें स्वातंत्र्य

(ड) स्त्रीस्वातंत्र्याची वाटचाल

(इ) मतदानहक्काचा विस्तार

(फ) शिक्षणाची वाढ

(२४) पहिल्या महायुद्धानंतरचें जग

(अ) आर्थिक आणि सामाजिक परिणाम

(ब) यू. एस्. एस्. आर.

(क) हुकुमशाहीं राष्ट्रें

(ड) अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें

(इ) ब्रिटिश राष्ट्रकुल

(फ) हिंदुस्थान आणि चीन

(ग) मध्यपूर्व

(ह) यूरपमधील स्थित्यंतरें

(२५) दुसऱ्या महायुद्धाचीं कारणें

(२६) दुसऱ्या महायुद्धानंतरचें जग

(२७) जागतिक शांततेसाठीं प्रयत्न : युनो, युनेस्को इत्यादि.

हा अभ्यासक्रम सकृद्दर्शनीं भयावह आहे. शिवाय तो यूरपखंडांतील मुलांच्या दृष्टीनें मुख्यतः तयार केलेला आहे. म्हणून आपल्या मुलांच्या दृष्टीनें त्यांत कांहीं अधिक मुद्दे आले पाहिजेत आणि त्यांतील बरेचसे मुद्दे गाळले पाहिजेत. हा

अभ्यासक्रम तयार करणाऱ्या समितीनेंच, अभ्यासक्रमांतील आठपासून बारापर्यंतचे मुद्दे युरपेतर देशांतील मुलांच्या दृष्टीनें वगळावेत आणि त्यांचा मध्ययुगीन कालाचा अभ्यास करतांना केवळ उल्लेख करावा असें सुचविलें आहे. त्याचप्रमाणें (१५) अ आणि (१६) हे मुद्दे फ्रेंच राज्यक्रांतीला जोडून घ्यावेत, वेगळे घेऊं नयेत, अशी या समितीची सूचना आहे. शिवाय फ्रेंच राज्यक्रांति शिकवितांना तिची पार्श्वभूमि म्हणजे प्रभावी कारणें आणि प्रेरणा देणारे विचार व त्या क्रांतीचे परिणाम यांवरच भर द्यावा; त्या क्रांतींत घडलेल्या घटनांच्या तपशिलांत शिरूं नये अशीहि सूचना या समितीनें केली आहे.

समितीनें वगळण्यास सांगितलेल्या मुद्द्यांखेरीज इतर कांहीं मुद्दे, विशेषतः कांहीं पोटमुद्दे वगळतां येण्यासारखे आहेत. याचा ज्या त्या शिक्षकानें किंवा अभ्यासक्रम तयार करण्याचा ज्या समितीकडे अधिकार असेल तिनें विचार करावा. हा जगाचा इतिहास ज्या अर्थी माध्यमिक शाळांच्या शेवटच्या वर्षात (कदाचित् प्री-युनिव्हर्सिटी वर्गांत) शिकविला जाणार आहे, त्या अर्थी तो आहे त्यापेक्षां अधिक सोपा आणि सुटसुटीत करावा हें योग्य आहे. इतकेंच नव्हे तर या श्रेणींत जगाचा इतिहास होतां होईलतों राष्ट्रीय इतिहासाच्या अनुरोधानें शिकवावा हें बरें. याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग म्हणजे राष्ट्रीय इतिहास शिकवितांना आपल्या राष्ट्राचा जगाशीं जेव्हां जेव्हां संबंध येतो तेव्हां तेव्हां जगाच्या इतिहासाचा योग्य तो परामर्श घ्यावा. हा प्रकार दुसऱ्या श्रेणीसाठीं (इयत्ता ८,९) आपण अवलंबिला आहे. तिसऱ्या श्रेणींत जगाचा इतिहास हें प्रधान उद्दिष्ट समजून त्या इतिहासांत जेथें जेथें स्वदेशाचा संबंध येईल तेथें तेथें स्वदेशाविषयींच्या परिस्थितीचा खुलासा करावा. वर दिलेल्या अभ्यासक्रमांत युरपखंडांतील सामाजिक क्रांतीचा किंवा धार्मिक क्रांतीचा उल्लेख आहे. या क्रांत्यांचा त्या त्या वेळीं आपल्या देशांत स्पर्शहि झाला नसेल, उलट एकोणिसाव्या शतकापासून इंग्रजी शिक्षणामुळें आणि अन्य कारणांमुळें आपल्या देशांत राजकीय चळवळीबरोबरच सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्रांतींची एकसमयावच्छेदेंकरून लाट आली आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युरपखंडांत ग्रीक संस्कृतीचें पुनरुत्थान झालें तें पंधरा-सोळाव्या शतकांत. आपल्याकडे त्यावेळीं तसें कांहींच घडण्याचें कारण नव्हतें. आपल्या ज्ञानेश्वरांनीं कितीतरी पूर्वी १३ व्या शतकांत

संस्कृत विद्येला देशिकार लेणें दिलें. जगाचा इतिहास शिकवितांना आपले पाय स्वदेशाच्या भूमीवर भक्कम रोवले गेले पाहिजेत आणि जागतिक घटनांचा विचार करतांना समकालीन स्वदेशीय परिस्थितीशीं त्यांची तुलना केली पाहिजे. या तुलनेनें आपल्याला नवीन अनुभव येतील व आपल्या इतिहासावर नवीन प्रकाश पडेल. कधीं इतर देशांत धार्मिक सामाजिक क्रांति घडत असतां आपला देश झोपलेला आढळेल, कधीं फार हळू उत्क्रांतीच्या मार्गावर वाटचाल करतांना आढळेल आणि एकोणिसाव्या शतकांत मागील मंदगतीची भरपाई म्हणून थोडासा भांबावल्यासारखा होऊन सर्व क्षेत्रांत धावतांना दिसेल. ही एक मोठी गंमत आहे. या तुलनेनेंच आपल्या देशाचें वास्तविक स्वरूपाचें आपल्याला दर्शन घडेल.

• • •

## प्रकरण सातवें

# इतिहासाचें विवेचन

इतिहास शिकवायचा म्हणजे काय काय शिकवायचें हें निश्चित झाल्यावर तें कोणत्या पद्धतीनें शिकवायचें, त्याचें वर्गात विवेचन (treatment) कसें करायचें हा पुढचा प्रश्न. सामान्यतः चार विवेचन-पद्धति मानल्या जातात; त्या अशा—

(१) समकेन्द्र पद्धत
(२) कालक्रम पद्धत
(३) विषयानुसारी (topical) पद्धत
(४) परावर्तन (regressive) पद्धत

यांतील तिसऱ्या व चौथ्या पद्धतींना विशेष महत्त्व नाहीं. तिसरी पद्धत तर दुसरीच्या पोटांतच आहे. खरा विरोध आहे तो समकेन्द्र आणि कालक्रम या दोन विवेचनपद्धतींत; त्यांचाच आपण आधीं विचार करूं.

**समकेन्द्र पद्धत :–** या पद्धतींत निश्चित केलेला अभ्यासक्रम दर वर्गात पुनरावृत्त होतो. कल्पना करा, पहिल्या वर्षी भारताचा गोष्टीरूप इतिहास शिकविला तर दुसऱ्या वर्षी तोच इतिहास थोडा अधिक तपशील देऊन शिकवावयाचा. तिसऱ्या वर्षी परत तोच इतिहासाचा भाग परंतु अधिक तपशील. याप्रमाणें तोच तो अभ्यासक्रम अधिकाधिक तपशीलासह शाळेंतील सर्व वर्गात या पद्धतीनें शिकविला जाईल.

प्रत्यक्ष व्यवहारांत असें कोणींच केलें नाहीं. दरसाल पुनरावृत्ति न करतां दोन किंवा तीन वर्षांनीं ती करण्याचा बऱ्याच शाळांत परिपाठ होता. माध्यमिक शाळा सात वर्षांची. या सात वर्षांचे तीन भाग पाडायचे. पहिल्या तीन वर्षांचा

म्हणजे इयत्ता ५, ६, ७ यांचा पहिला गट, इयत्ता ८, ९ यांचा मधला गट आणि शेवटच्या दोन वर्षांचा तिसरा आणि शेवटचा गट. या व्यवस्थेंत इतिहासाची पुनरावृत्ति फक्त दोनदां होईल. पहिल्या तीन वर्षांत जो इतिहास मुलांना सांगायचा तो गोष्टीरूप, साधा, सोपा आणि मनोरंजक असावा. या तीन वर्षांत तत्त्वापेक्षां ऐतिहासिक व्यक्तींना महत्त्व जास्त. मधल्या गटांत इतिहास कथनात्मक पद्धतीनें शिकविला जाईल पण तो मुलांच्या वयोमानाप्रमाणें सोपा असाच असेल. शेवटच्या दोन वर्षांत व्यक्तीपेक्षां तत्त्वांना प्राधान्य मिळेल आणि इतिहासांतील समस्या चिकित्सक वृत्तीनें मांडल्या जातील. समकेंद्रपद्धत मर्यादित स्वरूपांत उपयोगांत आणली तर तिचा वाईट परिणाम होण्याचा संभव नाहीं.

या पद्धतीविरुद्ध सामान्यतः खालील आक्षेप ऐकूं येतात.

(अ) सर्व इतिहास एक किंवा फार तर दोन, कदाचित् तीन वर्षांत संपवायचा असल्यामुळें फार घाई होते. इतिहास खुलवून सांगतां येत नाहीं. त्रोटक, जुजबी गोष्टीच सांगण्यापुरतां वेळ मिळतो. इतिहासाचें सर्वांगीण दर्शन या समकेन्द्र पद्धतीनें होऊं शकत नाहीं.

(ब) तोच तो इतिहास परत परत सांगावा लागत असल्यामुळें विवेचनांत ताजेपणा राहत नाहीं. मुलांना मौज वाटत नाहीं. कंटाळा येतो.

हे दोन्ही आक्षेप आत्यंतिक अशा समकेंद्रपद्धतीवर आहेत. वर सांगितल्याप्रमाणें सहा सात वर्षांची वांटणी तीन गटांत केली तर दर खेपेस पुरेसा इतिहास सांगतां येईल. शिवाय तोच तो-पणाचा आरोप तितकासा खरा नाहीं. इतिहासाचा मध्ययुगीन भाग किंवा अर्वाचीन भाग शिकवायचा म्हणजे तो कालखंड पुनरावृत्त होतो; त्या कालखंडांत घडलेल्या घटनाहि पुनरावृत्त होतात असें समजण्याचें कारण नाहीं. आरंभीं व्यक्तींच्या गोष्टी सांगितल्या असल्या तर पुनरावृत्तीच्या वेळीं कालक्रमानें कथनात्मक पद्धतीनें इतिहासाचा तो भाग सांगितला जाईल. म्हणजे पुनरावृत्तीचा दोष टळेल. तथापि कांहीं प्रमाणांत महत्त्वाच्या व्यक्ति आणि घटना यांची या पद्धतींत पुनरावृत्ति अपरिहार्य आहे हें मान्य केलेंच पाहिजे.

**कालक्रमपद्धत :–** या पद्धतींत कोणत्याहि प्रकारें पुनरावृत्ति न करतां सरळ इतिहास आरंभापासून शेवटपर्यंत ठरलेल्या वर्षांत शिकवावयाचा असतो. आपली माध्यमिक शाळा सात वर्षांची, तेव्हां सिंधु–संस्कृतिपाशीं सुरुवात करून थेट परवाच्या स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा पांच हजार वर्षांचा इतिहास सात वर्षांत सम-

प्रमाणांत वांटून टाकायचा. कोठेंहि पुनरावृत्ति होणार नाहीं. दरसाल नवा इतिहास, नव्या व्यक्ति आणि नव्या घटना.

प्रत्यक्ष व्यवहारांत सोयीसाठीं या पद्धतीमध्यें शिकवावयाच्या इतिहासाचे कालखंड पाडले जातात. भारताचा इतिहास घेतला तर त्यांत (१) प्राचीन, (२) राजपूत आणि पठाण, (३) मोंगल, (४) मराठा व (५) ब्रिटिश असे भाग पडतात. इंग्लंडच्या इतिहासाचे (१) ॲंग्लो–सॅक्सन, (२) नॉर्मन (३) मध्ययुगीन, (४) ट्यूडर आणि स्टुअर्ट आणि (५) आधुनिक असे कालखंड पडतात.

या कालक्रमपद्धतींत कालखंड पाडायचे त्यांना कांहीं अर्थ पाहिजे. प्रत्येक कालखंडाचें विशेष अशा प्रकारचें लक्षण पाहिजे. केवळ इतक्या इतक्या वर्षांचा एक कालखंड अशा गणिती हिशेबानें इतिहासाचे भाग पाडूं नयेत. प्रत्येक भागाला कांहींतरी युगधर्म पाहिजे, स्वतःचें असें वेगळेपण पाहिजे.

या कालक्रमपद्धतीचे पुरस्कर्ते आपल्या पद्धतीच्या समर्थनार्थ मानसशास्त्राचा आधार घेतात. ते म्हणतात, कोणच्याहि देशाचा प्राचीन इतिहास म्हणजे त्याच्या बाळपणाचा इतिहास मध्ययुगीन इतिहास त्या देशाच्या कुमारावस्थेचा इतिहास आणि आधुनिक इतिहास कुमारावस्था ओलांडून गेलेल्या प्रौढांचा इतिहास. या दृष्टीनें कालक्रमपद्धत मानसशास्त्रास धरून आहे. आरंभीच्या वर्षांत देशाच्या बालपणाचा इतिहास, कुमारवयांत मध्ययुगीन आणि पुढील वयांत आधुनिक इतिहास ही मांडणी शास्त्रपूत आहे.

हें म्हणणें फारसें बरोबर नाहीं. जगाचा प्राचीन इतिहास हा लहान बाळाप्रमाणें साधासीधा असतो हें खरें नाहीं. आधुनिक इतिहास हा गुंतागुंतीचा आणि भानगडीचा व तात्त्विक विवेचनाचा असतो हेंहि तितकेंसें खरें नाहीं. प्राचीन इतिहास तात्त्विक बैठकीवरून सांगतां येईल तर अर्वाचीन इतिहास गोष्टीरूपानें सांगतां येईल. हें सर्वस्वी अभ्यासक्रमावर आणि शिक्षकांवर अवलंबून आहे. प्राचीन जगाच्या समस्या आधुनिक जगाइतक्याच बिकट आणि जटिल होत्या. भारतांत प्राचीन काळीं आर्य आणि द्रविड एकत्र आले तेव्हां एक अत्यंत बिकट असा समाजशास्त्रीय प्रश्न उपस्थित झाला; तो प्रश्न मध्ययुगांतल्या हिंदु–मुसलमान प्रश्नाइतकाच भानगडीचा होता. अस्पृश्यतेचा प्रश्न घ्या. हें प्राचीनांचें पाप आज आपण निस्तरीत आहोंत. जातिभेद हा प्राचीन इतिहासाचाच

वारसा आणि शाप. अशीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. सारांश, लोकजीवन हें नेहमींच गुंतागुंतीचें, वैचित्र्यमय असें राहिलें आहे. आज आपल्या हाताशीं छापखाने आणि वर्तमानपत्रें आहेत आणि तीं आपल्या कानींकपाळीं ओरडतात म्हणून आपण वर्तमानकाळच्या समस्यांत गोंधळून जातों. यूरपखंडांत जी प्रचंड धर्मक्रांति झाली तिच्यांत सहस्रावधि व्यक्ति आणि घटना यांची गर्दी झाली आहे. अनेक हेतूंचें मिश्रण झालें आहे. स्वार्थत्यागाबरोबर स्वार्थलोलुपतेचाहि आविष्कार झाला आहे. या प्रचंड आंदोलनापुढें अलीकडचे कितीतरी प्रश्न म्हणजे 'किस झाडकी पत्ती' आहेत.

कालक्रमपद्धतीचे जसे पुरस्कर्ते आहेत तसेच विरोधकहि आहेत. त्यांची तक्रार अशी आहे,—

( १ ) कोणच्याहि कालखंडाची पुनरावृत्ति होत नसल्यामुळें आधीं शिकलेला भाग मुलें पुढें विसरून जाण्याचा धोका आहे.

( २ ) प्राचीन कालखंड लहान मुलांना शिकवायचा म्हणजे अर्थात् तो शक्य तेवढा पाणी घालून पाणचट करून शिकवावा लागेल. प्राचीन कालखंडाचें तात्त्विक विवेचन मुलांपुढें केलें जाणार नाहीं. याचा परिणाम असा होईल कीं जुन्या इतिहासांतील कांहीं भाकडकथा मात्र मुलांच्या ध्यानांत राहतील; त्यावेळचें सांस्कृतिक जीवन, सामाजिक प्रश्न, वर्णव्यवस्था, उद्योग, धर्मस्थिति इत्यादि अनेक गोष्टींची मुलांना माहिती होणार नाहीं.

हें म्हणणें खरें आहे; समकेन्द्र पद्धत आणि कालकेंद्र पद्धत या दोन्हीहि तडजोड न करतां वापरल्या तर ऐतिहासिक विवेचन सदोष होईल. दोन्ही पद्धतींना एकत्र केलें तर दोन्हींमधील दोष टाळतां येतील आणि दोन्हींचे फायदे मिळतील. आपण इतिहासाची फार वेळां पुनरावृत्ति करूं नये. पण जो भाग गोष्टीरूप पद्धतीनें, सोप्या रीतीनें आणि त्रोटक असा शिकविला असेल त्याच्याकडे परत एक दोनदां वळलें पाहिजे आणि त्याचें वरच्या तात्त्विक भूमिकेवरून विवेचन केलें पाहिजे.

**विषयानुसारी** ( topical ) **पद्धत :** या पद्धतीप्रमाणें इतिहास कालक्रमानेंच शिकवायचा, परंतु एकेक महत्त्वाचा प्रश्न किंवा मुद्दा घेऊन आरंभापासून शेवटपर्यंत तो न्यावयाचा. तो संपल्यावर परत मागें वळायचें. दुसऱ्या मुद्द्याला सुरुवात करायची, तो शेवटपर्यंत न्यावयाचा. परत मागें यायचें

आणि तिसऱ्या मुद्द्यासह वाटचाल करायची, एवढाच या पद्धतीचा अर्थ. ही पद्धत प्रौढ विद्यार्थ्यांना व ट्रेनिंग संस्थांना विशेष उपयोगी पडेल; कारण ती विचारगर्भ आहे. प्रत्येक मुद्दा म्हणजे एक व्यापक असा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक किंवा आर्थिक असा प्रश्न किंवा विचार या एकेका प्रश्नाचा इतिहास शंभर दीडशें वर्षांचा असूं शकेल; कदाचित् हजार वर्षांचा असूं शकेल. अस्पृश्यता हाच प्रश्न घ्या. या प्रश्नाचा उगम कसा झाला याबद्दल अनेकांनीं अनेक तर्क केले आहेत. परंतु भारतांत आर्य येण्यापूर्वीच ही व्यवस्था या देशांत स्थिरता पावली होती असें अलीकडील संशोधन सांगूं लागलें आहे. सारांश, नुसता अस्पृश्यता हा विषय घेतला तर आपल्याला या विषयानुसारी पद्धतीप्रमाणें पांच हजार वर्षांची वाटचाल करावी लागेल.

**परावर्तन ( रिग्रेसिव्ह ) पद्धत :** या पद्धतीची पुष्कळ लोकांनीं स्तुति केली आहे; पण वापर मात्र कोणीच केला नाहीं. तिचें तत्त्व उत्तम आहे पण तपशील खोटें आहे. इतिहासाचें उद्दिष्ट म्हणजे वर्तमानकाळाची उकल, हें तत्त्व आपण मान्य केलें आहे. वर्तमानकाळांत मुलांच्या डोळ्यांसमोर जे नाना प्रकारचे नानाक्षेत्रांतले प्रश्न दिसत असतात त्यांचे धागेदोरे भूतकाळांत दडलेले असतात. त्या प्रश्नांचें यथार्थ ज्ञान होण्यासाठीं भूतकाळाकडे म्हणजे इतिहासाकडे गेलें पाहिजे. तेव्हां आधीं वर्तमानकाळाचा प्रश्न समोर ठेवायचा, त्याच्या तोंडवळ्याची मुलांना समज द्यायची आणि तो कसा उद्‌भवला हें सांगण्याकरितां भूतकाळांत जावयाचें. परावर्तन पद्धतीचा इतपत स्थूल अर्थ केव्हांहि ग्राह्य आहे.

ही परावर्तन पद्धत कधीं कधीं आत्यंतिक स्वरूपांत मांडण्यांत येत असते. १९५८ सालचा प्रश्न, १९५७ किंवा त्याच्या जवळपासच्या भूतकाळामुळें व मध्यें उद्‌भवला. तेव्हां १९५८ पाशीं सुरुवात करून १९५७ किंवा त्याच्या जवळपासचा भूतकाळ याकडे जावयाचें. १९५७ च्या भूतकाळाला त्याच्यामागील म्हणजे ५६ चा भूतकाळ कारणीभूत झाला त्याच्याकडे जावयाचें. याप्रमाणें कालक्रमानेंच इतिहास घ्यावयाचा पण कालक्रम मात्र उलटा.

असा उपद्व्याप अद्याप कोणीं केला नाहीं. कारण तो करतां येणें शक्य नव्हतें. परंतु या पद्धतींत जें तत्त्व आहे त्याला फार महत्त्व आहे. भूतकाळासाठीं भूतकाळांत रममाण व्हावयाचें नाहीं. महत्त्व आहे तें वर्तमानकाळाला. आणि म्हणून वर्तमानकाळावर प्रकाश पाडण्याचें कार्य भूतकाळानें करावयाचें असतें

ही एक क्रांतिकारक कल्पना आहे. या कल्पनेमुळें इतिहासाच्या अध्यापनांत फार मोठी क्रांति घडेल. बहुतेक समंजस शिक्षक आतां कोणचाहि पाठ घ्यायचा किंवा कोणत्याहि व्यापक मुद्द्याच्या विवेचनाला आरंभ करावयाचा, म्हणजे प्रथम वर्तमानकाळ मुलांच्या डोळ्यांसमोर ठेवतात. या वर्तमानकाळाचा **प्रस्तावाच्या** रूपानें उपयोग केल्यावरच मग सरळ कालक्रमानें इतिहास सांगण्यांत येतो.

याहिपेक्षां वरील कल्पनेचा रोजच्या अध्यापनांत फार मोठा उपयोग होतो. कोणचाहि पाठ घेतांना त्या पाठांतील वर्ण्यविषयाचे वर्तमानकाळाशीं लागेबांधे असल्यास तो मुद्दा मुलांच्या मनावर बिंबविण्यासाठीं वर्तमानकालीन स्थितीचा शिक्षक योग्य प्रसंगीं उल्लेख करतात. म्हणजे कधीं वर्तमानकाळाकडून भूतकाळाकडे तर कधीं भूतकाळाकडून वर्तमानकाळाकडे अशा प्रकारें अध्यापनांत सारखें आंदोलन चालू ठेवलें पाहिजे. वर्तमानकाळाचा केवळ प्रस्ताव किंवा केवळ पार्श्वभूमि म्हणूनच उपयोग करूं नये. तर अवश्य त्या प्रसंगीं त्याची आणि पाठांतील विषयाची सांगड घालीत जावें. एवढ्या मर्यादेंत, कालक्रमाचा अधिक्षेप न करतां परावर्तन–पद्धतीचा अवलंब केल्यास विवेचनांत एक प्रकारचा जिवंतपणा येईल.

प्रकरण आठवें

# इतिहासाचें अध्यापन – प्रथम श्रेणी

आपण कोठपर्यंतची मजल मारली हें लक्षांत घ्या. थोडें सिंहावलोकन करा. मागील प्रकरणांत इतिहासाच्या वर्गाबाहेर राहूनच आपण इतिहास म्हणजे काय, त्याचे प्रकार कोणते, त्याचा अभ्यासक्रम कोणत्या तत्त्वांना अनुसरून तयार करावा या तात्त्विक प्रश्नांवर चर्चा केली. नंतर आपण वर्गांत प्रवेश केला. आणि जो इतिहास शिकवायचें निश्चित केलें होतें त्याच्या विवेचनपद्धतींचा विचार केला. प्रस्तुत प्रकरणांत आपल्याला अधिक खोलांत आणि तपशिलांत जावयाचें आहे. आतां तात्त्विक चर्चा संपली. रोजच्या अध्यापनकार्यांत कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावयाचें, मुलांच्या वयोमाना-प्रमाणें पाठ कसे घ्यावयाचे, पाठ्यपुस्तकांचा उपयोग कोणीं, केव्हां आणि कसा करावयाचा, शैक्षणिक साहित्याचा उपयोग कोणकोणत्या प्रकारें करावयाचा या सर्व गोष्टी आपल्याला आतां पाहावयाच्या आहेत.

आपण इतिहास किती वर्षें शिकविणार ? समजा, दुसऱ्या आणि तिसऱ्या इयत्तांत आपण इतिहासाची पार्श्वभूमि म्हणून आणि भाषा-विषयाचें एक महत्त्वाचें अंग म्हणूनसुद्धां रामायण-महाभारतांतील गोष्टी शिकविण्यास सुरुवात केली आणि चौथ्या इयत्तेंत गोष्टीरूप प्रादेशिक इतिहास शिकविला तर दुसऱ्या इयत्तेपासून अकराव्या इयत्तेपर्यंत इतिहासाचें शिक्षण आपण दहा वर्षें देणार असें होतें. रामायण–महाभारतांतील गोष्टींना आपण इतिहास समजत नसाल तर हा इतिहास शिकविण्याचा काळ आठ वर्षांचा होईल हें आपण मागच्या प्रकरणांत पाहिलें आहेच. या आठ वर्षांच्या काळाचे आपल्याला तीन भाग पाडतां येतात. मानसशास्त्रानेंसुद्धां सोळा सतरा वर्षांपर्यंतच्या वयाचे असेच भाग

पाडले आहेत. **पहिली श्रेणी** ४ ते७ इयत्तापर्यंतची; या श्रेणींतील मुलांना मानसशास्त्रदृष्ट्या '**बाल**' असें म्हणतां येईल. दुसरी श्रेणी ८ व ९ या माध्यमिक इयत्तांत शिकणाऱ्या मुलांची; यांना आपण **किशोर** म्हणूं. शेवटच्या १० व ११ या इयत्तांमधील मुलांना '**कुमार**' असें म्हणतां येईल. हीं नांवें अद्याप तितकीशीं रूढ झालीं नाहींत. त्यांच्यांत परस्परांत कधीं कधीं गल्लतहि होते. हळूहळू शिक्षणक्षेत्रांतील परिभाषा निश्चित होत गेली म्हणजे गोंधळ नाहींसा होईल.

पहिल्या श्रेणींतील मुलें वयानें लहान असतात. त्यांचे अनुभव मर्यादित असतात. त्यांना फार वेळ इंद्रियगम्य वस्तूंच्या मदतीवांचून निर्भेळ विचार करणें किंवा तो समजून घेणें जमत नाहीं. पन्नास साठ वर्षांपूर्वीची या वयाचीं मुलें सांजवात झाल्यावर आपल्या आजीभोंवतीं गोळा होऊन तिच्या गोष्टी ऐकत असत. आजीबाई ही आमच्या संस्कृतींतील त्यावेळची एक फार मोठी संस्था होती. ती बहुधा निरक्षर असे. परंतु तिच्यापाशीं रामायण-महाभारत, पुराणें, यांच्यांतील "सुरस आणि चमत्कारिक" कथांचा खूप भरणा असे. गोष्टी सांगतांना ती रंगत असे. आणि म्हणून ऐकणारीं मुलेंहि रंगत असत. यामुळें शाळेंत जाण्यापूर्वी किंवा त्या वयाच्या सुमारास, बालवाङ्मयाचा जन्म झालेला नसतांनासुद्धां माझ्या पिढीच्या डोक्यांत किती तरी जुन्या गोष्टींचा भरणा झाला होता. आम्हांला रामायण-महाभारतांतल्या व्यक्ति सजीव वाटत. इतकेंच नव्हे तर वर्तमानकाळांत आमच्यासमोर वावरणाऱ्या व्यक्तींपेक्षां अधिक जवळच्या आणि वास्तविक वाटत.

आमच्या आज्या गेल्या आणि आमची ही परंपरा घेऊन गेल्या. पण गरज शिल्लक राहिली आहे. ती या बालवयांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षकांनींच भागविली पाहिजे. कारण अलीकडच्या पालकांना स्वतःच्या मुलांकडे लक्ष देण्यास फुरसत नाहीं आणि तितकीशी हौसहि नाहीं. या वयांतील मुलांना इतिहास शिकवायचा म्हणजे त्यांना छान छान गोष्टी सांगायच्या. छान छान म्हणजे काल्पनिक नव्हे. खऱ्याच गोष्टी पण त्या खुलवून, गंमतीनें, मजेदार रीतीनें सांगितल्या पाहिजेत.

**गोष्ट सांगणें ही एक कला आहे.** कांहीं लोकांना जन्मतःच ती कला अवगत असते. लहानपणीं आमच्या शेतावर एक निरक्षर म्हातारा शेतकरी हिंवाळ्यांत रोज रात्रीं आमच्या शेकोटीवर शेकावयास येत असे. त्याच्यासारखा

गोष्टीवेल्हाळ माणूस मीं अजून पाहिला नाहीं. त्यानें आम्हां मुलांना किती तरी मजेदार गोष्टी सांगितल्या. तो गोष्टी सांगूं लागला म्हणजे आम्ही मुलें हालचाल न करतां तोंड वासून त्याच्याकडे टक लावून पाहात असूं. तसें म्हटलें तर गोष्ट छोटीच असे. पण तो म्हातारा तिला खूप ताणी. गोष्टींत येणाऱ्या माणसांचीं इतकीं तपशीलवार वर्णनें करी कीं तीं माणसें आमच्या डोळ्यांसमोर उभीं राहात. गोष्टींतील घटनासुद्धां तो आमच्यासमोर घडत आहेत अशा खुलवून सांगे. गोष्टींत संवाद आले तर आवाज बदलीत असे.

लहान मुलांच्या इतिहास-शिक्षकानें या म्हाताऱ्याचें सर्व प्रकारें अनुकरण केलें पाहिजे. कवि जन्मावा लागतो, त्याला घडवितां येत नाहीं अशी एक म्हण आहे. त्याचप्रमाणें अस्सल गोष्ट सांगणारासुद्धां जन्मावा लागतो. त्याला प्रयत्नानें घडवितां येणार नाहीं, असें सांगण्याचा मोह होतो. पण मी तो आवरतों. माणसा-माणसामध्यें प्रत्येक गोष्टींत फरक हा असायचाच. कांहीं माणसें साक्षर असोत किंवा निरक्षर असोत, गोष्टी चांगल्या प्रकारें सांगतील; तर कांहींना ती कला प्रयत्नानें साध्य होऊन बरेंच यशहि मिळूं शकेल. इतर सर्व कलांप्रमाणें या कलेचीहि साधना केली पाहिजे. उत्तम गोष्टी सांगण्यास कोणते गुण संपादन केले पाहिजेत याचा इतिहास-शिक्षकानें नीट विचार केला पाहिजे. आणि प्रयत्नपूर्वक त्या गुणांच्या मागें लागलें पाहिजे.

इतिहास-शिक्षकानें या दृष्टीनें खालील सूचनांचा अवश्य विचार करावा. या सूचना केवळ गोष्ट सांगण्यापुरत्याच नाहींत.

(१) **गोष्ट सांगणारा** – मग तो इतिहासांतली गोष्ट सांगो किंवा दुसरी कोणती गोष्ट सांगो– **गोष्ट सांगणारा रंगला पाहिजे.** गोष्ट सांगतांना त्यानें त्या गोष्टींत इतकें तन्मय झालें पाहिजे कीं स्वतःला विसरलें पाहिजे. इंग्रजींत ज्याला Self concious होणें म्हणतात तें टाळलें पाहिजे. मुलें चाणाक्ष असतात. शिक्षकाच्या आवाजावरून, हावभावांवरून, आविर्भावांवरून शिक्षकाचें मन गोष्टींत आहे का तो जुलमाचा रामराम करीत आहे हें मुलांना चटकन् समजतें. रंगून जाणें तितकें सोपें नाहीं. त्याला कलाकार लागतो. तथापि मुलांची आवड असल्यास आणि प्रयत्न करीत राहिल्यास शिक्षकाला ही गोष्ट असाध्य राहणार नाहीं.

(२) **इतिहासाचें ज्ञान आणि सहानुभूति :** – इतिहास–शिक्षकाला नुसतें तन्मय होऊन चालणार नाहीं. त्याला इतिहासाचें ज्ञान पाहिजे. ज्या

भूतकाळांतील इतिहास तो गोष्टींच्या रूपानें सांगत असतो त्या भूतकाळाचा त्याला चांगला परिचय पाहिजे. इतकेंच नव्हे तर त्या भूतकाळाविषयीं त्याला एक प्रकारची सहानुभूतिहि पाहिजे. ज्ञान आणि सहानुभूति हीं दोन्हीं परस्परसापेक्ष आहेत असें मानसशास्त्र सांगतें. ज्या जीवनाचें किंवा ज्या व्यक्तीचें बिलकूल ज्ञान नाहीं त्या व्यक्तीबद्दल किंवा जीवनाबद्दल सहानुभूति संभवत नाहीं. जगाच्या पाठीवर अनेक गोष्टी घडत असतात. सहानुभूति वाटण्यासारख्या त्यांत कितीतरी गोष्टी असतात. परंतु वर्तमानपत्रें जुजबी माहिती देतील, त्यापलीकडे त्यांच्याविषयीं विशेष ज्ञान नसलें तर त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटणें कठीण जातें. सहानुभूति नेहमीं डोळस असते, जागरूक असते. मानसशास्त्राचें हें तत्त्व इतिहासांतील गोष्टी सांगणाऱ्या शिक्षकालाहि लागू पडतें. भूतकाळांतील लोकांच्या रीतीभाति, समज, आचारविचार, दृष्टिकोन, श्रद्धा, इत्यादि गोष्टींचें शिक्षकानें सर्वांगीण ज्ञान करून घेतलें पाहिजे. म्हणजेच त्याला गोष्टी खुलवून सांगतां येतील. नाहींतर त्या त्रोटक, विस्कळीत, उथळ आणि शुष्क अशा होतील.

लहान मुलांना इतिहास शिकविणाऱ्या शिक्षकाला इतिहासाचें फारसें ज्ञान असण्याची जरुरी नाहीं अशी कांहीं लोकांची वेडगळ समजूत आहे. इतिहास-शिक्षक, मग तो खालच्या वर्गांना शिकवो किंवा वरच्या वर्गांना शिकवो, त्याला इतिहासाचें पुरेपूर ज्ञान पाहिजे. पुरेसें ज्ञान असल्याखेरीज लहान मुलांनासुद्धां त्याला ऐतिहासिक गोष्टी नीटपणें सांगतां येणार नाहींत. ज्ञानाच्या अभावीं त्या गोष्टी त्रोटक आणि आराखडावजा होतील. एक उदाहरण घेऊं या. आपण दहा अकरा वर्षांच्या मुलांना भगवान् बुद्धाची गोष्ट सांगतों. ती गोष्ट खुलवून परिणामकारक रीतीनें सांगण्यासाठीं बुद्धाच्या वेळची सामाजिक आणि धार्मिक परिस्थिति, यज्ञयागांचें आणि कर्मकांडांचें प्रस्थ, तत्कालीन बहुजनसमाजाची स्थिति, त्यावेळचे राजे, त्यांचे दरबार, त्यांचीं उपवनें, शिकारीचे खेळ, रथांच्या शर्यती इत्यादि कितीतरी गोष्टी बुद्धाची गोष्ट सांगणाऱ्या शिक्षकाला अवगत पाहिजेत. म्हणजेच तो बुद्धाला त्याच्या पार्श्वभूमीसह आणि वातावरणासह मुलांच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभा करूं शकेल.

(३) **शिक्षक उत्तम नट असावा :–** गोष्टी सांगणारा इतिहास-शिक्षक उत्तम नट पाहिजे. त्यानें एकाच आवाजांत सरळ धोपट मार्गानें यंत्राप्रमाणें गोष्ट

सांगतां कामा नये. योग्य वेळीं आवाज बदलला पाहिजे. आवाजांतील चढउतार साधले पाहिजेत, आवाजांत कधीं ओलावा आणला पाहिजे तर कधीं आवेश आणला पाहिजे. चेहऱ्यावर योग्य वेळीं योग्य ते भाव आणि भावना व्यक्त झाल्या पाहिजेत. योग्य प्रसंगीं विनोदाचाहि उपयोग केला पाहिजे. विनोदामुळें गोष्टीला खुमारी चढेल आणि मुलांना गोष्टींत रस उत्पन्न होईल. मात्र कारण नसतांना विनाकारण विनोद् निर्माण करण्याचा वेडगळ प्रयत्नही करूं नये. मुलें बोलली नाहींत तरी मनांत ते शिक्षकाची किंमत करतील.

(४) **गोष्ट वाचणें :** – आरंभीं आरंभीं कदाचित् गोष्ट सांगणें जमणार नाहीं. अशा वेळीं ऐतिहासिक गोष्टींचें एखादें चांगलें पुस्तक असल्यास त्यांतून गोष्ट वाचून दाखवावी. मात्र वाचन यांत्रिक नसावें. आवाजांत योग्य तो बदल करून समजून वाचावें.

(५) **फळ्याचा उपयोगः**– इतिहास-शिक्षकानें गोष्ट सांगत असतां फळ्याचा उपयोग करीत जावें. गोष्ट सांगण्यापूर्वी फळ्यावर त्या गोष्टीचें नांव लिहावें. गोष्टीचे तीन चार भाग पाडावे लागतील. प्रत्येक भाग संपल्यावर शिक्षकानें फळ्याकडे जाऊन फारसा वेळ न घालवितां दोन चार शब्दांत त्या भागाचा खुलासा होईल असा मुद्दा लिहावा आणि गोष्ट पुढें चालू ठेवावी. दुसरा मुद्दा संपल्यावर परत फळ्यावर दोनतीन शब्दांत तो मुद्दा लिहावा. विद्यार्थ्यांनीं आपल्या वहींत डाव्या बाजूकडे फळ्यावर लिहिलेले मुद्दे उतरून घ्यावेत.

फळा वापरतांना गोष्टींत फारसा खंड पडणार नाहीं याची काळजी घ्यावी. सराईत शिक्षक गोष्ट न थांबवितां फळ्यावर मुद्दा लिहून परत मुलांकडे तोंड फिरवून आपलें काम चालू ठेवतो. गोष्टींत फळ्यावरील टिपणांमुळें खंड पडत आहे असें वाटल्यास गोष्ट संपल्यावरच वर्गाच्या सहकार्यानें फळ्यावरील टांचण तयार करावें आणि विद्यार्थ्यांनीं तें वहीच्या डाव्या बाजूस लिहून घ्यावें. घरीं गेल्यावर मुलांनीं फळ्यावरील टांचणाचा विस्तार वहीच्या उजव्या बाजूस करावा.

(६) फळ्याचा उपयोग नुसत्या पाठाच्या टांचणासाठींच करूं नये. वेळींप्रसंगीं फळ्यावर लौकर काढतां येतील अशीं चित्रें काढावीं. हीं चित्रें कलाकुसरीचीं नसावींत. वर्गांत तेवढा वेळ नसतो. भरकन् दोन चार रेषांनीं एखादा विचार किंवा कल्पना चित्ररूपानें साकार करणें हेंच उद्दिष्ट शिक्षकाच्या समोर असावें. वर्गांत टांचणासाठीं एक आणि चित्रें काढण्यासाठीं एक असे दोन फळे असावेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ................ दि: .. ........
क्रमांक ................ नों. दि: ........


(७) **चित्रें दाखविणें**:– इतिहास आणि भूगोल या विषयांच्या शिक्षकाला चित्रांचा पदोपदीं उपयोग करावा लागतो. भूगोलांत अपरिचित प्रदेशांचा परिचय तर इतिहासांत अपरिचित काळाचा परिचय करून द्यावयाचा असतो. वर्गांत कितीहि तपशीलवार वर्णन केलें तरी भूतकाळांत अंतर्धान पावलेलें लोकजीवन मुलांना आकलन होणें फार कठीण. त्यांसाठीं चित्रें दाखविलींच पाहिजेत. हें चित्र दाखविण्याचेंहि एक तंत्र आहे. शिक्षकाकडून या बाबतींत नेहमीं चुका घडतात. कांहीं शिक्षक, विशेषतः ट्रेन्ड शिक्षक, वाटेल तितकीं चित्रें दाखवितात. चाळीस पंचेचाळीस मिनिटांच्या तासांत आठ दहा चित्रें दाखविलीं म्हणजे, "एक ना धड भाराभर चिंध्या" असा प्रकार घडतो. अनेक चित्रें भरभर डोळ्यांसमोरून गेल्यामुळें कोणत्याच चित्राचा चांगला ठसा उमटत नाहीं. तेव्हां चित्रें थोडींच पण निवडक असावींत. दुसरी गोष्ट म्हणजे नुसतें वर्गांत समोर उभें राहून कांहीं सेकंद चित्र दाखवावयाचें आणि मग खालीं ठेवायचें किंवा वर्गांत फिरून मुलें पाहतात न पाहतात तोंच भराभर पुढें चित्र दाखवीत जावयाचें हेंहि बरें नाहीं. प्रत्येक चित्र प्रत्येक मुलानें नीट पाहिलें पाहिजे. त्याला पुरेसा वेळ मिळाला पाहिजे. चित्र दाखविण्यापूर्वीं त्या चित्रांत काय पाहावयाचें याची सूचना शिक्षकानें आधींच मुलांना दिली पाहिजे.

चित्रें कोणतीं दाखवायचीं याचाहि नीट विचार झाला पाहिजे. आपण बहुधा एकेका माणसाचीं चित्रें दाखवितों. पुष्कळ वेळां निरुपाय असतो. कारण तेंच चित्र त्या पाठासाठीं उपलब्ध असतें. नुसत्या स्तब्ध बसलेल्या माणसाच्या चित्रावरून मुलांना इतिहासाचा कितीसा बोध होणार ? फार तर त्यावेळचे कपडे कशा प्रकारचे होते एवढें समजेल. या लहान वयांत मुलांना चालतें, बोलतें, धांवतें जीवन पाहिजे असतें. त्यांच्या डोक्यांत विचार आला रे आला कीं चटकन् तो कृतींत उतरतो. मुलें कृतिप्रिय असतात. त्यांतल्या त्यांत लढाया, मारामाऱ्या, रक्तपात मुलांना फार प्रिय. तेव्हां शक्य तर माणसांचीं नुसतीं चित्रें न दाखवितां कृतिप्रधान चित्रें दाखवावीं हें उत्तम. तीं चित्रें विशेष प्रसंग दाखविणारीं असावीं. शिवाजीचा नुसता फोटो मुलांच्या डोळ्यांसमोर धरण्यापेक्षां शिवाजी घोड्यावरून गड चढत आहे, शिवाजी आणि संभाजी पेटाऱ्यांतून आग्र्यामधून सटकत आहेत. शिवाजी आणि अफजलखान आणि शिवाजी आणि शाहिस्तेखान यांचे अद्‌भुत प्रसंग. बालपणीं जिजाबाई शिवाजीस त्याच्या संवगड्यां

सह रामायण–महाभारतांतील गोष्टी सांगत आहे अशीं, शिवाजीचें नानाविध जीवन दाखविणारीं प्रासंगिक चित्रें उपयोगांत आणावीं. मुलांना दाखवायचीं चित्रें मोठ्या आकाराचीं असावीं.

(८) **नाट्यसंवाद** :– मुलांना नाटक करणें फार आवडतें. ऐतिहासिक नाटकाविषयीं स्वतंत्र प्रकरण लिहिलें आहे. तेथें या शैक्षणिक साधनांचा सविस्तर विचार केला आहे. तें प्रकरण पाहावें. येथें एवढेंच सांगतों कीं या दहा, अकरा, बारा वर्षांच्या मुलांसमोर इतिहास साकार होण्यासाठीं त्यांच्याकडून ऐतिहासिक संवाद बसवून घ्यावे. कांहीं निवडक संवाद मुलांनीं पाठ करावे. परंतु आपल्याला दिलेली भूमिका पुस्तकामधून वाचून व्यवस्थित रीतीनें साभिनय व्यक्त केली म्हणजे उद्दिष्ट साध्य होईल. संवाद बसविण्यापूर्वी शिक्षकानें त्यांची योग्य कल्पना वर्गास दिली पाहिजे. आरंभीं स्वतः त्यानें तो नाट्यसंवाद वाचून दाखवावा हें उत्तम.

(९) **पाठ्यपुस्तकाचा उपयोग**:– ट्रेनिंगसंस्था अस्तित्वांत नव्हत्या तेव्हां पाठ्यपुस्तकाचा एखाद्या धार्मिक पोथीप्रमाणें श्रद्धेनें आणि कसोशीनें उपयोग होत असे. शिक्षक इतिहासाचा असो, भूगोलाचा असो किंवा विज्ञानाचा असो, त्याचें एकमेव कर्तव्य म्हणजे वर्गात पुस्तक वाचून दाखविणें, किंवा जेवण जास्त झालें असल्यास मुलांना पाळीपाळीनें तें वाचावयास लावणें आणि त्यांतील कठीण शब्दांचा अर्थ सांगणें, एवढेंच असें. नेमलेला भाग वाचून झाल्यावर तो कधीं आपली मल्लीनाथी करी, कधीं तीहि करीत नसे. कांहीं कॉन्व्हेन्ट शाळांत वर्गात पुस्तक वाचून आणि अर्थ सांगून झालें म्हणजे मुलांनीं घरीं तेवढा भाग घोकून टाकण्याचा आणि दुसऱ्या खेपेस वर्गात पाळीपाळीनें तो म्हणून दाखवायचा अशी प्रथा होती. अजूनहि ही प्रथा त्या शाळांत बंद झाली असेल याची खात्री देतां येत नाहीं.

ट्रेनिंग कॉलेजें निघाल्यावर मात्र ही स्थिति बदलली. पाठ्यपुस्तकाला जें मुख्य स्थान होतें तें नाहीसें झालें. त्याचा दर्जा कमी झाला. तें पदच्युत झालें. ट्रेनिंग कॉलेजांत शिक्षण घेणारा विद्यार्थी इतिहासाचें पाठ्यपुस्तक वर्गात वाचूं लागला तर तो मोठा अपराध समजला जाऊं लागला. अध्यापनपद्धतीचा विचार करतांना पाठ्यपुस्तकाच्या उपयोगाबद्दल मतभेद आणि गोंधळ निर्माण झाला. असा एक काळ होता कीं वर्गात शिक्षकानें किंवा मुलानें इतिहासाचें पुस्तक उघडायचें नाहीं. सर्व तोंडीं मामला. घरीं गेल्यावर मुलांनीं वर्गात झालेल्या

पाठाची उजळणी म्हणून पाठ्यपुस्तक हवें तर वाचावें. अलीकडे काय स्थिति आहे याची मला कल्पना नाहीं. परंतु पाठ्यपुस्तकाचा इतिहासाच्या वर्गांत केव्हां आणि कसा उपयोग करावयाचा याबद्दल माझें मत स्पष्ट आहे.

पाठ्यपुस्तक हें मुख्यतः विद्यार्थ्यांकरितां आहे, शिक्षकाकरितां नाहीं. शिक्षकानें आपली तयारी करण्यासाठीं मोठमोठीं पुस्तकें वाचावीं, त्यांमधून अवश्य तीं टिपणें काढून घ्यावीं; विद्यार्थ्यांनीं मात्र पाठ्यपुस्तकाचा कसोशीनें अभ्यास केला पाहिजे. या प्रथम विभागांतील विद्यार्थ्यांचें इतिहासाचें अध्यापन मुख्यत्वेंकरून तोंडींच होईल. शिक्षक गोष्ट सांगतील, प्रश्न विचारतील, चित्रें दाखवतील, फळ्यावर टांचण लिहितील; म्हणजे मुख्य काम शिक्षकानेंच अलीकडच्या पद्धतीप्रमाणें करावयाचें असतें. या पद्धतींतहि पाठ्यपुस्तकाला स्थान आहे. विद्यार्थ्यांनीं नेमलेला भाग पुस्तकांतून वाचून यावा आणि झालेल्या भागाची पुस्तकांतूनच उजळणी करावी. याप्रमाणें पाठाच्या पूर्वी आणि नंतर पुस्तकाचा उपयोग करतां येतो.

परंतु या अलीकडच्या पद्धतींत मुलांनीं स्वस्थ बसावें आणि शिक्षकानेंच सारें कांहीं करावें अशी कामाची वांटणी होण्याचा धोका आहे. वर्गांत शिक्षकानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देणें एवढेंच काम मुलांकडे असूं नये. पाठ्यपुस्तक सोपें आणि रंजक असलें तर शिक्षकानें मधूनमधून त्यांतील नेमलेला भाग वर्गांत मुलांना मनांत वाचण्यास सांगावें. हें मूकवाचन सहेतुक असावें, म्हणजे शिक्षकानें फळ्यावर दोन तीन वेंचक प्रश्न लिहावे आणि मुलांना या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्यासाठीं पुस्तकांतील इतका इतका भाग मनांत वाचा असें सांगावें. मूळ वाचनानंतर प्रश्न विचारून शिक्षकानें मुलांना पुस्तकांतील तो भाग समजला आहे कीं नाहीं, विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें त्यांना देतां येतात कीं नाहीं याची खात्री करून घ्यावी. एवढें झाल्यावर शिक्षकानें पाठ्यपुस्तकाला पूरक अशी माहिती वर्गांत सांगावी. कधीं कधीं पाठ्यपुस्तकाचा यापेक्षांहि भरीव असा उपयोग करतां येईल. मुलांना पुस्तकांतील ठराविक भाग वाचून येण्यास सांगावें. इतिहासाच्या तासाला त्या भागावर प्रश्न विचारावे आणि पुढें आपल्याला जें कांहीं विशेष सांगायचें तें सांगावें. एवंच, पाठ्यपुस्तकाचा सर्व प्रकारें मुलांनीं उपयोग केला पाहिजे. त्यांचा केव्हां कसा उपयोग करावयाचा हें चतुर शिक्षकानें अनुभवानें ठरवावें.

(१०) **अवांतर वाचन** :– मुलांनीं नुसतें एकुलतें एक पाठ्यपुस्तक वाचून चालणार नाहीं. त्यांना समजतील आणि आवडतील अशीं ऐतिहासिक आणि भौगोलिक, नाना प्रकारचीं पुस्तकें वर्गाच्या ग्रंथालयांत असावीं. ऐतिहासिक स्त्री-पुरुषांचीं चरित्रें, ऐतिहासिक नाटकें व कादंबऱ्या, ऐतिहासिक निबंध, साहसी प्रवासी, धाडसी संशोधक इत्यादिकांच्या चरित्रांची इतिहासाच्या ग्रंथालयासाठीं निवड करावी. हरि नारायण आपट्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांना अजून महत्त्व आहे. त्यांची जागा अजून दुसरीं पुस्तकें घेऊं शकत नाहींत. उषःकाल, सूर्योदय, गड आला पण सिंह गेला इत्यादि आपट्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांवर दोन तीन पिढ्या पोसल्या आहेत. अजूनहि त्या वर्तमान पिढीला पोसूं शकतील.

## प्रकरण नववें

# इतिहासाचें अध्यापन – द्वितीय श्रेणी

पहिली श्रेणी बालांची होती तर दुसरी किशोरांची. हे किशोर ८ व ९ या इयत्तांत असतात. त्यांचें बालपण संपलेलें असतें. परीकथा, यक्ष-किन्नरांच्या अद्‌भुत गोष्टी वाचण्याचेहि दिवस मागें पडले असतात. आतां या वयांत अस्वाभाविक आणि अवास्तव गोष्टींकडे मन वेधलें जात नाहीं. किशोर वास्तववादी असतात इतकें स्पष्ट जरी म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांच्या मनाची धांव आतां वास्तवाकडे असते हें मात्र निश्चित. किशोराला क्रिकेट, हुतुतु, लंगडी या खेळांची विशेष गोडी असते. आणि अशा खेळांच्या सामन्यांत नांव मिळविलेले खेळाडू त्याचे वीर पुरुष असतात. किशोराच्या मनाची प्रकृति निकोप असल्यास तुम्हांला असें आढळून येईल कीं पं. नेहरू किंवा विनोबा यांच्यापेक्षां हॉकीमध्यें जगांत नांव मिळविणारा ध्यानचंद किंवा क्रिकेटमधले हजारे, फडकर यांसारखे वीर हींच त्यांचीं पूजास्थानें असतात. मागच्या पिढींतील किशोर असेच मेजर सी. के. नायडूंना पूजीत होते.

किशोरअवस्था जसजशी प्रगत होत जाते तसतशी या मुलांची स्मरणशक्ति आणि कल्पकता यांची फार झपाट्यानें वाढ होत असते. या वयांत किशोरांना सामान्य तत्त्वें आणि सिद्धान्त यांचें आकलन होऊं शकतें. मात्र तीं तत्त्वें व्यक्तीच्या किंवा विशिष्ट उदाहरणाच्या माध्यमामधून त्याच्यासमोर मांडलीं गेलीं पाहिजेत. किशोराला अशीं तत्त्वें समजत नाहींत ही कल्पना चुकीची आहे. कारण गणितांत त्याला या अमूर्त तत्त्वांचा पदोपदीं वापर करावा लागतो आणि उदाहरणें सोडवितांना त्यांची उपयोजना (applicaticn) करावी लागते. तेव्हां वर्गांत किशोरांना विशिष्टांकडून सामान्याकडे आणि इंद्रियगम्य वस्तूकडून अमूर्त तत्त्वाकडे योग्य प्रकारें नेलें तर ते जाऊं शकतात.

या वयांत किशोरांचें पुष्कळच वाचन होत असतें. ते ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटकें, चरित्रें आवडीनें वाचतात. विशेषतः इतिहासांतले साहसाचे, पराक्रमाचे आणि बाणेदारपणाचे प्रसंग तर ते मिटक्या मारीत वाचतात. कारण हें वयच मुळीं विभूतिपूजेचें असतें.

ऐतिहासिक कादंबऱ्या, नाटकें व चित्रपट भूतकाळाचें हुबेहूब दर्शन घडवितात; ते हें महत्त्वाचें कार्य करतात त्याप्रमाणें थोडेंबहुत नुकसानहि करतात. कादंबऱ्या व नाटकें हे वाङ्मयीन प्रकार असल्यामुळें त्यांचा कल कलेच्या साधनेकडे असतो. सत्यशोधनाकडे नसतो. वास्तविक कलेच्या साधनेंत सत्याचा आविष्कार करणें हें अशक्य नाहीं. ड्रिंक वॉटर चें 'एब्राहम लिंकन' हें नाटक घ्या. त्यांत कला आहे आणि सत्यहि आहे. तथापि एकंदरीनें ऐतिहासिक वाङ्मय कलेकडेच विशेष झुकतें हें मान्य केलें पाहिजे. अशा पुस्तकांच्या वाचनानें मुलांच्या मनांत इतिहासाबाबत कमीजास्त प्रमाणांत अपसमज उत्पन्न होतात. मतेंहि आत्यंतिक आणि एकांगी होतात.

शिक्षकाला या ऐतिहासिक कादंबऱ्या आणि नाटकें यांच्याशीं सामना द्यावा लागेल. त्या प्रबल शक्तींपुढें शिक्षक दुबळा ठरण्याचा संभव आहे. तरीहि त्यानें प्रयत्न केलाच पाहिजे आणि या वाङ्मयांत ऐतिहासिक व्यक्तींची निर्भेळ सज्जन आणि निर्भेळ दुर्जन अशी जी वांटणी केलेली असते ती किती अनैतिहासिक आहे हें दाखविलें पाहिजे. मात्र असें करतांना इतिहासांत पूजनीय अशा ज्या व्यक्ति आहेत त्यांच्याविषयीं अनादर उत्पन्न होईल असें कांहीं करूं नये.

या वास्तवाकडे झुकणाऱ्या, तत्त्वांचें आकलन करूं शकणाऱ्या आणि त्याचबरोबर विभूति-पूजाहि करणाऱ्या किशोरांना इतिहास कसा शिकवायचा हें आपण आतां पाहूं. या श्रेणींत किशोरांना कथनपद्धतीनें ( narrative ) शिकवायचें आहे. परंतु किरकोळ प्रश्न टाळून विवेचन बऱ्याचशा तार्किक पद्धतीनें करावें लागेल. अर्थात् जेथें जेथें इतिहासाला व्यक्तींची प्रेरणा मिळाली तेथें तेथें त्यांचा यथायोग्य परामर्श घेतलाच पाहिजे. निवेदनाच्या ओघांत त्या त्या वेळचें लोकजीवन, रीतिभाति, संघर्ष यांचें चित्र ठळक रंगांत रंगविलें पाहिजे. व्यक्तींचें चित्रणहि असेंच ठळक असलें पाहिजे. ऐतिहासिक विभूतींनीं

इतिहासाला काय देणें दिलें, त्यांची कामगिरी कशा प्रकारची होती हें शक्य तेवढ्या सोप्या भाषेंत स्पष्ट केलें पाहिजे.

या दोन इयत्तांत ट्यूडर राजवटीपासूनचा इंग्लंडचा सुसूत्र इतिहास शिकवावा अशी माझी सूचना आहे. हा इतिहास फार महत्त्वाचा आहे. ट्यूडर राजवटींत उदयास आलेले ड्रेकसारखे साहसी दर्यावर्दी कप्तान, रॅलेसारखे शूर सेनापति यांचें जीवन फार चित्तवेधक आहे. या राजवटींतील साहसें, स्टुअर्ट राजवटींतील जनतेनें राजेशाहीशीं दिलेला लढा, अमेरिकेंतील वसाहती, भारतांतील व्यापार, अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध, इंग्लंडमधील औद्योगिक क्रांति, तिचा भारताच्या इतिहासाशीं असलेला महत्त्वाचा संबंध, इंग्लंडमधील लोकशाहीची वाटचाल करणारे सुधारणेचे कायदे, इत्यादि इंग्लंडच्या इतिहासांतील प्रश्न फार उद्बोधक आहेत.

**चित्रांचा उपयोग :–** या श्रेणींतहि चित्रांच्या उपयोगाला फार महत्त्व आहे. मुलांना त्या त्या वेळच्या लोकजीवनाचीं आणि ऐतिहासिक वास्तूंचीं व प्रसंगांचीं चित्रें दाखविलीं पाहिजेत. ऐतिहासिक चित्रांचे अल्बम वर्गांत ठेवले असतीलच. ते चाळण्याची मुलांना संवय लावावी. युरोपांतील कांहीं प्रसिद्ध चित्रकारांनीं कांहीं फार मोठ्या दर्ज्याचीं ऐतिहासिक चित्रें रंगविलीं आहेत. युरोपांतील वस्तुसंग्रहालयांत आणि चित्रसंग्रहालयांत अशा चित्रांच्या कमीजास्त किंमतीच्या लहानमोठ्या प्रति विकत मिळत असतात. लंडनमधील मेडिसी (Medici) सोसायटीनें मोठमोठ्या चित्रांच्या फार सुंदर प्रतिकृति तयार केल्या आहेत. आपल्याकडे अलीकडे या गोष्टीला सुरुवात झाली आहे. भारत सरकारनें अजंठा, वेरूळ या लेण्यांतील चित्रांचे सुंदर अल्बम तयार केले आहेत. त्याचप्रमाणें बौद्धकालीन शिल्पकलेचे नमुनेहि सरकारनें प्रसिद्ध केले आहेत. अवनींद्रनाथ टागोरांचें ‘मृत्युशय्येवरील शहाजहाँ’ यांसारखीं कांहीं ऐतिहासिक चित्रें मुलांची सौंदर्यदृष्टि विकसित करतीलच, पण त्याबरोबरच त्यांची इतिहासदृष्टीहि अधिक चोखंदळ होईल. अशीं सुंदर, निवडक, ऐतिहासिक चित्रें इतिहास-वर्गाच्या भिंतींवर मुलांना दिसतील अशीं टांगून ठेवावीं.

**पाठ्यपुस्तकाचा उपयोग :–** या द्वितीय श्रेणींत मुलांनीं पाठ्यपुस्तकाचा अधिक प्रमाणांत उपयोग केला पाहिजे. प्रथम श्रेणींत वर्गांत पाठ शिकवून झाल्यावर मुलांनीं घरीं गेल्यावर तो भाग आपल्या पाठ्यपुस्तकांतून वाचावा

अशी सामान्य सूचना केली होती. त्याचबरोबर कधीं कधीं नव्या पाठाची तयारी म्हणून मुलांनीं पाठ्यपुस्तकांतून नवा भाग वाचून यावा असेंहि सुचविलें होतें. या बाबतींत निश्चित असें कांहींहि सांगणें योग्य होणार नाहीं. पाठ्यपुस्तक सोपें, सुबोध आणि रंजक असल्यास प्रथम श्रेणींतसुद्धां त्याचा पुष्कळच उपयोग करतां येईल. परंतु सामान्यतः त्या श्रेणींत पाठ्यपुस्तकाचा वर्गांत असा अभ्यास होणार नाहीं. इतिहास गोष्टींच्या रूपांत सांगावयाचा तर तें काम शिक्षकानेंच केलें पाहिजे. अर्थात् मुलांनीं नुसती श्रवणभक्ति करावयाची नाहीं. शिक्षक त्यांना नाना प्रकारचे प्रश्न विचारील, त्यांचीं उत्तरें त्यांना द्यावीं लागतील.

द्वितीय श्रेणींत मात्र पाठ्यपुस्तकाचा **पाठाच्या पूर्वीं, पाठाच्या वेळीं** आणि **पाठाच्या नंतर** असा तिहेरी उपयोग करण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. हळूहळू आपल्याला मुलाना पायावर उभें राहण्यास शिकवायचें आहे. म्हणून किशोर अवस्थेंत मुलांनीं नेमलेला भाग आधीं वाचून आलें पाहिजे. आणि शिक्षकांनीं सुरवातीलाच प्रश्न विचारून मुलें तयारी करून आलीं आहेत कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. मुलांनीं तशी तयारी केली नसल्यास त्यांना वर्गांत नेमलेला भाग वाचावयास सांगावें आणि मग त्यावर प्रश्न विचारावे.

कांहीं तज्ज्ञांना ही सूचना मान्य नाहीं. त्यांच्या मतें वर्गांत मुलें मोकळ्या म्हणजे रिकाम्या मनानें आलीं पाहिजेत. त्यांनीं वर्गांतच शिक्षक पाठांत जें सांगेल तें ग्रहण केलें पाहिजे. हें मत फार धोक्याचें आहे. त्याचा अभिप्रेत अर्थ आणि परिणाम आपण लक्षांत घेतला पाहिजे. या मताप्रमाणें द्यावयाची विद्या किंवा ज्याला ती विद्या द्यावयाची तो विद्यार्थी यांना तितकेसें महत्त्व नाहीं. महत्त्व दिलें जातें तें अध्यापनाच्या तंत्राला. या तंत्राबरहुकूम चतुर शिक्षक वर्गांत मुलांच्या-समोर कशा उलट्या सुलट्या उड्या मारतो याला महत्त्व मिळतें. शिक्षक जें शिकविणार आहे त्यासंबंधीं मुलांचें अज्ञान असलें पाहिजे, त्यांना कांहीं त्या-बाबत ज्ञान असल्यास तें जवळ नाहीं असें त्यांनीं नाटक केलें पाहिजे. तसें नाटक न झाल्यास या रंगभूमीवरील नायक म्हणजे शिक्षक याच्या भूमिकेला आणि कसबाला यश मिळणार नाहीं. या सिद्धान्ताप्रमाणें गारुडी आपल्या पोतडींतून एकेक अजब चीज बाहेर काढतो आणि आपल्याला आश्चर्यचकित करून सोडतो तसाच प्रकार शिक्षकाला करावा लागतो.

आपण अशा चमत्कारिक आणि अशास्त्रीय सिद्धान्तापासून अलिप्त राहिलें पाहिजे. अध्यापन आणि अध्ययन ही एकात्म झालीं पाहिजेत. म्हणजेच **वर्गांत ज्ञानाची जी देवघेव व्हायची ती शिक्षक आणि मुलें यांच्या अव्याहत सहकार्यानें सिद्ध झाली पाहिजे.** आपल्या अध्यापनाचें उद्दिष्ट असें असलें पाहिजे कीं मुलांचें वय, अनुभव आणि ज्ञान जसजसें वाढत जातें तसतशी **अध्यापनाची जागा अध्ययनानें घेतली पाहिजे.** आणि क्रमाक्रमानें शिक्षकानें विद्यार्थ्यांचा एक मार्गदर्शक, एक वाटाड्या ही भूमिका पत्करली पाहिजे. राजकारणांत जी शासनसंस्था शक्य तितकें कमी शासन (Governing) करते ती उत्तम असें म्हटलें जातें. शिक्षणक्षेत्रांतहि तोच नियम लागू आहे. तेव्हां मुलांनीं घरून पुस्तक वाचून तयारी करून आलें पाहिजे. कधीं कधीं इतिहासांतील असे कांहीं भाग शिकवावे लागतील कीं जेव्हां शिक्षकालाच सारें सांगावें लागेल. त्यानेंच पुढाकार घेणें अशा प्रसंगीं उचित ठरेल. पण असे प्रसंग थोडेच असतात. सामान्यतः मामुली पाठांत मुलांनीं तयारी करून येणें हेंच योग्य ठरेल.

इकडे पाठ्यपुस्तक मुलांनीं तयार करून यावें तर तिकडे शिक्षकानें अव्वल दर्जाचे ऐतिहासिक ग्रंथ वाचून आपला पाठ तयार करावा. वर्ग सुरू झाल्यावर शिक्षकानें तोंडीं प्रश्न विचारावेत किंवा कांहीं प्रश्न फळ्यावर लिहून मुलांना त्यांचीं उत्तरें लिहिण्यास सांगावें. नंतर या पार्श्वभूमीवर नव्या पाठाला सुरवात व्हावी. शिक्षकानें पाठ्यपुस्तकांत भर घालावी. मध्यवर्ति कल्पना शोधून काढण्यास सांगावें. अनेक मुद्द्यांवर चर्चा करावी. प्रस्तुत विषयास योग्य असे दाखले द्यावे. आणि जेथें शक्य असेल तेथें वर्तमानकाळांतील प्रश्नांशीं सांगड घालावी. एवंच, या श्रेणींत चर्चा-पद्धतीला आरंभ होईल.

पाठ्यपुस्तकाविषयीं एक सूचना करावीशी वाटते. वर्गांत चाळीस पंचेचाळीस मुलें असलीं तर त्यांच्याजवळ सर्वांमिळून तीन चार वेगवेगळीं पाठ्यपुस्तकें असलेलीं चांगलीं. मुलांनीं एकाच विषयावर वेगवेगळ्या लेखकांनीं काय लिहिलें आहे, त्या लेखकांचीं मतें आणि दृष्टिकोन कसे वेगळे आहेत याचा तुलनेनें अभ्यास करण्यास शिकावें. अर्थात् वेगवेगळीं पाठ्यपुस्तकें म्हणजे कांहीं ऐतिहासिक साधनें नाहींत. परंतु अनेक पाठ्यपुस्तकांची तुलना करण्यांत एक प्रकारची पुराव्याची छाननी करण्याची संवय होते. शिवाय एकच पाठ्यपुस्तक

वाचल्यानें पुस्तकांत जें लिहिलें आहे तें ब्रह्मलिखित असा समज होण्याचा जो संभव असतो तो अनेक पुस्तकें वाचल्यानें उद्‌भवत नाहीं.

या श्रेणींत अध्यापन कथन पद्धतीनें होईल. या निवेदनांत इतिहासाची जी रूपरेषा मुलांपुढें ठेवावयाची ती राजकीयच असणार. ती सामाजिक किंवा आर्थिक होऊं शकणार नाहीं. याला अनेक कारणें आहेत. एकतर एकंदर इतिहासाचा सामाजिक किंवा आर्थिक आराखडा ( outline ) तयार करण्यास आपल्या-जवळ पुरेशीं साधनें उपलब्ध नाहींत. कांहीं मर्यादित कालखंड कदाचित् या दृष्टिकोनांतून शिकवितां येतील. परंतु सर्व इतिहास सामाजिक किंवा आर्थिक सूत्रांत गुंफतां येणार नाहीं. तसा गुंफण्याचा प्रयत्न केलाच तर तो मुलांच्या डोक्यांवरून जाण्याचा संभव आहे. कारण इतिहासाचीं हीं अंगें व्यक्तिनिरपेक्ष असतात, तत्त्वें आणि विचार यांवर आधारलेलीं असतात. तत्त्वांच्या विरळ वातावरणांत प्रौढांनासुद्धां फार वेळ टिकाव धरवत नाहीं. मग मुलांची काय कथा ? तथापि मधून मधून अनुकुल प्रसंग आले म्हणजे इतिहासाच्या या अंगांना अवश्य प्राधान्य द्यावें. विशेषतः भारताच्या १९ व्या शतकाचा इतिहास तिन्ही अंगांनीं समृद्ध आहे. राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, लोक-हितवादी, ज्योतिराव फुले, आगरकर, अण्णासाहेब शिंदे यांना सामाजिक सूत्रांतच गोवलें पाहिजे. टाटा, गणेश व्यंकटेश जोशी, डी. ई. वाच्छा आर्थिक इतिहास सांगतील, तर दादाभाई नवरोजी, रानडे, मेथा, गोखले, टिळक आणि गांधी राजकारणाचें सूत्र वर्तमानकाळापर्यंत आणून सोडतील. सारांश, एकोणिसावें शतक आणि विसाव्याचें अर्धशतक बहुरंगी आहे आणि म्हणून बहुरंगांतच तें रंगविलें पाहिजे. शिवपूर्वकालाची पार्श्वभूमि सांस्कृतिक आणि धार्मिक बाजूनें मांडावी लागेल. एवंच, इतिहासांत ज्या वेळीं जी बाजू प्रधान व प्रभावी असेल त्या बाजूस विवेचनांत प्राधान्य दिलें पाहिजे व दुसऱ्या बाजूंना दुय्यम स्थान द्यावें लागेल.

इतिहासाचा सामान्य आराखडा राजकीय ठेवण्याचें दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे राजकीय घटना व व्यक्ति एकामागून एक कालक्रमानें येतात. त्यामुळें इतिहासाच्या प्रवाहांतलें सातत्य आणि अभंगत्व मुलांच्या मनावर चांगलें ठसतें, तसें सामाजिक सूत्रानें ठसणार नाहीं. कारण त्यांत अनेक व्यक्ति, अनेक विचार असतात. त्यांचें परस्परांशीं साधर्म्य शोधणें कठीण आणि त्यांच्यांतला कालक्रम अखंड ठेवणें त्याहून कठीण.

आराखडा राजकीय ठेवला आणि त्या त्या काळांतील सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक बाजूंचा त्या कालखंडाचा विचार करतांना परामर्श घेतला म्हणजे अध्यापन यशस्वी होण्यास हरकत नसावी. या बाबतींतला एक धोका येथें सांगितला पाहिजे. सामान्यतः असा प्रघात आहे कीं एखाद्या कालखंडाचा राजकीय इतिहास सांगून व शिकवून झाल्यावर त्याचें परिशिष्ट म्हणून तत्कालीन सामाजिक स्थितीची माहिती देण्यांत येते. या माहितीचा व त्या राजकीय इतिहासाचा दुवा जोडला जात नाहीं; कार्यकारणभाव व अन्योन्यसंबंध स्पष्ट केले जात नाहींत. संबंधित कालखंडाशीं या सामाजिक स्थितीचा काय संबंध आहे याचा उकल केला जात नाहीं.

याचा परिणाम असा होतो कीं इतिहासांत मधून मधून अगांतुकासारखी डोकावणारी सामाजिक परिस्थिति त्रिशंकूसारखी अधांतरीं लोंबते. तिला भक्कम जमिनीवर स्थिर होण्यास जागा मिळत नाहीं. तिचे लागेबांधे त्या त्या कालखंडाशीं जोडले नाहींत म्हणून परीक्षेंत अमक्या अमक्या कालखंडांतील किंवा राजवटीनंतरची सामाजिक स्थिति कशी होती तें सांगा असा प्रश्न आला म्हणजे मुलांच्या मनाचा गोंधळ होतो; कारण वेगवेगळ्या काळांतील सामाजिक स्थित्यंतरें एकमेकांत मिसळून गेलेलीं असतात. मग मुलें आठवेल ती आणि तशी परिस्थिति लिहून टाकतात. अशोक, गुप्तराजे आणि हर्ष यांच्या-काळांतील परिस्थितींत त्यांना भेद करतां येत नाहीं. कारण शिक्षकानें अशोक-कालीन परिस्थितीची सांगड अशोकच्या राजवटीशीं घातलेली नसते, किंवा गुप्तांचे व त्यांच्याकालच्या सामाजिक स्थितीचे परस्परसंबंध प्रस्थापित केलेले नसतात. राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक अंगें हीं एकाच इतिहासपुरुषाचीं आहेत. त्यांच्यांतील नुसतें साधर्म्यच नव्हे तर एकात्मता शिक्षकानें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**फळ्याचा उपयोग :–** प्रथम श्रेणीप्रमाणें याहि श्रेणींत फळ्याचा पदोपदीं उपयोग केला पाहिजे. शिक्षकानें फळ्यावर टांचण लिहिलें पाहिजे. मुलांनीं तें वहींत उतरून घेतलें पाहिजे आणि घरीं त्याचा विस्तार केला पाहिजे. याशिवाय लढायांतील सैन्यांची स्थिति, स्वाऱ्यांचे मार्ग, वेढे इत्यादि घटना फळ्यावर भरभर थोड्या रेघांत दाखवल्या पाहिजेत. अर्काटचा प्रसिद्ध वेढाच घ्या. क्लाइव्ह मद्रासला होता, चंदासाहेब त्रिचनापल्लीला. त्रिचनापल्लीवरची चंदा-

साहेबाची मिठी सैल करण्यासाठीं क्लाइव्ह मद्रासहून निघून अर्कॉटला गेला व तें शहर जिंकून त्यानें त्याच्यांत तळ दिला. त्याच्या अपेक्षेप्रमाणें चंदासाहेबाचा मुलगा राजासाहेब त्रिचनापल्ली सोडून सैन्य घेऊन अर्कॉटचा बचाव करण्यासाठीं धावला आणि अर्कॉटचा प्रसिद्ध वेढा सुरू झाला. या घडामोडी केवळ कांहीं रेषा व टिंबें यांच्या साहाय्यानें खालीलप्रमाणें दाखवितां येईल व मुलांना त्या घडामोडीची चांगली कल्पना येईल.




त्याचप्रमाणें पानपतच्या लढाईच्या पूर्वी भाऊसाहेब व अबदाली एकमेकांना हुकवीत दक्षिणेकडून उत्तरेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे यमुना उतरून एकमेकांना शह देत होते. शेवटीं परिणाम असा झाला कीं भाऊसाहेबांनीं अबदालीचा स्वदेशीं जाण्याचा मार्ग अडवला, तर अबदालीनें भाऊसाहेबांचा दिल्लीकडचा मार्ग रोखून धरला. दोघांनाहि लढण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाहीं. हा युद्धकलेंतील हुतुतूचा डाव फळयावर थोड्या चिन्हांनीं स्पष्ट करतां येईल. पूर्वपश्चिम वाहणारी यमुना दाखवावी, पूर्वेकडे टोकाला टिंबानें दिल्ली दाखवावी. योग्य ठिकाणीं कुंजपुरा व पानपत दाखवावें आणि दोन्ही सैन्यांनीं यमुना जेथें जेथें पार केली तेथें तेथें बाणांनीं उतार व त्यांच्या दिशा दाखवाव्यात.

• • •

## प्रकरण दहावें

# इतिहासाचें अध्यापन– तृतीय श्रेणी

आतां आपण तृतीय श्रेणीपर्यंत येऊन पोहोंचलों. या श्रेणींत दहावी आणि अकरावी इयत्ता म्हणजे प्री-मॅट्रिक आणि मॅट्रिक हे वर्ग येतात. या वर्गांतील विद्यार्थी मुलें नसतात. त्यांना ओठावर थोडीबहुत मिसरुड आणि तिच्यासह मतें फुटलेलीं असतात. ते राजकीय सभांना जात असतात. वर्तमानपत्रें वाचतात. निवडणुकीच्या धामधुमींत त्यांचीं डोकीं ठिकाणावर नसतात. ते मिरवणुका काढतात, घोषणा करतात, ओरडतात आणि घसा बसवून घेतात. त्यांचें राजकारण अर्थात् उथळ, क्षोभक व भडक असतें. त्यांना शांतपणें विचार करून संयमानें आपलें म्हणणें सांगणारे वक्ते आवडत नाहींत. प्रतिस्पर्ध्यांना शिवीगाळ करणारे, राजकारणांतील घाण वस्त्रें सभेंत चारचौघांसमक्ष धुणारे, खुसखुशीत विनोद करणारे, मार्मिकपेक्षां शाब्दिक कोट्या करणारे वक्ते व पुढारी त्यांना आवडत असतात. त्यांना विचार करण्याची शक्ति आलेली असते. त्या शक्तीचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हा समाजाचा व शिक्षणसंस्थांचा प्रश्न आहे. त्यांच्या वरवरच्या खळखळींखालीं ध्येयवादाचा झरा असतो. शिक्षणसंस्थांनीं तितक्या खोल पोहोंचलें पाहिजे व त्या ध्येयवादाला वाट करून दिली पाहिजे. एखादी सेवादलासारखी ओजस्वी संस्था त्यांना आवाहन करूं लागली कीं हेच ओरडणारे विद्यार्थी ध्येयवादाच्या उच्च भूमिकेवर वावरूं लागतात.

या मुलांना आपल्याला इतिहास शिकवायचा आहे. त्यांना कोणता इतिहास शिकवायचा हें पूर्वीच आपण सातव्या प्रकरणांत निश्चित केलें आहे. परत तें पुढें देत आहोंत :–

( अ ) भारताच्या इतिहासांतील एखाद्या विशिष्ट कालखंडाचा विशेष अभ्यास;

( ब ) जागतिक इतिहास;

( क ) नागरिक शास्त्र;

( ड ) राज्यघटना व राज्यकारभार.

द्वितीय श्रेणींत आपण कथनात्मक ( narrative ) पद्धतीचा अवलंब केला आणि तात्त्विक विवेचनाची थोडीशी सुरुवात केली. आतां तृतीय श्रेणींत चर्चापद्धत आणि विषयानुसारी पद्धत ( topical ) यांचा आपल्याला विशेष उपयोग करावा लागेल. अर्थात कालक्रम हा इतिहासाच्या पाठीचा कणा आहे. त्याच्या जोरावरच इतिहास उभा आहे. तो मोडून चालावयाचें नाहीं. परंतु विषयानुसारी ( topical ) शिकवितांना कालक्रमाला थोडी मुरड घालावी लागेल. याविषयीं सातव्या प्रकरणांत सविस्तर विचार केलाच आहे. या पद्धतीप्रमाणें एक एक प्रश्न घ्यावयाचा व त्याला कालक्रमानेंच शेवटपर्यंत नेऊन पोहोंचवायचें. परत दुसरा प्रश्न घ्यावयाचा व त्याची तशीच वासलात लावायची. हे प्रश्न अभ्यासासाठीं घ्यावयाचे तेहि कालक्रमानेंच. म्हणजे प्रश्न घ्यावयाचे ते कालक्रमानें आणि प्रत्येक प्रश्नाचा अभ्यास करायचा तोहि कालक्रमानेंच.

चर्चापद्धत या नांवांत भिण्यासारखें कांहीं नाहीं. अनट्रेन्ड शिक्षकसुद्धां मुलांना शिकवितांना त्यांच्याशीं चर्चा करीत असतो. आपणच सांगत व शिकवीत सुटायचें नाहीं, वाचीत सुटायचें नाहीं; मुलांना काय वाटतें तें विचारलें पाहिजे, त्यांना विचार करण्यास लावलें पाहिजे, हेंच चर्चापद्धतीचें सार आहे. ‘तुम्हांला काय वाटतें ? ‘तुम्हांला असें कां वाटतें ? ’ हे प्रश्न मुलांना नेहमीं विचारले पाहिजेत.

राज्यकारभाराची पद्धत किंवा आधुनिक इतिहास शिकवितांना चर्चापद्धतीचा अनेक प्रकारें उपयोग करतां येईल. या श्रेणींतील मुलें वर्तमानपत्रें वाचतात. एखादे दिवशीं वर्तमानपत्रांत एखादी अशी बातमी येते कीं आधुनिक इतिहास किंवा राज्यकारभाराशीं तिचे धागेदोरे जुळतात; अशा प्रसंगीं वर्तमानपत्रांतील तो उतारा वर्गांत वाचावा, मुलांना त्यावर चर्चा करण्यास सांगावें आणि त्या बातमीचा संबंध वर्गांत शिकवायच्या विषयाशीं कसा येतो तें सुचवावें. सारांश,

या श्रेणींत आपल्या देशांत व अन्यत्र ज्या घडामोडी चालल्या असतील त्यांचा वारंवार उल्लेख व उपयोग करून इतिहासाचें वर्तमानकाळाशीं कसें अभेद्य नातें आहे तें दाखविण्याची संधि कधीं दवडूं नये.

वर्तमानकालीन घडामोडींच्याच बाबतींत चर्चापद्धतीचा उपयोग केला पाहिजे असें नाहीं. भारताच्या एखाद्या कालखंडाचा विशेष अभ्यास करतांना पदोपदीं वर्गांत चर्चा झाली पाहिजे. रानडे–गोखले यांची राजकीय भूमिका, टिळकांची सामाजिक दृष्टि, जिनांचा द्विराष्ट्र सिद्धान्त, सामाजिक कायदे, मँचेस्टरच्या कापडाच्या संरक्षणासाठीं भारतांतील मालावर लादलेले कर, इंग्रजी शिक्षणवादी विरुद्ध संस्कृत शिक्षणवादी यांचा झगडा, असे किती तरी वादग्रस्त प्रश्न आहेत कीं त्यांना दोन बाजू आहेत; निदान त्या वेळच्या लोकांना व राज्यकर्त्यांना त्या तशा दिसल्या. अशा सर्व प्रश्नांवर वर्गांत सांगोपांग चर्चा झाली पाहिजे.

वादविवाद मंडळांतहि भानगडीच्या ऐतिहासिक प्रश्नावर पूर्वपक्ष, उत्तरपक्ष झाला पाहिजे. मंडळांत एक बाजू मांडायची म्हणजे तिचा चांगला अभ्यास करावा लागेल, मुद्दे निवडावे लागतील, शिक्षकांची व पालकांची मदत घ्यावी लागेल. परंतु अशा चर्चेनें मुलांची ऐतिहासिक दृष्टि चोखंदळ होईल आणि राजकारण हा एक गंभीर विषय आहे, त्याच्या अनेक प्रश्नांना अनेक बाजू असतात, तेव्हां त्याचा विचार करतांना थोडा संयम पाळला पाहिजे, थोडा अभ्यास केला पाहिजे, हें मुलांच्या लक्षांत येईल.

चर्चा म्हटली म्हणजे प्रश्नोत्तरें आलीं. चर्चेत विषयाचें मुलांना थोडेंबहुत ज्ञान आहे हें या पद्धतींत गृहीत धरलें जातें. परंतु अनेक ऐतिहासिक प्रश्नांबद्दल मुलांना ज्ञान नसतें. अशा प्रसंगीं त्यांना प्रश्न विचारून चर्चेत ओढण्यांत कांहीं हंशील नाहीं. शिक्षकानेंच अशा प्रसंगीं तात्त्विक विवरण आणि स्पष्टीकरण करून त्या प्रश्नांचें यथार्थ स्वरूप मुलांना दाखविलें पाहिजे.

पहिल्या आणि दुसऱ्या श्रेणींत इतिहासाचा प्रवाह अप्रतिहत असा वाहत होता आणि त्या प्रवाहाबरोबर मुलेंहि वाहत होतीं. एका दृष्टीनें तीं प्रवाहपतित होतीं. इतिहासांतील प्रचंड घडामोडी आणि अलौकिक व्यक्ति यांचें त्यांना जबरदस्त आकर्षण होतें. त्यांच्यामागें तीं धांवत होतीं. तृतीय श्रेणींत आपण चर्चा आणि तात्त्विक पद्धत पतकरली आहे. येथें प्रवाहाबरोबर वाहत जाऊन चालायचें नाहीं. जमिनीवर भक्कम पाय रोवून त्या प्रवाहाचा ठिकठिकाणीं अंदाज

आणि मोजमाप आपल्याला घ्यावयाचें आहे. यासाठीं प्रवाहपतित न होतां थोड्याबहुत प्रमाणांत मुलांना तटस्थांची भूमिका घेण्यास आपण शिकविलें पाहिजे. नदीच्या तीरावर उभे राहिलें म्हणजे आपण स्थिर असतों आणि आपल्या समोरून प्रवाह वाहत जातो. वाढत्या वयांत इतिहासाचा अभ्यास अशाच वस्तुनिष्ठ दृष्टीनें करावयाचा असतो.

तृतीय श्रेणींत आपल्याला भारताच्या इतिहासांतील आपण निवडलेल्या एखाद्या कालखंडाचा विशेष अभ्यास करावयाचा आहे. यापूर्वी सुमारें पांच वर्षें भारताच्या समग्र इतिहासाचा आराखडा आपण मुलांच्यासमोर मांडला आहे. या पांच हजार वर्षांच्या इतिहासांतील मुख्य घटना आणि व्यक्ति मुलांना परिचित झाल्या आहेत. ही पार्श्वभूमि लक्षांत ठेवून आपल्याला आतां एकच कालखंड निवडून त्याचा चर्चात्मक पद्धतीनें शास्त्रशुद्ध असा तात्त्विक अभ्यास करावयाचा आहे. तात्त्विक अभ्यास कसा तें प्रश्न-पद्धतीचें विवरण करतांना सांगितलें आहे; त्याची पुनरुक्ति नको.

विशेष अभ्यासाकरितां जो कालखंड निवडायचा तो आधुनिक असलेला बरा. आपल्याला या श्रेणींत उद्याचे नागरिक तयार करावयाचे आहेत आणि निकोप अशी राजकीय दृष्टि विद्यार्थ्यांना प्राप्त करून द्यावयाची आहे. या दृष्टीनें एकोणिसावें शतक आणि विसाव्याचें अर्धें शतक या दीडशें वर्षांचा अभ्यास फार उपयोगी पडेल. आज जो भारत मुलांना दिसत आहे त्याची घडण मोठ्या प्रमाणांत या दीडशें वर्षांतच झाली आहे. या दीडशें वर्षांतच आधुनिक भारतीय समाज घडला गेला आहे. आधुनिक शिक्षण, कारखाने, उद्योगधंदे, सामाजिक कायदे आणि सामाजिक सुधारणा, आंतरराष्ट्रीयता ह्या सर्व आधुनिक संस्कृतीच्या लक्षणांचा आविष्कार याच युगांत झाला आहे. हा दीडशें वर्षांचा वारसा घेऊनच मुलांना पुढें वाटचाल करावयाची आहे. प्राचीन किंवा मध्ययुगीन इतिहासांचे संस्कार आधुनिक जीवनावर नाहींत असें नाहीं. परंतु ते बरेचसे पुसत चालले आहेत. आणि त्यांची जागा आधुनिक संस्कार घेत आहेत. हें जें होत आहे तें बऱ्याकरतांच होत आहे असें पुष्कळ समंजस माणसांना वाटतें. तें कांहीं असो, अलीकडचा भूतकाळ हा अधिक परिचित, अधिक जिव्हाळ्याचा, अधिक लागाबांध्याचा आहे हें मात्र निःसंशय.

आधुनिक युगाच्या अभ्यासाला १८१८ पासून सुरवात करावी. दुसरे बाजीराव ब्रह्मावर्तास जाऊन तेथें स्नानसंध्या करीत राहिल्यावर आज आपण ज्याला मुंबई राज्य म्हणतों त्या पश्चिम भारताची स्थिति कशी होती याविषयीं विहंगमावलोकन करावें. बाजीरावनें चिडविलेले आणि धुळीस मिळविलेले सरदार-दरकदार आपापल्या वतनांवर आणि वाड्यांत मनगटें चावीत बसले होते. संस्कृत विद्येंत प्रवीण असलेले विद्वान पंडित पुण्यास, वाईस, साताऱ्यास, नाशकास असे ठिकठिकाणीं विखुरलेले होते, पाठशाळांत विद्यार्थ्यांना पढवीत होते. त्यांना भविष्यकाळ काळाकुट्ट दिसत होता आणि म्हणून कृष्णशास्त्र्यांच्या गुरूंनीं त्यांना "बाबा, आतां संस्कृत विद्येचे दिवस संपले, ती शालजोडी टाक आणि इंग्रजी शिकायला लाग ' असा उपदेश केला. बहुजनसमाज शेतकऱ्यांचा होता. महाराष्ट्राची शेती पावसाच्या लहरीवर आजच्यासारखी तेव्हांहि अवलंबून होती. अवर्षणें पडत. गुरें मरत. शेतकऱ्यांची अन्नान्नदशा होई. पण मराठशाहींत त्यांना एक मोठा आसरा होता. शेतीच्या बरोबरच एक दुय्यम धंदा म्हणून महाराष्ट्राचा शेतकरी शिपाईगिरी करीत असे. शेतांतलें धान्य घरीं आल्यावर तो आपल्या पथकांत जात असे आणि दसऱ्याच्या मुहूर्तावर दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे होणाऱ्या स्वाऱ्यांत सामील होत असे. नवे नवे प्रदेश पहायला मिळत. लूटहि मुबलक मिळे. घरीं पाटलीणबाईच्या गळ्यांत वज्रटीक आणि ठुशी झळकत. १८१८ नंतर शिपाईगिरी संपली. भिवरा, गोदा, कृष्णाकांठचीं तट्टें, जागच्या जागीं बसण्याची सवय नसल्यानें, ठाणावरच मेलीं. नव्या राजवटींत सावकारांना बरे दिवस आले. कारण कायद्याच्या तलवारीनें शेतकऱ्याला नागवतां येऊं लागलें. उलट शेतकऱ्यांच्या तलवारीचे विळे-कोयते झाले. मिशनऱ्यांचा प्रचार जोरांत सुरू झाला. चौकाचौकांत ते वेडयावांकडया मराठींत भाषणें करूं लागले. संतापलेल्या म्हाताऱ्या त्यांच्या डोक्यांवर खरकटें पाणी ओतूं लागल्या. पण त्यांची चिकाटी दांडगी. त्यांचा प्रचार चालूच राहिला.

एवढेंच पुरे. आणखी किती तरी सांगतां येईल. परंतु १८१८ च्या सुमारास महाराष्ट्र कसा होता, त्याची राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थिति कशी होती याची मुलांना यथार्थ कल्पना देऊनच या कालखंडाच्या अभ्यासाला सुरुवात करावी. पद्धत अर्थात विषयानुसारी व चर्चात्मक. या पद्धतींत विवेचन केवळ तात्त्विक होईल व मुलांना झेपणार

नाहीं असें समजण्याचें कारण नाहीं. या आधुनिक इतिहासांतील प्रत्येक प्रश्नाच्या मागें कोणी तरी विभूति उभी आहे. या प्रश्नास कोणी तरी अलौकिक माणसानें चालना दिली असेल, ते धसास लावले असतील, त्यांना गति दिली असेल. प्रत्येक प्रश्न म्हणजे एका किंवा अनेक व्यक्तींचें जीवनकार्य असणार. त्या व्यक्तींचा ध्येयवाद, त्यांची तळमळ व धडपड, त्यांच्यावर ओढवलेलीं संकटें, झालेला विरोध, त्यांनीं दिलेला सामना यांत व्यक्तिजीवनाचें आकर्षण व अद्‌भुतरम्यता पदोपदीं आढळते. प्रत्येक प्रश्नाचा खल करतांना या व्यक्तींना विसरूं नये, त्यांचा आधार घ्यावा, म्हणजे आधुनिक इतिहास हा एखाद्या कादंबरीसारखा रंजक होईल.

या श्रेणींत मुलांनीं खूप काम केलें पाहिजे. पाठ्यपुस्तक वाचून तर आलेंच पाहिजे; पण त्याला पोषक अशीं चरित्रें व अवांतर पुस्तकांतील संबंधित भागहि वाचला पाहिजे. शिक्षकानें वर्गांतील बरेंचसें काम या घरच्या तयारीवर आधारलें पाहिजे. हीं मुलें मॅट्रिकच्या परीक्षेस बसायचीं असतात. शिक्षक आपल्याला परीक्षेंत येणाऱ्या संभाव्य प्रश्नांचीं आयतीं उत्तरें सांगणार आहे, अशी मुलांची समजूत होतां कामा नये. त्यांनीं आतां या श्रेणींत झालेल्या प्रश्नांवर स्वतःचीं टिपणें तयार करण्यास शिकलें पाहिजे. शिक्षकानेंहि एका प्रश्नाचा ( म्हणजे topic चा ) अभ्यास झाला म्हणजे त्यावरील गृहपाठ म्हणून अशीं टिपणें लिहून आणण्यास सांगावें. त्याचप्रमाणें दर तीन चार महिन्यांनीं मुलांनीं एक विस्तृत असा ऐतिहासिक निबंध लिहावा अशी प्रथा पाडली पाहिजे.

तृतीय श्रेणींत आपल्याला कालक्रमानुसार अखंडित असा जगाचा इतिहास शिकवावयाचा आहे. ‘ युनेस्को ’ नें तयार केलेला या विषयाचा अभ्यासक्रम सहाव्या प्रकरणांतील परिशिष्टांत दिला आहे आणि तेथें त्याचें विवेचनहि केलें आहे. या अभ्यासक्रमाप्रमाणें अद्याप पाठ्यपुस्तकें झाल्याचें ऐकिवांत नाहीं. तथापि वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून आजवर या विषयावर अनेक पाठ्यपुस्तकें झालीं आहेत. त्यांचा येथें नामनिर्देश मात्र करतों. अशा प्रकारें मराठींतसुद्धां पुस्तकें झालीं पाहिजेत.

1 The struggle of Modern Man

2 The Dawn of Freedom

3 Foot-prints on the Sands of Time

4 An Outline History of Civilization (हें पुस्तक म्हणजे नं. ३ च्या पुस्तकाचीच नव्या नांवानें सुधारून काढलेली आवृत्ति आहे.)

वरील चारहि पुस्तकें भारतांतील शाळांत शिकविण्यांत ज्यांचा जन्म गेला आहे त्या F. G. Pearce नें लिहिलीं असून ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनें प्रसिद्ध केलीं आहेत.

5 The New Approach — Introduction to History by J. C. Hill ( Oxford Uni. Press ) हें पुस्तक मोठें गमतीदार आहे. यांत अगदीं सोप्या भाषेंत भाषा, लिपी, कला, शिक्षण, युद्धें, जहाजें, घरें, पोशाख, इत्यादिकांचा उगम आणि विकास दाखवला आहे.

याशिवाय व्हॅन लून या चित्रकार-लेखकाचें Story of Mankind हें पुस्तक मुलांनीं व शिक्षकानें अवश्य वाचण्यासारखें आहे. विशेषतः त्याच्यांतील शेकडों गमतीचीं चित्रें फार उद्बोधक आहेत. भाषाहि सोपीच आहे. किंमत कदाचित् मुलांना परवडणार नाहीं; परंतु ग्रंथालयांत हें पुस्तक अवश्य पाहिजे.

नागरिकशास्त्राचा बराचसा विचार 'समन्वय' या प्रकरणांत केला आहे. तेथें जें सांगितलें त्याची येथें पुनरावृत्ति करीत नाहीं. आपल्या परिस्थितीस अनुरूप असा या शास्त्राचा सुटसुटीत अभ्यासक्रम आंखावा. त्याचा चांगला उपयोग होईल. नागरिकशास्त्राची राज्यकारभार व राज्यपद्धत यांच्याशीं सांगड घालावी.

पुष्कळ वर्षांपासून आपण राज्यघटना व राज्यकारभार हा विषय माध्यमिक शाळांत शिकवितों. या विषयावरचीं चारदोन पुस्तकें मीं पाहिलीं आहेत. या पुस्तकांत फुटकळ माहिती दिलेली असते. तीं पुस्तकें वाचतांना लहानपणीं भूगोलाच्या पुस्तकांत नद्या, पर्वत, भूशिरें, आखातें यांचीं नांवेंच नांवें वाचलीं होतीं व पाठ केलीं होती ती आठवण होते. मुलांना ही फुटकळ माहिती पाठ केल्यावर परीक्षेंत हमखास गुणहि मिळत असतील. परंतु अशा पुस्तकांनीं व त्यांच्या अध्ययनानें मुलांच्या मनावर काय संस्कार होत असतील, याचा आपण विचार केला पाहिजे.

आपल्याला उद्याचे नागरिक तयार करावयाचे आहेत. पार्लमेंटचे, प्रादेशिक विधान सभांचे व परिषदांचे किती सदस्य असतात हे आकडे पाठ करून घ्याव-याचे नाहींत. आपल्याला मुलांना निकोप अशा राजकारणाचें शिक्षण द्यावयाचें

आहे. हा हेतु वरील प्रकारानें साध्य होत नाहीं. परीक्षा जवळ आली म्हणजे बहुधा या विषयाची सुरुवात होते. आणि भराभर त्याची वासलात लागते. बहुधा एखादें पुस्तक वाचण्यांत येतें. महत्त्वाच्या भागांवर खुणा करण्यास सांगण्यांत येतें. पाठ करण्यापलीकडे या विषयांत व त्याच्या अध्यापनांत फारसें कांहीं नसल्यानें मुलांचेंहि वर्गांत बेताचेंच लक्ष असतें.

हें सर्व बंद झालें पाहिजे. हा विषय फार महत्त्वाचा आहे. तो परिश्रमपूर्वक तयार केला पाहिजे. मुलांनीं घरून वाचून आलें पाहिजे. वर्गांत एक एक प्रश्न घेऊन त्यावर चर्चा झाली पाहिजे. हीं मुलें आतां वर्तमानपत्रें वाचूं लागलीं आहेत, राजकीय सभांना हजर राहूं लागलीं आहेत. स्वयंसेवक होऊं लागलीं आहेत हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तेव्हां वर्गांत राज्यघटनेपैकीं एकेक प्रश्न त्यांच्या-समोर ठेवावा आणि त्यांचीं त्या प्रश्नावर काय मतें आहेत तीं काढून घ्यावींत. बहुधा या वयांत स्पष्ट अशीं मतें नसतातच. कांहीं अस्पष्ट वरवरच्या कल्पना आणि पूर्वग्रहच असतात. चर्चेमध्यें मुलांच्या मनांतील हें दुर्भिक्ष उघडकीस येईल. अशा प्रसंगीं शिक्षकानें त्या प्रश्नावर तात्त्विक विवेचन करावें.

राज्यघटनेंत असा एकहि मुद्दा नाहीं कीं ज्यावर मुलांना चर्चा करतां येणार नाहीं. मध्यवर्ति सरकार आणि प्रादेशिक सरकारें, मध्यवर्ती सरकारचें अधिकार-क्षेत्र व त्यांत येणारे विषय, प्रादेशिक सरकारांचीं अधिकारक्षेत्रें व त्यांतील विषय, मध्यवर्ती सरकार आणि प्रादेशिक सरकार यांना सामान्य असलेले विषय, अल्पसंख्याकांचा प्रश्न, घटनेनें नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क, संघभाषा आणि प्रादेशिक भाषा यांचीं क्षेत्रें आणि मर्यादा, न्यायासनास प्रशासनापासून मिळालेलें स्वातंत्र्य इत्यादि सर्व प्रश्न मोठे मनोरंजक आणि विचारप्रवर्तक आहेत.

भारताची राज्यघटना संघराज्याची आहे. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, संयुक्त संस्थानें ( अमेरिका ) इत्यादि मोठमोठया देशांची घटनाहि याच प्रकारची आहे. तेव्हां आपल्या घटनेचा विचार करतांना इतर संघराज्यांत वेगवेगळे प्रश्न सोडविण्याचे कसे प्रयत्न केले आहेत हें विद्यार्थ्यांना समजण्यासाठीं वारंवार इतर देशांशीं तुलना करीत जावें. पुष्कळ वेळां आपल्याला असें वाटतें कीं कांहीं वादग्रस्त प्रश्न आपल्याच वांट्याला आले आहेत. उदाहरणार्थ, अल्पसंख्याकांचा प्रश्न हा आपल्यालाच मिळालेला शाप आहे अशी बऱ्याच लोकांची कल्पना असते; परंतु हें चूक आहे. पहिल्या महायुद्धानंतर युरपखंडांत जेव्हां नवीन राज्यें निर्माण

झालीं तेव्हां त्यांच्यांत हा प्रश्न उपस्थित झाला आणि त्या वेळच्या राष्ट्रसंघाला या प्रश्नाचा अभ्यास करून त्यावर मार्गदर्शक असा अहवाल प्रसिद्ध करावा लागला. मुलांना या गोष्टी समजल्या पाहिजेत.

इतर देशांचे दाखले घ्यावयाचे त्याप्रमाणें आपल्या पूर्वेतिहासामधूनहि दाखले घेतां येण्यासारखे आहेत. इतिहासाची पुनरावृत्ति होतें हें विधान शब्दशः खरें नसलें तरी कांहीं मूलभूत प्रश्नांच्या आणि समस्यांच्या बाबतींत पुनरावृत्ति घडत असते हें मान्य केलें पाहिजे. उदाहरणार्थ, मध्यवर्ती सरकार आणि त्याच्या अंमलाखालीं असलेले दूरदूरचे प्रदेश हा प्रश्न अशोक, कनिष्क, समुद्रगुप्त, हर्ष, पुलकेशी, अक्बर या सर्व सम्राटांना सोडवावा लागला आहे. अंमलाखालच्या प्रदेशांचा कारभार कसा हांकावा, प्रादेशिक आणि स्थानिक लोकांना कितपत महत्त्व द्यावें, यांचा निर्णय सर्वांनाच घ्यावा लागला आहे. तेव्हां आजच्या राज्यघटनेचा अभ्यास करतांना मागील इतिहासाकडेहि वळलें पाहिजे.

● ● ●

## प्रकरण अकरावें

# इतिहासाचा शिक्षक

'शारदा' नाटकांत थोडें प्रेमांत येऊन कांचनभटानें इंदिराकाकूंस प्रश्न केला, "मग तुला जावई तरी पाहिजे कसा ? कळूं दे एकदां !" इंदिराकाकू म्हणाल्या, "माझ्या फारशा अपेक्षा नाहींत. मात्र 'तरुण, कुलिन, गोरा, हंसतमुख, पाहिजे मुलीला चतुर सद्गुणी सुंदरसा नवरा.'' काकूंनीं 'विद्वानांत हिरा' वगैरे वगैरे आणखीहि यादी जोडली होती. मला इंदिराकाकूंची भूमिका घ्यावयाची नाहीं. कारण माझें तें वय नाहीं. तथापि माझ्याहि संबंधित जावईबुवांच्याविषयीं थोड्याबहुत अपेक्षा आहेत. त्या मी वाचकांपुढें सादर करतों.

माझी पहिली अपेक्षा. इतिहासाच्या शिक्षकाला **इतिहासाचें ज्ञान** पाहिजे. हें वाक्य दिसायला सोपें वाटेल पण तितकें तें सोपें नाहीं. त्याचा एक दोन पानें तरी मला प्रपंच करावा लागेल. इतिहासाच्या शिक्षकाला इतिहासाचें ज्ञान पाहिजे हें वाक्य वाचून कदाचित् आपण हंसाल. या वाक्यांत मी विशेष तें काय सांगितलें असा प्रश्न आपण विचाराल. मीं ज्ञान हा शब्द राजीखुषीनें आणि अक्कलहुषारीनें वापरला आहे. इतिहासाची माहिती असें मीं म्हटलें नाहीं. ज्ञान आणि माहिती यांमध्यें फार फरक आहे. ज्ञान म्हटलें म्हणजे त्यांत माहितीचा समावेश होणारच. परंतु मनुष्य एकाद्या बाबतींत पुष्कळ माहितगार असेल पण कदाचित् त्या बाबतींत तो ज्ञानी असूं शकणार नाहीं. एखाद्या माणसानें अरण्यांतल्या प्रत्येक झाडाची मोजदाद केली असेल पण त्याला अरण्य म्हणजे काय याची जाणीव झाली नसेल. त्याच्या डोळ्यांसमोर एकेक झाड उभें राहील आणि एकेका झाडाची तो माहिती सांगेल. पण त्याला तुम्ही जर

विचारलें, "ही झाडांची खानेसुमारी ठीक आहे रे. आम्हांला ती नको. आम्हांला अरण्याची अशी साकल्यानें जाणीव करून दे." तर कदाचित् तो बुचकळ्यांत पडेल. कारण आपड्यानें मोठ्या कष्टानें जवळ जाऊन एकेक झाड पाहिलें असेल. पण झाडें पाहून झाल्यावर दूर जाऊन त्यानें सबंध अरण्याकडे दृष्टि फेंकली नसेल. आणि सबंध अरण्य दाट आहे का विरळ आहे, त्याचा आकार कसा आहे, पसारा किती आहे इत्यादि गोष्टींची त्याला यथार्थ जाणीव झाली नसेल.

आतां हाच दाखला इतिहासाला लावा. एखाद्या शिक्षकानें इतिहासाची किरकोळ पुष्कळच माहिती मिळवली असेल. इतिहासांतल्या असंख्य घटना त्याला माहीत असतील, शेंकडों सन पाठ केलेले असतील, पण त्याला त्यामुळें इतिहासाचें ज्ञान मिळालें आहेच असें म्हणतां येणार नाहीं. त्याच्या डोक्यांत असंख्य ऐतिहासिक घटना, गोष्टी, व्यक्ति, स्थळें, सन, अस्ताव्यस्त कसे तरी पडले असतील. तुम्ही देशमुख-देशपांड्याचा एखादा जुना वाडा पाहिला असल्यास तुम्हांला दिसून आलें असेल कीं वाडा फार मोठा आहे; चार चौकी आहे; पण वाड्यांत राहणारीं माणसें फार थोडीं आहेत. वाड्याच्या तीनचार खोल्यांचाच वापर होत आहे, बाकीचा भाग रिकामा आहे; कांहीं उध्वस्त आहे, आणि या रिकाम्या भागांत अनेक पिढ्यांची अडगळ कशी तरी पडली आहे. या जुन्या वाड्यांतील अडगळ म्हणजेच आपल्या शिक्षकाच्या डोक्यांतील इतिहासाची अस्ताव्यस्त माहिती.

आतां ज्ञान आणि माहिती यांमधील भेद आपल्या लक्षांत येईल. आपण जगांत पुष्कळच गोष्टी पाहत असतों. त्याचप्रमाणें आपल्या मनांत किती तरी प्रकारचे विचार येत असतात. आणि आपल्याला प्रत्यहीं नानाप्रकारचे अनुभव येत असतात. आपलें मन जागरूक असतें, क्रियाशील असतें, तें मुकाट्यानें पाहिलेल्या गोष्टी, सुचलेले विचार, आलेले अनुभव यांची रवानगी अडगळीच्या खोलींत करीत नाहीं. मनानें, स्वतःचे असे संस्कार न करतां या नानाविध अनुभवांची अडगळ जमविली तर त्या मनाच्या मालकाची वेड्याच्या दवाखान्यांत रवानगी करावी लागते. कारण वेड्यांच्या मनांत विचारांची आणि अनुभवांची नीट व्यवस्था लागलेली नसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ग्रंथ.
अनुक्रम .................... वि ....................
क्रमांक .................... नों दि ....................

इतिहासशिक्षकानें आपल्या डोक्यांत ऐतिहासिक माहितीची अडगळ जमा करूं नये. इतिहास वाचावा, खूप वाचावा. पण जें वाचलें असेल त्यावर खूप विचार करावा, चिंतन करावें, आणि त्याची नीट **व्यवस्था** लावावी. व्यवस्था लावायची म्हणजे काय करायचें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपण जें कांहीं वाचीत असतों त्या घटना, गोष्टी, व्यक्ति या सर्वांचे परस्परसंबंध हुडकून काढले पाहिजेत आणि जोडले पाहिजेत. आपण जें वाचतों त्यामागें कार्यकारण-भाव काय आहे तो शोधून काढला पाहिजे आणि त्यासाठीं अवश्य तर भूतकाळांत शिरलें पाहिजे आणि वाचलेल्या घटनांचे धागेदोरे भूतकाळाशीं जोडले पाहिजेत. इतिहास-शिक्षकाला वाचनांत आलेल्या ऐतिहासिक घटनांचें यथार्थ स्वरूप, मर्म व अभिप्राय (Interpretation) समजला पाहिजे. त्याचे दूरवर होणारे परिणाम त्याच्या लक्षांत आले पाहिजेत. पुष्कळ वेळां आपण वाचतों त्यांत इतका पाल्हाळ केलेला असतो कीं फापटपसारा कोणता आणि सत्त्व कोणतें हें समजणें कठीण जातें. इतिहास-शिक्षकानें फापटपसाऱ्यांतून ऐतिहासिक सत्त्व निवडून काढण्यास शिकलें पाहिजे. त्याला न्यायाधीशाची भूमिका करावी लागेल. तो अनेक पुस्तकें वाचतो. त्यांत कदाचित् परस्परविरुद्ध गोष्टी सांगितल्या असतील. म्हणून विश्वसनीय काय आणि पूर्वग्रहदूषित काय याचा निवाडा त्याला करतां आला पाहिजे. डोळ्यांसमोर जो पुरावा येईल तो कितपत अस्सल आहे आणि कितपत पुरेसा आहे इकडे त्याचें लक्ष पटकन् गेलें पाहिजे. एवंच, इतिहास-शिक्षकाची दृष्टि वस्तुनिष्ठ आणि वृत्ति चिकित्सक असली पाहिजे.

इतिहासशिक्षकाला इतिहासाचें ज्ञान पाहिजे म्हणजे त्यानें इतिहासाचा चालता बोलता ज्ञानकोश झालें पाहिजे, असा या विवेचनाचा अर्थ समजूं नये. इतिहास-शिक्षकानें इतिहास-पुस्तकांतील भाराभर माहिती गोळा करण्याचा अट्टाहास करण्याचें कारण नाहीं. ऐतिहासिकदृष्ट्या स्वतःचें मन तयार करणें, हें त्याचें मुख्य काम आहे. मन तयार करण्यासाठीं अनेक देशांचा इतिहास वाचलाच पाहिजे असें नाहीं. त्याला स्वतःला ज्या कालखंडाची विशेष आवड असेल त्या कालखंडाचा त्यानें विशेष अभ्यास करावा. त्या कालखंडावरील मिळतील तीं पुस्तकें वाचावींत, साधनें जमवावींत; पुरावे तपासावेत, कार्यकारणभाव हुडकून काढावेत आणि त्या कालखंडांत घटनांच्या पाठीमागें दडलेले ऐतिहासिक विचारप्रवाह (movements) कोणते आहेत त्यांचा शोध करावा. हे विचार-

प्रवाह, या प्रेरणा म्हणजेच ऐतिहासिक सत्त्व ! अशा रीतीनें एखाद्या कालखंडाचा चिकित्सक रीतीनें विशेष अभ्यास केला म्हणजे मन तयार होईल, चिकित्सक वृत्ति जागृत होईल आणि मग इतर कोणत्याहि कालखंडाचा इतिहास हातीं घेतला तर मनाचा गोंधळ होणार नाहीं. तें तयार असल्यामुळें या नव्या क्षेत्रांतहि त्याची दृष्टि वस्तुनिष्ठ अर्थात् शास्त्रीय अशीच राहील.

आता थोडें तपशिलांत शिरूं. इतिहासशिक्षकाचें मुख्य कर्तव्य म्हणजे वस्तुनिष्ठ दृष्टि कमावणें हें होय. परंतु अशी दृष्टि कमावल्यावर किंवा कमावतांना त्याचा व्यासंग चालू राहिला पाहिजे. एकाच वाक्यांत सांगायचें झाल्यास असें सांगतां येईल कीं इतिहासशिक्षक हा नेहमीं इतिहासाचा विद्यार्थी राहिला पाहिजे. त्याला जगाच्या इतिहासाचें थोडेंबहुत ज्ञान असलें पाहिजे. जगाच्या इतिहासांतील कमीजास्त महत्त्वाचे सर्व तपशील माहिती करून घेण्याचें कारण नाहीं; परंतु मानवसमाजाची या जगांत कशीकशी उत्क्रांति होत गेली, तिचे मुख्य टप्पे कोणते, तिच्यांत वेळोवेळीं कोणते विचारप्रवाह प्रगट आणि प्रभावी झाले, या उत्क्रांतीच्या कार्यांत कोणकोणत्या देशांनीं किंवा व्यक्तींनीं कोणकोणत्या वेळीं कामगिरी बजाविली आहे, याचा ठोकळ आराखडा त्याला माहीत असला पाहिजे. हा आराखडा डोळ्यांसमोर असला म्हणजे शिकवीत असलेल्या राष्ट्रीय किंवा प्रादेशिक इतिहासाचें नक्की स्थान आणि महत्त्व काय तें त्याला तारतम्यानें समजूं शकेल. कोणताहि देश केव्हांहि स्वयंपूर्ण आणि बंदिस्त नव्हता. सर्व देशांचे एकमेकांवर भलेबुरे परिणाम घडले आहेत. ही जाणीव जगाच्या इतिहासाच्या व्यासंगानेंच येऊं शकते आणि इतिहासशिक्षकाच्या वृत्तींत योग्य तो संयम व समजूतदारपणा येतो. दुर्दैवानें मराठींत अद्याप नांव घेण्यासारखे जगाचे इतिहास लिहिले गेले नाहींत. इंग्रजी भाषेंत केवळ शिक्षकालाच नव्हे तर माध्यमिक शाळांतील प्रौढ विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशीं या विषया-वरचीं किती तरी पुस्तकें आहेत. प्रत्येक माध्यमिक शाळेच्या ग्रंथालयांत जगाच्या इतिहासाचीं कांहीं निवडक पुस्तकें अवश्य असलीं पाहिजेत आणि मुख्याध्यापका-कडून हीं पुस्तकें वाचलीं जातात याविषयीं खबरदारी घेतली पाहिजे.

जगाच्या इतिहासाप्रमाणें इतिहासशिक्षकानें मानववंशशास्त्राची तोंडओळख करून घेतली पाहिजे. फारशा खोलांत न शिरतां या शास्त्राचा थोडाबहुत



९९८०

अभ्यास प्रत्येक शिक्षकानें केला पाहिजे. मनुष्यप्राण्याचे वेगवेगळे वंश, त्यांचीं लक्षणें आणि भेद, जीवसृष्टीची व त्यांतल्या त्यांत माणसाची पृथ्वीवरील उत्पत्ति आणि उत्क्रांति यांची कल्पना या शास्त्राच्या अध्ययनानें होईल आणि इतिहास-काळांत प्रवेश केला म्हणजे तो काळ प्रागइतिहास काळाच्या मानानें किती तोटका आणि क्षीण आहे याची कल्पना शिक्षकाला येईल. मानववंशशास्त्रावरचीं एक दोन पुस्तकें इतिहासशिक्षकानें अवश्य वाचावीं. निदान ' होम युनिव्हर्सिटी लायब्ररी ' या मालेंतील डॉ. मॅरट यांचें या विषयावरील Anthropology हें छोटेसें पुस्तक प्रत्येक शिक्षकानें अवश्य वाचावें.

आतांपर्यंत ज्ञानावर आणि दृष्टिकोनावर विशेष भर दिला गेला. इतिहास-शिक्षकानें इतिहास कसा शिकवावा, इतिहास कोणत्या पद्धतीनें शिकवावा, कोणतीं साधनें वापरावींत याचा अद्याप विचार झाला नाहीं. अध्यापनाची पद्धत आणि साधनें यांनाहि महत्त्व आहे. पण तें ज्ञानाइतकें आणि शास्त्रीय दृष्टी-इतकें नाहीं. आधीं ज्ञान पाहिजे, शास्त्रीय दृष्टि पाहिजे आणि मग अध्यापनाच्या पद्धतीकडे वळलें पाहिजे. आधीं ज्ञान आणि मग तें मुलांना कसें द्यायचें याचा विचार आणि याचें तंत्र. मला तर कधीं कधीं असें वाटतें, इतिहासशिक्षकाला इतिहासाचें चांगलें ज्ञान (माहिती नव्हे) असलें आणि वर्गांतील मुलांवर त्याचें प्रेम असलें म्हणजे मग त्याच्या हातून पद्धतीच्या बाबतींत फारशा चुका होणार नाहींत. कदाचित् त्याचे हातून कांहीं तांत्रिक दोष घडतील. कदाचित् तो पुरेशीं चित्रें दाखवणार नाहीं; कदाचित् अजीबात दाखवणार नाहीं; कदाचित् फळ्याचा पुरेसा वापर करणार नाहीं; वेळीं प्रसंगीं रंगांत आला तर फळ्याचा बिलकुल वापर करणार नाहीं; कदाचित् रंगांत आल्यावर मुलांना प्रश्न विचारण्याचें विसरून जाईल. पण इतिहास शिकवितांना शिक्षक जर मनापासून रंगला असेल व त्यामुळें वर्गांतील मुलेंहि रंगलीं असतील, विस्कळित माहिती न देतां मुद्देसूद ज्ञान जर तो देत असेल, कार्यकारणभाव, विचारप्रवाह, त्यांचें स्वरूप व दिशा उकलून दाखवीत असेल, आणि हें सर्व जर जिव्हाळ्यानें करीत असेल तर मी त्या शिक्षकाला सात खून माफ करीन.

हें थोडेसें मी रंगूनच लिहिलें आहे. अध्यापनपद्धति व साधनें यांना मी कमी लेखीत नाहीं. त्यांनाहि महत्त्व आहे पण तें दुय्यम आहे; ज्ञानाएवढें

नाहीं हेंच मला सांगावयाचें आहे. ज्ञानाची उणीव नुसत्या अध्यापनपद्धतीनें किंवा साधनांनीं भरून निघेल असें शिक्षकानें कधींहि समजूं नये. आधीं ज्ञान मिळवावें, दृष्टि चोखंदळ ठेवावी आणि मग अवश्य पद्धतींचा आणि साधनांचा परामर्श घ्यावा.

माझी तिसरी अपेक्षा : इतिहास हें शास्त्र आहे हें तत्त्व स्वीकारल्यावर शिक्षकानें वर्गांत शास्त्रज्ञाची भूमिका पतकरली पाहिजे. आणि ती पतकरतांना अवश्य तीं पथ्यें पाळलीं पाहिजेत. त्यानें निःपक्षपात आणि समतोलपणा ह्या दोन शास्त्रीय गुणांना सतत जपलें पाहिजे. पदार्थविज्ञान किंवा रसायन किंवा दुसऱ्या शास्त्रांत निःपक्षपाताचा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण रसायनें, पदार्थ किंवा आकाशस्थ ग्रह यांविषयीं पक्षपात करण्यासारखें कांहीं नसतें. इतिहासाची तशी गोष्ट नाहीं. इतिहास माणसांचा असतो. हीं माणसें विशिष्ट देशांतील, विशिष्ट धर्माचीं, पंथाचीं असतात. शिक्षकहि अर्थात् कोणत्या तरी एका धर्माचा, पंथाचा, मताचा असतो. साहजिकच इतिहास-शिक्षकाची दृष्टि ऐतिहासिक व्यक्तींविषयीं भावनात्मक व पूर्वग्रहदूषित होण्याचा धोका असतो. भावना टाळतां येत नाहींत. त्या अपरिहार्य असतात; त्या टाळण्याचें कारणहि नाहीं; त्यांना सत्याचा आधार असला म्हणजे झालें. या दृष्टीनें शिक्षकानें ऐतिहासिक पुराव्याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. पुरावा अपुरा असल्यास त्यांत स्वतः भर घालूं नये किंवा मुलांनाहि भर घालूं देऊं नये. कोणत्याहि ऐतिहासिक प्रश्नाच्या दोन बाजू या असायच्याच. शिक्षकानें दोन्ही बाजूंचा पुरावा समतोलपणानें मुलांपुढें मांडण्याचा प्रयत्न करावा. हें जरा कठीण आहे. परंतु इतिहास–विषय शास्त्र म्हणून शिकवितांना हा तारेवरचा नाच झोंक जाऊं न देतां केलाच पाहिजे.

भारताच्या इतिहासांत झोंक जाण्याचा धोका फार. मुसलमान आणि इंग्रज यांच्या रियासती शिकवितांना शिक्षकाची दृष्टि पूर्वग्रहदूषित आणि पक्षपाती होण्याचा संभव फार. क्लाईव्हनें घेतलेल्या लांचेचा कटाक्षानें उल्लेख करण्यांत येतो. परंतु एतद्देशीय राज्यकर्ते, सेनापति आणि मुत्सद्दी किती मोठ्या प्रमाणांत लांच खात होते, याचा मात्र निर्देश केला जात नाहीं. ज्या पक्षाविषयीं किंवा व्यक्तीविषयीं सहानुभूति आणि आदर वाटतो त्यांचे विजय गौरविण्याचा आणि

पराभव कमी लेखले जाण्याचा धोका असतो. आपल्या देशांतील राज्यकर्त्यांनीं अलेक्झांडरपासून तों वेल्स्ली, हॅवलॉक रोज् इत्यादि परक्या सेनापतींपर्यंत परक्यांशीं केलेल्या लढायांचीं वर्णनें पाहावीं. 'दुपारपर्यंत आपलीच सरशी होती. नंतर एखादी आकस्मिक घटना झाली, निशाण खालीं पडलें किंवा हत्ती उधळला गेला किंवा विश्वासरावाला गोळी लागली, किंवा फलाणा फलाणा रणांगणांतून सटकला, आणि लढाईचा रंग बदलून आपला पराभव झाला.' अशी पराभवांची "आपलेपणाची" मीमांसा केली जाते.

वास्तविक महत्त्वाच्या लढाया किरकोळ आणि आकस्मिक कारणांमुळें जिंकल्या जात नाहींत किंवा हरल्या जात नाहींत. सैन्याजवळ असलेलीं हत्यारें, सैन्यांतील शिस्त, सेनापतींचें धोरण आणि डावपेंच अशा गोष्टींवरच लढायांचा निर्णय लागत असतो. भारतांतील क्रांतिकारक लढायांचा नीट अभ्यास केला तर असें दिसून येईल कीं बहुतेक लढायांत भारतीयांचीं हत्यारें परक्या सैन्याच्या मानानें जुनींपुराणीं आणि कुचकामाचीं होतीं. आर्थर वेल्स्ली मराठ्यांशीं झालेल्या एका लढाईचें, कांहीं तासांनीं लिहिलेल्या पत्रांत वर्णन करतांना म्हणतो, 'आमच्यासमोर लढाईस आलेल्या बऱ्याच मराठ्यांच्या हातांत नुसत्या गोफणी होत्या.' गोफणींचा मुकाबला तोफा आणि बंदुका यांच्याशीं झाल्यावर निकाल काय लागायचा तें उघडच आहे. हें उदाहरण एवढ्याचसाठीं दिलें कीं इतिहासशिक्षकानें ऐतिहासिक घटनांकडे धार्मिक, राष्ट्रीय किंवा जातीय दृष्टीनें न पाहतां वस्तुनिष्ठ दृष्टीनेंच पाहावें.

इतिहास-शिक्षकानें आपल्या लोकांची लंगडी किंवा दुबळी बाजू, लंगडी किंवा दुबळी नव्हतीच असें सांगूं नये. दुबळी बाजू सांगण्याचें टाळूं नये आणि सांगतांना वकिली डावपेचांनीं तिचें गांभीर्य आणि महत्त्व कमी करूं नये. भूतकाळांत आपल्या पूर्वजांच्या हातून ज्या चुका घडल्या त्या आपल्या हातून घडूं नयेत हें समजण्यासाठीं तर इतिहास शिकायचा आणि शिकवायचा. तेव्हां पूर्वजांच्या हातून घडलेल्या चुकांची सारवासारव करायची म्हणजे इतिहासाच्या एका महत्त्वाच्या उद्दिष्टाला हरताळ फांसण्यासारखेंच होईल. अर्थात् आपल्या इतिहासांतील दुबळी किंवा लंगडी बाजू सांगतांना शिक्षकाची त्याविषयीं आपले-

पणाची दृष्टि अवश्य असावी. आपल्या लोकांच्या हातून चुका झाल्या, आपल्या लोकांनीं द्रोह केला, आळस केला हें त्या त्या वेळीं कळकळीनें सांगितलें पाहिजे आणि पूर्वजांच्या चुकांपासून आपण धडा घेतला पाहिजे, चारित्र्य संपादन केलें पाहिजे ही गोष्ट मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजे.

आपल्या इतिहासांत आपण नुसत्या चुकाच केल्या असें नाहीं. अभिमान वाटावा अशा आपल्या इतिहासांत किती तरी गोष्टी आहेत. त्या गोष्टीहि शिक्षकांनीं आपलेपणानें व सहृदयतेनें मुलांना सांगितल्या पाहिजेत. इतिहास-शिक्षणांत भावनांना, देशाभिमानाला स्थान आहे तें असें. सत्याचा बळकट पाया असल्यावर त्यावर भावनांची भव्य इमारत खुशाल रचावी. मुलांच्या भावना समृद्ध करण्यासाठीं खोटेंच लिहिलें किंवा सांगितलें पाहिजे असें नाहीं. **सत्यांत स्वतःचें असें सामर्थ्य असतें.** आणि त्याचा उपयोग चतुर शिक्षकाला अनुकूल भावनांचा परिपोष करण्यासाठीं खात्रीनें करतां येतो.

माझी चौथी अपेक्षा : अध्यापनाची पद्धति. इतिहासाच्या अध्यापनाच्या अशा कांहीं विशिष्ट पद्धति आहेत. इतिहासशिक्षकानें त्या समजून घेतल्या पाहिजेत. अध्यापनाच्या पद्धति आणि साधनें यांच्यांत कांहीं गूढ रहस्य आहे असें शिक्षकानें समजूं नये. पद्धतीकडे आणि साधनांकडे त्यानें स्वाभाविक रीतीनेंच पाहावें आणि स्वाभाविक रीतीनेंच त्यांचा वापर करावा. पद्धत म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या शिक्षकांना प्रत्यक्ष काम करीत असतांना सांपडलेला मार्ग म्हणजेच पद्धत. **पद्धत म्हणजे गुरुमंत्र नाहीं किंवा न चुकतां आचरण्याचें आन्हिक नाहीं.** पूर्वी होऊन गेलेल्या शिक्षकांना कांहीं विशिष्ट रीतीनें शिकविलें म्हणजे यश मिळतें असें दिसून आलें आणि आपल्या भल्याकरितां ते तसें सांगून गेले एवढाच पद्धतीचा अर्थ घ्यावा. कोणतीहि अध्यापनाची पद्धत शैक्षणिक मानसशास्त्रावर आधारलेली असते. आणि तिची मध्यवर्ती कल्पना वर्गांत शिक्षक आणि शिक्षित यांच्यांत सहकार्य झालें पाहिजे हीच असते. अध्यापनांत विद्यार्थी सक्रिय सहभागी असले पाहिजेत. आणि ज्या पद्धतीनें आणि साधनांनीं शिक्षकाला विद्यार्थ्यांचें सहकार्य सफलतेनें लाभतें त्यांचा त्यानें अवश्य उपयोग करावा. म्हणजे शिक्षकाचें मुख्य लक्ष पद्धतीकडे किंवा साधनांकडे असूं नये. त्यांचा वर्गांत मुलांच्या मनावर काय परिणाम होतो याकडे असावें. अपेक्षित परिणाम होत नाहीं असें

दिसून आल्यास ती पद्धत टाकावी किंवा तिच्यांत बदल करावा. शैक्षणिक मानसशास्त्र सांगतें, "तुम्हीच नुसतें सांगत सुटूं नका. मुलांना प्रश्न विचारा. त्यांच्याकडून काम घ्या." ही सूचना सामान्यतः योग्य आहे. परंतु इतिहास शिकवितांना असे कांहीं मजेदार भावनानुकूल प्रसंग येतात कीं तेव्हां जातिवंत शिक्षकानें स्वतःच सांगितलें पाहिजे. अशा प्रसंगीं केवळ तंत्र सांभाळण्यासाठीं प्रश्न विचारणें, फळा वापरणें किंवा चित्र दाखवणें हा गुन्हा ठरेल. या तांत्रिक खबरदारीमुळें रसहानि होईल आणि अध्यापनाचें उद्दिष्टहि सफल होणार नाहीं.

सारांश, पद्धत हें केवळ साधन आहे, साध्य नाहीं, हें शिक्षकानें लक्षांत ठेवलें पाहिजे. शिवाय ज्ञानाची उणीव पद्धत केव्हांहि भरून काढणार नाहीं हेंहि त्यानें विसरूं नये. ही खबरदारी घेतल्यावर योग्य त्या पद्धतींचा व साधनांचा शिक्षकानें अवश्य उपयोग करावा, मुलांकडे सारखी नजर ठेवावी आणि आपल्या अध्यापनांत 'प्रयोगाच्या सोईसाठीं' वेळोवेळीं अवश्य ते फेरफार करावेत.

## प्रकरण बारावें

# इतिहासाचें पाठ्यपुस्तक

इतिहासाचें पाठ्यपुस्तक लिहिणें फार जोखमीचें काम आहे. तें काम जाणत्या माणसांनींच केलें पाहिजे. वास्तविक पाहिलें तर पाठ्यपुस्तकापेक्षां शिक्षक हा केव्हांहि अधिक महत्त्वाचा समजला पाहिजे. शिक्षक जर ज्ञानी, कल्पक आणि प्रेमळ असेल तर पाठ्यपुस्तक हें त्याच्या हातांतील केवळ एक साधन होऊन राहील. यापेक्षां त्याला विशेष महत्त्व नाहीं. ज्ञानी आणि कल्पक शिक्षक पाठ्यपुस्तकांतील उणीवा सहज भरून काढील. परंतु दुर्दैवानें असे शिक्षक कमी असतात. आमच्या प्राथमिक शिक्षकांचें शिक्षण प्राथमिक सात इयत्ता किंवा फार तर माध्यमिक शालान्त परीक्षा येथ-पर्यंत झालेलें असतें. एवढ्या शिक्षणानें इतिहासाचें पुरेसें आणि भरपूर ज्ञान मिळेलच असें नाहीं. माध्यमिक शाळांत, इतिहास घेऊन पदवी मिळविलेल्या शिक्षकांकडेच इतिहास शिकविण्याचें काम येईल याची खात्री देतां येत नाहीं. ऱ्याच शाळांत शिक्षकाला पुरेसें काम देण्यासाठीं इतिहास किंवा कॉपी वगैरे विषय देण्यांत येतात. अशा परिस्थितींत इतिहासशिक्षकापासून फारशी अपेक्षा करणें चुकीचें होईल. म्हणून शिक्षक प्राथमिक असो किंवा माध्यमिक असो, त्याच्या हातांत शक्य तेवढें चांगलें पाठ्यपुस्तक देणें हें आपल्या देशाच्या सध्याच्या शैक्षणिक परिस्थितीमध्यें अवश्य झालें आहे.

आपण काळजीपूर्वक सर्वांगसुंदर असा अभ्यासक्रम तयार केला आणि त्या अभ्यासक्रमावर योग्य अशीं पाठ्यपुस्तकें नसलीं तर त्याचा काडीमात्र उपयोग होणार नाहीं. आपल्या देशाच्या परिस्थितींत शिक्षकापेक्षां आणि अधिकृत अभ्यासक्रमापेक्षां पाठ्यपुस्तकाला दुर्दैवानें अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे. हें

बरें नाहीं. परंतु जशी परिस्थिति असेल तसें वागलें पाहिजे आणि पुढचा मार्ग काढला पाहिजे. पाठ्यपुस्तक इतकें महत्त्वाचें झालें आहे कीं काय शिकवायचें आणि कसें शिकवायचें हेंसुद्धां त्या पाठ्यपुस्तकाच्या बरेंवाईटपणावर अवलंबून आहे. कारण आपली अध्यापनपद्धति बऱ्याच अंशीं पाठ्यपुस्तकावर अवलंबून आहे. आपला सामान्य शिक्षक इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांत जें जें लिहिलें आहे त्याची फोड करून सांगतो. जें लिहिलें नाहीं त्याच्या वाटेस जात नाहीं. पुष्कळ शिक्षक इतिहासाचें पाठ्यपुस्तक भाषाविषयाच्या पाठ्यपुस्तकासारखें शिकवितात. कठीण शब्दांचे व वाक्यांचे अर्थ सांगावे, फार झालें तर कांहीं संदर्भांचें स्पष्टीकरण करावें, सन पाठ करून घ्यावेत, ऐतिहासिक व्यक्तींची तुलना करावी आणि तीहि पाठ करून घ्यावी, असाच प्रकार पुष्कळ शाळांत आढळतो. आमचें सध्याचें शिक्षण केवळ पुस्तकी आहे असा आरोप नेहमीं केला जातो. इतिहासाच्या बाबतींत हा आरोप बहुतांशीं खरा आहे.

कांहीं देशांत पाठ्यपुस्तक मुलांच्याकरितां लिहिलें जात नाहीं. तें केवळ शिक्षकाच्या उपयोगासाठीं असतें. तें केवळ सारांशासारखें असतें आणि म्हणून त्याचीं पानें फार थोडीं असतात. फळ्यावर आपण पाठांचें संक्षिप्त टांचण लिहितों त्याच प्रकारचीं हीं टांचणवजा पुस्तकें (manuals) असतात. उद्यां जर अशीं पुस्तकें आपल्या देशांत तयार झालीं आणि अशीं बत्तीस छत्तीस पानांचीं पुस्तकें इतिहासशिक्षकाच्या हातीं देऊन त्याला इतिहास शिकविण्यास सांगितलें तर आपत्ति कोसळेल. कारण पुस्तकांत नुसता आराखडा, नुसतें टांचण असणार. शिक्षकाला सर्व माहिती, सर्व तपशील आपल्या डोक्यांतून काढावा लागेल आणि त्यासाठीं अनेक मोठमोठीं पुस्तकें वाचावीं लागतील. मला कधीं कधीं वाटतें हा प्रयोग आपण अवश्य करून पाहण्यासारखा आहे. अशीं त्रोटक पुस्तकें हातांत असलीं तर इतिहास-शिक्षकाला इतिहासाचा व्यासंग ठेवावा लागेल, ग्रंथालयांत बराच काळ घालवावा लागेल, खूप चिंतन करावें लागेल आणि प्रत्येक पाठाची कसून तयारी करावी लागेल.

ही कल्पना आकर्षक असली आणि निवडक शाळांत प्रयोगादाखल तिचा वापर करण्यासारखा असला तरी सामान्यतः पाठ्यपुस्तक, मग तें कोणत्या कां विषयाचें असेना, मुलांच्यासाठीं असतें, शिक्षकांसाठीं नाहीं, ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. त्या दृष्टीनेंच पाठ्यपुस्तकाचा

आपण विचार केला पाहिजे. पाठ्यपुस्तक हें मुलांनीं वापरायचें असतें. मुलांनीं तें घरून वाचून आलें पाहिजे, वर्गांत वाचलें पाहिजे आणि वर्गांत जो भाग झाला असेल त्याची घरीं जाऊन उजळणी केली पाहिजे. याप्रमाणें पुस्तकाचा उपयोग झाला पाहिजे.

मुलांनीं आपल्या पायावर उभे राहून इतिहासाच्या पुस्तकाचा सर्व प्रकारें उपयोग करावा या दृष्टीनेंच इतिहासाचें पाठ्यपुस्तक लिहिलें गेलें पाहिजे. अशा पुस्तकांत काय असावें आणि काय नसावें याचा विवेक केला गेला पाहिजे. **पहिली गोष्ट म्हणजे पाठ्यपुस्तकाची भाषा.** शिक्षकाच्या मदतीवांचून मुलांना पाठ्यपुस्तक समजलें पाहिजे आणि आवडलें पाहिजे. पुस्तक समजलें पाहिजे म्हणजे त्याची भाषा **सोपी** असली पाहिजे. पुस्तक आवडलें पाहिजे म्हणजे त्याची भाषा **आकर्षक** असली पाहिजे. आपलीं बरींच पाठ्यपुस्तकें सोपीं नसतात आणि आकर्षकहि नसतात. कांहीं सोपीं असतात पण त्यांच्यांत वाङ्मयीन गुण नसतात. भाषेची शैली म्हणून जिला म्हणतात ती आढळून येत नाहीं आणि म्हणून तीं पुस्तकें आकर्षक होत नाहींत. पाठ्यपुस्तक लिहिणाऱ्या लेखकापाशीं वाङ्मयीन गुण अवश्य असले पाहिजेत. आणि त्याशिवाय शैक्षणिक मानसशास्त्रांत त्याची चांगली गति पाहिजे. पुस्तक लिहिण्यापूर्वीं त्याच्या डोळ्यांसमोर तें पुस्तक वापरणारीं असंख्य मुलें उभीं राहिलीं पाहिजेत. या मुलांचा चांगला परिचय करून घेतल्यावरच त्यानें पुस्तक लिहिलें पाहिजे. लेखकानें ज्या मुलांसाठीं किंवा ज्या वर्गासाठीं पुस्तक लिहावयाचें त्या वर्गांतील मुलांचें वय काय असतें, त्या वयांत त्या मुलांचें मन कसें असतें, त्यांच्या मनांत कशा प्रकारचा शब्दसंग्रह तयार झालेला असतो आणि कशा प्रकारचे विचार व कल्पना रुजलेल्या असतात, यांचें नीट ज्ञान करून घेतलें पाहिजे.

भाषेच्या आणि विचारांच्या दृष्टीनें बरींच पाठ्यपुस्तकें सदोष असतात. जे शब्द आणि विचार त्या वर्गांतील मुलांच्या आवाक्याबाहेरचे असतात त्यांचा पाठ्यपुस्तकांत सर्रास उपयोग केला जातो. लेखक एखादा विचार व्यक्त करण्यासाठीं एखादा कठीण संस्कृत शब्द लिहून जातो. कधीं कधीं तर थोडक्यांत लिहिण्याचा मोह झाल्यामुळें तो संस्कृतप्रचुर सामासिक शब्दांचा वापर करतो. माध्यमिक शाळांतील वरच्या वर्गांतील मुलांसाठीं लिहिलेल्या पाठ्यपुस्तकांत

अशी शब्दरचना चालेल. परंतु सात इयत्तांपर्यंत पाठ्यपुस्तकाची भाषा शक्य तेवढी सोपी व सुबोध पाहिजे. प्रचारांत नसलेले संस्कृत शब्द टाळले पाहिजेत. सामाजिक शब्द तर कटाक्षानें वर्ज्य केले पाहिजेत. उदाहरणार्थ, चौथ्या इयत्तेच्या दहा वर्षांच्या मुलांसाठीं लिहिलेल्या इतिहासपुस्तकांत "स्वराज्यसंकल्पक शहाजी" अशी भाषा असतां कामा नये. स्वराज्य आणि संकल्प हे दोन्हीहि शब्द आणि त्यांच्या पाठीमागें दडून बसलेले विचार मुलांना त्या वयांत अपरिचित असतात. स्वराज्य शब्द वापरावाच लागेल. परंतु तो वापरल्यावर त्याचा खुलासेवजा अर्थ पुस्तकांत मुलांना समजेल असा दिला पाहिजे. लहान मुलांच्या पाठ्यपुस्तकांत भाषा ओघवती पाहिजे. तोच विचार किंवा कल्पना वेगवेगळ्या वाक्यांत पग्त घोळून सांगितली तर ती लहान मुलांना नीट समजेल. पुनरुक्ति हा मुलांच्या पाठ्यपुस्तकांच्या बाबतींत दोष नाहीं, गुण आहे.

शब्दांपेक्षां विचारांना अधिक महत्व आहे. कांहीं वेळां आपण सोपे शब्द वापरतों परंतु ते शब्द जे विचार आणि कल्पना व्यक्त करतात त्या कठीण, आड-वळणी आणि अपरिचित असूं शकतात, मुलांच्या अनुभवाच्या परिसराच्या बाहेरच्या असूं शकतात. तेव्हां नुसती भाषाच सोपी असून भागायचें नाहीं. विचारसुद्धां सोपे आणि अनुभवांतले असले पाहिजेत. तुकारामबोवांनीं 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा' असें अगदीं सोपें लिहिलें, पण या ओळीचा अर्थ किती गहन आहे! एवढें पथ्य सांभाळलें म्हणजे मुलांना पुस्तक समजेल पण तें आवडेलच ही हमी देतां येत नाहीं.

पुस्तक आवडण्यासाठीं त्याची शैली मोहक आणि चटकदार पाहिजे. त्याच्यांत मजेदार आणि चपखल वर्णनें पाहिजेत. त्यांच्यांत वर्णन केलेल्या व्यक्ति लेखकानें आपल्या प्रतिभेनें त्या वयाच्या मुलांच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभ्या केल्या पाहिजेत. नाहीं तर त्या ऐतिहासिक व्यक्ति म्हणजे पाठ करायचीं तेवढीं विशेष-नामें यापलीकडे मुलांच्या मनांत त्या व्यक्तीविषयीं जाणीव किंवा चित्राकृति उभी राहणार नाहीं. जेथें जाणीव नाहीं तेथें सहानुभूति येऊं शकत नाहीं आणि भावनात्मक प्रतिक्रिया होऊं शकत नाहीं. याचा अर्थ एवढाच कीं **शालेय पुस्तक सुद्धां लघुकथा किंवा कादंबरीसारखें चटकदार झालें पाहिजे.**

आतां थोडेसें खोलांत शिरूं. इतिहासाच्या अध्यापनांत आणि लेखनांत काय सांगायचें किंवा काय लिहायचें याच्यापेक्षां काय सांगायचें नाहीं किंवा काय

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि: ........

लिहायचें नाहीं याची विशेष खबरदारी घेतली पाहिजे. म्हणजे इतिहासाच्या अध्यापनांत आणि लेखनांत ' **निवड** ' फार महत्त्वाची समजली पाहिजे. मुलांना सांगण्यासाठीं कोणत्या ऐतिहासिक घटना निवडायच्या आणि कोणत्या वगळायच्या याचें तारतम्य कसोशीनें पाळलें पाहिजे. तसें पाहूं गेलें तर ऐतिहासिक कालखंडांत किती तरी व्यक्ति होऊन गेलेल्या असतात. अनेक राजे गादीवर येतात आणि जातात. अनेक युद्धें होतात, अनेक तह होतात, इतर अनेक घटना घडतात. या सर्व घटना एखाद्या खानेसुमारीच्या गणतीदाराप्रमाणें इतिहास-लेखक नमूद करूं लागल्यास अनर्थ होईल. त्यानें लिहिलेलें पाठ्यपुस्तक एक भलें मोठें, असंख्य लहानमोठ्या वृक्षांचें दंडकारण्य होईल आणि त्या निबिड दंडकारण्यांत शिक्षक आणि मुलें नापत्ता होतील.

यासाठीं इतिहासलेखकाला नुसतें भाषेचें ज्ञान असून चालायचें नाहीं; नुसती चांगली शैली असून चालायचें नाहीं: त्याला अवश्य त्या ऐतिहासिक घटनांची निवड करण्याइतकी **कल्पकता व विवेक** असला पाहिजे. आपण दहा अकरा वर्षांच्या मुलांसाठीं पुस्तक लिहीत आहों. या पुस्तकांत हजार किंवा दीड हजार वर्षांचा कालखंड अभिप्रेत आहे. या एवढ्या कालखंडांत जो इतिहास घडला असेल त्यांतील या विशिष्ट वयाच्या मुलांना किती गोष्टी सांगायच्या आणि किती सोडून द्यायच्या याचा लेखकानें नीट विचार केला पाहिजे. कांहीं ऐतिहासिक घटनांना इतिहासांत महत्त्व असतें. परंतु त्या घटना अशा प्रकारच्या असतात कीं त्यांचें स्वरूप, अर्थ आणि अभिप्राय मुलांच्या आवाक्याबाहेरचा असतो. आणि म्हणून त्या घटनांना तेथें स्थान देतां कामा नये. प्रौढ वयाच्या मुलांसाठीं लिहिलेल्या पुस्तकांत त्या घटनांचा समावेश होऊं शकेल.

निवड करतांना दुसरी एक खबरदारी घ्यावी लागते. कालखंड मोठा असला म्हणजे त्यांत पुष्कळच घटना होऊन गेलेल्या असतात. त्या महत्त्वाच्या असतात आणि मुलांना समजण्यासारख्याहि असतात. परंतु त्यांच्यांतहि निवड केली पाहिजे. मोहाला बळी पडून शक्य तितक्या जास्ती घटना किंवा गोष्टी यांची निवड करण्याऐवजीं शक्य तितक्या कमी, बेताच्या आणि माफक अशा गोष्टींची निवड शालेय पुस्तकांत केली पाहिजे. पुष्कळ लेखक नेमके याच खड्ड्यांत पडतात. त्यांना इतिहासाची पुष्कळ माहिती असते, पुष्कळ घटना ठाऊक असतात. सव्वाशे-दीडशें पानांत पुस्तक संपवायचें असतें; कारण

थोड्या किमतींत पुस्तक विकायचें असतें. हे लेखक या सव्वाशें दीडशें पानांत असंख्य घटना खच्चून भरतात. थोड्या पानांत पुष्कळ घटना लिहावयाच्या म्हणजे अर्थात् गर्दी होते, घटनांच्यांत धक्काबुक्की होते. कोणत्याहि घटनेला नीट ऐसपैस जागा मिळत नाहीं आणि त्यामुळें त्या घटनेची मुलांना यथार्थ जाण होत नाहीं.

घटनेला पाठ्यपुस्तकांत ऐसपैस जागा देणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. मुलांना त्या घटनेचें यथार्थ आकलन व्हावें, तिचें महत्त्व कळावें, तिचे मागेपुढें पसरलेले धागेदोरे लक्षांत यावेत यांसाठीं प्रत्येक घटनेला पुस्तकांत ऐसपैस जागा दिली पाहिजे. एका वाक्यांत सांगायचें झाल्यास मी असें म्हणेन, **इतिहासाच्या पाठ्य-पुस्तकांत शक्य तितक्या बेताच्या घटनांची किंवा गोष्टींची निवड करावी आणि निवडलेली प्रत्येक घटना शक्य तितक्या अघळपघळपणें खुलवून मुलांच्या समोर मांडावी.** म्हणजे घटना वेंचक आणि प्रत्येक घटनेचा तपशील ऐसपैस अशी व्यवस्था लेखनांत आणि अध्यापनांत व्हावयास हवी. प्रत्येक घटना मुलांच्या डोळ्यांसमोर जिवंत उभी राहिली पाहिजे. ती तशी उभी राहण्यासाठीं तिच्या वास्तूचें म्हणजे भौगोलिक पार्श्वभूमीचें आणि वस्तुस्थितीचें यथार्थ चित्र रंगविलें पाहिजे. व्यक्तींचे चेहरे दिसले पाहिजेत. त्यांच्या स्वभावांतील बारकावे, त्यांची रीतभात, त्यांचे गुणदोष कुशलतेनें रंगविले पाहिजेत. आणि कलेची ही साधना करतांना पूर्वीच्या एका प्रकरणांत सांगितल्या-प्रमाणें ऐतिहासिक सत्याचा अधिक्षेप होतां कामा नये.

घटनेला ऐसपैस जागा द्यायची म्हणजे तिच्या भोंवतालचे बारीकसारीक तपशील मार्मिक रीतीनें, कलात्मक पद्धतीनें रंगवून खुलवून सांगायचे. पुस्तक वाचून झाल्यावर कांहीं काळानें मुलें कांहीं तपशील विसरून जातील आणि **त्यांनीं तो विसरून जावा अशीच आपण अपेक्षा ठेवली पाहिजे.** मात्र तपशीलवार खुलवून सांगितलेली कोणतीहि घटना मुलें सहसा कधीं विसरणार नाहींत हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. कांहीं तपशील गळून जाईल; परंतु सर्व तपशीलानें मिळून घट्ट आवळून ठेवलेल्या घटनेचा विसर होणार नाहीं. हें मानसशास्त्रांतलें एक सत्य आहे.

कांहीं घटना किंवा बाबी अशा असतात कीं त्यांना तपशील नसतो. उदाहरणार्थ, सन ही एक ऐतिहासिक बाब (fact) आहे. इतिहासांत येणारीं व्यक्तींचीं आणि स्थळांचीं सर्व विशेषनामें यासुद्धां अशाच ऐतिहासिक बाबी

आहेत. पूर्वी सांगितलेल्या सिद्धान्ताप्रमाणें अशा गोष्टींची माफक निवड केली पाहिजे. म्हणजे इतिहासाच्या पुस्तकांत **शक्य तितकीं कमी विशेषनामें आणि शक्य तितक्या कमी तारखा**– असल्या पाहिजेत. लहान मुलांसाठीं लिहावयाच्या पाठ्यपुस्तकांत तीस बत्तीस तारखा असल्या म्हणजे पुष्कळ झालें. डोक्यावरून पाणी गेलें. इंग्लंडमध्यें शाळाखात्यानें इंग्लंडच्या दोन हजार वर्षांच्या इतिहासांत महत्त्वाच्या अशा २४–२५ तारखांची यादी तयार केली आहे. आपल्यालाहि भारताच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाच्या आणि निवडक अशा तारखांची यादी करतां येईल. होतांहोईलतों संख्या यापेक्षां अधिक नसावी.

जी तारखांची तीच **विशेषनामांची** स्थिति. मुलाला प्रत्येक तारखेप्रमाणें प्रत्येक विशेषनाम पाठ करायचें असतें. निदान आपली तशी अपेक्षा असते. भरमसाट व्यक्तींचीं विशेषनामें पुस्तकांत समाविष्ट केल्यास कोणाच व्यक्तीला विशेष महत्त्व मिळणार नाहीं. ती केवळ सामान्यांची गर्दी होईल. मुलांच्या मनांवर कांहीं ठळक ऐतिहासिक व्यक्तींचे संस्कार घडावे अशीच आपली इच्छा असली पाहिजे. यासाठीं अगदीं निवडक अशाच व्यक्तींचीं नांवें पाठ्यपुस्तकांत असावींत. प्रत्येक राजघराण्यांतील राज्यकर्त्यांचें नांव घेण्याचें कारण नाहीं. वॉरन हेस्टिंग्जपासून माउंटबॅटनपर्यंतच्या सर्व राजप्रतिनिधींची लांबलचक यादी पुस्तकांत देण्याचें कारण नाहीं. ज्या ब्रिटिश राज्यप्रतिनिधींनीं भारतांत विशेष कामगिरी बजावली असेल अशांचाच नामनिर्देश पुस्तकांत करावा. पुष्कळ लेखक कटाक्षानें एकामागून एक येणाऱ्या सर्व गव्हर्नर जनरलांचीं नांवें आणि कारकीर्द सांगत सुटतात. त्याऐवजीं त्या गव्हर्नर जनरलपेक्षांहि महत्त्वाचें ऐतिहासिक कार्य केलेल्या राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, दादाभाई नौरोजी, जमशेटजी टाटा, न्यायमूर्ति रानडे, ज्योतिराव फुले, लोकहितवादी, टिळक आणि आगरकर, मेथा आणि गोखले, महर्षि कर्वे अशा महनीय भारतीयांचीं नांवें आणि कार्य आपल्या पाठ्यपुस्तकांत प्रामुख्यानें पण कालक्रमानें अवश्य आलीं पाहिजेत.

या सर्व विवेचनावरून इतिहासाचें पुस्तक लिहिणें किती जबाबदारीचें आहे हें दिसून येईल. इतिहासलेखकाला **ज्ञान** पाहिजे, **कल्पकता** पाहिजे, **प्रतिभा** पाहिजे आणि या सर्वांपेक्षां **बालमानसशास्त्राची जाणीव** पाहिजे.

●●●

## प्रकरण तेरावें

# इतिहासाची प्रयोगशाळा

शाळेंत इतिहासाचा असा वेगळा वर्ग, म्हणजे खोली असावी. खरें सांगायचें म्हणजे बहुतेक सर्व विषयांच्या वेगळ्या खोल्या असाव्यात. सर्वांची सोय करणें शक्य नसतें. तेव्हां दोन, क्वचित् तीन विषयांचा एकत्र संसार थाटून द्यावा हें योग्य. वेगळा संसार म्हटला म्हणजे भांडींकुंडीं वेगळीं निराळीं, सामानसुमान वेगळें आणि निराळें आलेंच. मात्र असे वेगवेगळे संसार थाटून देतांना लक्षांत ठेवलें पाहिजे कीं वांटणी करून देत असलों तरी सारे विषय एकमेकांचे भाऊ भाऊ आहेत. एकाच कुळींतले, एकाच दशकांतले आहेत. कांहींजण इतरांपेक्षां परस्परांना अधिक जवळ असतील आणि त्यांचे संबंध अधिक जिव्हाळ्याचे असतील. इतिहास-भूगोलाचा एकमेकांशीं गणित व शास्त्रापेक्षां अधिक जिव्हाळा असेल. तरी ते सर्व परस्परावलंबित आहेत, हें आपण विसरूं नये. संसार वेगळे केले तरी त्या त्या विषयांनीं शेजारधर्म पाळावेत, वेळीं प्रसंगीं एकमेकाच्या मदतीला धावावें हें योग्य आहे. एका विषयाचें कोठें अडलें तर दुसऱ्या विषयानें त्याला मदत करावी व गाडा चालू करावा. परस्परांविषयीं जिव्हाळा आणि सहकार्य ठेवूनसुद्धां प्रत्येकाचा संसार वेगळा आहे व त्याला तो वेगळ्या रीतीनें चालवूं देणेंच योग्य आहे हें कधीं विसरूं नये.

'इतिहासासाठीं वेगळी खोली कशाला पाहिजे ?' माझ्या या प्रश्नाला उत्तर असें आहे : इतिहासाची वेगळी खोली असली म्हणजे तिच्यांत इतिहासास अनुकूल असें वेगळें वातावरण निर्माण होतें. निदान शिक्षकास तसें वातावरण निर्माण करणें सुलभ जातें व मग शिक्षक आणि विद्यार्थी खोलींत प्रवेश केल्यावर त्या

वातावरणानें भारले जातात, त्याला वश होतात व त्यांचीं मनें इतिहासाकडे विशिष्ट दृष्टीनें झुकतात. शिवाय शिक्षकांना व विद्यार्थ्यांना इतिहास या विषया-बद्दल योग्य तो आदर व महत्त्व वाटतें आणि त्यांचें इतिहासाचें अध्ययन-अध्यापन सर्व प्रकारें **सुलभ** व **सोईस्कर** होतें.

विद्यार्थ्यांनीं इतिहासाचा अभ्यास करतांना कितीतरी गोष्टी केल्या पाहिजेत. त्यांनीं खूप वाचलें पाहिजे, चर्चा केली पाहिजे, चिंतन केलें पाहिजे. त्यांनीं वेगवेगळ्या पुस्तकांतून हवे ते संदर्भ हुडकून काढले पाहिजेत, वेगवेगळ्या पुस्तकांतून पुरावे, दाखले शोधून काढले पाहिजेत. एकाच घटनेचा निरनिराळ्या लेखकांनीं कसा परामर्श घेतला आहे याची तुलना करावयास शिकलें पाहिजे. इतिहासाच्या अस्सल साधनांची अवश्य तेव्हां मदत घेतली पाहिजे. चित्रें, नकाशे, आलेख यांचा योग्य वेळीं उपयोग केला पाहिजे. अवांतर पुस्तकें वाचलीं पाहिजेत. शिवाय इतिहास शिकतांना कालक्रमाची जाणीव करून घेतली पाहिजे.

याप्रमाणें इतिहासाचा अभ्यास करावयाचा म्हणजे सुसज्ज अशी वेगळी खोली पाहिजेच. शिक्षकालासुद्धां अशी खोली फार सोईस्कर वाटेल. एकाच खोलींत अनेक विषय शिकविले जात असले म्हणजे कधीं कधीं अडचण उत्पन्न होते व काम नीट होत नाहीं. शिक्षकाला आयत्या वेळीं एखादें पुस्तक, चित्र किंवा नकाशा पाहिजे असला तर मुलाला तें आणण्यास पाठवावें लागतें व मुलगा परत येईपर्यंत खोळंबा होतो. कधीं कधीं मुलाला जें पाहिजे तें सांपडत नाहीं व तो तसाच येतो. कधीं कधीं हवें असलेलें पुस्तक, चित्र किंवा इतर साधन हाताशीं नसलें म्हणजे शिक्षक त्याचा उपयोग करण्याचें आळसामुळें टाळतो. शिक्षकानें चांगली तयारी करून आपल्याला हवीं तीं साधनें बरोबर आणावीं, हें योग्यच आहे. परंतु शिकवतांना असे प्रसंग येतात कीं एखाद्या पुस्तकांतला उतारा वाचून दाखवावा, एखादें चित्र दाखवावें, असा विचार जाणत्या शिक्षकाच्या मनांत येतो. अशा वेळीं हीं साधनें हाताशीं असलीं पाहिजेत. तेव्हां शिक्षकाच्या दृष्टीनेंहि वेगळी खोली अवश्य आहे.

## इतिहासाची खोली कशी तयार करावी ?

( अ ) पहिली गोष्ट म्हणजे या खोलींत शिक्षकांस आणि विद्यार्थ्यांस

अवश्य त्या पुस्तकांचें एक **छोटेसें ग्रंथालय** असावें. या ग्रंथालयांत दोघांनाहि उपयोगी पडतील अशींच पुस्तकें असावींत. क्वचित् प्रसंगीं उपयोगीं पडणारीं अशीं मोठमोठीं पुस्तकें या ग्रंथालयांत ठेवण्याचें कारण नाहीं. अशीं पुस्तकें शाळेच्या सामान्य ग्रंथालयांतच असावींत. या छोट्या ग्रंथालयांत शिक्षकांसाठीं संदर्भांचीं पुस्तकें, साधन-पुस्तकें ( Source–books ) आणि इतिहासावरील नामांकित लेखकांनीं लिहिलेलीं अव्वल दर्जाचीं निवडक पुस्तकें असावींत. त्यांत एखादुसरा जगाचा इतिहास, भारताचे आणि भारतांतील प्रदेशांचे निवडक इतिहास, इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रांचे इतिहास असावेत. याशिवाय वेगवेगळीं पाठ्यपुस्तकेंहि असावींत. मुलांसाठीं अवांतर वाचनाचीं नाना प्रकारचीं ऐतिहासिक पुस्तकें, वेगवेगळीं पाठ्यपुस्तकें, ऐतिहासिक चित्रांचीं पुस्तकें, ऐतिहासिक व्यक्तींचे चरित्रग्रंथ असावेत. मुलांना उपयुक्त अशीं साधनपुस्तकें मिळाल्यास त्यांचाहि समावेश या ग्रंथालयांत करावा. सध्यां महाराष्ट्राच्या इतिहासासाठीं विद्यार्थ्यांस उपयुक्त असें श्री. दत्तोपंत आपटे आणि प्रा. ओतूरकर यांनीं संपादन केलेलें, ‘ साधन–परिचय ’ अथवा “ महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास ( १६२४–१८५९ ) ” हें एकमेव साधन पुस्तक आहे. याशिवाय शं. दा. चितळे व प्रा ओतुरकर यांनीं संपादिलेलें “ हिंदुस्थानचा साधनरूप इतिहास ” हें पुस्तक भारताच्या इतिहासाच्या साधनांचा परिचय करून देण्यास उपयुक्त आहे.

( ब ) इतिहासाच्या खोलींत **चित्रांचा भरपूर संग्रह** असावा आणि त्यांत मुलांनीं आणि शिक्षकांनीं भर टाकीत जावी. भिंतीवर टांगण्याचीं ऐतिहासिक व्यक्तींचीं आणि विशेषतः प्रसंगांचीं निवडक चित्रें असावींत. यांतील कांहीं चित्रें भिंतीवर टांगावींत, कांहीं संग्रहांत ठेवावींत आणि **मधूनमधून भिंतीवरील चित्रांत बदल करीत जावें**. तींच तींच चित्रें वर्षोगणती धूळ खात भिंतीवर ठेवूं नयेत. या मोठ्या चित्रांशिवाय लहान आकाराचीं ऐतिहासिक चित्रें संग्रहांत ठेवावींत. नवीन चित्रें घेतलीं म्हणजे तीं कांहीं दिवस मुलांना पाहण्यासाठीं भिंतीवर किंवा योग्य ठिकाणीं ठेवावींत. या चित्रांची वर्गवारी करावी आणि त्यांचा योग्य वेळीं उपयोग करावा. मुलांना मासिकें किंवा साप्ताहिकें यांच्यांतील चित्रें कातरून आल्बममध्यें त्यांचे संग्रह करण्याची संवय लावावी.

(क) इतिहासाच्या खोलींत **पृथ्वीचा गोल** अवश्य असावा. त्याचप्रमाणें ऐतिहासिक **नकाशे** आणि **आराखडे** असावेत. नुसते देशांचे किंवा प्रदेशांचेच नकाशे असूं नयेत. महत्त्वाच्या लढायांचेसुद्धां नकाशे असावेत. ते उपलब्ध नसल्यास शिक्षकानें ते तयार करावेत.

(ड) कालक्रमाची जाणीव करून देण्यासाठीं इतिहासाच्या खोलींत नाना प्रकारच्या **कालरेषा, कालाचे आलेख** असावेत. हे अर्थात् मुलांच्या मदतीनें शिक्षकालाच करावे लागतील. या विषयाचा एका स्वतंत्र प्रकरणांत विचार केला आहे तेथें अधिक खुलासा मिळेल. येथें महत्त्वाच्या कालक्रमाच्या साधनांचा फक्त निर्देश करतों. इतिहासाच्या खोलीच्या दोन किंवा तीन भिंतींवर मुलांना बसल्या बसल्या सहज दिसूं शकेल इतक्या उंचीवर तीन किंवा चार बोटें रुंदीची एक पट्टी रंगवावी. या पट्टीला इंग्रजींत Runnig frieze असें म्हणतात. या धावत्या रेषेची तपशीलवार माहिती 'काळाची जाण' या प्रकरणांत पुढें दिली आहे. ही **आडवी धांवती कालरेषा** नेहमीं डोळ्यांसमोर असली म्हणजे जगाच्या इतिहासाचा प्रवाह कसा वाहत गेला आहे आणि त्या त्या वेळीं आपल्या देशाची काय स्थिति होती याची मुलांना कल्पना येईल.

कालक्रम समजण्याचें दुसरें साधन म्हणजे एकेकट्या किंवा तुलनात्मक अनेक अशा **सरळ उभ्या कालरेषा**. तुलनात्मक रेषा जास्त उपयुक्त होतील. या रेषा सारख्याच लांबीच्या असाव्यात आणि त्यांचे शतकें किंवा सहस्रकें दाखविणारे सारखे भाग पाडावेत. बॅबिलोन, ईजिप्त, भारत, चीन, ग्रीस, रोम, इंग्लंड आणि अमेरिका या देशांचा कालक्रम-इतिहास दाखविणाऱ्या रेषा फार उद्बोधक होतील. बॅबिलोन, ईजिप्त, भारत हे प्राचीन देश कालरेषेच्या आरंभाला भरभराटीला आलेले दिसतील. त्यांच्यांत घटनांची गर्दी दिसेल; तर इंग्लंड–अमेरिकासारख्या नवीन राष्ट्रांच्या शेजारच्या रेषा त्या कालांत रिकाम्या असतील. कारण त्या देशांचा इतिहास त्या वेळेस सुरू झाला नव्हता. उलट कांहीं जुने देश इतिहासाच्या रंगभूमीवरून नाहींसे झालेले आढळतील आणि त्यावेळीं कांहीं नवे देश पुढें आलेले दिसून येतील. अशा तुलनात्मक कालरेषा वर्गांत डोळ्यांसमोर असल्या म्हणजे मुलांच्या मनावर अजाणतां कालप्रवाहाची आणि त्याच्या स्थित्यंतरांची जाणीव ठसेल.

आणखी किती तरी सांगण्यासारखें आहे. बोलून चालून इतिहासाचा संसार थाटायचा. संसारच तो. त्याला काय लागेल आणि काय नाहीं याची गणती कशी करायची? हा संसार एकदोन वर्षांत थोडाच थाटला जाणार आहे? शिक्षक हौशी असला आणि त्यानें मुलांच्या मनांत इतिहासाविषयीं हौस निर्माण केली म्हणजे हळूहळू संसार थाटला जाईल आणि वेळोवेळीं त्यांत भरहि पडेल. पैशापेक्षां हौसच या बाबतींत महत्त्वाची ठरेल. रसायनशास्त्र आणि पदार्थविज्ञानशास्त्र यांसाठीं आपण जशी जागरूकपणें प्रयोगशाळा तयार करतों तशीच इतिहासाची ही प्रयोगशाळा आहे असें समजावें आणि तिची तयारी करावी.

● ● ●

## प्रकरण चौदावें

# काळाची जाण

काळ ही एक अजब वस्तु आहे. तिला आदि नाहीं, अंत नाहीं. आपण कोणीच नव्हतों, तेव्हां काळ होता. आपण कोणीहि नसूं, तेव्हांहि काळ असेल. जीवसृष्टि नव्हती, वनस्पति नव्हत्या, किंबहुना पृथ्वी व हें सूर्यमंडळ नव्हतें, तेव्हां काळ होता.

पण आपण थोडेसें आपलपोटे आहोंत. आपण माणसांनीं – जीवांनीं – वनस्पतींनीं जन्म घेण्यापूर्वीं जो काळ होता, त्याच्याशीं आपल्याला कर्तव्य नाहीं. त्याच्याशीं आपलें नातें नाहीं, सोईरसुतक नाहीं. तो काळ पोकळ होता, रिकामा होता, जीवनरसानें भरलेला नव्हता; वांझ होता. अशा वांझ काळाची आपल्याला कल्पना करवत नाहीं. आपण जाणूं शकतों तो काळ पृथ्वीवर जीवन हलूं, चालूं, वाढूं लागल्यावरचा. जीवन धडपडूं लागलें, गुदमरूं लागलें, चालू लागलें, धावूं लागलें, आपला वारसा ठेवून जाऊं लागलें. हा जीवनाचा अप्रतिहत प्रवाह सुरू झाला तेव्हांच काळाची कूस फळाला आली आणि आपण त्याची जाण ठेवूं लागलों, हिशेब ठेवूं लागलों. त्याच्या मुक्कामाच्या टप्प्या-टप्प्याची नोंद ठेवूं लागलों. कारण ते टप्पे आपल्या जीवनयात्रेचे होते. काळ साक्षी होता, मोजायची फूटपट्टी होता, मैलाचा दगड होता. पण जीवन कांहींच नसते तर काळानें मोजलें असतें काय? मैलाचा दगड बसवण्यापूर्वीं मैलोगणती पसरलेली जमीन पाहिजे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे काळ हें एक मोजमाप आहे आणि आपल्या जीवनाचें, करणीचें तें मोजमाप आहे. जीवन मुख्य, काळ त्याचा टाइमकीपर.

या दृष्टीनें कालाचा इतिहासाशीं फार जवळचा संबंध आहे. इतिहास **काळांत** घडत असतो, **काळामधून** प्रवाहित असतो. काळ इतिहासाचें मोजमाप घेत असतो. काळाची जाण नसती तर पूर्वी जें जें घडलें तें तें सर्व एक अगडबंब, अस्पष्ट, अंधुक भूतकाळाच्या अडगळीच्या खोलींत घडलें, असें झालें असतें. मग व्यास, राम, कृष्ण, बुद्ध, अशोक, समुद्रगुप्त, हर्ष, अकबर, शिवाजी सारे एकाच अडगळींत बसले असते. त्यांच्यांत कांहींच **अंतर** नसतें. त्यांच्यांत परस्परांत किती अंतर आहे आणि आपणापासून त्यांचें किती अंतर आहे हें काळ आपल्याला सांगतो.

**काळाची जाण तीन प्रकारची** असते. (अ) काळामधलें विशिष्ट **स्थान** (location) (ब) काळाची **मुदत** (duration) आणि (क) काळांतील **अंतरें** (distance). काळाविषयीं बोलतांना अवकाशवाचक शब्द वापरावे लागतात. त्याला निरुपाय आहे. अवकाश (space) डोळ्यांना दिसतो. काळ दिसत नाहीं. म्हणून एकाची ओळख दुसऱ्याच्या मार्फत करून द्यावी लागते.

(अ) काळांतील विशिष्ट स्थान म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. अमकी अमकी गोष्ट अमक्या अमक्या वेळीं ( विशिष्ट स्थान ) झाली हें सांगायचें. शिवाजीमहाराज १६३० त जन्मले. औरंगझेब १७०७ मध्यें वारला. १६३० व १७०७ हीं दोन काळप्रवाहांतील विशिष्ट स्थानें.

आपण काळाच्या प्रवाहांतील हीं विशिष्ट स्थानें मुलांना नेहमींच सांगत असतों आणि पाठ करून घेतों. प्रत्येक भल्याबुऱ्या ऐतिहासिक घटनेच्या डोक्यावर सालाची चिठ्ठी डकवल्याखेरीज आपल्याला अन्न गोड लागत नाहीं. आपण याबाबत संयम पाळीत नाहीं, तारतम्य समजत नाहीं. सब घोडे बारा टक्के. साऱ्याच व्यक्तींना व घटनांना तारखा द्यावयाच्या म्हणजे कोणाच व्यक्तीला किंवा घटनेला महत्त्व राहत नाहीं.

आपण महत्त्वाचे निवडक असेच थोडे सन वापरले पाहिजेत. थोडे असल्यामुळें ते मुलांच्या लक्षांत राहतील. त्यांना त्यांचें महत्त्व जाणवेल. परंतु नुसते सन सांगून भागायचें नाहीं. सन म्हणजे कालाच्या प्रवाहांतला एक बिंदु आहे. त्याला **अभिप्राय** नाहीं. त्या सनाची मागच्या पुढच्या सनांशीं सांगड

घातली पाहिजे, त्यांचें अंतर स्पष्ट केलें पाहिजे, आपल्यापासून त्या बिंदूवर स्थित असलेली व्यक्ति किंवा घटना किती अंतरावर आहे हें दाखवलें पाहिजे. त्या एकाकी बिंदूला काळाच्या गोफांत गुंफलें पाहिजे म्हणजे त्याला अर्थ मिळेल व त्याचें महत्त्व कळेल. या प्रकरणाच्या शेवटीं आपल्या देशाच्या इतिहासांतील महत्त्वाच्या तारखा निवडल्या आहेत. या यादींत थोडाफार बदल करतां येईल. पण यादी याप्रमाणें आटोपशीर ठेवावी हें बरें.

आपण पाहिलें कीं नुसता सन म्हणजे कालसागरांतला एक बिन्दु. त्याला **आगा ना पीछा.** त्याला आकार नाहीं. अभिप्राय ( Significance ) नाहीं. जेव्हां आपण त्या बिन्दूचे संबंध इतर बिंदूंशीं आणि आपल्याशीं जोडतों तेव्हांच तो साभिप्राय होतो. मुलांना आपण सन पाठ करायला सांगतों तेव्हां हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं **नुसत्या सनांमुळें कालज्ञान होत नाहीं.** सन हा एक मैलाचा दगड. त्या मैलाच्या दगडाला केव्हां अर्थ येतो ? जेव्हां त्याच्या मागें कांहीं मैलांचे दगड गेले असतील आणि पुढें कांहीं येणार असतील तेव्हांच. आपण पटकन् म्हणतों, " एकशें बारावा मैल आला बरं का ! " त्या दगडानें ११२ वा मैल दाखवला तो त्याच्यामागें तसे १११ दगड होते म्हणून. समजा, मागेंपुढें मैलाच्या खुणा नाहींत आणि नुसताच तो दगड उभा असता तर आपल्याला कालज्ञान झालें नसतें. एवंच, सनांचा उपयोग कालज्ञानासाठीं होत नाहीं तर त्यांच्या मदतीनें कालाविषयींचे जे संबंध आपण जुळवतों त्यामुळें तें ज्ञान होत असतें.

हे संबंध दोन प्रकारचे आहेत हें वर सांगितलेंच आहे. एखादी घटना घडण्यास किती **अवधि** लागला हें एक महत्त्वाचें काललक्षण आहे. बौद्ध धर्म भारतांत सुमारें हजार वर्षें नांदत होता. हजार वर्षें हा बौद्ध धर्माचा भारताच्या इतिहासांतील अवधि. इस्लामचें भारतावर ५–६ शें वर्षें राज्य होतें. मराठेशाही जेमतेम दीडशें वर्षें टिकली. त्याच्या उलट रोमन साम्राज्य हजार वर्षांवर टिकलें. काशी ( Kassite ) लोकांनीं बॅबिलोनवर सातशें वर्षें राज्य केलें. आपल्या राजघराण्यांच्या मुदती अशाच तोटक्या आहेत. हें तुलनात्मक कालज्ञान कोणत्या घटना, कोणत्या राजवटी, कोणत्या व्यक्ती किती अवधीपर्यंत टिकल्या हें समजल्यानें होतें. आणि त्यामुळें इतिहासाचा एक नवाच अर्थबोध होतो.

दुसरें महत्त्वाचें काललक्षण म्हणजे **अंतराचें.** ऐतिहासिक घटनांत आणि व्यक्तींत एकमेकांपासून किती अंतर आहे, त्याचप्रमाणें तीं सारीं आपल्या वर्तमानकाळापासून किती अंतरावर आहेत हें समजून घेणें मोठें उद्‌बोधक होईल. या काललक्षणाच्या अभावीं साऱ्याच ऐतिहासिक घटना आणि व्यक्ति एकाच भूतकाळाच्या अंधारकोठडींत पडून राहतील. त्यांना त्यांचें योग्य स्थान मिळणार नाहीं. आणि तसें स्थान न मिळाल्यामुळें त्यांचा ऐतिहासिक अभिप्राय स्पष्ट होणार नाहीं. शिवाजीमहाराज आपल्यापासून पावणेतीनशें वर्षांच्या अंतरावरच आहेत. त्याच्या उलट हर्ष आपल्यापासून तेराशें वर्षें दूर आहे. आणि शिवाजीमहाराजांपासून हजार वर्षें दूर आहे. म्हणजे ठोकळमानानें सांगायचें झाल्यास शिवाजीमहाराज आपल्या पंक्तीला बसतील व हर्ष आणि त्याच्याहिपेक्षां समुद्रगुप्त, यांची पंगत बरीच दूर असेल. अलेक्झांडर तर हर्ष आपल्याला जितका दूर तितकाच जवळ जवळ हर्षाला दूर. ही मोठी गंमत आहे नाहीं का ?

हा नुसता बेरीज-वजाबाकीचाच खेळ आहे काय ? ऐतिहासिक व्यक्ति आणि घटना यांच्या परस्परांपासूनच्या अंतरांची मोजदाद आपल्याला कांहीं विशेष ऐतिहासिक सत्य सांगते काय ? विचार केल्यास आढळून येईल कीं या अंतरांच्या तुलनेनें पुष्कळच बोध होतो. अमकी व्यक्ति आपल्यापासून इतकी दूर आहे आणि अमकी इतकी जवळ आहे हें समजल्यावर त्यांचा असा अर्थ घ्यावयाचा कीं जी व्यक्ति पुष्कळ दूर आहे तिच्या आणि आपल्या दरम्यानच्या काळांत पुष्कळच इतिहास घडला आहे, जीवनप्रवाह वाहत गेला आहे. त्यावेळचें जीवन आजच्या जीवनापेक्षां पुष्कळच भिन्न असलें पाहिजे. आजच्या जीवनावरून त्या वेळच्या जीवनचें अनुमान करूं नये. एखादी व्यक्ति कालक्रमानें आपल्या बरीचशी जवळ असल्यास तिच्या आपल्यामध्यें सांस्कृतिक अंतरहि फारसें नसावें, तिचें आपलें सांस्कृतिक जीवन बरेचसें जवळचें आणि जुळतें असलें पाहिजे असा निष्कर्ष काढतां येईल. अर्थात् हा निष्कर्ष कांहीं मर्यादेपर्यंतच बरोबर ठरेल.

आतां आपण वर्गांत प्रवेश करूं आणि वर उल्लेखिलेलें कालज्ञान मुलांना कसें देतां येईल याचा विचार करूं. मुलांना नुसतें सन सांगून भागत नाहीं हें आपण पाहिलें. अनेक सनांची मिळून कांहीं तरी एक जुळवणी, गुंफण, शक्य

झाल्यास चित्राकृति केली तर मुलांना महत्त्वाच्या घटना आणि व्यक्ति यांच्यामधील अंतर, अवधि सहज समजूं शकेल. कालज्ञानासाठीं सामान्यतः दोन प्रकारचीं साधनें उपयोगांत आणतात. सोपें आणि सुटसुटीत साधन म्हणजे कालरेषा आणि त्यापेक्षां थोडें वरच्या दर्जाचें साधन म्हणजे आलेख. कालरेषा आणि आलेख यांचेहि दोन प्रकार संभवतात. पहिला प्रकार म्हणजे सुट्या एकेकट्या कालरेषा किंवा त्याच प्रकारचे आलेख. आणि दुसरा प्रकार म्हणजे अनेक **तुलनात्मक कालरेषा** किंवा **आलेख.**

**कालरेषा :** सन एकामागून एक येतात आणि जातात. कारण काळाचा प्रवाहच तसा एकमार्गी आहे. सनांचे परस्परसंबंध मुलांना समजण्यासाठीं त्यांना एका रेषेंत आणले पाहिजेत आणि त्या सर्वांचें मुलांना निरीक्षण करावयास लावलें पाहिजे. म्हणजे एका विशिष्ट मर्यादेंत एखादी राजवट, एखादी कारकीर्द किंवा एखादी घटना यांचा अवधि आणि परस्परांतील अंतरें मुलांना समजतील; यासाठीं दहा इंच लांबीची एक रेषा कागदावर उभी काढावी. ही एक रेघ म्हणजे एक शतक असें मानावें. तिचे दहा सारखे भाग केले म्हणजे प्रत्येक भाग दहा वर्षांची मर्यादा दाखवील. समजा, ही कालरेषा १६०० ते १७०० या शतकाची मानल्यास १६१०, १६२०, १६३० असे आंकडे आपण पाडलेल्या सारख्या भागांच्या खुणांवर खालपासून वरपर्यंत लिहावे. हे आंकडे रेषेच्या डाव्या बाजूस लिहावे. आणि उजव्या बाजूस योग्य ठिकाणीं ज्या घटना नमूद करावयाच्या असतील त्या आणि त्यांचे सन लिहावेत. या घटना निवडक आणि थोड्याच असाव्या. नाहींतर मुलांचा गोंधळ होईल.

ही कालरेषा एका शतकाऐवजीं एक सहस्रक किंवा दशसहस्रकसुद्धां व्यक्त करील, किंवा अर्ध शतकहि दाखवूं शकेल. तिची लांबीसुद्धां आपल्या सोईप्रमाणें घ्यावी. जशी जागा असेल त्या मानानें तिची लांबी घ्यावी. मात्र ती फार लहान नसावी. वर्गांत जी कालरेषा उपयोगांत आणायची ती फळ्यावर खडूनें निदान २–३ फूट लांबीची अशी काढावी. रेषेची लांबी किती कां असेना; तिचे जे भाग पाडायचे (ते दहाच असले पाहिजेत असेंहि नाहीं) ते सारखे असले पाहिजेत आणि जे सन नमूद करायचे त्यांची संख्या फार असतां कामा नये.

या कालरेषा, ज्याप्रमाणें एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीच्या जीवनयात्रा दाखवूं

शकतील त्याप्रमाणें एखाद्या राष्ट्राचा किंवा जगाचा हजार, दोन हजार, दहा हजार वर्षांचा कालावधीहि व्यक्त करूं शकतील. शिवछत्रपति, अकबर, औरंगजेब यांच्या जीवनरेषा वर सांगितल्याप्रमाणें काढतां येतील आणि त्यांत त्यांच्या जीवनांतील विशेष प्रसंगांचे सन उजव्या बाजूस दाखवतां येतील. इतकेंच नव्हे तर ऐतिहासिक व्यक्ति किंवा राजवटी बऱ्याचशा समकालीन असल्या तर एकाऐवजीं दोन किंवा तीन उभ्या कालरेषा एकापुढें एक काढल्यास त्यांचा तुलनेला फार उपयोग होईल आणि परीक्षेच्या वेळीं झालेल्या अभ्यासाची उजळणी करण्यासहि मदत होईल. उदाहरणार्थ, सतराव्या शतकांत शिवछत्रपति आणि औरंगजेब समकालीन होते. दोघांच्या कालरेषा समोरासमोर ठेवल्या आणि त्यांतील महत्त्वाचे सन त्या त्या रेषेवर दाखविले तर दोघांची तुलना करणें सोपें जाईल. इतकेंच नव्हे तर सतराव्या शतकांत फ्रान्समध्यें चौदावा लुई होता, इंग्लंडमध्यें स्टुअर्ट घराणें होतें. तेव्हां शिवछत्रपति आणि औरंगजेब यांच्या कालरेषेपुढें तुलनेसाठीं यूरपची सतराव्या शतकाची कालरेषा दाखवावी. कांहीं मजेदार ऐतिहासिक गोष्टींवर त्यामुळें प्रकाश पडेल. यूरपखंडांत या शतकांत लोकशाही सरंजामशाहीशीं आणि राजांशीं झुंज खेळत होती; एका राजाचा लोकांनीं शिरच्छेद केला; दुसऱ्याला पिटाळून लावलें; तिसऱ्या परक्या राजाला आपल्या मर्जीप्रमाणें गादीवर बसविलें; अशा प्रकारें या शतकांत लोकशाही बाळसें घेत असतांना भारतांत मात्र ‘ नः विष्णुः पृथिवीपतिः ’ असा न्याय होता. दुसरी एक गंमत सांगतों. इकडे शिवछत्रपतींनीं आपण राजे झालों अशी घोषणा केली, त्याच सालीं पॅरिसमध्यें उच्च दर्जाचीं संगीतप्रधान नाटकें करण्यासाठीं ऑपेरा हाऊस बांधलें गेलें. शिवछत्रपति गेले, भोसल्यांची राजवट गेली, पेशवे गेले, त्यांच्यामागून आलेले इंग्रज गेले. परंतु अजून पॅरिसच्या ऑपेरा हाऊसमध्यें खंड न पडतां नाटकें चालू आहेत ! हा तेथील संस्कृतीचा मोठा विजय आहे. हें थोडें विषयांतर झालें पण ही गंमत केव्हां तरी मला तुम्हांला सांगायची होती.

आपण लहान मुलांना रामायण-महाभारतांतल्या गोष्टी, भगवान् बुद्ध आणि अशोकाच्या गोष्टी सांगत असलों तर त्यावेळींहि कालरेषा उपयोगी पडेल. फळ्यावर तीनचार फूट लांबीची रेषा काढली, तिचे सारखे भाग पाडले

आणि या तयार रेषेंत उजव्या बाजूस राम, कौरव-पांडवांचें युद्ध, बुद्ध, अशोक, समुद्रगुप्त यांचा निश्चित किंवा अंदाजी काळ मांडला तर कोणतें दृश्य दिसेल ? राम कालरेषेच्या जवळ जवळ डोक्यावर बसेल. कृष्ण आणि पांडव त्यांच्याखालीं कांहीं अंतरावर स्थानापन्न होतील आणि बुद्ध, अशोक व समुद्रगुप्त हे या दोघांच्या पुष्कळच खालीं, रेषेच्या तळाशीं एकमेकांचा शेजार करून बसलेले आढळतील. अशा कालरेषेंत जर आणखी शिवछत्रपतींची भर घातली तर त्यांना वरील भूतकाळांतील व्यक्तींजवळ स्थान उरणार नाहीं. ते आधुनिकांत येतील आणि राममोहन रॉय, रानडे, गांधी यांच्याबरोबर खुर्चीवर बसतील. भूतकाळांतील टप्पे दाखविण्यास अशा कालरेषेचा किती उपयोग होईल हें आतां विशेष सांगण्यास नको.

कालरेषांचा उपयोग अनेक प्रकारें होत असतो. आपल्या भारताच्या इतिहासाच्या दृष्टीनें सांगायचें तर कनिष्क, समुद्रगुप्त, हर्ष, अक्बर, शिवाजी, औरंगजेब इत्यादि पुरुषांच्या राजवटी, बौद्ध आणि वर्णाश्रमधर्मांचे उदय व अस्त; पठाण, मोगल, राजपूत, मराठे, शीख, इंग्रज यांचे उदय व अस्त; इंग्रजी शिक्षणाचा भारतांतील उदय व विकास ( आणि अस्त ? ), राजकीय अधिकारप्राप्तीचा टप्प्याटप्प्यानें झालेला लाभ, अशा अनेक गोष्टी कालरेषांनीं स्पष्ट होतील. अशा नाना प्रकारच्या कालरेषा शिक्षकानें तयार कराव्यात आणि कांहीं निवडक रेषा भिंतीवर लावाव्यात. मुलांनाहि अशा रेषा काढण्यास सांगावें. त्यांनीं कांहीं रेषा काढल्यावर त्यांना हेतु समजेल. मग एखादी राजवट संपल्यावर त्यांना तिच्याविषयीं कालरेषा घरून तयार करण्यास सांगावें. अशा अभ्यासानें त्यांना महत्त्वाचे सन निवडतां येतील व वेगवेगळ्या रेषांची तुलना करतां येईल.

**आडवी कालरेषा :–** इंग्रजींत हिला frieze म्हणतात. ही फळ्यावर काढायची नसते. वर्गाच्या तिन्ही बाजूंच्या भिंतीवर जमिनीपासून तीनचार फूट अंतरावर मुलांना सहज डोळ्यांसमोर दिसेल अशा उंचीवर काढावी. तिची रुंदी दोन तीन बोटें असावी. भिंतीच्या रंगापेक्षां वेगळ्या रंगानें ती काढावी. लाल, शेंदरी, निळा रंग उत्तम. तो डोळ्यांत भरतो. या लांबलचक रेषेचे सारखे भाग पाडावेत. सबंध रेषा तीन हजार वर्षांचा इतिहासकाळ दाखवील. मोहेंजो-दडोपासून इतिहास मोजायचा असल्यास ( तो आतां तसा मोजावा लागणार ) रेषा पांच हजार वर्षांची असावी. प्रत्येक भाग शंभराचा म्हटल्यास पन्नास भाग होतील

व गर्दी होईल. त्यापेक्षां दोनशेचा एक एक भाग धरावा व दोन दोन शतकांचे आंकडे या आडव्या रेषेच्या खालीं प्रत्येक भागाच्या खुणेच्या खालीं लिहावेत. रेषेच्या वर योग्य ठिकाणीं महत्त्वाच्या व्यक्ति व घटना यांचीं नांवें व सन किंवा शतक लिहावें. वर्गांत इतिहासाचा अभ्यास ज्या टप्प्यापर्यंत आला असेल त्या टप्प्यावर या आडव्या कालरेषेवर छोटेसें कागदी किंवा कापडी निशाण खोवावें. म्हणजे मुलांना आपण कोठपर्यंत आलों व पुढें कोठें जावयाचें याची कल्पना येईल.

**आलेख :**— कालज्ञानाचें दुसरें साधन म्हणजे आलेख. आलेखांत वर्षें दाखवणारी आडवी कालरेषा असते आणि तिच्या डाव्या टोकाला डोक्यावर एक उभी रेघ काढतात. या रेघेवर ज्या गोष्टीचा चढ-उतार दाखवायचा असतो तिची संख्येंत नोंद केलेली असते. उदाहरणार्थ, समजा, दहा वर्षांत एखाद्या शहरांत किंवा देशांत किती माणसें दरसाल जन्मलीं व दरसाल किती मेलीं, याचा आलेख काढायचा असल्यास आडव्या रेषेवर एकपासून दहापर्यन्त वर्षें लिहावीं. हीच मोजदाद शंभर वर्षांची असल्यास आडव्या रेषेचे दशकें दाखविणारे सारखे दहा भाग करावेत. म्हणजे कालरेषेचे जसे भाग पाडतात म्हणून पूर्वी सांगितलें तसेच येथेंहि करायचे. उभ्या रेषेचे असेच सारखे भाग पाडून तिच्यावर जन्ममरणाच्या चढत्या आकड्यांची नोंद करायची. मग दरसाल जन्मलेल्यांचे व मेलेल्यांचे जे आकडे उपलब्ध असतील ते आकडे उभ्या रेघेनें सुचविलेल्या नोंदींत जेथें बसतील तेथें नुसतीं टिंबें द्यावींत. शेवटीं दहाहि टिंबें एकमेकांना जोडावीं म्हणजे खालींवर झुकणारी अशी एक रेघ तयार होईल. हाच आलेख. समजा हा आलेख जन्मांचा आहे. मृत्यूंचा आलेख असाच काढावा. दोन्ही आलेख एकाच कागदावर व एकाच मुदतीचे असले म्हणजे त्या कालावधींत त्या शहरांत किंवा देशांत जन्ममृत्यूंमध्यें परस्परसंबंध कसे राहिले तें चटकन् दिसेल. इतिहासाच्या आलेखांत जन्ममृत्यूंसारखे आकडे नसतात. समजा, मोगलांचें, मराठ्यांचें किंवा इंग्रजांचें राज्य **किती** वाढत व कमी होत गेलें, हें चौरस मैलांत सांगणें शक्य होणार नाहीं. मराठशाहीला उतरती कळा लागली, ती संख्येनें कशी दाखवायची ? अशा प्रसंगीं कल्पकता वापरून अंदाजच करावे लागतात. त्याला उपाय नाहीं.

असे गणिती आलेख लहान मुलांना समजणार नाहींत. पुष्कळ प्रौढांना देखील ते वाचतां येत नाहींत. लहान मुलांसाठीं चित्ररूप आलेख तयार केले

पाहिजेत. पंचवीस वर्षांपूर्वी मीं ' मराठशाहीचा डोंगर ' या नांवाचा चित्राकृति आलेख तयार केला. तो मुलांना फार आवडला. आपण पायथ्यापासून डोंगर चढतों, चढतां चढतां अशा उंचीवर येतों कीं जेथें लहान मोठें पठार असतें. तेथें चढ नाहीं आणि उतारहि नाहीं. पठार संपल्यावर परत चढ लागतो नाहींतर उतारसुद्धां. असा चढ–उतार व पठारांचा मार्ग आक्रमीत आपण अखेरीस शिखरावर येऊन पोहोंचतों. तेथून उतार लागतो. मध्यें पठारहि लागेल. मध्यें एखाद् दुसरी चढणहि लागेल, पण आपण खालीं उतरत असतों व शेवटीं दुसऱ्या बाजूच्या पायथ्याशीं येऊन पोहोंचतों. राजवटींचें अगदीं असेंच असतें. भरभराट असते, राज्य वाढतें (चढण) तसेंच टिकतें (पठार); कधीं कांहीं भाग हातचा जातो ( उतार ); शेवटीं भरभराटीचें शिखर येतें व मग अधःपात सुरू होतो; कधीं सावकाश पण बहुधा झपाट्यानें. या दृष्टीनें खालीं दिलेला " हा मराठशाहीचा डोंगर पहा " आणि लहान मुलांसाठीं असे किंवा दुसऱ्या प्रकारचे चित्राकृति आलेख तयार करा.

मराठशाहीचा डोंगर




## मराठशाहीचा डोंगर

तुलनात्मक आलेखांचा उपयोग आपल्यासारख्या मोठ्या देशाच्या इतिहासाला अवश्य आहे. पूर्वी आपल्या देशांत एकाच वेळीं अनेक राजवटी नांदत असत. हर्ष उत्तरेचा सम्राट झाला तर त्याच वेळीं दक्षिणापथांत पुलकेशी. आपलें लक्ष

उत्तरेच्या इतिहासांत गुंतलेलें असतें. दक्षिणेंत पराक्रमी विद्वान राजे झाले, त्यांनीं अंदमान बेटें, मलाया, सिंगापूर इत्यादि मुलुख समुद्रमार्गानें जाऊन जिंकले व साम्राज्यें स्थापन केलीं. कित्येकांनीं अत्यंत सुंदर अशीं मंदिरें व गोपुरें बांधलीं आणि विद्येस व वाङ्मयास उत्तेजन दिलें. याची आपण दखल घेत नाहीं. उत्तरेच्या राजांची नामावळी जशी आपण घेतों, तशी शालिवाहन, पुलकेशी, राष्ट्रकूट गोविंद सिंघण यादव, महमद गावान, कृष्णदेवराय, मलिक (मलिक = सरदार) अंबर, अशांची नामावळी आपल्यासमोर नसते. दर खेपेस उत्तर-दक्षिणचे आलेख दिले तर मुलांच्या मनांत दोन्हींचें महत्त्व सारखेंच ठसेल.

## परिशिष्ट

## भारताच्या इतिहासांतील महत्त्वाचे सन

| | |
|---|---|
| १ खिस्तपूर्व सुमारें २४००–२१०० (प्रो. व्हीलरनी प्रमाणें) | मोहेंजोदडोः सिंधु संस्कृति |
| २ खि. पू. सुमारें २०००–१४०० | आर्यांचें आगमन. वैदिक काल |
| ३ खि. पू. सुमारें १४००–८०० | आर्यांच्या गंगाखोऱ्यांत वसाहती |
| ४ खि. पू. सुमारें ७०० | पाणिनी |
| ५ खि. पू. ५४३ | बुद्धाचा मृत्यु |
| ६ खि. पूर्व ३२६ | अलेक्झांडरची स्वारी |
| ७ खि. पूर्व ३२५ | भारतसम्राट चंद्रगुप्त मौर्य |
| ८ खि. पूर्व २६९ | अशोक–राज्याभिषेक |
| ९ इसवी सन ३३० | समुद्रगुप्त |
| १० ,, ,, ३७५ | चंद्रगुप्त विक्रमादित्य (कालिदासाचा आश्रयदाता) |
| ११ इ. स. ६०६ | हर्ष–राज्याभिषेक |
| १२ ,, ,, ७१२ | मीर कासिमची सिंधवर स्वारी |
| १३ ,, ,, ८२० | श्रीशंकराचार्यांचा मृत्यु |
| १४ ,, ,, १००१ | गझनीच्या महमुदाची पहिली स्वारी |

## महत्त्वाचे सन

| | | |
|---|---|---|
| १५ | इसवी सन ११९२ | पृथ्वीराज व घोरी : थानेसरचें युद्ध |
| १६ | ,, ,, १२९४ | अल्लाउद्दिन देवगिरी घेतो. मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश |
| १७ | ,, ,, १४६९ | नानकाचा जन्म |
| १८ | ,, ,, १५२६ | बाबर व लोदी : पानपतचें २ रें युद्ध |
| १९ | ,, ,, १५६५ | तालिकोटचें युद्ध |
| २० | ,, ,, १५६५–१६०५ | अक्बर |
| २१ | ,, ,, १६३० | शिवाजीचा जन्म |
| २२ | ,, ,, १७०७ | औरंगझेबाचा मृत्यु |
| २३ | ,, ,, १७६० | वांदिवाशची लढाई: फ्रेंच सत्तेचा शेवट |
| २४ | ,, ,, १७६१ | मराठे व गिलचे : पानपत ३ रें युद्ध मराठशाहीचा ऱ्हास |
| २५ | ,, ,, १८३५ | मेकॉलेचें मिनिट : इंग्रजी शिक्षण |
| २६ | ,, ,, १८५७ | इंग्रज सत्तेविरुद्ध उठाव |
| २७ | ,, ,, १८८५ | राष्ट्रीय सभेचा जन्म |
| २८ | ,, ,, १९०५ | वंग – भंग : राजकारणांतील चढाऊ धोरणाला सुरुवात |
| २९ | ,, ,, १९१४–१८ | पहिलें महायुद्ध |
| ३० | ,, ,, १९३५ | गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कायदा |
| ३१ | ,, ,, १९३९–४५ | दुसरें महायुद्ध |
| ३२ | ,, ,, १५ ऑगस्ट १९४७ | स्वातंत्र्य |
| ३३ | ,, ,, १९५० | प्रजासत्ताकाचा जन्म |

● ● ●

## प्रकरण पंधरावें

# ऐतिहासिक साधनांचा उपयोग

काळ हा एकमार्गी रस्ता आहे, असें एका लेखकानें म्हटलें आहे. तुम्हांला या रस्त्यानें जातां येतें, परंतु परततां येत नाहीं. इतिहासाची त्यामुळें मोठी गैरसोय झाली. तो या रस्त्यानें गेला आणि नापत्ता झाला. त्याला परत वळून आपल्याकडे येण्याची सोय नाहीं. परंतु सीतामाईनें रावणाबरोबर जातांना रामाला तपास करण्यास मदत व्हावी म्हणून ठिकठिकाणीं आपले दागिने फेकून दिले. इतिहासानेंहि तसेंच केलें आहे. काळ सारखा पुढें पुढें घेऊन जात असतांना त्यानें दर मुक्कामावर आपल्या खाणाखुणा ठेवून दिल्या आहेत. त्यांनाच आपण **ऐतिहासिक साधनें** म्हणतों.

अलीकडच्या भूतकाळांतील साधनें विपुल आहेत व तीं सर्व लेखी आहेत. परंतु भूतकाळांत मागें मागें जावें तशी साधनसंपत्ति विरळ होत जाते आणि काडीच्या आधारावर इतिहासकाराला माडी रचावी लागते. त्यांतच त्याच्या प्रतिभेचें सामर्थ्य व कल्पनाचातुर्य दिसून येत असतें.

साधनांच्या प्रकारांच्या दृष्टीनें इतिहासाचे दोन खंड पडतात. ज्या कालखंडांत विटा, ताम्रपट, शिलालेख, चामड्यावरचे आणि हाडावरचे लेख, कागदावर लिहिलेले लेख असे कोणत्या ना कोणत्या प्रकारचे **लेख उपलब्ध असतात त्याला ऐतिहासिक काळ म्हणतात.** त्याच्या पाठीमागचा विस्तीर्ण कालखंड— जो लाखों वर्षांइतका मोठा असतो — त्याला **प्रागैतिहासिक काळ** म्हणतात. प्रागैतिहासिक म्हणजे इतिहासापूर्वीचा. या काळांत कोणत्याहि प्रकारचे लेख लिहिले गेलेले नसतात.

माणसांना लेखनकला अवगत नव्हती किंवा ती अवगत झाली असून तिचा त्यांनीं फारसा उपयोग केला नव्हता अशा काळचीं इतिहाससाधनें अनेक असतात.

उदाहरणार्थ, त्या काळच्या माणसांचे आणि त्यांनीं पाळलेल्या जनावरांच्या हाडांचे सांगाडे, किंवा फुटकळ हाडें, त्या काळचीं घरें किंवा त्यांचे चौथरे, त्या काळचीं माणसें राहात असलेल्या गांवांची रचना, रस्ते, विहिरी, गटारें, देवळें, सार्वजनिक इमारती यांचे अवशेष; माणसांचीं हत्यारें आणि अवजारें; मुलांचीं मातीचीं खेळणीं, दागदागिने ( वस्त्रें उपयोगांत येण्यापूर्वी दागिने उपयोगांत आले हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. )

सर्वांत विपुल प्राचीन साधनें म्हणजे त्या त्या वेळचीं भांडींकुंडीं. धातूंचा शोध लागण्यापूर्वी सारा मडक्यांचा आणि दगडांचा संसार होता. अजुनसुद्धां आपल्या स्वयंपाकघरांतले पाटे-वरवंटे दगडाचेच आहेत. आणि त्या दृष्टीनें आपण एक प्रकारें अजून अश्मयुगांत आहोंत. हजारों वर्षांपूर्वीच्या जुन्या वस्तूंचें उत्खनन केलें म्हणजे मातीचे खुजे, वाट्या, ताटें, रांजण, सुरया, खेळणीं अशा कितीतरी वस्तु किंवा बहुधा त्यांचीं खापरें सांपडतात. तीं नाना रंगांचीं असतात आणि त्यावर अनेक प्रकारचीं चित्रें किंवा भूमितीच्या आकृति आढळून येतात. या मातीच्या भांड्यांचें एक मोठें शास्त्रच निर्माण झालें आहे. तज्ज्ञांनीं जगाच्या पाठीवरील अनेक ठिकाणचीं लक्षावधि भांडीं आणि खापरें यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. या भांड्यांचे वर्ग पाडले आहेत. मातीच्या भांड्यांचे किंवा खापरांचे कांहीं नमुने पाहिल्याबरोबर तज्ज्ञ मनुष्य तीं भांडीं कोणत्या काळांतलीं, कोणत्या वर्गांतलीं आहेत तें बिनचूक सांगू शकतो.

सोनें, चांदी या धातु आधीं बाहेर पडल्या. मग तांबें, मग जस्त. शेवटीं लोखंड. कॉकेशस पर्वताचें परिसर हें लोखंडाचें आदिस्थान. आणि हेंच बहुधा आर्यांचेंहि मूलस्थान. या लोखंडाच्या आणि शिकवून तयार केलेल्या घोड्यांच्या जोरावर ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षांपूर्वी आर्यांनीं आपल्या द्रुतगति रथांत बसून आशियामायनर, सीरिया, उत्तर मेसापोटेमिया, नंतर बॅबिलोन, इराण, भारत असे एकामागून एक त्यावेळचे ज्ञात देश जिंकले.

जसजसें आपण इतिहासकाळांत वाटचाल करूं लागतों तसतशीं इतिहास-साधनें विपुल आणि अनेक प्रकारचीं व चांगल्या स्थितींत असलेलीं आढळतात. आरंभीं आरंभीं तांब्याचे पत्रे आणि दगड यांवर कोरलेले लेख इतिहासाच्या उपयोगी पडतात. दक्षिण भारतांत देवस्थानें, सत्पुरुष, विद्वान पुरुष, मठ, पाठशाला वगैरेंना वर्षासनें, आणि इतर इनामें देण्याची वहिवाट होती. त्याच-

प्रमाणें दक्षिणेंतील अनेक राजे आपण केलेल्या पराक्रमाचीं वर्णनें ताम्रपटावर कोरवून घेत. डॉक्टर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं केवळ अशा ताम्रपटांच्या आधारावर दक्षिणेचा आरंभीचा इतिहास तयार केला.

अलीकडच्या काळांत आपण येऊं लागतों तसतसे कागदावर लिहिलेले लेख सांपडूं लागतात. हे लेख अनेक प्रकारचे असतात. जुन्या बखरी, याद्या, करीने, सनदा, महजर, निवाडपत्रकें, जुन्या पेढ्यांतील जमखर्चाच्या वह्या, जुनीं फर्मानें, बातमीपत्रें, आज्ञापत्रें, रोजनिशा, इतकेंच नव्हे, ऐतिहासिक व्यक्तींचीं आत्मवृत्तें आणि दुसऱ्यांनीं लिहिलेलीं चरित्रें. हा लेखी साधनांचा प्रचंड डोंगर आहे, नव्हे हिमालय पर्वत आहे. हे सर्व जगाच्या इतिहासावर प्रकाश पाडणारे कोट्यवधि कागद वाचायचे कोणी आणि त्यांच्या आधारावर इतिहासाची रचना करायची कोणी ? हें एकट्यादुकट्याचें काम नाहीं. कोणाचा नाण्यांचा अभ्यास असतो तर कोणाचा मातीच्या भांड्यांचा. कोणी ताम्रपट वाचूं शकतात तर कोणी मोडी कागदपत्रें. कोणी लुप्त झालेल्या प्राचीन काळच्या लिप्यांतील एकेक अक्षर वाचीत तीस तीस चाळीस चाळीस वर्षें त्या लिप्यांचा पाठलाग करतात आणि विजय मिळवितात, तर कोणी जुन्या वास्तु खोल खणून त्या खोलीचें मोजमाप घेऊन संस्कृतीचा कोणता थर कोणत्या काळाचा याचे अडाखे बांधतात. याप्रमाणें शेंकडों तज्ज्ञ आपली हयात आपल्या विशिष्ट क्षेत्रांतील साधनांचा अभ्यास करण्यांत आणि अर्थ लावण्यांत घालवितात. एखादा शोध निश्चित झाला असें स्वतःच्या बुद्धीला पटलें म्हणजे ते संशोधनास वाहिलेल्या मासिकांत किंवा वार्षिकांत तो प्रसिद्ध करतात. मग त्यावर इतर तज्ज्ञांकडून उलटसुलट टीका होते. वादविवाद होऊन शोधाचा खरेपणा सर्वांना किंवा बहुतेकांना पटला म्हणजे सर्वजण तो शोध मान्य करतात आणि त्याच्या आधारावर लिहितात.

अशा प्रकारें आस्ते आस्ते संशोधन होत जातें, शोध लागतात; कांहीं टिकतात, कांहीं गळतात. टिकलेल्या सर्व शोधांची आयती सामुग्री घेऊन मग एखादा व्यासंगी इतिहासकार पुढें येतो आणि इतिहास लिहितो. इतिहासाचा इतिहास असा आहे. आपण केवळ सांखळीचा शेवटचा दुवा पाहात असतों. त्याच्या पाठीमागें कितीतरी दुवे असतात; त्यांचा आपल्याला पत्ता नसतो. पाठ्यपुस्तकें लिहिणारे लेखक आपला पोहरा घेऊन अव्वल दर्जाच्या

इतिहासकारांनीं लिहिलेल्या इतिहासाच्या विहिरीकडे जातात आणि मिळेल तें पाणी पोहऱ्यांत भरून आणतात. हीं पाठ्यपुस्तकें आपले शिक्षक आणि विद्यार्थी वापरतात. त्यांना ज्या इतिहासांच्या आधारावर हीं छोटीं पुस्तकें लिहिलीं गेलीं त्यांची सहसा जाण नसते. मग त्या इतिहासकारांनीं ज्या असंख्य संशोधकांच्या संशोधनाचा उपयोग केला असेल त्यांचीं तर नांवेंसुद्धां माहीत नसतात यांत कांहींच नवल नाहीं.

हें सांगण्याचें कारण एवढेंच कीं एका टोंकाला खापरें, नाणीं, ताम्रपट, विटा घेऊन बसलेला संशोधक आणि दुसऱ्या लांबच्या टोंकाला पाठ्यपुस्तक लिहीत बसलेला लेखक यांच्यांत किती अंतर असतें हें वाचकांस समजावें. या दोघांत जेवढें अंतर तेवढेंच अंतर अर्थात् पाठ्यपुस्तक वापरणारीं मुलें आणि भूतकालीन ऐतिहासिक सत्य यांच्यामध्यें असतें. पाठ्यपुस्तक वापरणारीं आणि वर्तमानकाळांत वावरणारीं मुलें भूतकालीन वस्तूंपासून फार दूर असतात. दोघांच्यामध्यें खिंडार असतें. दुसरा दाखला घ्यायचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं मुलें ताटांत येऊन पडलेल्या पदार्थांचें सेवन करीत असतात. ते पदार्थ कोणत्या शेतांत किंवा मळ्यांत पैदा झाले आणि ते पैदा करण्यासाठीं कोणाकोणाचे घाम कामीं आले यांची त्यांना जाण नसते.

मुलें ऐतिहासिक बोलपट पाहतात तेव्हां ऐतिहासिक वस्तूंशीं त्यांचा मुकाबला होतो. इतिहासाचें समोरासमोर दर्शन घडतें. मुलें जेव्हां ऐतिहासिक नाटकांतील सोंगें करतात तेव्हांसुद्धां त्यांना इतिहासाचा साक्षात्कार घडतो. शिवाजीचें सोंग करणाऱ्या मुलाला शिवाजी कसा होता याचा एक वेगळाच आणि आगळाच अनुभव येतो. बोलपट आणि नाट्य यांप्रमाणेंच ऐतिहासिक साधनेंसुद्धां मुलांची इतिहासाशीं **प्रत्यक्ष मुलाखत** घडवून देण्यास उपयोगीं पडतात. सोंग शिवाजीचें असलें तरी तें सोंगच. परंतु प्रत्यक्ष महाराजांनीं वापरलेली तलवार, चिलखत, अंगरखा, लिहिलेलें पत्र, पूजलेली भवानीआई, त्यांचें वास्तव्य झालेले गड, यांच्या दर्शनानें मुलांच्या मनावर एक वेगळाच संस्कार घडतो. तेव्हां आपण शक्य तेवढ्या ऐतिहासिक साधनांचा मुलांना परिचय करून दिला पाहिजे.

कांहीं साधनें अशीं आहेत कीं तीं वर्गात आणतां येत नाहींत. डोंगर महंमदाकडे येत नसतो, महंमदालाच त्याच्याकडे जावें लागतें, किंवा त्याल्या



अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक .......................... नों दि ..................

प्रतिकृतीवर समाधान मानून घ्यावें लागतें. या न्यायानें जुने किल्ले, गढ्या, वाडे, रणांगणें पाहण्यास मुलांनाच नेलें पाहिजे. आतां विद्यार्थ्यांना सवलतीचीं तिकिटेंहि मिळूं लागलीं आहेत त्याचा फायदा घेऊन पानपतला भेट द्यावी, सारें रणांगण हिंडून पाहावें; कुंजपुऱ्याकडे फेरफटका करावा. रायगड, प्रतापगड, तोरणा, सिंहगड, लोहगड, सिंधुदुर्ग, असे प्रसिद्ध डोंगरी किल्ले व जंजिरे सुटींत पहावेत. या किल्ल्यांत शिवकालीन जीवन कसें होतें तें समजून घ्यावें. पाण्याचा पुरवठा कसा होता, धान्य व दारूगोळा यांचीं कोठारें कशीं बंदिस्त असत, बुरुजांवर मारा करण्याची सोय कशी केली होती, हें सारें पहावें. शिक्षकानें अशा सहली करण्यापूर्वी व नंतर सर्व माहिती मुलांना सांगावी.

कांहीं नाहीं तर नगर जिल्ह्यांत खर्ड्याचा किल्ला आणि त्याचें परिसर पाहून यावें आणि मराठ्यांच्या शेवटच्या पराक्रमाच्या त्या पुण्यक्षेत्राचें दर्शन घ्यावें. त्याचप्रमाणें पुण्याचें भारत इतिहास संशोधक मंडळाचें ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय आणि मुंबईचें प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम अवश्य पाहावें. या संग्रहालयांत पूर्वीचीं चित्रें, चिलखतें, हत्यारें, वस्त्रें, महत्त्वाच्या व्यक्तींनीं हातांनीं लिहिलेलीं पत्रें मुलांना अवश्य दाखवावीं. या ऐतिहासिक सहली शास्त्रोक्त रीतीनें झाल्या पाहिजेत. मुलांना वस्तुसंग्रहालयांत नेण्यापूर्वी त्यांची आधीं तयारी केली पाहिजे. त्यांना आधीं जुजबी माहिती दिली पाहिजे आणि संग्रहालय पाहून आल्यावर त्यावर वर्गांत माहितीवजा पाठ दिला पाहिजे. कांहीं ऐतिहासिक वस्तूंचीं सुंदर चित्रें मिळतात. तीं इतिहासाच्या खोलींत योग्य ठिकाणीं ठेवलीं पाहिजेत आणि त्यांचा उपयोग केला पाहिजे.

ज्या साधनांचा उपयोग प्रत्यक्ष इतिहास शिकविण्यासाठीं होण्याचा संभव आहे तीं साधनें म्हणजे जुने ऐतिहासिक कागदपत्र. या कागदपत्रांच्या आधारानेंच श्री. सरदेसायांसारख्या व्यासंगी इतिहासकारानें आपल्या रियासती लिहिल्या. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल अक्षरशः लाखों कागदपत्रें आहेत. त्यांतील बहुतेक अद्याप प्रकाशित व्हायचीं आहेत. तरीपण पुष्कळच प्रकाशांत आलीं आहेत. राजवाडे, खरे, पारसनीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, धुळ्याचें राजवाडे-संशोधनमंदिर, या व्यक्ति आणि संस्था, यांनीं बहुमोल कागदपत्रें उजेडांत आणलीं आहेत. त्यामुळें महाराष्ट्राचा बराचसा इतिहास अस्सल कागदपत्रांच्या आधारानें लिहिणें आतां शक्य झालें आहे. अजून कांहीं कांहीं भाग अंधारांत आहेत.

कांहीं कांहीं गोष्टी वादग्रस्त आहेत. तरीपण एकंदरीनें महाराष्ट्राच्या इतिहासाला साधनें भरपूर आहेत हें मान्य केलें पाहिजे.

हीं जुनीं कागदपत्रें जुन्या मराठी भाषेंत व मोडी लिपींत आहेत. त्यांचें मोडी वळण जुनें आहे. त्या नुसत्या वळणावरून तो कागद १७ व्या शतकांतला का १८ व्या शतकांतला याचा अंदाज बांधतां येतो. या कागदांतले मायने आणि भाषा जुनी आहे. वापरांतून गेलेले शेंकडों फारशी, अरबी व मराठी शब्द या कागदपत्रांत आढळतात. त्यांचा अर्थ मुलांनाच काय, शिक्षकांनाच माहीत नसतो. अशा कागदपत्रांचा उपयोग करायचा कसा? कांहीं वर्षांपूर्वी कै. दत्तोपंत आपटे यांनीं 'इतिहासमंजरी' या नांवानें कालक्रमानें कांहीं निवडक ऐतिहासिक कागद छापले. पुढें प्रा. ओतूरकर यांच्या सहकार्यानें "महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास" या नांवानें असे कागदपत्र प्रश्न, शब्दार्थ वगैरेंसह कालक्रमवार प्रसिद्ध केले. माझ्या माहितीप्रमाणें साधारण माणसाच्या किंवा विद्यार्थ्यांच्या उपयोगीं पडेल असें हें एकच महाराष्ट्राच्या इतिहासाचें साधनांचें पुस्तक आहे. अशा प्रकारचीं अनेक पुस्तकें झालीं पाहिजेत आणि तीं विद्यार्थ्यांच्या हातीं पडलीं पाहिजेत. कांहीं पाठ्य-पुस्तककारानीं जुन्या कागदपत्रांतील महत्त्वाचे उतारे घेऊन त्यांचा यथायोग्य परामर्श घेतला आहे. जुन्या कागदपत्रांच्या लिपीला किंवा भाषेला आतां भिण्याचें कारण नाहीं. 'महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास' यासारख्या पुस्तकांत अपरिचित शब्दांचे अर्थ दिले आहेत.

शिक्षकांना आणि प्रौढ विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या इतिहासासाठीं या साधनांचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. प्रथम शिक्षकाला जुन्या कागदपत्रांचा किती प्रकारें उपयोग करतां येईल तें आपण पाहूं.

(अ) यथायोग्य वातावरण निर्माण करण्यासाठीं तत्कालीन कागदपत्रांचा उपयोग चांगला होईल.

(ब) एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं किंवा त्याचे अधिक तपशील सांगण्यासाठीं किंवा प्रसंगविशेषीं उदाहरण देण्यासाठीं ऐतिहासिक लेखांचा उपयोग करतां येईल.

(क) ऐतिहासिक पुरावा म्हणजे काय, इतिहासांत सत्य काय आणि असत्य काय आणि त्यांची कशी बेमालूम भेसळ होत असते, हें समजून देण्यासाठीं

आणि मुलांची ऐतिहासिक दृष्टि तयार करण्यासाठीं कांहीं निवडक कागदपत्रांचा उपयोग करतां येईल.

जुन्या कागदपत्रांचा, वर्गांत योग्य असें वातावरण निर्माण करण्याकडे नेहमींच उपयोग होऊं शकतो. पाठ्यपुस्तकांत बहुधा असें वातावरण नसतें. मोठमोठ्या इतिहासांतसुद्धां तें सांपडेलच याची खात्री नाहीं. कारण बहुतेक लेखक ऐतिहासिक घटनांमध्यें गुरफटलेले असतात. त्यांना तत्कालीन भौगोलिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक वातावरणाची जाण नसते आणि असल्यास भान नसतें, आणि तें असलें तर त्याची आवश्यकता वाटत नसते. अलीकडे Will Durant सारखे प्रतिभावान् इतिहासकार मात्र आपल्या इतिहासांत सर्व बाजूचें वातावरण उत्पन्न करूं लागले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. तथापि हे झाले अपवाद. तेव्हां ऐतिहासिक घटना यथायोग्य अशा वातावरणाच्या चौकटींत घडत आहेत हें मुलांना समजण्यासाठीं शिक्षकानें जुन्या कागदपत्रांचा वेळोवेळीं उपयोग केला पाहिजे.

साधनांचा दुसरा उपयोग स्पष्टीकरणासाठीं आणि दाखल्यासाठीं. पाठ देत असतांना असे अनेक प्रसंग येतात कीं जेव्हां एखादा ऐतिहासिक उतारा वाचून दाखविला तर ऐतिहासिक घटना जणूं काय सजीव होतात, आकार धारण करतात आणि डोळ्यांसमोर उभ्या राहतात. त्याचप्रमाणें एखादी घटना किंवा एखादी व्यक्ति यांविषयीं कांहीं विधान केल्यावर त्याला पुष्टी म्हणून तत्संबंधीं ऐतिहासिक उतारा वाचून दाखविला तर तो मुद्दा मुलांना तात्काळ पटेल.

ऐतिहासिक पुराव्याची छाननी आणि सत्याचा शोध ही एक कठीण गोष्ट आहे. चांगल्या चांगल्यांना तें जमत नाहीं. अगदीं परवाचेंच उदाहरण घ्या. १८५७ च्या उठावाला शंभर वर्षें झालीं. त्यावर इतिहास लिहिण्याचा प्रसंग आला. कोणी त्याला स्वातंत्र्याचें युद्ध म्हणाले तर कोणीं तें शिपायांचें निर्भेळ बंड होतें असें प्रतिपादन केलें. कोणी त्याला शिपाईगर्दीचा मध्यम मार्ग दिला. ज्यांना कोणतीच बाजू धिटाईनें स्वीकारायची नव्हती त्यांनीं सुरक्षित असा मध्यम मार्ग पतकरला आणि म्हटलें तर असें होतें, म्हटलें तर तसें होतें, असा तारेवरचा नाच केला. वास्तविक अठराशें सत्तावनच्या उठावासंबंधीं अक्षरशः हजारों कागदपत्रें, चौकशी कमिट्यांचे अहवाल इत्यादि साधनें आहेत. त्यावेळीं तारायंत्र सुरू झालें असल्यामुळें ठिकठिकाणच्या बातम्या मुंबईच्या आणि

कलकत्त्याच्या वर्तमानपत्रांत रोज येत होत्या. साधनें इतकीं विपुल असूनसुद्धां एकवाक्यता होत नाहीं, मतभेद माजतात; याचें कारण उघड आहे. या विषयावर लिहिणाऱ्या लेखकांत कोणी देशभक्तीनें भारलेले असतात तर कोणी आतषबाजीचे हौशी असतात. सत्य दाखवील त्या वाटेनें शेवटपर्यंत जाण्याचें बौद्धिक धैर्य आणि सामर्थ्य थोडक्यांतच असतें. साहजिकच मतामतांचा गलबला होतो.

असें असलें तरी इतिहासांतलें सत्यशोधन हें इतिहासाच्या विद्यार्थ्याचें एक ध्येय असलेंच पाहिजे. भारताचा उद्याचा नागरिक स्वतंत्र बुद्धीचा आणि चिकित्सक वृत्तीचा व्हायचा असल्यास त्याची तयारी आपल्या शिक्षणसंस्थांनीं केली पाहिजे आणि माध्यमिक शाळांतील प्रौढ विद्यार्थी व कॉलेजांतले विद्यार्थी यांना ऐतिहासिक पुराव्याची तोंडओळख करून दिली पाहिजे. सर्वच ऐतिहासिक घटना वादग्रस्त आणि भानगडीच्या नसतात. मतभेद होण्यासारखे थोडेच प्रसंग असतात. अशा प्रसंगांवरचे वेगवेगळी बाजू दाखविणारे कागद मुलांना वाचून दाखवावे. वास्तविक निरनिराळ्या बाजू आणि मतें दाखविणारे ऐतिहासिक उतारे प्रौढ मुलांच्या पाठ्यपुस्तकांत परिशिष्टांत समाविष्ट झाले पाहिजेत. १७६१ मधल्या पानिपतच्या युद्धाचें उदाहरण घ्या. या युद्धावर वेगवेगळ्या माणसांनीं लिहिलेलीं साधनें आहेत. 'भाऊसाहेबांची बखर' ही प्रसिद्ध बखर आहेच. पण त्याखेरीज पानिपतच्या युद्धांत हजर असलेला सुजाउद्दौल्याचा दिवाण काशीराज याचीहि बखर आहे. शिवाय भाऊसाहेबांनीं आणि सरदारांनीं दक्षिणेंत दर मुक्कामावरून पाठविलेलीं कितीतरी अस्सल पत्रें उपलब्ध आहेत. नाना फडणिसांचें पानिपतहून परत येतांना घडलेल्या प्रसंगांचें तपशीलवार आणि मार्मिक आत्मवृत्त आहे. हीं सर्व साधनें मुलांच्या समोर ठेवलीं पाहिजेत. म्हणजे त्यांना पानिपतला खरोखर काय घडलें आणि तें कसें घडलें याविषयीं कल्पना येईल.

इंग्लंडच्या इतिहासाचा अभ्यास करतांना प्रॉटेस्टंट पंथाच्या लेखकानें लिहिलेला इतिहास आणि हिलेर बेलॉक या रोमन कॅथॉलिक पंथाच्या थोर इतिहासकारानें लिहिलेला इतिहास समोरासमोर ठेवला आणि त्याच त्या घटना दोघांनीं किती वेगळ्या रीतीनें वर्णिल्या आहेत तें पाहिलें म्हणजे सत्य गुहेंत कसें दडून बसलें आहे याची यथार्थ कल्पना विद्यार्थ्यांना होईल.

शिक्षकाप्रमाणें विद्यार्थ्यांनींहि स्वतंत्रपणें ऐतिहासिक साधनांचा उपयोग करावा का हाहि एक प्रश्न आहे. माझ्या मतें मराठी साधनांचा तरी उपयोग माध्यमिक शाळांत मुलांनीं करण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. आरंभाला पाठ्यपुस्तकांत ऐतिहासिक साधनांचा भरपूर वापर असावा. शक्य तेथें ऐतिहासिक उताऱ्यांचे परिच्छेदच्या परिच्छेद पुस्तकांत द्यावेत आणि अवांतर माहितीसाठीं त्या त्या प्रकरणाच्या शेवटीं परिशिष्टांत संबंधित कागदांचे उतारे द्यावेत. अशा प्रकारें पाठ्यपुस्तक वापरतांनाच मुलांना ऐतिहासिक साधनांची व त्यांतील भाषेची आपोआप तोंडओळख होईल.

वरच्या वर्गांत ऐतिहासिक साधनें स्वतंत्रपणेंच मुलांपुढें आलीं पाहिजेत. त्याचे दोन प्रकार : वर्गांतील पाठापूर्वी साधनांचा उपयोग करावा तर कधीं तो पाठानंतर करावा. हें शिक्षकांच्या इच्छेवर अवलंबून राहील. पाठाच्या पूर्वी जो उपयोग करायचा तो पाठाची पार्श्वभूमि आणि उपोद्घात या दृष्टीनें. मुलांनीं संबंधित असे ऐतिहासिक उतारे वाचावे, त्यांतील मुद्दे काढावे, शिक्षकानें त्यावर प्रश्न विचारावे आणि हें झाल्यावर पाठाला सुरुवात करावी. असें केलें म्हणजे मुलांना ऐतिहासिक साधनें कशीं असतात आणि त्या साधनांच्या मदतीनें इतिहासाची रचना कशी होते याची जाण होईल. पाठानंतर साधनें वापरायचीं तीं त्या पाठांत मिळविलेल्या ज्ञानाची उपयोजना ( application ) म्हणून. पाठामध्यें अवश्य ती माहिती मुलांना मिळेल. आणि ऐतिहासिक उताऱ्यांत त्या ऐतिहासिक घटनांची पार्श्वभूमि समजेल; व्यक्तींचे गुणदोष, धोरण व परस्परांशीं घडणारे संघर्ष यांची कल्पना येईल.

कशाहि प्रकारचा पाठ देतांना मुलांना जुन्या इमारती, वास्तु, वस्तु यांचीं चित्रें नेहमींच दाखविलीं पाहिजेत, म्हणजे भूतकाळ त्यांच्यापुढें सजीव असा उभा राहील.

• • •

## प्रकरण सोळावें

# इतिहासाचें नाट्यीकरण

श्रीशंकराचार्यांनीं कांहीं विशिष्ट अनुभव मिळविण्यासाठीं परकायाप्रवेश केला होता असें म्हणतात. खरें खोटें आचार्यच जाणोत! मात्र परकायाप्रवेश (म्हणजेच परमनप्रवेश) ही मानसशास्त्रांतील एक महत्त्वाची आणि आवश्यक गोष्ट आहे. आपण पुष्कळ अनुभव घेतों. परंतु त्यांना मर्यादा असते. सारेच अनुभव मिळत नाहींत. जेथें अनुभूति लाभत नाहीं तेथें सहानुभूति पुढें होते आणि काम करते. आपलें मन आणि हृदय मोकळें आणि स्वागतशील असलें तर अनेकांच्या अनुभवांचा आपण स्वीकार करूं शकतों आणि आपलें मन समृद्ध करूं शकतों. परकायाप्रवेश म्हणतात तो हाच.

शिक्षकाला तर परकायाप्रवेश फार आवश्यक आहे. त्यानें वर्गांतील मुलांच्या मनांत मधूनमधून प्रवेश केला पाहिजे. इतिहासाचा शिक्षक रोज वर्गांत शिकवीत असतो, पुस्तक वाचून दाखवतो, अर्थ सांगतो, प्रश्न विचारतो, वाचून घेतो, किती तरी गोष्टी करतो. या साऱ्या धडपडीचा समोर बसलेल्या मुलांच्या मनावर कितपत परिणाम घडतो, आपले अध्यापनाचे कितीसे संस्कार मुलांच्या मनांत शिल्लक राहतात हें जाणत्या आणि सहृदय शिक्षकानें मधूनमधून पाहिलें पाहिजे. तसें पाहिलें म्हणजे त्याला आश्चर्याचा धक्का बसेल. तो थोडासा निराश होईल, कदाचित् हतबुद्धहि होईल. त्याला असें आढळून येईल कीं त्यानें जें मोठ्या मनोभावानें शिरा ताणताणून सांगितलें त्यांतलें बरेंचसें वर्गाच्या डोक्यावरून खिडकीवाटें बाहेर निघून गेलें! थोडेंच डोक्यांत शिरलें, आणि त्यांपैकीं थोडेंच तेथें शिल्लक राहिलें.

अशा अनुभवानें निराश होऊं नये. "हें फल काय मम तपाला" असें नुसतें वैतागानें म्हणूं नये. आपलेंच कांहीं तरी चुकतें आहे असें समजून, काय

चुकतें त्याचा तपास करावा आणि आपण जें शिकवितों तें मुलांच्या मनांत उतरलें पाहिजे आणि टिकून राहिलें पाहिजे याविषयीं उपाय शोधले पाहिजेत. इतिहासाच्या बाबतींत मुलांची अडचण काय असते हें सहज समजूं शकेल. इतिहास भूतकाळाबद्दल असतो, आणि मुलें वर्तमानकाळांत वावरत असतात. हा वर्तमानकाळ भूतकाळापेक्षां फारच वेगळा असतो. त्याचें भूतकाळाशीं फार थोडें साधर्म्य असतें आणि म्हणून मुलांना त्याची जाणीव होत नाहीं. मुलें १९ व्या शतकापासून यंत्रयुगांत वावरत आहेत. यंत्रानें त्यापूर्वीचें जग अजिबात बदलून टाकलें आहे. मुलें मोटार–आगगाडींतून प्रवास करतात. डोक्यावरून नित्यनेमानें जाणारीं वाहतुकीचीं विमानें पाहत असतात. घरांत रेडिओ ऐकतात. कदाचित् टेलिफोननें मित्रांशीं बोलतात; सिमेंटच्या घरांत राहतात. त्या घरांचें रंगरूप पूर्वींच्या वाड्यांपेक्षां किती तरी वेगळें, मुलांना घरांत आणि घराबाहेर माणसें दिसतात. त्यांचे पोषाख, रीतिरिवाज, बोलणेंचालणें भूतकाळांतील माणसांपेक्षां अगदीं वेगळे.

मध्ययुगांतील पांचसातशें वर्षें घेतलीं तर त्यांत सामाजिक जीवनांत आणि भौतिक गोष्टींत फारसा फरक आढळणार नाहीं. प्रवासाचीं साधनें जवळजवळ तींच. पोषाखांत फारसा बदल नाहीं. धार्मिक व सामाजिक रीतीरिवाज जवळ जवळ तसेच अशी स्थिति होती. बाराव्या शतकांतला पृथ्वीराज चव्हाण दिल्लीहून सतराव्या शतकांतल्या शिवछत्रपतींना भेटायला पुण्यास आला असता तर त्याला फारसें अपरिचित असें जग दिसलें नसतें. पण अठराशें सालीं मरण पावलेले नाना फडणीस तीस चाळीस वर्षांनीं पुण्यासच 'लोकहितवादीं' ना भेटायला आले तर त्यांना सारेंच वेगळें दिसेल आणि आश्चर्याचा धक्का बसेल. इतक्या झपाट्यानें जग बदललें आहे. फार कशाला? विष्णुशास्त्री चिपळूणकर किंवा आगरकर ओंकारेश्वरांतून उठून आज लकडी पुलापलीकडे आले तर त्यांना अगदीं नवें जग आणि जीवन दिसेल.

या बदललेल्या जगांत वावरणाऱ्या मुलांना जुनें जग कसें होतें, जुनीं माणसें कशीं होतीं हें समजणें फार कठीण. चांगल्या जाणत्या प्रौढ माणसांनासुद्धां डोळ्यांसमोर जुनें जग आणतां येत नाहीं. मग बिचाऱ्या कोंवळ्या मुलांना तें कसें साधेल? पूर्वींच्या काळीं जीवन संथ आणि सुस्त होतें. प्रवास सावकाश, टप्प्या-टप्प्यानें होत असत. मोहिमा तशाच सावकाश होत. ४०–५० हजार माणसांची फौज, हजारों घोडे, धान्यानें लादलेले हजारों बैल, छोट्या तोफांनीं लादलेले

शेकडों उंट, अनेक हत्ती, अनेक पालख्या, तमासगीर, दुकानदार, गोंधळी, नाचीं पोरें, मुरळ्या, भटभिक्षुक अशा लवाजम्यानिशीं मोहिमा होत. माणसांना आणि जनावरांना पाणी लागे. बरोबर पाणी कितीसें नेणार? अर्थात् नद्यांच्या आसऱ्यानें फौजा मुक्काम करीत. आणि नद्यांना उतार जेथें असे तेथें तळ पडत. या परिस्थितीमुळें देशाच्या एका भागांतून दुसऱ्या भागांत ज्या स्वाऱ्या होत त्यांचे मार्ग आणि त्यांतील टप्पे निश्चित असत. हे टप्पे नद्या, त्यांवरील उतार आणि डोंगरांतले घाट यांना अनुसरूनच ठरत असत. आजच्या स्वाऱ्या विमानांतून आणि चिलखती रणगाड्यांतून वेगानें होतात. आजच्या मुलांना पूर्वीची भौगोलिक परिस्थिति आणि अडचणी नीट समजल्याखेरीज पूर्वीच्या स्वाऱ्या आणि युद्धें कशीं होत याचें ज्ञान होणार नाहीं.

अशा ज्ञानाच्या अभावीं वर्गांत शिकलेला इतिहास डोक्यावरून जातो. नुसते शब्द ऐकूं येतात आणि कांहीं स्मृतींत राहतात; पण ते शब्द डोळ्यांसमोर जुनें चित्र उभें करीत नाहींत. मुलांची ही अडचण शिक्षकानें लक्षांत घेतली पाहिजे. अपरिचित आणि अनोळखी असा भूतकाळ त्यांच्यापुढें जिवंत उभा केला पाहिजे. यासाठीं अनेक साधनें आहेत. सर्वांत प्रभावी साधन म्हणजे ऐतिहासिक बोलपट. मुलें पडद्यावर प्रत्यक्ष जुन्या काळच्या वाटा, रस्ते, घरें, किल्ले, गढ्या, माणसें, जनावरें पाहतात. माणसाचीं जुन्या काळचीं बोलणीं ऐकतात. जुन्या जमान्यांतल्या नानाविध जीवनाचें त्यांना पडद्यावर दर्शन घडतें, संस्कार मनावर ठसतात. परंतु हें साधन वर्गाबाहेरचें आहे. वर्गांत उपयोगीं पडणारें एक उत्तम साधन म्हणजे नाटक. मुलांनीं वर्गांत ऐतिहासिक नाट्याचा अवलंब केला म्हणजे ज्या ऐतिहासिक व्यक्तींचीं तीं कामें करतात त्यांच्याविषयीं त्यांना वेगळाच अनुभव येतो, साक्षात्कार घडतो. इतिहासाच्या पुस्तकांत ज्यांचीं नांवें आपण वाचतों तीं आपल्यासारखींच हाडामासाचीं माणसें होतीं, त्यांना भल्याबुऱ्या भावना होत्या, गुणदोष होते याची जाणीव मुलांना नाट्याच्या माध्यमामधून होते. या प्रकरणाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें ऐतिहासिक नाट्यामुळें मुलांचा भूतकाळांत जणूं काय 'परकायाप्रवेश'च होतो.

इतिहासाचें नाट्यीकरण करायचें म्हणजे काय करायचें हें नीट समजून घेतलें पाहिजे. माझ्या लहानपणीं मीं पुष्कळ ऐतिहासिक नाटकें पाहिलीं. त्यांना ऐतिहासिक म्हणणं चुकीचें होईल. कथानकाचा थोडाबहुत भाग जरूर

ऐतिहासिक असे. सामान्यतः 'बहुत' म्हणण्यापेक्षां तो 'थोडा'च असे. नाटकांतील कांहीं प्रमुख पात्रें ऐतिहासिक असत पण बरींच काल्पनिक असत. त्या नाटकांत लांबलचक आवेशाचीं भाषणें असत. मरतांना बहुतेक पान दीड पान भाषण करूनच नायक मरत असे. त्याचें भाषण संपेपर्यंत यमदेव माशा मारीत थांबत असत. संवादांत आवेश व आवेग असे. नायकाचा सत्पक्ष असे व स्वतः नायक अर्थातच सौजन्याचा पुतळा असे. नाटकांत खलनायक असे व तो निर्भेळ दुष्ट असे व आपण निर्भेळ दुष्ट आहोंत हें तो प्रेक्षकांना आपल्या भाषणांतून वेळोवेळीं पटवून देत असे. त्याच्या खलत्वाला इतिहासांत कितपत आधार आहे आणि नायकाच्या निर्भेळ सौजन्यालासुद्धां इतिहास साक्षी आहे कीं नाहीं याची नाटककाराला दरकार नसे. त्याचें नाट्य-परिणामाकडे लक्ष असे, इतिहासाकडे नसे. त्याचा इतिहासाचा अभ्यास बेताचाच असे आणि प्रचलित राजकारण व त्यांत वावरणाऱ्या व्यक्ति डोळ्यांसमोर ठेवून तो इतिहासाच्या काडीच्या आधारावर माडी रचीत असे !

आपल्याला वर्गात असें नाटक करावयाचें नाहीं. इतिहासाच्या नाटकांत इतिहासाला प्राधान्य आहे, नाटकाला नाहीं. ऐतिहासिक नाटक करतांना तें इतिहासाच्या अध्यापनाचें अनेकांपैकीं एक साधन आहे, साध्य नाहीं, हें आपण लक्षांत बाळगलें पाहिजे. आपलें साध्य इतिहास म्हणजे इतिहासांतलें सत्य हेंच असलें पाहिजे. नाट्य ही कला आहे आणि इतिहास हें शास्त्र आहे. शास्त्राच्या म्हणजेच सत्याच्या साधनेसाठीं आपण एका कलेचा उपयोग करीत आहोंत, ही मर्यादा आपण लक्षांत ठेवली पाहिजे आणि सत्याच्या साधनेस अवश्य तीं पथ्यें पाळलीं पाहिजेत.

आतां प्रश्न असा उद्भवतो, कीं मग ऐतिहासिक नाटकांत प्रतिभेला, कल्पनेला आणि भावनांना कांहीं स्थान आहे कीं नाहीं ? ऐतिहासिक नाटकांत पात्रें खरोखरीचीं ऐतिहासिकच असलीं पाहिजेत काय ? त्या नाटकांतील घटना जशा घडल्या तशाच दाखवल्या पाहिजेत का ? त्यांचे तपशील इतिहासदृष्ट्या बिनचूक असले पाहिजेत का ? नाटक म्हटलें म्हणजे संवाद आलेच. किंबहुना नाटक म्हणजेच संवाद. हे संवाद कसे असावेत ? संवाद खरोखरीच झालेले पाहिजे असल्यास तें कसें शक्य आहे ? शिवाजीमहाराज व अफझलखान, अलेक्झांडर व पुरु यांचे संवाद झाले तेव्हां आपण कोणीच हजर नव्हतों. कोणी समकालीनानें

त्यांच्या संवादाचीं टिपणें आपल्यासाठीं लिहून ठेवलीं नाहींत. कांहीं वर्षांनीं स्मरणानें कोणीं कांहीं लिहिलें असेल. पण त्याला किती किंमत द्यायची? ऐतिहासिक संवाद अशक्य कोटींतले दिसतात. आणि म्हणून साहजिकच ऐतिहासिक नाटकेंहि.

ऐतिहासिक सत्याचा इतका संकुचित अर्थ घेण्याचें कारण नाहीं. जें जें घडलें तें तें आणि तसेंच या नाटकांत आलें पाहिजे, अशा शब्दशः मर्यादा पाळायच्या नसतात. नाटकाचें कथानक किंवा प्रसंग हे सत्याला धरून अवश्य असले पाहिजेत. कलेसाठीं किंवा नाट्यपरिणामासाठीं ऐतिहासिक व्यक्ति किंवा घटना जो कांहीं ऐतिहासिक पुरावा उपलब्ध असेल त्याला विसंगत किंवा विरोधी अशा प्रकारें ऐतिहासिक नाटकांत दाखवितां कामा नये. आपल्याला नाट्याच्या माध्यमांतून मुलांना इतिहासाचें दर्शन घडवायचें आहे तेव्हां आपलें नाट्य इतिहासावरच आधारलेलें असलें पाहिजे.

नाट्य इतिहासावर आधारतांना त्यांत कलेला आणि कल्पकतेला पुष्कळच वाव आहे. ऐतिहासिक वातावरणाच्या परिपोषासाठीं जरूर तेथें काल्पनिक व्यक्ति अवश्य आणाव्यात. ऐतिहासिक घटना रंगवितांना कलेसाठीं नाहीं पण त्या घटनांच्या पूर्ततेसाठीं काल्पनिक माणसें निर्माण केलीं पाहिजेत आणि काल्पनिक संवादहि रचले पाहिजेत. खबरदारी घ्यायची ती एवढीच कीं या काल्पनिक व्यक्ति, काल्पनिक प्रसंग आणि काल्पनिक संवाद ऐतिहासिक सत्याशीं संवादी असले पाहिजेत, पूरक असले पाहिजेत, विसंगत नकोत. एखादी ऐतिहासिक व्यक्ति पुराव्याच्या आधारें आपल्याला वाटते इतकी चांगली किंवा वाईट नाहीं, अशी वस्तुस्थिति असल्यास नाटकाचा भडक परिणाम साधण्यासाठीं तिला निर्भेळ चांगल्या किंवा वाईट रंगानें रंगवूं नये. कलेलाहि असा एकांडेपणा मंजूर नाहीं. माणसें ऐतिहासिक असलीं तरी माणसेंच आहेत, अतिमानव नाहींत. त्यांच्या पिंडांत गुणदोषांचें मजेदार मिश्रण आहे व तें मिश्रण खुलवून दाखविण्यांतच कलेची बहादुरी आहे व त्यांतच कलेची सत्याची साधनाहि आहे.

एक उदाहरणच घेऊन दाखवतों. तीस वर्षांपूर्वी मीं "नाट्यरूप महाराष्ट्र" हें पुस्तक लिहिलें. या पुस्तकांत कालक्रमानें पण नाट्यपद्धतीनें महाराष्ट्राचा १७०७ पर्यंतचा इतिहास आणला आहे. या इतिहासांत मी कल्पनेला पुष्कळच वाव दिला आहे. पण ऐतिहासिक सत्याला घट्ट धरून बसलों आहें. जेथें जेथें कल्पनेचा

वापर केला तेथें तेथें तो सत्याच्या आविष्कारासाठींच आणि पूर्ततेसाठींच. माझ्या मताप्रमाणें ऐतिहासिक पुराव्यांप्रमाणें नाना व्यक्तींचे स्वभाव कसे आहेत हें पारखल्यावर ते स्वभाव व्यक्त करण्यासाठीं मी घटना व संवाद तयार करण्यास कल्पनेची मदत घेतली. या पुस्तकांतील एकाच प्रवेशाचा उल्लेख करतों व तो लिहितांना ऐतिहासिक पुरावा हाताशीं किती होता आणि त्या पुराव्याच्या आधारावर मीं कल्पनेचा किती उपयोग केला याची फोड करतों, म्हणजे माझें म्हणणें स्पष्ट होईल.

हा प्रवेश ‘ हिंदवी स्वराज्याचा संकल्प ’ या नांवाचा आहे. सोळा वर्षांचा शिवाजी दादाजी कोंडदेवांसहवर्तमान रोहिडखोऱ्यांतील रोहिडेश्वराच्या देवळांत जातो, तेथें त्याला मावळांत अनेक देशमूख-देशपांडे भेटतात. या भेटींत शिवाजी ‘ हिंदवी स्वराज्या ’चा संकल्प जाहीर करतो आणि आपल्या गोड वाणीनें त्या मावळ्यांचीं मनें वळवून त्यांना आपल्या संकल्पांत सामील करतो. वृद्ध दादाजी ‘ तथास्तु ’ म्हणून आशीर्वाद देतो.

आतां या स्वराज्याच्या संकल्पाला आधार काय ? राजवाड्यांच्या ऐतिहासिक साधनांच्या १५ व्या खंडांत शिवाजीनें १६४६ सालीं नरसू प्रभूला लिहिलेलें पत्र छापलें आहे. त्यांत “ रोहिडेश्वराच्या समक्ष आणि दादाजी पंताच्या विद्यमाने तुमच्या आमच्या आणाभाका झाल्या. तुमचीं वतनें आम्ही वंशपरंपरे चालवूं. हें राज्य व्हावें हें श्रीच्या मनांत फार आहे. ” ‘ हें हिंदवी स्वराज्य ’ असा मजकूर आहे. हा माझा पहिला आणि सर्वांत मोठा ऐतिहासिक पुरावा; या पत्रांत नरसूबाबाबरोबर त्यांचा मुलगा दादाजी नरसू हजर होता हा उल्लेख आहे. परंतु इतर मावळे देशमुख हजर असल्याचा दाखला नाहीं. ते हजर असते तर या पत्रांत शिवाजीनें त्या मातबर माणसांचा अवश्य उल्लेख केला असता. येथें मी कल्पनेची मदत घेतली. पण तिला ऐतिहासिक आधार आहे. जेधे, बांदल, सिलिमकर हे शिवाजीस आरंभींच सामील झाले होते असा पुरावा आहे. मग मी नरसूबाबाबरोबर या तिघांनाहि रोहिडेश्वराच्या देवळांत आणलें. हे तिघे कशा प्रकारचे होते यावर प्रकाश टाकणारीं ऐतिहासिक पत्रें आहेत. बांदल-जेध्यांचें पिढीजाद हाडवैर होतें. नुकतेंच जेध्यानें बांदलाचें लग्नाचें वऱ्हाड खिंडींत गांठून कापून काढलें होतें. हे भांडखोर देशमूख शिरवळच्या अभिनापुढें मात्र नांगी टाकीत होते, एकमेकांच्या चहाड्या करीत होते, हें ऐतिहासिक

पत्रांवरून आपल्याला समजतें. राहतां राहिले दादाजी कोंडदेव. "दादाजीपंताच्या विद्यमानें" हे शिवाजीचे पत्रांतील शब्द सूचक आहेत. दादाजीचें पूर्वचरित्र आणि शिवाजीनें दिलेला हा दाखला दादाजीची या प्रवेशांतील भूमिका रंगविण्यास मला उपयोगीं पडला. अनेक कमीजास्त वयाचे, वतनाला जिवापाड जपणारे हे मातबर मावळे रोहिडेश्वरीं मी एकत्र आणल्यावर कल्पनेनें त्यांचें स्वभाववैचित्र्य मीं रंगविलें. कोणी सनातनी, जडवृत्तीचा, आदिलशाहीला वचकून वागणारा, कोणी चंचल, उतावळा, कोणी वयोमानानें स्वयंकेंद्रित तर कोणी ध्येयवादी, असे निरनिराळे प्रकार मीं कल्पिले. हे स्वभावभेद ऐतिहासिक सत्याला विसंगत नसून पोषक होते.

मीं लिहिलेल्या एका नाट्यप्रवेशाचा एवढा प्रपंच मीं मुद्दाम केला. ऐतिहासिक सत्याला न सोडतां एक सुंदर कलाकृति निर्माण करतां येते, तेथें रचनात्मक कल्पकतेला भरपूर कार्य असतें, हें मला दाखवायचें होतें. आतां एवढें कबूल केलें पाहिजे कीं या प्रवेशासाठीं ऐतिहासिक साधनें बरीचशीं होतीं. नेहमींच अशीं साधनें उपलब्ध असतील असें नाहीं. पण जीं साधनें हाताशीं असतील तीं घ्यावींत. ऐतिहासिक सत्य काय आहे तें हुडकून काढावें, व्यक्तींचे दृष्टिकोन कसे आहेत ते हेरावे आणि बाकीचें काम आपल्या रचनात्मक कल्पकतेला करूं द्यावें, म्हणजे फारशी अडचण येणार नाहीं. अर्थात् हा एक प्रकारचा तारेवरचा नाच आहे. पण आतांपर्यंत सांगितलेलीं पथ्यें पाळलीं तर तोल जाणार नाहीं असा माझा अनुभव आहे.

आतांपर्यंत आपण वर्गाबाहेरच उभे राहून ऐतिहासिक नाट्यावर विवेचन करीत होतों. आतां वर्गांत शिरूंया, आणि इतिहासाच्या तासाला ऐतिहासिक नाट्याचा कसा उपयोग करायचा तें पाहूंया. हे उपयोग अनेक आहेत. चतुर शिक्षक वेळींप्रसंगीं त्या सर्वांचा अवलंब करील. पुष्कळ प्रसंगीं वर्गांत आयतें लिहिलेलें नाट्यप्रवेशाचें पुस्तक उपलब्ध असतें. अशा पुस्तकाचा अनेक प्रकारें उपयोग करतां येतो. अशा प्रकारचें आयतें पुस्तक उपलब्ध असो किंवा नसो, वर्गांत मुलांकडून नाट्यप्रवेश रचून घेतां येतात. हें झालें नाट्यप्रवेश लिहिण्याचें किंवा लिहिलेले नाट्यप्रवेश करवून घेण्याचें. परंतु नाट्याचें मर्म प्रत्यक्ष कृतींत आहे; नाट्य लिहिण्यांत किंवा वाचण्यांत नाहीं. म्हणून वर्गांत आणि अन्यत्र मुलांकडून प्रवेश बसवून घेतले पाहिजेत.

हे सर्व प्रकार आपण क्रमाक्रमानें घेऊं.

( १ ) वर्गात एखादा पाठ झाल्यावर त्या पाठावरचा नाट्यप्रवेश मुलांकडून वाचून घ्यावा आणि मुलांना तो तयार करण्यास सांगावें. या प्रकारांत मामुली पद्धतीनें वर्गातील पाठ संपल्यावर त्याची उपयोजना म्हणून ( application ) नाट्याचा उपयोग केला जातो.

(२) कांहीं प्रसंगीं मामुली पाठ न शिकवितां मुलांना नाट्यप्रवेश मनांत वाचायला सांगावे. वाचून झाल्यावर त्यावर ढोकळ प्रश्न विचारावे, आणि मग पाठ्यपुस्तकांतून तो पाठ मामुली पद्धतीनें घ्यावा. या प्रकारांत नाट्याचा उपोद्घात किंवा पार्श्वभूमि यासारखा उपयोग होतो.

(३) कांहीं प्रसंगीं नाट्यप्रवेशांत भरपूर ऐतिहासिक आशय असला तर नाट्याचा उपोद्घातासारखा उपयोग न करतां एक स्वयंपूर्ण पाठ म्हणूनच तो घ्यावा. मुलांना मनांत वाचायला सांगावें, मुद्दे काढायला लावावें, त्यावर प्रश्न विचारावेत आणि नंतर मुलांना त्या प्रवेशांत जो ऐतिहासिक प्रसंग वर्णिला असेल तो सरळ कथनपद्धतीनें आपल्या शब्दांत लिहून काढण्यास किंवा सांगण्यास सांगावें. असा पाठ संपल्यावर वेळ असल्यास मुलांना मामुली पाठ्य-पुस्तक उघडण्यास सांगून त्यांतून तो ऐतिहासिक भाग वाचण्यास सांगावें. येथें नाट्यपाठ हा मुख्य आणि त्यानंतर केलेला पाठ्यपुस्तकाचा उपयोग ही उपयोजना ( application ) होईल.

(४) या सर्वांपेक्षां नाट्याचा महत्त्वाचा उपयोग आहे तो असा. इतिहासाचा पाठ झाल्यावर त्याचें फळ्यावर केलेलें टांचण मुलांनीं लिहून घ्यावें आणि त्या टांचणाच्या आधारानें त्यांनीं स्वतःच्या बुद्धीनें ऐतिहासिक संवाद किंवा आत्मगत भाषणें ( monologues ) तयार करावींत. जो संवाद उत्तम झाला असेल तो वर्गात मुलांकडून करून दाखवावा. याप्रमाणें उपोद्घात म्हणून, पूरक लेखी काम म्हणून किंवा स्वतंत्र इतिहासाचा पाठ म्हणून नाट्याचा उपयोग करतां येतो.

ऐतिहासिक नाट्याचें खरें यश मुलांनीं तें साभिनय करून दाखविण्यांत आहे हें सांगितलेंच आहे. पण येथेंहि थोडें पथ्य पाळलें पाहिजे आणि संयम बाळगला पाहिजे. मामुली ऐतिहासिक नाट्यासाठीं मुलांनीं आपापलीं कामें पाठ करण्याचें कारण नाहीं. मुलांनीं पुस्तकावरूनच आपल्याला दिलेली भूमिका योग्य आवाजांत, समजून, वाचावी. वर्गात करण्याच्या नाट्याला अर्थात् रंगरंगोटी,

कपडेलत्ते, हत्यारें पात्यारें आणि पडदे यांचीहि जरुरी नाहीं. आजकाल नाट्य-वाचन-स्पर्धा होतात तशाच प्रकारें वर्गांतील नाट्यप्रयोग करावेत. अर्थात् संमेलनप्रसंगीं किंवा इतर महत्त्वाच्या वेळीं वरील सर्व साधनांची जरुरी लागेल, पण तो प्रश्न वेगळा. अशा प्रसंगीं रंगभूमीची रचना, सजावट इत्यादि गोष्टी मुलांना करूं द्याव्यात, म्हणजे त्यांच्या सौंदर्यदृष्टीला भरपूर खाद्य मिळेल.

आतां वर्गात मुलांकडून अगदीं स्वाभाविक परिस्थितींत नाट्यप्रवेश कसे लिहून घेतां येतात याचें एक उदाहरण सांगतों. पूर्वी मॅक्मिलन कंपनीचें "भारताच्या इतिहासांतील गोष्टी" या नांवाचें पाठ्यपुस्तक पुष्कळ शाळांत चालू होतें. त्यांत 'हुमायूँचें दुखणें' या नांवाचा एक धडा होता. हुमायूँ अत्यवस्थ असतो, अनेक हकीम प्रयत्न करतात पण दुखणें हटत नाहीं. बाबरचें त्याच्यावर अतोनात प्रेम. तो हुमायूँच्या पलंगापाशीं गुडघे टेकतो, देवाची करुणा भाकतो, "माझ्या बाळाचें दुखणें मला दे, मला घेऊन जा, त्याला वांचव" अशी प्रार्थना करतो. अशी ती हृदयद्रावक गोष्ट आहे. वर्ग लहान मुलांचा होता. ही गोष्ट टप्प्याटप्प्यानें सांगण्यांत आली. आधीं शिक्षकांनीं फळ्यावर 'हुमायूँचें दुखणें' असें पाठाचें नांव लिहिलें. पाठाचे एकंदर तीन भाग होते. प्रत्येक भाग संपल्यावर फळ्यावर दोनतीन शब्दांत तो मुद्दा मांडला आणि पुढील भागाला सुरुवात केली. पुढील भाग संपल्यावर त्याचाहि मुद्दा फळ्यावर मांडला. याप्रमाणें जसजसा पाठ होत गेला तसतसें त्याचें टांचण फळ्यावर लिहिलें गेलें. मुलांनीं हें फळ्यावरचें टांचण उतरून घेतलें. या टांचणांत पाठाचे मुख्य तीन मुद्दे आणि प्रत्येक मुद्द्याखालीं त्याचे उपमुद्दे लिहिलेले होते.

दुसऱ्या खेपेस इतिहासाच्या तासाला शिक्षकांनीं जाहीर केलें, 'मुलांनो, गेल्या खेपेला आपण जो पाठ घेतला त्यावर एक नाटक तयार करायचें आहे आणि तें तुम्ही तयार करायचें आहे. जरूर तेथें मी तुम्हांला मदत करीन. पण मुख्य काम तुम्हांलाच करावें लागेल.' मुलें उत्तेजित झालीं. थोडीं गोंधळलीं. इतक्या लहानपणीं नाटक कसें लिहायचें याचा त्यांना प्रश्न पडला. शिक्षकांनीं त्यांचें समाधान केलें. ते म्हणाले, 'नाटक हें अगदीं सोपें. तुमच्यापैकीं कोणीं कोणीं नाटकें पाहिलीं आहेत?' बहुतेक मुलांनीं एखाददुसरें तरी नाटक पाहिलें होतें. त्यांनीं हात वर केले. शिक्षकांनीं प्रश्न टाकला, 'तुम्ही पाहिलें त्या नाटकांत कांहीं भाग होते ना?' मुलांनीं पटकन् उत्तर दिलें 'होय; चार पांच अंक होते.' शिक्षकांनीं

पुनः विचारलें, "प्रत्येक अंकाचे पुनः कांहीं भाग होते ना?" मुलांनीं उत्तर केलें, "हो तर! प्रत्येक अंकांत कांहीं प्रवेश होते." शिक्षक म्हणाले, "वा! तुम्हांला सर्व माहिती आहे. नाटक लिहावयाचें म्हणजे त्यांत अंक पाहिजेत व अंकांत प्रवेश पाहिजेत. आपल्याला हुमायूँच्या दुखण्यावर नाटक लिहायचें आहे. त्यांत कोणते अंक असावेत, ते अंक कसे हुडकून काढावेत?" एका चतुर मुलाच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला आणि तो म्हणाला, "सर, सर, मी सांगतों. तुम्ही या पाठाचें जें टांचण लिहून दिलें त्यांतले मुख्य मुद्दे तेच या नाटकाचे अंक." शिक्षक आनंदानें म्हणाले, "वा, छान! बरोबर सांगितलेंस. बरें तर. प्रत्येक अंकांतील प्रवेश कसे हुडकावेत?" आतां सर्व वर्गानेंच हात वर केले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एका नवीन शोधाचा आनंद दिसत होता. सर्व वर्ग एकसमयावच्छेदेंकरून ओरडला, "टांचणांतले दुय्यम मुद्दे ते अंकांतले प्रवेश." शिक्षकांनीं सांगितलें, "झालें तर, नाटकाचा आराखडा तयार झाला. नाटकांत कोणते अंक आणि प्रवेश घ्यायचे हें तुम्हांला माहीत आहे. प्रत्येक अंकांत आणि प्रवेशांत काय लिहायचें हें मी तुम्हांला सांगितलें आहे. शिवाय तें तुमच्या पाठ्यपुस्तकांतहि आहे. झालें तर. एकामागून एक सर्व प्रवेशांतील संवाद लिहून काढा. जास्ती प्रवेश नसतील तर एका प्रवेशावरच अंकाचें काम भागवा. कुठें गंमत करावीशी वाटली तर खुशाल करा. तुम्हांला स्वातंत्र्य आहे. तुम्ही वर्गांत बत्तीस जण आहांत. तुमचे मी पांच पांच सहा सहा जणांचे असे गट करतों. प्रत्येक गटानें एकत्र बसून चर्चा करावी, खूप विचार करावा, काय लिहायचें तें ठरवावें आणि सहकार्यानें नाटक लिहून काढावें. ज्या गटाचें नाटक उत्तम ठरेल तें योग्य वेळीं सबंध शाळेच्यासमोर करून दाखविण्यांत येईल."

झालें. मुलें तयारीला लागलीं. तीं गटागटानें बसलीं. वर्गांतील शिस्तीची त्यांना फारशी आठवण राहिली नाहीं. ज्या गटाला जी जागा योग्य वाटली तेथें तो बसला. एक गट तर खुशाल वर्गाबाहेर व्हरांड्यांत ठाण देऊन बसला. तासाच्या अखेरीस दोन तीन गटांचीं नाटकें आलीं. बाकीच्या गटांनीं अधिक वेळ मागितला आणि घरून आम्ही तयार करून आणतों म्हणून सांगितलें. त्यांना तशी परवानगी देण्यांत आली. याप्रमाणें सर्वांचीं नाटकें मागेंपुढें शिक्षकांकडे आलीं. दोनतीन अगदींच मामुली होतीं. दोन साधारण बऱ्यापैकीं होतीं. एकांत मात्र चांगल्यापैकीं वाङ्मयीन गुण होते. या गटानें थोडी गंमतहि

केली होती. त्या गटांतील १–२ मुलांनीं नुकतेंच ‘ एकच प्याला ’ नाटक पाहिलें होतें. त्या नाटकांतील डॉक्टर आणि वैद्य यांच्यामधला रोग्याच्या बिछान्याजवळचा झगडा त्यांच्या आठवणींत होता. त्यांनीं हुमायूँच्या बिछान्याशेजारीं एक वैद्य आणि एक हकीम यांचा झगडा तयार केला. बहुतेक वाक्यें ‘ एकच प्याल्यां’तीलच होतीं. परंतु ही कल्पना या प्रसंगीं त्यांनीं उपयोगांत आणली हेंच विशेष.

बऱ्याच शाळांत मुलांकडून ऐतिहासिक संवाद बसवून घेतात. परंतु आत्मगत भाषणें (monologues) बसविल्याचें किंवा लिहून घेतल्याचें माझ्या फारसें ऐकिवांत नाहीं. इतिहासदृष्ट्या अशीं भाषणें फार महत्त्वाचीं ठरतील. संवादांपेक्षां या भाषणांमुळें मुलें ऐतिहासिक व्यक्तींच्या अगदीं अंतरंगांत शिरतील. महत्त्वाच्या क्रांतिकारक प्रसंगीं त्यांची मनःस्थिति कशी होती, कशा प्रकारचे विचार त्यांच्या मनांत घोळत होते, काय खळबळ उडाली होती, हें सर्व या आत्मगत भाषणांत मुलांना समजेल. एखाद्या कालखंडाचा अभ्यास झाल्यावर त्याच्यांतील महत्त्वाचे प्रसंग निवडून मुलांना जर त्या प्रसंगांत भाग घेणाऱ्या व्यक्तींचीं आत्मगत भाषणें तयार करण्यास सांगितलें तर त्यांच्या धारणाशक्तीची व कल्पकतेची ती एक कसोटीच ठरेल. मोठमोठ्या माणसांच्या मृत्युप्रसंगींचीं आत्मगत भाषणें तर फार उद्बोधक होतील. शिवाजी, संभाजी, औरंगझेब यांचीं मृत्युपूर्वीचीं भाषणें अवश्य तयार करण्यासारखीं आहेत. क्रांतिकारक क्षणांवर प्रकाश पाडणारीं भाषणेंसुद्धां कल्पनेला खूप वाव देतील. अलेक्झांडरशीं सामना करण्यापूर्वीच्या रात्रीं पुरु, महमद घोरीशीं मुकाबला करण्यापूर्वीं पृथ्वीराज, अफझलखानाशीं मुकाबला करण्यापूर्वीं शिवाजी, पानिपतच्या आदल्या रात्रीं सदाशिवरावभाऊ, गृहत्याग करण्यापूर्वीं बुद्ध, कलिंगाच्या रणांगणांत उपरति झालेला अशोक, संभाजीस पत्र लिहून मृत्यूची तयारी करणारे समर्थ रामदास, ड्यूक ऑफ कनॉटच्या पानसुपारीला निघालेले ज्योतिराव फुले, सुरत कॉंग्रेस अधिवेशनाच्या रात्रीं टिळक आणि गोखले, ‘चले जाव’ च्या निर्णयाला येऊन पोहोंचलेले महात्मा गांधी, देशाच्या फाळणीला दुःखानें कबुली देण्यापूर्वीं महात्माजी– ही यादी चतुर शिक्षकाला पुष्कळच लांबवतां येईल. माझ्या “ नाट्यरूप महाराष्ट्रां ” तील आत्मगत भाषणें या दृष्टीनें वाचून पहावींत.

● ● ●

## प्रकरण सतरावें

# समन्वय

सत्यनारायणाच्या पोथींत कोणी त्याला 'सत्यनारायण' म्हणतात, कोणी 'सत्यदेव' म्हणतात; पण तो एकच आहे. त्याच रुबाबांत मी तुम्हांला सांगतों, कोणी ह्याला 'समन्वय' म्हणतात, कोणी 'अनुबंध' म्हणतात. इंग्रज 'कोरिलेशन' म्हणतात; पण तें एकच आहे; आणि साऱ्या ट्रेन्ड शिक्षकांना त्याचीं वेळीं व अवेळीं स्वप्नें पडत असतात. अनट्रेन्ड शिक्षक त्या शब्दाकडे भययुक्त श्रद्धेनें पाहत असतात. पण तें घाबरण्यासारखें नाहीं आणि डोळे मिटून स्तोत्रें म्हणण्यासारखेंहि नाहीं. तें एक मामुली शैक्षणिक साधन आहे. आजवर चतुर शिक्षक–मग ते ट्रेन्ड असोत का अनट्रेन्ड–जाणून बुजून किंवा अजाणतां त्याचा उपयोग करीत आले आहेत. ही चीज वाटते तशी नवी नाहीं.

समन्वय किंवा अनुबंध याचा अर्थ आधीं नीट समजून घ्या. दोन वेगळया वस्तु एकत्र आणून त्यांचा 'अन्वय' जोडायचा, त्यांना एकत्र बांधायचें, असा या शब्दांचा अर्थ आहे. या व्याख्येंत दोन गोष्टी अभिप्रेत आहेत. वस्तु वेगळया आहेत. त्यांचें वेगळें असें अस्तित्व आहे आणि त्या वेगळेपणाची आपण दखल घेतली पाहिजे ही एक गोष्ट. दुसरी गोष्ट त्यांना एकत्र आणायचें. कधीं ठकूबाईला भागूबाईची जरूर लागेल, तर कधीं भागूबाईला ठकूबाईची. ठकूबाईनें नाकानें कांदे सोलूं नयेत आणि भागूबाईनेंहि. एकीला दुसरीची कधीं तरी जरुर लागायची. कधीं घरांत चहाला दूध नसेल, कधीं साखर. दोघींनीं आपापले संसार गुण्यागोविंदानें करावेत व अडीअडचणीला शेजारधर्माला जागावें, हेंच योग्य. एवढें सांगितलें म्हणजे या प्रकरणांतलें सारें सांगून झालें, अशी वस्तुस्थिति आहे. पण ठकू–भागूबायांच्या शेजारधर्माची नीट फोड केल्याखेरीज जें सांगितलें तें समजायचें नाहीं.

आपण घरांत, दारांत, बाजारांत आणि शाळेंत जें ज्ञान मिळवीत असतों, तें सारें समन्वयाचें फळ असतें. ज्ञान म्हणजे फुटकळ, एकमेकांपासून फटकून राहणारी माहिती नव्हे. ज्ञान आणि माहिती यांच्यांतील भेद आपण पूर्वीच पाहिला आहे. एखाद्या विषयाची माहिती म्हणजे अडगळींची खोली असली तर त्या विषयाचें ज्ञान म्हणजे जेथली वस्तु तेथें नीटनेटकेपणानें मांडली आहे असा दिवाणखाना. आरामखुर्चीच्या जागीं आरामखुर्ची, टेबलाच्या जागीं टेबल, चित्रांच्या जागीं चित्रें, या सर्वांचा परस्परांशीं अनुबंध असतो आणि एखादी वस्तु भलत्याच ठिकाणीं ठेवली तर तो अनुबंध मोडला जातो. आपण जगांत अवलोकनानें आणि वाचनानें व अन्य प्रकारें जे अनुभव मिळवीत असतों ते पूर्वी मिळविलेल्या अनुभवांशीं गुंफले जातात, "अनुबद्ध" होतात. आपल्या मनाचें हें वळणच आहे. त्याची ती संवयच आहे. तें मुळांतच समन्वयशील आहे. नव्याची जुन्याशीं तें सारखी सांगड घालीत असतें; इतकेंच नव्हे तर जें जुनें ज्ञान मिळविलेलें असतें त्याच्यांत साधर्म्य हुडकून काढून त्याचाहि अंतर्गत असा समन्वय करीत असतें. या क्रियेला इंग्रजींत process of integration म्हणजे एकात्मतेची प्रक्रिया असें म्हणतां येईल. Integration हा समन्वयाचाच एक प्रकार आहे.

ज्ञान म्हटलें म्हणजे अनुबंध आलाच, गुंफण आलीच. शाळेमध्यें जें जें ज्ञान द्यायचें तें अनुबद्ध झालें पाहिजे, एकात्म आणि एकसंध झालें पाहिजे. तें परस्परांशीं फटकून वागतां कामा नये. अनेक शैक्षणिक तत्त्ववेत्ते या एकात्म ज्ञानाच्या सुवर्णमृगाच्या मागें लागले होते. त्यांना सुवर्णमृग मिळाला नाहींच. पण हातची सीता मात्र ते गमावून बसले. अपयश आलें, तरी एखाद्या उदात्त आणि सुंदर अशा ध्येयाकडे वाटचाल करीत जाण्यांतसुद्धां एक प्रकारची कृतार्थता आणि समाधान आहे. पूर्ण यश मिळालें नाहीं तर बरेचसें यश पदरीं पडतें. ज्ञान पूर्णपणें एकात्म झालें नाहीं तरी तें बरेचसें जवळ येतें, एकत्र येतें.

अमेरिकेमध्यें प्रॉजेक्ट मेथड या नांवाची शिक्षणपद्धति प्रसिद्ध आहे. सर्व वर्गानें मिळून एक बरीचशी व्यापक अशी योजना ( project ) हातीं घ्यायची, कित्येक महिने ती चालू ठेवायची आणि ती चालवीत असतां जेव्हां जेव्हां जशी जशी गरज पडेल तसें तसें गणित, भाषा, विज्ञान, इतिहास, भूगोल यांचें ज्ञान द्यावयाचें. प्रत्येक विषयाचें ज्ञान तर्कदृष्ट्या एकत्र गुंफलेलें नसेल. उदाहणार्थ,

इतिहास घ्या. त्याची जेव्हां जितकी गरज पडेल तितकें त्याचें ज्ञान मुलांना मिळेल. योजना पुढें चालूच राहील. परत केव्हां तरी इतिहासाची गरज भासेल आणि त्यापुरतें त्यावेळीं इतिहासाचें ज्ञान देण्यांत येईल. अशा प्रकारें प्रत्येक विषयाचें ज्ञान खंडित असेल. परंतु प्रत्येक विषयाचें ज्ञान योजना कृतींत आणतांना त्या कृतींतून जन्म पावलेलें असेल. प्रॉजेक्ट मेथडचें थोडक्यांत असें स्वरूप आहे.

अशी योजना अंमलांत आणतांना वेळापत्रकें, वेगवेगळ्या विषयांचे वेगळे तास, वेगळे शिक्षक, वेगवेगळीं पाठ्यपुस्तकें, हे मामुली प्रकार शक्यच नसतात. या योजनापद्धतींत मुलें एक प्रकारें जीवनाचा पाठलाग करीत असतात. तेथें कसलीं वेळापत्रकें आणि कसले तास! शाळेच्या सर्व वेळांत हातीं घेतलेल्या योजनेचा पाठपुरावा करायचा हाच उद्योग!

योजना-पद्धति हा एक समन्वयाचाच प्रकार आहे. या पद्धतींत सर्व विषय योजनेच्या निर्मितींतून निघतात. म्हणजे योजनेशीं अनुबद्ध असतात. योजनेशीं अनुबद्ध असतात म्हणजे अर्थातच परस्परांशीं अनुबद्ध असतात असा याचा अर्थ घ्यायचा. योजनेच्या पोटीं वेगवेगळ्या वेळीं जन्म घेतल्यानें त्यांचें भावंडांचें नातें झालें. भावंडें परस्परांहून कितीतरी वेगळीं असतात, पण त्यांची आई एकच. समन्वयाचा इतका आत्यंतिक प्रकार अंमलांत आणण्याचें धाडस फार थोड्यांनीं केलें आहे. थोड्यांनीं केलें आहे हीच शहाणपणाची गोष्ट आहे. असे प्रयोग हाताळण्यास प्रतिभेचें सामर्थ्य लागतें, समयसूचकता लागते, आणि **मनमुराद स्वातंत्र्यहि** लागतें. असे प्रयोग अंतःस्फूर्तीनें झाले पाहिजेत, सरकारी हुकमानें नाहीं. कारण तें येरा गबाळाचें काम नव्हे. तेथें लोखंडाचे चणे खायचे असतात!

सामान्यतः मामुली अध्यापनपद्धतींत पुष्कळच कमी धाडसाचे असे समन्वयाचे प्रकार आढळतात. मामुली शाळांत दोन प्रकारें समन्वय अवलंबितां येईल. (अ) प्रासंगिक आणि (ब) योजनापूर्वक. प्रासंगिक समन्वयासाठीं पूर्वतयारी आणि योजना करावी लागत नाहीं. तो आपोआपच आणि ओघानें होत असतो. किंबहुना, आपण समन्वय करीत आहोंत हें शिक्षकाच्या लक्षांतहि येत नाहीं. कोणीं त्याला तसें सांगितलें तर त्याला आश्चर्यहि वाटण्याचा संभव आहे. स्वतःचा विषय वर्गांत शिकवितांना त्या विषयांतील कांहीं असे भाग

असतात कीं दुसऱ्या 'शेजारच्या' विषयाची मदत घेतल्याशिवाय ते भाग नीट समजावून सांगतांच येत नाहींत. आणि म्हणून जातिवंत शिक्षक असे स्वाभाविक समन्वय हमेशा जुळवीत असतो.

समन्वयाचा हा प्रकार सर्वांत उत्तम. तो **स्वाभाविक** असतो; इतकेंच नव्हे तर तो **अपरिहार्य** असतो. त्याच्यावांचून अडून बसावें लागेल अशी स्थिति असते, समन्वय केल्याखेरीज शिकवींत असलेला विषय जणूं काय अडूनच बसतो.

ओढून ताणून आणलेला समन्वय हा खरा समन्वयच नव्हे. कारण विषयाची समज देण्यास त्याची गरज असतेच असें नाहीं. परवा अशा द्राविडी प्राणायामाचें एक मजेदार उदाहरण मीं ऐकलें. पाठ इतिहासाचा होता आणि शिक्षक तानाजी सिंहगड चढून कसा गेला तें सांगत होते. त्यांनीं विचारलें, तानाजी चढून कसा गेला? उत्तर, घोरपडीच्या साहाय्यानें. प्रश्न – घोरपडीला काय बांधलें होतें? उत्तर – दोर. प्रश्न – दोर कशाचा करतात? उत्तर – कापसाचा. वास्तविक तानाजीचा दोर अंबाडीचा केला असणार. परंतु अशा प्रकारच्या कोणत्याहि प्रश्नाला कापूस हेंच उत्तर द्यायचें असें ठरलें गेलें असल्यामुळें मुलांनीं तें उत्तर दिलें आणि शिक्षकांनीं तें स्वीकारलें व तानाजीला दोरावर तसाच लटकत ठेवीत 'आतां आपण थोडा कापूस कातूंया' असा त्यांनीं विद्यार्थ्यांना आदेश दिला आणि समन्वय साधला. कदाचित् खरा प्रकार उलट असेल. प्रथम शिक्षकांनीं कापूस कातायला सांगितलें असेल. नंतर कापसाचा दोर होतो हें सांगितलें असेल आणि मग तो दोर तानाजीच्या घोरपडीला बांधला असेल. प्रकार कसाहि असला तरी तानाजीबद्दलचा वीररसाचा पाठ घेतांना आधीं किंवा नंतर मुलांना सूतकताई करायला लावण्याचें कांहींच कारण नव्हतें. तें कृत्य त्या ऐतिहासिक पाठाला पोषक नव्हतें, जरूर नव्हतें. उलट त्यानें रसहानीच झाली.

असे समन्वयाचे वेडेवांकडे प्रकार नेहमींच घडत असतात. ट्रेनिंग कॉलेज-मधील एका शिक्षकानें माझ्याजवळ अशा वेडगळ समन्वयाच्या पांचपन्नास पाठांचीं टांचणें दिलीं आहेत. हीं टांचणें वाचून हसूं येण्याऐवजीं मला दुःख होतें. मी स्वतः असाच एक वेडगळ समन्वय एकदां पाहिला. शाळा समन्वया-साठीं नांवाजलेली होती आणि म्हणून कांहीं बड्या पाहुण्यांना ती शाळा दाखविण्याचें काम मजकडे आलें होतें. आम्ही पहिल्या इयत्तेच्या वर्गात गेलों.

शिक्षकानें चांदोबावरचें एक सुंदर बालगीत मुलांकडून म्हणून घेतलें. आम्हांला आनंद झाला. तदनंतर त्या बालगीतांतील मौज मुलांना सांगण्याच्या भानगडींत न पडतां शिक्षकानें गंभीरपणें प्रश्न टाकला, " आतां सांगा, चांदोबा कशासारखा दिसतो ? " वर्गांतील सर्व मुलांनीं एकदम उत्तर दिलें, " कापसासारखा ". कारण, शिक्षकाला तेंच उत्तर नेहमीं अभिप्रेत असतें हें त्यांना ठाऊक होतें. त्यांनीं इमानेंइतबारें जें पाहिजे तेंच उत्तर दिलें.

असे वेडेवाकडे आणि यांत्रिक समन्वय आमच्या शाळांत कां सुरू झाले तें समजत नाहीं. प्रत्येक पाठांत पाठांतील विषयाचा दुसऱ्या कशाशीं तरी मारून मुटकून समन्वय केला पाहिजे असा जुलूम कां ? समन्वय पाठांतील विषयाला पोषक असला तर तो अवश्य करावा. परंतु पाठासाठीं कोणत्याहि प्रकारच्या समन्वयाची अप्रत्यक्षसुद्धां गरज नसतांना हा द्राविडी प्राणायाम कशाला ? आपल्याला आपल्या मुलांना राम, कृष्ण, बुद्ध, अशोक, समुद्रगुप्त, हर्ष, शिवाजी, तानाजी, बाजीराव, महादजी, नाना फडणीस, राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, लोकहितवादी, दादाभाई, रानडे, आगरकर, टिळक, गोखले, टाटा, गांधी अशा राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें शिकवायचीं आहेत. या चरित्रांत काय कमी सामर्थ्य आहे ? या चरित्रांत वीरश्रीचे, ध्येयवादाचे, स्वार्थत्यागाचे प्रसंग काय कमी आहेत कीं कसल्या तरी दूरान्वयी मूलोद्योगाच्या काठीचा त्यांना आपण आधार द्यावा ? छत्रपति शिवाजी किंवा तानाजी यांच्यावरच्या पाठांना अनुबंधांची काय गरज ? उलट पानपतच्या तिसऱ्या युद्धाचा पाठ घेणें झाल्यास त्याचा भूगोलाशीं समन्वय केलाच पाहिजे. कारण या समन्वयावांचून तो पाठ मुलांना नीट समजणार नाहीं.

जेथें अपरिहार्य आणि पोषक आहे तेथें समन्वय अवश्य करावा. परंतु तो योजनापूर्वक असावा. शिक्षकाच्या लहरीवर तो ठेवूं नये. आणि दर पाठांत तो झालाच पाहिजे असा आग्रह धरूं नये. योजनापूर्वक समन्वय साधण्याचा उत्तम मार्ग म्हणजे शाळांसाठीं जो अभ्यासक्रम तयार करायचा **तोच मुळांत अनुबद्ध करायचा**. अनुबद्ध अभ्यासक्रमांचे अनेक प्रकार संभवतात. येथें प्रयोगाला भरपूर जागा आहे. माझे गुरुवर्य सर पर्सी नन् आम्हांला नेहमीं सांगत, " आपण आपल्या अभ्यासक्रमांत ज्ञानाचे विनाकारण तुकडे पाडतों आणि ते तुकडे स्वतंत्र आणि तुटकपणें मुलांना शिकवितों. यापेक्षां जे विषय एकमेकांशीं जुळते असतील त्यांचा एकच विषय करावा. असें केल्यास शाळेंत शिकविण्याचे दोनच विषय

राहतील. एक विषय म्हणजे शास्त्रें आणि गणित आणि दुसरा विषय वाङ्मयात्मक, ज्याला इंग्रजींत Humanities म्हणतात तो. असे दोनच विषय ठरवून त्यांचे अभ्यासक्रम तयार केले तर ओघानेंच आजच्या सर्व शालेय विषयांचा त्यांच्यांत समावेश होईल आणि मुळामधेंच अभ्यासक्रमांतच समन्वय साधले जातील."

सर पर्सी नन्ची ही सूचना कितपत व्यवहार्य आहे हा प्रश्न आहे. या दृष्टीनें प्रयोग मात्र अवश्य झाले पाहिजेत, म्हणजे समन्वयाचें यथार्थ स्वरूप, महत्त्व आणि मर्यादा आपल्याला समजून येतील.

योजनापूर्वक समन्वयाचा कमी आत्यंतिक असा दुसरा प्रकार आहे आणि तो व्यवहार्य आहे. आजच्याप्रमाणेंच वेगवेगळ्या विषयांचे वेगवेगळे अभ्यासक्रम आपल्याला शिकवायचे आहेत असें समजा. वर्षाच्या आरंभीं प्रत्येक शिक्षकानें आपल्या शिकवायच्या विषयाचा कार्यक्रम आणि रचना (planning) करावी. हें झाल्यावर सर्व शिक्षकांनीं एकत्र यावें आणि परस्परांची केव्हां आणि कोणत्या बाबतींत मदत घ्यायची हें निश्चित करावें. उदाहरणार्थ, इतिहास आणि भूगोल हे विषय घ्या. या विषयांच्या शिक्षकांनीं आधींच ठरवून टाकायचें कीं इतिहासाच्या अभ्यासक्रमाला अमकी अमकी भौगोलिक माहिती अवश्य आहे किंवा भूगोलाला इतिहासाची कांहीं विशिष्ट बाबतींत गरज आहे. ही गरज त्या त्या शिक्षकानें आपला विषय शिकवितांना योजनापूर्वक पुरवावी. इतिहासशिक्षकानें आपल्या वर्गांत सांगावें, 'तुम्हांला या विषयाची सविस्तर माहिती भूगोलाचे शिक्षक देतील. मी ती तुम्हांला सांगत बसत नाहीं.' अशा प्रकारें योजनापूर्वक समन्वयाचा स्वीकार आणि वापर झाल्यास तो उपयोगीं पडेल आणि समन्वित विषयांचें शिक्षण अधिक यशस्वी होईल.

आतां या प्रकारें इतिहासाचा शाळेंतील कोणकोणत्या विषयांशीं समन्वय होऊं शकतो तें पाहूंया. तशी जबरदस्तीच करायची झाली तर सर्वच विषयांशीं कसातरी समन्वय करतां येईल व स्वतःची फसवणूक व हंसें करून घेतां येईल परंतु ज्या विषयांचीं गोत्रें जुळत नसतील त्यांच्यांत शरीरसंबंध जुळवून आणणें आपल्याला मंजूर नाहीं. सारा राजीखुषीचा मामला पाहिजे. राक्षसी विवाह नकोत. असे विवाह शिक्षणक्षेत्रांतसुद्धां अपेशी ठरतात. तर मग इतिहासाचें कोणकोणत्या विषयांशीं गोत्र जुळतें? कोणकोणत्या विषयांशीं इतिहासाचे राजी-खुषीचे संबंध जुळतील?

पहिलें नांव पटकन सुचतें तें भूगोलाचें. इतर विषयांपेक्षां इतिहास आणि भूगोल यांचे संबंध फार जवळचे आणि जिव्हाळ्याचे आहेत. भूगोल ही इतिहासाची कर्मभूमि आहे. भूगोल हा इतिहासाचा रंगमंच आहे. या दोन्हीहि उपमा तितक्याशा चपखल नाहींत. रंगमंच किंवा कर्मभूमिपेक्षां भूगोलाचा इतिहासाशीं अधिक जवळचा आणि **परिणामकारक** असा संबंध आहे. दोघांत एक प्रकारचें कार्यकारणभावाचें नातें आहे. इतिहास कसा घडावा हें त्याची कर्मभूमि बऱ्याच प्रमाणांत ठरवीत असते. कांहीं भूगोलशास्त्रज्ञांच्या मतें तर इतिहास सर्वस्वी भूगोलावर अवलंबून आहे. भौगोलिक परिस्थिति इतिहासाची घडण करीत असते. तेथें माणसाच्या इच्छाशक्तीला, कर्तृत्वाला आणि ध्येयवादाला विशेष वाव नाहीं. सारें कांहीं भूगोलाच्या निर्घृण शक्ति ठरवीत असतात. सारे धर्मसंस्थापक आशियांतच कां उदयाला आले, युरोपांत कां नाहीं याचें उत्तर भूगोलापाशींच आहे. साऱ्या परकीयांबरोबरीच्या क्रांतिकारक लढाया पानपतलाच कां झाल्या, हें भूगोल सांगेल. भूगोलाच्या सर्वंकष सामर्थ्या-बद्दलची ही आत्यंतिक भूमिका फार थोड्या लोकांना मान्य आहे. तथापि भूगोलाचे इतिहासाच्या घडणीवर महत्त्वाचे परिणाम होत असतात हें आपण कबूल केलेंच पाहिजे.

इतिहास–भूगोलाचें जर इतकें जवळचें आणि कार्यकारणभावदर्शक नातें आहे, तर मग त्यांना अलग तरी कां ठेवा? दोघांचा मिळून एकच संयुक्त विषय कां मानूं नये? अलीकडे पुष्कळ लोक दोघांना एकात्म करूं पाहतात आणि त्या संयुक्त विषयाला समाजशास्त्र (Social studies) असें म्हणतात. ही समन्वयाची परिसीमाच झाली. समन्वयांत दोन विषयांना आपण मधून मधून किंवा वारंवार एकत्र आणीत होतों. परंतु दोघांना आपण अलग ठेवलें होतें. दोघांना आपल्यापरीनें वेगळे संसार थाटूं दिले होते. या नव्या समाजशास्त्रांत तर दोघे एक झाले. वेगळे संसार राहिले नाहींत. भागूबाई, ठकूबाई एकाच चुलीवर रांधूं लागल्या. या प्रकाराला समन्वय म्हणावें का हा प्रश्न आहे. कारण समन्वयांत दोन भिन्न वस्तु असतात, सलोकता असते, समीपता असते, पण सायुज्यता नसते. पण शब्दासाठीं अडून बसण्याचें कारण नाहीं. याहि एकात्मतेला समन्वय म्हणायचें असेल तर खुशाल म्हणा. पूर्वीच्या समन्वयांत आणि या आत्यंतिक ‘ समन्वयांत ’ भेद आहे, एवढें लक्षांत ठेवा म्हणजे झालें.

इतिहास–भूगोलाची ही सायुज्यता–ही एकात्मता इष्ट आहे का? शक्य आहे का? मजजवळ याचें एकच उत्तर आहे, ‘नाहीं, नाहीं, त्रिवार नाहीं.’ हा जुलमाचा रामराम होईल; राक्षसी विवाह होईल आणि या विवाहांत नवरा राक्षस नाहीं, नवरी राक्षस नाहीं, त्यांचें जबरदस्तीनें लग्न लावणारे भद्रेश्वरच राक्षस. हें लग्न कोणालाच सुखाचें होणार नाहीं. इतिहासाला तर खास नाहीं. दोघांच्या स्वाभाविक विकासाला तें विघातक होईल. दोघांचे तोंडवळे वेगळे. गरजा वेगळ्या, क्रम वेगळे. दोघांचें सहजीवन कसें जमणार? अभ्यासक्रमाचेंच उदाहरण घ्या. भूगोलाचा आरंभ आपण स्थानिक भूगोलानें करतों. गांवालगतची नदी, डोंगर, शेतें, ओढा, झाडें, बाजार, देवळें, चावडी यांचें निरीक्षण करूनच आपण भूगोलाला सुरुवात करतों; म्हणजे मुलांच्या डोळ्यांसमोर जें दिसतें किंवा पायांखालीं जें येतें तेंच आरंभींच्या भूगोलाचा विषय. उलट इतिहासाचा आरंभ आपण जागतिक इतिहासानें करतों. गुहेंत राहणारा, वल्कलें धारण करणारा, शिकार करून पोट भरणारा माणूस हा आपल्या प्रारंभीच्या इतिहासाचा विषय. आतां प्रारंभीच्या इतिहासाची आणि भूगोलाची कशी सांगड घालाल तें सांगा. कोठें स्थानिक भूगोल आणि कोठें जागतिक इतिहास! स्थानिक इतिहास हा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांच्या आवाक्याबाहेरचा असतो. तो त्या शाळांत कोणी शिकतहि नाहीं आणि शिकवूं शकतहि नाहीं. कारण पुष्कळ स्थानांना स्थानिक असा इतिहासच नसतो. प्रारंभीं इतिहास–भूगोलांना जखडून एकत्र आणल्यास एक तर इतिहासावर अन्याय होईल किंवा भूगोलावर. कोणाचा तरी संसार उध्वस्त होईल, कोणाचा तरी क्रमप्राप्त विकास थांबेल आणि भलतेंच वळण घेईल.

तेव्हां इतिहास आणि भूगोल हे वेगळे विषय आहेत, त्यांचीं कार्यक्षेत्रें वेगळीं आहेत, त्यांच्या वाटा कोठें कोठें समांतर असतील पण वेगळ्या आहेत. एक, माणसाच्या विकासाची कहाणी सांगतो तर दुसरा तो विकास ज्या प्राकृतिक परिस्थितीशीं झुंजतांना किंवा मिळतें घेतांना किंवा शरण जातांना होत असतो त्या कर्मभूमीची ओळख करून देत असतो. एकांत संकलनाची (Synthesis) क्रिया, तर दुसऱ्यांत विकलनाची (Analysis). एवंच, दोन्ही विषयांना अलग ठेवावे आणि त्यांच्या वारंवार भेटी घडवून आणाव्या हेंच समंजसपणाचें होईल.

असे भेटीगाठीचे प्रसंग मात्र वारंवार आले पाहिजेत. जुन्या काळीं अन्नासाठीं

मनुष्य निसर्गावर अवलंबून असे. मध्ययुगांत सैन्यें घेऊन जायचीं तर नद्यांच्या आसऱ्यानेंच. प्रागैतिहासांत शिरलें तर मनुष्य किती परावलंबी–निसर्गावलंबी— होता हें पदोपदीं दिसून येतें. आर्य आपलीं गुरें आणि घोडे घेऊन सुखा-समाधानानें मध्य आशियाच्या पठारावर, कुरणांत शेंकडों, नव्हे हजारों वर्षें राहात असतील. पाऊस पडत होता. नद्यांत आणि ओढ्यांत भरपूर पाणी होतें. गुरांना चरण्यास मनमुराद चारा होता. लोकसंख्याहि बेताची होती तोंपर्यंत ठीक होतें. परंतु खिस्तपूर्व १९ व्या किंवा २० व्या शतकाच्या सुमारास अवर्षण पडलें, नद्या कोरड्या ठणठणीत पडल्या, गुरें मरूं लागलीं. या निसर्गाच्या प्रकोपापुढें आर्यांचा टिकाव लागला नाहीं. ज्याला जशी वाट दिसली तसा तो आपलीं बायकामुलें, गुरेंढोरें आणि घोडे घेऊन आपला मायदेश सोडून परागंदा झाला. कोणी आशिया मायनरमध्यें गेले, कोणी कॉकेशसच्या पायथ्याशीं थांबले. कोणी युफ्रेटीस आणि तैग्रीस या नद्यांच्या कांहीं एतद्देशीयांना जिंकून साम्राज्य स्थापून राहिले. कोणी उलट दिशेला इराणकडे वळले. तेथें कांहीं शतकें राहिले. तेथेंहि गुरांढोरांवरून, कुरणांवरून कदाचित् देवदैवतांवरून भांडणें जुंपलीं. भाऊबंदकी माजली. आणि म्हणून कांहीं जण इराणांतल्या भाईबंदांना सोडून भारतांत आले, आणि भारतीय बनले. याप्रमाणें भूगोलानें अक्षरशः आर्यांना आपल्या मायदेशां-तून उधळून लावलें. हा जुना इतिहास, या जुन्या भूगोलावांचून समजणार नाहीं.

आपल्या महाराष्ट्राचाच इतिहास घ्या. त्याला भूगोलानें किती प्रचंड मदत केली आहे. महाराष्ट्राचा डोंगराळ प्रदेश, त्यांतील डोंगरी किल्ले, त्याच्या दऱ्याखोरीं, त्याच्या खिंडी, त्याच्या इतिहासाच्या पाठीमागें उभ्या होत्या. २७ वर्षें महाराष्ट्राचा धारकरी औरंगजेबाविरुद्ध लढला तो या भूगोलाच्या मदतीनेंच. मराठ्यांचा गनिमी कावा हा ऐतिहासिक होता तसा भौगोलिकसुद्धां होता. तेव्हां महाराष्ट्राचा इतिहास शिकवितांना भूगोलाची पदोपदीं मदत घेतली पाहिजे, आठवण करून दिली पाहिजे.

इतिहासशिक्षकानें नेहमीं नकाशा वापरला पाहिजे. नकाशांत ऐतिहासिक स्थळें दाखवलीं पाहिजेत. नकाशा अर्थात् उठावाचा पाहिजे, वेगवेगळ्या स्थळां-मध्यें किती अंतर आहे तें मोजण्यास मुलांना शिकविलें पाहिजे. कोणतें स्थळ कोणत्या दिशेला आहे तें नकाशाच्या साह्यानें सांगितलें पाहिजे. त्याचप्रमाणें भूप्रदेशाचा चढउतार, नद्यांचीं खोरीं दाखविणारीं चित्रें मुलांना दाखवलीं

पाहिजेत. याशिवाय नेहमीं फळ्याचा उपयोग केला पाहिजे. फळ्यावर टिंबांच्या आणि रेषांच्या साहाय्यानें फौजा कोठून कोठें गेल्या तें दाखवावें. कोणत्याहि ऐतिहासिक घटनेचा विचार करतांना शिक्षकानें ती घटना जेथें घडली त्या ठिकाणच्या भौगोलिक वस्तुस्थितीची मुलांना जाण करून दिली पाहिजे.

यापेक्षां अधिक समन्वयाची इतिहासशिक्षकाकडून आपण अपेक्षा करूं नये. इतिहासाचा अभ्यासक्रम भूगोलाच्या शिक्षकाच्या सहकार्यानें करावा, त्याच्यांत योग्य ठिकाणीं, वेळोवेळीं भूगोलाची दखल घ्यावी, भूगोलशिक्षकाकडून कोणती मदत घ्यायची तें निश्चित करावें, आपण कोणती भौगोलिक माहिती सांगायची तें ठरवावें आणि एवढी पूर्वयोजना केल्यावरसुद्धां इतिहासाचे पाठ घेतांना प्रसंगोपात् ओघानें भूगोलाशीं समन्वय जुळवावा म्हणजे गंगेंत घोडे न्हाले. एवढें केल्यावर भूगोलानें भूगोलाची आणि इतिहासानें इतिहासाची वाट धरावी.

इतिहासाशीं सहज संबंध जुळून येतो असा दुसरा विषय म्हणजे भाषा. परवांपरवांपर्यंत इतिहासाला वेगळें अस्तित्वच नव्हतें. तो वाङ्मयाचा एक भाग होता. वाङ्मयाचे सारे गुणदोष त्याच्यांत आढळून येत होते. आतां शास्त्र बनल्याबरोबर इतिहासाची वाङ्मयापासून फारकत झाली. प्रश्न असा आहे कीं या दोघांना एकत्र आणायचें का आणि तें कसें. इतिहास हें शास्त्र आहे ही भूमिका स्वीकारणारे कांहीं लोक इतिहास आणि वाङ्मय यांच्यांत कोणत्याहि प्रकारचा समन्वय नको असें म्हणतात. ते म्हणतात, इतिहास हें शास्त्र आहे तर वाङ्मय ही कला आहे. दोघांचीं उद्दिष्टें वेगळीं, तोंडवळे वेगळे, दिशा वेगळ्या. दोघांना एकत्र आणण्यांत हंशील नाहीं. याच्या उलट इतिहासाचें परवांपर्यंत वाङ्मयाशीं जें जिव्हाळ्याचें नातें होतें त्याची आठवण जागी ठेवणारे लोक म्हणतात, इतिहास शास्त्र असेल, आम्हांला त्याच्याशीं कर्तव्य नाहीं. आम्हांला इतिहासापासून वाङ्मयानंद पाहिजे, रसास्वाद पाहिजे, भावनांचा परिपोष पाहिजे. इतिहास दुसरीं तिसरीं कामें करो वा न करो, हें वाङ्मयीन कार्य त्यानें केलेंच पाहिजे. पोवाडे, बखरी, ऐतिहासिक नवलकथा, नाटकें यांना इतिहासाच्या अध्यापनांत महत्त्वाचें आणि मध्यवर्ती स्थान पाहिजे.

या दोन्ही भूमिका आत्यंतिक आहेत. त्या दोन्हीहि आपल्याला पतकरायच्या नाहींत. इतिहास शास्त्र झालें म्हणून त्याचा कलात्मक आणि वाङ्मयीन आविष्कार करूं नये असें थोडेंच आहे? उलट पोवाडे, कादंबऱ्या, आणि नाटकें इतिहासाच्या

नांवाखालीं खपूं लागलीं तर ऐतिहासिक सत्याचा लोप होईल आणि इतिहास हें शास्त्र राहणार नाहीं. इतिहासाचा वाङ्मयाशीं समन्वय जोडायचा म्हणजे वाङ्मयाची निवड आणि पारख त्याच्यांतील ऐतिहासिक आशयावरून करावी लागेल. जें वाङ्मय ऐतिहासिक नाहीं तें टाकावें लागेल. तेव्हां या बाजूनें करावयाचा समन्वय उपकारक ठरणार नाहीं.

वाङ्मयाचा इतिहासाशीं अनुबंध जमवायचा म्हणजे नक्की काय करायचें? ऐतिहासिक वाङ्मयांत वाङ्मय मुख्य असतें आणि ऐतिहासिक हें विशेषण त्यावर अवलंबून असतें. तेव्हां पोवाडे, बखरी, ऐतिहासिक नाटकें, कादंबऱ्या अशा ऐतिहासिक वाङ्मयाचा इतिहासशिक्षकानें अवश्य उपयोग करावा, परंतु त्यांना इतिहासाची जागा देऊं नये. इतिहासाचा पाठ दिल्यावर अवांतर वाचनासाठीं ग्रंथालयामधून त्या पाठाशीं संबंध असलेलीं नाटकें इत्यादि पुस्तकें मुलांना वाचायला द्यावींत. पाठ देतांनासुद्धां या वाङ्मयीन साधनांचा केव्हांहि उपयोग करतां येईल. पाठाची प्रस्तावना म्हणून एखादा बखरींतला मजेदार उतारा वाचून दाखवितां येईल. पोवाडा म्हणून दाखवितां येईल. किंवा पाठ चालू असतां योग्य ठिकाणीं अशा साधनांचा उपयोग करतां येईल. शिवाजीमहाराजांचें सारें चरित्र सांगून झाल्यावर कवि गोविंदांचा शिवाजीचा पोवाडा वर्गात अवश्य म्हणून दाखवावा आणि मुलांना तो पाठ करण्यास लावावा. याप्रमाणें ऐतिहासिक वाङ्मयाचा उपोद्घात म्हणून, दाखला म्हणून किंवा अवांतर वाचन म्हणून इतिहासाच्या पाठांत उपयोग केल्यास वाङ्मयाचें सामर्थ्य इतिहासाच्या मदतीला खास येईल.

इतिहासाशीं कधीं कधीं हस्तव्यवसाय या विषयाचा समन्वय करण्यांत येतो. या समन्वयाला फार मर्यादा आहेत. आणि त्याचा व्याप बेताचाच आहे. बहुधा लहान मुलांच्या बाबतींतच हा समन्वय करीत असतात. मुलांना हस्तव्यवसाय फार आवडतो. आपल्या हातानें चिकणमाती, कागद किंवा पुठ्ठा यांच्या अनेक वस्तु तयार करण्यांत मुलांना निर्मितीचा आनंद मिळत असतो. या त्यांच्या सृजनशक्तीचा इतिहासाच्या साधनेसाठीं उपयोग करतां येईल. अलीकडे ऐतिहासिक किंवा भौगोलिक चित्रांचे आराखडे असलेलीं पुस्तकें मिळतात. मुलांना अशा आराखड्यांत योग्य ते रंग भरण्यास सांगावें. त्याचप्रमाणें साधीं सोपीं ऐतिहासिक चित्रें काढण्यासहि त्यांना उत्तेजन द्यावें. डोंगराचा माथा, आणि त्यावर

असलेला किल्ला लहान मुलें आपल्या परीनें सहज काढूं शकतात. शिवाय कागद आणि पुठ्ठा घेऊन ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृति बनविणें किंवा कागद कापून ऐतिहासिक व्यक्ति आणि वास्तु यांच्या प्रतिकृति तयार करणें या कृतिसुद्धां प्राथमिक शाळांत मुलांना करतां येण्यासारख्या आहेत. माध्यमिक शाळांत यापेक्षां वरच्या दर्जाचें हस्तव्यवसायाचें काम मुलांना सांगतां येईल. मुलें दिवाळींत किल्ले तयार करतात, त्यांवर तोफा ठेवतात, त्यांवर जाण्यास वाटा तयार करतात. हें सर्व माध्यमिक शाळांतील वर्गांना करतां येण्यासारखें आहे. तथापि, एकंदरीनें माध्यमिक शाळांत ऐतिहासिक हस्तव्यवसायाला फारसें स्थान नाहीं हें मात्र खरें.

दुसरा एक विषय इतिहासाशीं जुळता आहे. तो म्हणजे नागरिकशास्त्र. हें शास्त्र अलीकडेच जन्माला आलें आहे आणि बाळसें धरूं लागलें आहे. अमेरिकेंत तर तें चांगलेंच वाढीला लागलें आहे आणि स्वतःच्या पायानें चालूं लागलें आहे. नागरिकशास्त्र आरंभीं इतिहासाचाच एक भाग होता. आजहि एका अर्थानें तें तसेंच आहे. पण त्यानें इतिहासापासून फारकत घेतली आहे. त्याचा व इतिहासाचा समन्वय कसा काय जुळतो तें पाहूंया.

नागरिकशास्त्र म्हटलें म्हणजे तीन गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या राहतात.

(अ) नागरिकशास्त्र म्हणजे राज्यकारभाराचें वर्णन.

(ब) नागरिकशास्त्र म्हणजे राज्यघटना कशी कशी क्रमाक्रमानें विकास पावली आणि आजच्या स्थितिप्रत येऊन पोहोंचली त्याचा इतिहास.

(क) नागरिकशास्त्र म्हणजे आधुनिक समाजांत व्यक्तींचीं कार्यें व अधिकार यांचें शास्त्र.

आधीं आपण (ब) घेऊं या. राज्यघटनेचा उगम आणि विकास शोधायचा हें इतिहासाचें अनेक क्षेत्रांपैकीं एक क्षेत्र आहे. कांहीं इतिहासकारांच्या मतें इतिहासाचें हें एवढेंच कार्य व क्षेत्र आहे. दुसऱ्या क्षेत्रांशीं इतिहासाला कर्तव्य नाहीं. या राजकीय क्षेत्राव्यतिरिक्त सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक या क्षेत्रांचीहि इतिहासाला दखल घ्यावी लागते. राज्यघटनेचा उगम व विकास या अर्थानें नागरिकशास्त्राचा इतिहासाशीं समन्वय जुळविण्याचा प्रश्नच उरत नाहीं. तें इतिहासाचें घरचेंच काम आहे; किंबहुना इतिहासाचाच तो एक भाग आहे.

( अ ) प्रचलित राज्यपद्धति व कारभार यांचें मुलांना ज्ञान द्यावयाचें हें वास्तविक इतिहासाचें काम नाहीं. तो एक स्वतंत्र विषय होतो. इतिहास वर्तमानकाळ समजून घेण्यासाठीं भूतकाळाकडे जात असतो. त्याला वर्तमानकाळांत असा रस नाहीं. तथापि वरील (अ) आणि (ब) ची सांगड घालतां येईल. राज्यघटना कसकशी बदलत व विकास पावत गेली हें दाखवून झाल्यावर वर्तमानकाळांत ती कशी आहे याची मुलांना नीट समजूत द्यावी. मुलांना ज्या राज्यपद्धतीखालीं पुढें नांदावयाचें आहे आणि नागरिक म्हणून आपलें कर्तव्य बजावावयाचें आहे तिचें शास्त्रशुद्ध ज्ञान मिळालेंच पाहिजे.

राहतां राहिलें सर्वंकष असें नागरिकशास्त्र. याचा अमेरिकेंत मोठा व्याप झाला आहे आणि अनेक शास्त्रांची जुजबी माहिती त्यांत समाविष्ट झाली आहे. त्या देशांत हा एक स्वतंत्र विषय गणला गेला असून तो सहासात वर्षें शिकविण्यांत येतो. आपण ज्या गांवांत किंवा शहरांत राहतो तें आपल्या कल्याणासाठीं काय काय गोष्टी करतें याची क्रमशः आणि निरीक्षण पद्धतीनें मुलांना माहिती देण्यांत येते व आपण या समाजांत कसें वागलें पाहिजे, काय काय गोष्टी करतां कामा नये याची नीट समज देण्यांत येते.

लहान मुलांना आपल्या कुटुंबांतील, शाळेंतील आणि गल्लींतील एक घटक या नात्यानें आपलें कर्तव्य काय याची जाण देण्यांत येते. पुढें आरोग्यखातें, शिक्षणखातें, उपवन–खातें, आगीपासून बचाव करण्याचें खातें, शांतता ठेवणारें पोलीसखातें, इत्यादि स्थानिक खात्यांच्या कामाची माहिती देण्यांत येते व त्या खात्यांशीं आपण सहकार्य कसें व कां करावें हें समजून देण्यांत येतें. यापुढें दूध, पाणी, अन्न, भाजीपाला, घरें, मंडया, बाजार, यांची माहिती देण्यांत येते. ‘ पाणी ’ या सदराखालीं तें कोठून येतें, आपल्या घरीं कसें आणलें आहे, तें स्वच्छ व शुद्ध राहावें यासाठीं काय खबरदारी घेण्यांत येते, आपण काय खबरदारी घ्यावी, पाण्यासाठीं कां खर्च करावा लागतो हें सर्व सांगण्यांत येतें. ‘ घरें ’ या सदराखालीं घरांतील उजेड, हवा, उष्णता, गॅस, वीज, टेलिफोन, यांची सोपी पण शास्त्रीय माहिती देण्यांत येते. याशिवाय मुलें रस्ते साफ करणें व ठेवणें, सांडपाण्याची विल्हेवाट, खरकटें व केरकचरा यांची वासलात, आरोग्यखात्याचीं कामें, संसर्गजन्य व इतर रोग, त्यांचे परिणाम, तें टाळण्याचे

उपाय, वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छतेचें महत्त्व या सर्व आरोग्य शास्त्राखालीं मोडणाऱ्या बाबी येतात.

ही नुसती चुणुक दिली. या शास्त्रांत आणखी कितीतरी येतें इतकें तें ऐसपैस आहे. अमेरिकन लोक हौशी व प्रयोगशील आहेत. त्यांनीं नागरिकशास्त्र या नांवाखालीं एक टोलेजंग समाजशास्त्रच उभारलें आहे. त्यांत रसायन, पदार्थविज्ञान, अर्थ, जीव, मानस, राज्य, अर्थ, भूगोल अशा कितीतरी शास्त्रांतील अवश्य ते भाग आणले आहेत.

हा अमेरिकन माल आपण आयात करावा काय? अमेरिकन गांवांप्रमाणें आपलीं गांवें आधुनिक नाहींत. सार्वजनिक खात्यांचा तेथें अद्याप शिरकाव झाला नाहीं. तथापि आपल्याला या अमेरिकन प्रयोगापासून पुष्कळच शिकण्यासारखें आहे. आपल्या गरजा व मर्यादांप्रमाणें अवश्य ते फेरफार करून या नागरिकशास्त्राचा आपण अवश्य स्वीकार करावा. अनेक शास्त्रें व शालेय विषय यांनीं आपापला करभार देऊन निर्माण झालेला हा सर्वव्यापी विषय एक प्रकारें जीवनशिक्षणाचा एक यशस्वी प्रयोग आहे. यांत मुळीं अभ्यासक्रमांतच नाना विषयांचा समावेश केल्यामुळें ओढून ताणून समन्वय करण्याचें प्रयोजन उरत नाहीं. अभ्यासक्रमच अनुबद्ध आहे. अशा विषयाचा इतिहासाशीं काय समन्वय करणार? तो अभ्यासक्रम करतांनाच होणार आणि तेंच योग्य आहे.

● ● ●

## प्रकरण अठरावें

# जीवन–शिक्षण व समन्वय

हें इतिहासाच्या अध्यापनावरचें पुस्तक आहे. यांत नवरामुलगा इतिहास आणि म्हणून त्यालाच बोहोल्यावर चढविलें आहे. बाकीचे सारे वऱ्हाडी. या दृष्टीनेंच मागील प्रकरणांत इतिहासाचा इतर कोणत्या शालेय विषयांशीं कशा प्रकारें समन्वय होऊं शकतो याचाच विचार केला.

तथापि अलीकडे आपल्या प्राथमिक शाळांत मूलोद्योगशिक्षणाचा प्रवेश झाला आहे व त्याची वाढ होत आहे. या शिक्षण–पद्धतींत समन्वयाला पूर्वीपेक्षां आगळेंच असें स्थान मिळालें आहे. तेव्हां या शिक्षणांत इतिहास हा विषय कसा समन्वित करावा याचा थोडक्यांत विचार करूं.

मूलोद्योगशिक्षणाला अलीकडे जीवनशिक्षण म्हणूं लागले आहेत. एका दृष्टीनें तें योग्यच आहे. कारण उद्योग हेंच मूळ कल्पून त्याच्यांतून सामान्य शिक्षणाचा प्रपंच करावयाचा हें काम कठीण होते. जीवन–शिक्षण ही संज्ञा त्या मानानें लवचिक व व्यापक आहे आणि शिक्षण हें पुस्तकी नसावें, जीवनानुगामी असावें, हें उद्दिष्ट त्यांत अभिप्रेत होतें.

जीवन–शिक्षण हा शब्द आपण नीट तपासला पाहिजे. त्याचे तीन अर्थ संभवतात.

( अ ) जीवन हेंच शिक्षण.

( ब ) जीवनाचें म्हणजे जीवनोपयोगी शिक्षण.

( क ) जीवनद्वारां शिक्षण.

जॉन डुई या प्रतिभावान तत्त्वज्ञाला पहिला अर्थ अभिप्रेत होता. त्यानें संकल्पिलेल्या प्रॉजेक्ट मेथड या शिक्षणपद्धतींत तोच अर्थ अनुसरला होता.

**प्रत्यक्ष जीवन जगतांना जे जे अनेकविध अनुभव येतात त्यांचा परिपाक म्हणजेच शिक्षण.** मूल जीवन जगतां जगतां धडपड करीत पडत झडत रांगूं लागतें, उभें राहतें, चालूं लागतें, पळूं लागतें; बोबडें बोलतां बोलतां स्पष्ट शुद्ध बोलूं लागतें. हेंच शिक्षण. विस्तवाला हात लावतांच तो भाजला-वेदना झाल्या. अनुभव आला. परत हात विस्तवाकडे गेला नाहीं. हेंच शिक्षण.

या शिक्षणक्रमांत वेळापत्रकें, आयतां पूर्वीच तयार केलेला अभ्यासक्रम या गोष्टी संभवत नाहींत. डुईनें आपल्या शिक्षणपद्धतींत या गोष्टींना मज्जाव केला होता.

जीवन हेंच शिक्षण— ही गरुड झेप आहे. एखाद्या वॉल्ट व्हिटमनला, थोरोला, वर्डस्वर्थला ती साधेलहि. हे महात्मे आपल्या मुलांना निसर्गाच्या हवाली करून मोकळे होतील. निसर्ग हीच शाळा, हाच गुरु. निसर्गजीवन व त्यांतून शरिराला, मनाला आणि हृदयाला मिळणारें अनुभव हेंच शिक्षण.

पण हें आम्हां सामान्य माणसांना जमणार नाहीं. आम्ही शाळा बांधून चुकलों, अभ्यासक्रम तयार करून छापून चुकलों. आम्ही शाळेबाहेर घंटा टांगली, आंत वेळापत्रक टांगले. आम्हांला जीवन हेंच शिक्षण हें मानवणार नाहीं. तो आमचा आदर्श, तें आमचें दुरून दिसणारे व आम्हांस आवाहन करणारें ध्येय राहील. ती आमची प्रेरणा राहील. बंदिस्त शाळागृहांत शिकवितांना आम्ही जीवनास विसरणार नाहीं, पुस्तकाला जीवनापेक्षां श्रेष्ठ मानणार नाहीं.

(ब) दुसरा अर्थ जीवनाचें शिक्षण म्हणजे जीवनाची तयारी करून देणारें शिक्षण.

येथें एक खवचट प्रश्न विचारतां येईल. मुलांची जीवनाची तयारी करून द्यायची म्हणजे तीं आज जें जगतात तें मग आहे तरी काय ? जीवन कां दुसरें कांहीं ? पण हा नुसता अर्थवाद झाला. जीवनासाठीं शिक्षण याचा एवढाच अर्थ घ्यावयाचा कीं समाजांत जें जीवन पुढें जगायचें आहे, त्यासाठीं मुलांची पूर्वतयारी करून द्यायची. आतां या मुलांना विस्तवाजवळ नेऊन त्यांचा हात चांगला खरपूस भाजवून त्यांना विस्तवाच्या दाहकतेचा अनुभव देण्याचें कारण नाहीं. त्यांच्या कांहीं हजार वर्षांपूर्वीच्या बापजाद्यांचा कच्चे मास भाजतांना हात भाजला होतां व ते सांगून गेले, 'बाबांनो, विस्तवाच्या वाटेस जाऊं नका. असा हात भाजतो. हम बिगरे, तुम बिगरो न भाई.'

मागील पिढ्यांना आलेले हे व असले अनंत अनुभव, त्यांनीं मिळविलेले अनेक प्रकारचें ज्ञान हें आपल्या मुलांचें पूर्वसंचित आहे. त्या ज्ञानाचा व अनुभवांचा त्यांना वारसा मिळाला आहे. परत त्यांना 'नवी विटी, नवें राज्य' खेळायास नको. पूर्वज थांबले त्याच्यापुढें त्यांना जायचे आहे. परत पहिल्यापासून आरंभ करायचा नाहीं.

म्हणूनच शिक्षण म्हणजे मुलांना जीवनप्रवाहांत मोकाट सोडणें नाहीं. त्यांच्या-पूर्वीं व्यतीत झालेल्या जीवनाचा वारसा, अनुभवांची ज्ञानांची कलांची शिदोरी त्यांच्या पदरांत टाकून त्यांना वाटचाल करण्यास समर्थ करणें म्हणजेच जीवन–शिक्षण.

आतां या संदर्भात जीवन–शिक्षणाच्या तिसऱ्या अर्थाकडे वळूं या. जीवनाच्या मार्फत शिक्षण. येथें जीवन आणि शिक्षण या भिन्न वस्तु झाल्या. ही समीपता अगर सलोकता मुक्ति. जीवन हेंच शिक्षण येथें सायुज्यता मुक्तीचा – परमोच्च मुक्तीचा – लाभ होता. तेथें द्वैत नव्हते. शिक्षण जीवनांत विरघळून गेलें, जशीं दुधांत साखर; तादात्म्य पावलें, जीवनच झालें.

वेळापत्रक आणि अभ्यासक्रम यांबरहुकूम चालणाऱ्या आमच्या शाळांत 'सायुज्यता' नसली तरी समीपता अवश्य असावी. म्हणजे या बंदिस्त शिक्षण-क्रमाला शक्य तितक्या वेळां शक्य तितक्या प्रकारें जीवनाच्या **जवळ** आणावें.

शिक्षणाला जीवनाच्याजवळ आणायचें म्हणजेच त्याचा जीवनाशीं **समन्वय** करायचा, त्याचें जीवनाशीं लागेबांधे जुळवायचे; मुलांना मधून मधून प्रत्यक्ष जीवन जगायला लावून, रसरशित ताजा जीवनानुभव देऊन त्याच्या आधारावर-पायावर– ज्ञानाचें कलेचें मंदिर उभारायचे. असें केलें म्हणजे तें मंदिर त्रिशंकूनेंच राहण्याची गंधर्वनगरी होणार नाहीं. जमिनींत भक्कम पायावर उभारलेला किल्ला होईल. याचसाठीं मुलांना शाळांबाहेर सहलींना न्यायचें, त्यांना डोंगरदऱ्या, झाडेंवनस्पति, नद्यानाले शेतेमळे, पशुपक्षी यांचे अनुभव द्यायचे व मग या अनुभवांच्या **कच्च्या मालमसाल्याचें** वर्गात तर्कशुद्ध व्यवस्थित असे **पक्वान्न** बनवायचे.

याचसाठीं जगांतल्या किंवा आपल्या देशांतल्या मोठ्या माणसांच्या जयंत्या, उत्सव, मनोभावानें साजरें करायचे; शाळागृह शृंगारायचे, पताका–निशाणें फडकवायचीं, तोरणें बांधायचीं, छानदार सडासंमार्जन करायचें, सुंदर रांगोळ्या

काढायच्या, त्या महात्म्याच्या जीवनावर सुंदर नाट्य रचायचें व साजरें करायचें, गोडगोड खायचें, छान छान कपडे घालायचे अन् हंसायचें, खेळायचें. या व अशा सांस्कृतिक माध्यमांच्या द्वारें मुलांचीं मनें व हृदयें जागीं करायचीं, विशाल करायचीं आणि मग या **गरमागरम** मसाल्याची वगींत पाक ( पाठ ) निष्पत्ति करायची.

जीवनशिक्षणांत समन्वय, समवाय अनुबंध म्हणतात तो हाच. मागील प्रकरणांत दोन किंवा अधिक विषयांचा समन्वय कसा व कां साधायचा तें सांगितलें. जीवन हे शिक्षणांत अनुषंगिक समन्वय अभिप्रेत आहेतच. परंतु जीवन-शिक्षणांत खराखुरा समन्वय म्हणजे जीवनाशीं लागेबांधे जोडायचे-मुलांना जीवनाच्या जवळ न्यायचें- थोडा वेळ त्यांना त्या प्रवाहांत बुचकळून काढायचें- नव्हे त्यांनाच त्यांत डुंबूं द्यायचें.

हा जीवन-समन्वय सहज झाला पाहिजे. तो ओढून ताणून आणायचा नसतो. कारण जीवन सहज असतें, सरळ असतें. समन्वयांचें वेडेवांकडे तंत्र तयार करून तारेवरचा नाच करायचा नाहीं, कोलांट्या उड्या मुलांसमोर मारायच्या नाहींत, समन्वय **शक्य** झाला तरी तो **अवश्य, अपरिहार्य** असला पाहिजे. सरावानें कोलांट्या शक्य होतात, पण त्या अवश्य असतातच असें नाहीं.

मीं जीवन-शिक्षणाचे पुष्कळ पाठ पाहिले आहेत, त्यांहूनहि अधिक पाठांचीं टांचणें पाहिलीं आहेत. या पाठांत समन्वय आणि विषयप्रवेश (प्रस्ताव, उपोद्घात) यांत गल्लत झालेली दिसली. ‘कोरिलेशन’ व ‘मोटिव्हेशन’ हीं अलग आहेत. मोटिव्हेशन ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया आहे. मुलांना पाठ द्यायचा तो एकदम, त्यांच्या मनाची तयारी न करतां, धसमुसळेपणानें द्यावयाचा नाहीं. आपण दोन अपरिचित माणसांचा जसा आधीं परिचय करून देतों, त्याप्रमाणें मुलांना या नव्या पाठाचा आधीं परिचय करून द्यायचा असतो. त्याचे अनेक प्रकार आहेत व ते अध्यापनशास्त्राच्या पुस्तकांत तुम्हांला वाचायला मिळतील. कधीं आपण मुलांचें पूर्वज्ञान जागृत करून त्याच्याशीं या नव्या पाठाची सांगड घालून मग पाठाला सुरुवात करतों; कधीं मागील पाठाची उजळणी करून पुढें चालूं लागतों; कधीं सुंदर चित्र दाखवून. कवितेच्या पाठांत तर आपण कोणतांच द्राविडी प्राणायाम न करतां बहुधा कविता एकदां दोनदां म्हणून सुरवात करतों; कवितेचा परिचय करून देण्याच्या भानगडींत आपण पडत

नाहीं. कविता सुंदर असली तर तिची आणि मुलांची नुसती रुजवात घालून दिली म्हणजे आपलें काम भागतें. तीं दोघें मग आपलें पाहून घेतात.

तथापि सामान्यतः आपण नवा पाठ घेण्यापूर्वी 'विषय–प्रवेश' करतों, परिचयविधि करतों. यालाच इंग्रजींत motivation म्हणतात. याचा जीवन-शिक्षणांतल्या समन्वायाशीं कांहीं संबंध नाहीं. जीवन–समन्वयांत आपण कधीं कधीं **पाठानंतरसुद्धां** जीवनाच्या जवळ जाऊं शकतों. कधीं जीवन शिक्षणाकडे येते, तर कधीं शिक्षण जीवनाकडे. तेव्हां विषयप्रवेशाला–परिचयाला समन्वय–समवाय समजून वेडेवाकडे पाठ देऊं नयेत.

समवाय करा अशी तुमच्यावर सक्ति नाहीं. अनेक पाठांत समवायाची जरूरी नसते. पाठांचे अनेक विषय इतके समर्थ असतात, इतके अर्थवाही असतात, इतके 'जिवंत' (म्हणजेच जीवनांत डुंबलेले) असतात कीं त्यांना ओढून ताणून जीवनाकडे नेण्याचें प्रयोजन नसतें. ते साक्षात् जीवनच असतात. शिवछत्रपति हें आपलें मराठ्यांचें जीवन आहे. भगवान बुद्ध, महात्मा गांधी साऱ्या भारताचें जीवन आहे. त्यांचा वर्गात सहृदयतेनें आणि कुशलतेनें मुलांना परिचय करून देणें म्हणजेच त्यांना जीवन–दर्शन घडविणें होय. **एवंच, विषयप्रवेशाला समन्वय समजूं नये. जीवन-शिक्षणांत समन्वय हा झालाच पाहिजे असेंहि समजूं नये.**

या जीवन–शिक्षणांत इतिहासाची काय वाट? आपण इतिहासाचें उद्दिष्ट स्वीकारलें आहे तें लक्षांत घ्या. आपण इतिहास शिकतों व शिकवितों तो आपली एक तांतडीची गरज भागविण्याकरितां. आपण ज्या समाजांत जन्मलों, वावरतों तो बहुरूपी आहे. त्याचीं अनेक अंगें आहेत, समस्या आहेत, दुखणीं आहेत. या सर्वांचा नीट उकल केल्याखेरीज आपल्याला आपलें जीवन जगतां येणार नाहीं. चुका होतील, धक्के खावे लागतील, हारहि खावी लागेल. इतिहासाचा अभ्यास येथें आपलें संरक्षण करतो, आपल्याला यशस्वी रीतीनें जीवनाभिमुख करतो. बापजाद्यांच्या चुका दाखवून जागरूक करतो. बापजाद्यांचें वैभव, पराक्रम, उदात्त विचार व आचार यांची शिदोरी जवळ देऊन भविष्यकाळची वाटचाल करण्यास बळ आणि हुरूप देतो. जीवन–शिक्षणांत इतिहासाला महत्त्वाचें स्थान आहे. इतर विषयांना जीवनाकडे कसेंबसें न्यावें लागेल.

इतिहास हें प्रत्यक्ष जीवन आहे, गतकाळचें मेलेलें, पुरलेलें जीवन नाहीं. गतकालचें टिकलेलें आपल्याभोंवतीं उभें असलेलें जीवन.

या जीवनवादी इतिहासाला समन्वयाची जरूर आहे काय? अवश्य आहे. इतिहासांतलें हें जीवन जुनें आहे, मुलांना अपरिचित आहे. आपण जीवन-शिक्षणांत या जुन्या जीवनाला परत जागें केलें पाहिजे, मुलांना त्या जुन्या वातावरणांत परत जयंत्या, उत्सव, नाट्य, पोवाडे, कलानिर्मिति यांच्या साधनांनीं नेलें पाहिजे व (सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे) या जुन्या इतिहासाचा वर्तमान-काळाशीं समन्वय केला पाहिजे.

● ● ●

## प्रकरण एकोणिसावें

# इतिहासाची परीक्षा

परीक्षा म्हणजे एकंदरीनें वाईटच. त्यांतल्या त्यांत इतिहासाची परीक्षा फार वाईट. गणिताचा पेपर मी कोरा देऊन येत होतों, पण समाधानी होतों. गणित येतच नव्हतें तर पेपर सुटणार कसा? कोरा द्यावा आणि घरीं येऊन खेळांत गुंतावें. पण इतिहासाचा पेपर अपुरा राहिला (आणि तो तसा नेहमींच राहात असे) म्हणजे मनाला चुटपुट लागायची. सारें येत होतें, पण सारें लिहायला वेळ पुरत नसे.

नुसतें परीक्षा वाईट म्हणून भागायचें नाहीं. तिला आज तरी दुसरा पर्याय नाहीं. कोठें कोठें तिचा राज्यविस्तार कमी केला आहे, अधिकारक्षेत्र मर्यादेंत आणलें आहे; परंतु परीक्षेला अजून कोणीं काढून लावलें नाहीं. तेव्हां परीक्षा हद्दपार करतां येईल किंवा नाहीं हा शुष्कवाद भविष्यकालाकडे सोपवून सध्यां या बयेचीं नखें काढून तिला निरुपद्रवी कसें करायचें, इतकेंच नव्हे तर तिला शिक्षणाचें एक प्रबल साधन कसें बनवायचें, याचा विचार तुमच्या माझ्यासारख्या समंजस माणसांनीं केला पाहिजे. तुम्हांला मीं समंजस म्हटलें आहे, तेव्हां पुढें मी जें सांगणार तें सारें तुम्हांला मंजूर असणारच!

नखें मात्र अवश्य काढलीं पाहिजेत. फार वाढलीं आहेत तीं. मुलांना रक्तबंबाळ करतात.

या बाबतींत एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. परीक्षा ही शाळेच्या अंतर्गत कामकाजांतलीच एक बाब आहे. ती पाहुणी नाहीं, घरची आहे. तिनें घरच्यासारखेंच वागलें पाहिजे आणि तिला सोपविलेलें घरचें काम बिनतक्रार केलें पाहिजे.

म्हणजे काय? म्हणजे असें. शाळेंत आणि वर्गांत आपण अनेक गोष्टी करतों. पाठ्यपुस्तक वाचतों, प्रश्न विचारतों, फळा वापरतों, चित्रें दाखवतों, गृहपाठ देतों आणि मधून मधून शिकविलेल्या भागाची उजळणी करतों. बस्स. परीक्षा म्हणजे उजळणी, दुसरें तिसरें कांहीं नाहीं. उजळणीचें महत्त्व साक्षेपी शिक्षकास सांगावयास नको. तो नवा पाठ घेण्यापूर्वी मागील पाठावर प्रश्न विचारतो, इतकेंच नव्हे तर नवा पाठ शिकवून झाल्यावर शेवटच्या पांच सात मिनिटांत त्याच्यावर प्रश्न विचारतो व जें शिकविलें तें मुलांना समजलें कीं नाहीं याची खात्री करून घेतो. मधून मधून तो महिना पंधरा दिवसांनीं तोंडीं किंवा लेखी उजळणी घेतो. या सार्‍या एका अर्थानें परीक्षाच आहेत आणि यांचें उद्दिष्ट एकच आहे; जें शिकविलें तें मुलांना समजलें कीं नाहीं याची तपासणी करायची.

परीक्षांना असे स्वाभाविक रूप येण्यासाठीं तिच्यांत पुष्कळच बदल केले पाहिजेत.

पहिला बदल : जें शिकविलें त्याचीच परीक्षा घेतली पाहिजे; भलत्या सलत्याची नाहीं. पुष्कळ परीक्षकांना मुलांना खिंडींत गाठण्याची हौस असते. ते आडवळणी अपरिचित प्रश्न विचारतात. हें बरें नाहीं. लहान मुलांच्या बाबतींत तर त्यांना ज्या पद्धतीनें शिकविलें त्या पद्धतीनेंच त्यांची परीक्षा घ्यावी. उदाहरणार्थ, त्यांना जर इतिहास गोष्टींच्या रूपानें शिकविला असेल तर त्यांना गोष्टीच विचाराव्यात कथन ( narration ), करण्यास सांगू नये.

हें शक्य होण्यासाठीं उत्तम मार्ग म्हणजे ज्यानें शिकविलें तोच परीक्षक असावा; निदान त्याचा परीक्षकांत समावेश व्हावा व पेपर काढतांना त्याच्या सूचनांचा योग्य विचार व्हावा.

दुसरा बदल: वार्षिक परीक्षा व बढती हे प्रश्न अलग ठेवावेत. बढती वार्षिक परीक्षेच्या परिणामावर अवलंबून ठेवूं नये. परीक्षा हें शैक्षणिक साधन आहे तर बढती ही कारभाराची बाब आहे. हें खरें असलें तरी आज तरी परीक्षा व बढती यांचे संबंध दृढ आहेत. यांत पुष्कळच सुधारणा करतां येण्यासारखी आहे. वर्षभर शिकविलें तें तीन तासांत कागदावर कसें उतरतां येईल? या तीन तीन तासांच्या दिव्यावर मुलांचें नशीब अवलंबून ठेवायचें हा निव्वळ निर्दयपणा आहे.

यांत बदल झाला पाहिजे. वार्षिक परीक्षा ही अनेक परीक्षांपैकीं एक

समजण्यांत यावी. आपण तिमाही परीक्षा घेतों. त्यांतली शेवटची परीक्षा म्हणजे ही वार्षिक परीक्षा. या चारहि परीक्षांच्या गुणांची दखल घेतली पाहिजे.

याशिवाय वरच्या वर्गांच्या बाबतींत दर तिमाहीला घरून लिहून आणण्यास एक निबंध द्यावा. हा निबंध लिहिण्यासाठीं मुलांना पाठ्यपुस्तक तर वाचलेंच पाहिजे, परंतु त्याखेरीज एकदोन तरी अवांतर पुस्तकें वाचावीं लागतील, अशी व्यवस्था असावी. अशा पुस्तकांचा शिक्षकानें आधींच निर्देश करावा. अर्थात् हे तिमाही निबंध सर्वच विषयांना चालायचे नाहींत. इतिहासाला अवश्य चालतील. भूगोल आणि भाषा विषयांनासुद्धां उपयोगी पडतील.

याप्रमाणें तिमाही परीक्षांचे आणि तिमाही निबंधांचे गुण एकत्र करूनच मुलांची त्या त्या वर्षांतील प्रगति निश्चित करावी. या प्रगतीच्या आधारेंच त्यांची बढती ठरवावी, म्हणजे वार्षिक परीक्षेला जें आज भलतेंच महत्त्व प्राप्त झालें आहे तें नाहींसें होईल आणि तिला तिचें स्वाभाविक स्थान मिळेल.

परीक्षेमध्यें विशेष बदल करावयाचा तो प्रश्नांमध्यें. खरीं नवें तींच आहेत. हे प्रश्नच बोचकारे घेत असतात, घायाळ करीत असतात. अलीकडे पंधरा वीस वर्षांपासून आपल्याकडे या बाबतींत बरीच सुधारणा झाली आहे, हें कबूल केलें पाहिजे. परंतु अद्याप पुष्कळ सुधारणा करण्यासारखी आहे. या क्षेत्रांत प्रयोग झाले पाहिजेत. त्यांच्या परिणामाची मोजदाद केली पाहिजे. आपण कोट्यवधि रुपये शिक्षणावर खर्च करतों. अर्धीं अधिक मुलें जर नापास होत असतील, त्याच त्या वर्गांत रेंगाळत असतील तर आपण आटोकाट प्रयत्न करून आपल्या अध्यापन-पद्धतीची व परीक्षा-पद्धतीची तपासणी केली पाहिजे.

सध्याच्या परीक्षेंत मुलांना सामान्यतः सहा निबंध लिहिण्यास सांगतात. निदान कांहीं वर्षांपूर्वीं तरी तशी स्थिति होती. इतिहासाची परीक्षा विशेषतः याच प्रकारची असे. इतर विषयांत कमीजास्त फरक असत. परीक्षेच्या या निबंधपद्धतींत खालील दोष आढळून येत.

(अ) केवळ सहा निबंध लिहावे लागत असल्यामुळें विषयाच्या संपूर्ण ज्ञानाची परीक्षा होत नाहीं. वर्गांत जें शिकविलें त्यापैकीं फार थोड्या गोष्टींची परीक्षा होते.

(ब) इतिहास किंवा भूगोल या विषयांच्या परीक्षेंत निबंधवजा प्रश्न असले तर विषयज्ञानाबरोबरच किंवा कदाचित् त्यापेक्षांहि भाषाज्ञानाला महत्त्व मिळतें. म्हणजे अशा परीक्षापद्धतींत विषयापेक्षां भाषेच्या ज्ञानाची परीक्षा होते.

( क ) निबंधवजा परीक्षेंत घोकंपट्टीचा फार धोका आहे.

हे तिन्ही दोष बऱ्याच अंशीं खरे आहेत. मुलांना परीक्षेंत निबंध लिहायचे असले म्हणजे साहजिकच थोड्या मुद्द्यांविषयींच्या ज्ञानाची त्यांची परीक्षा होते. विषयाच्या सर्व बाजूंची चांचणी घेण्यास सहा प्रश्न पुरे पडत नाहींत. त्याच-प्रमाणें इतिहासामध्यें व बऱ्याच प्रमाणांत भूगोलामध्यें निबंधवजा प्रश्न ठराविक साच्याचे येतात. मराठेशाहीच्या अस्ताचीं कारणें, मोगल रियासतीच्या अस्ताचीं कारणें, तिसऱ्या पानपतच्या युद्धांतील पराभवाचीं कारणें, '५७ च्या उठावाचीं कारणें, ऐतिहासिक व्यक्तींचीं परस्परांशीं तुलना, असे आणि अशा प्रकारचे प्रश्न साचेबंद होतात. शिक्षक मुलांच्याकडून अशा प्रश्नांचीं उत्तरें तोंडपाठ करून घेतात. शिक्षकांच्या आणि मुलांच्या मदतीस तत्परतेनें धांवणारे विद्यार्थ्यांचे वाटाडे, मित्र, मार्गदर्शक (काय पण मार्ग दाखवितात!) अशा ठराविक प्रश्नांवर प्रश्नोत्तरमाला लिहून छापून काढतात आणि मुलें कधीं शिक्षकांच्या अनुमतीनें आणि कधीं त्या अनुमतीशिवाय परीक्षेची तयारी करतांना पाठ्यपुस्तक हातांत न घेतां या वाटाड्यांच्या मागें जातात.

तिसरा दोष दाखविला आहे तोहि विचार करण्यासारखा आहे. विषयाचें ज्ञान अपुरें असलें आणि भाषा रंगवून खुलवून लिहिण्याची कला अवगत असली तर चतुर मुलें परीक्षकाच्या डोळ्यांत धूळ टाकूं शकतात. कोणच्या प्रश्नाखालीं किती मुद्दे आले पाहिजेत याचा आधीं विचार केला नसल्यास शिक्षक विषयाचें दारिद्र्य झांकून टाकणाऱ्या भाषावैभवानें फसतो, वाहून जातो आणि खूष होऊन प्रश्नाला चांगले गुण देतो.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें एके काळीं परीक्षापद्धति निबंधप्रधान होती. आज ती तशी राहिलेली नाहीं. आणि वरील दोष आजच्या परीक्षापद्धतीला बहुधा लागू पडणार नाहींत. तथापि परीक्षा म्हणजे शिकलेल्या विषयाची उजळणी ही आपली भूमिका आपण लक्षांत ठेवल्यास सध्याच्या परीक्षा–पद्धतींतसुद्धां आपल्याला सुधारणा करतां येईल. आजसुद्धां नुसते निबंध विचारण्यांत येत नसले तरी प्रश्नांच्या रूपांत फारशी विविधता नसते. दुसरा दोष म्हणजे परीक्षेंत मुलांच्या स्मरणशक्तीचीच चांचणी घ्यायची नसते. त्यांची अनुमान आणि निर्णयशक्तिसुद्धां तपासायची असते. यांसाठीं मुद्दाम परीक्षेंत कांहीं खास प्रश्न घातले पाहिजेत.

इतिहासाच्या परीक्षेंत प्रश्न कशा प्रकारचे असावेत या तपशिलांत शिरण्यापूर्वी एका महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करणें अवश्य आहे. तिचा थोडाबहुत विचार मागें झालाच आहे. पण तो एकांगी होता; ती गोष्ट म्हणजे इतिहासाच्या प्रश्न-पत्रिकेंत निबंध विचारावेत कीं नाहीं. पूर्वी नुसतेच निबंध असत तर आतां त्यांना अजीबात हद्पार करण्यांत येण्याचा संभव आहे. या दोन्ही गोष्टी आपण टाळल्या पाहिजेत. आपल्याला वाटतात इतके निबंध वाईट नाहींत. निबंध ही लेखनपद्धति विचारगर्भ असते; तिच्यांत कांहीं गोष्टी सांगण्याऐवजीं विचारांचा अनुक्रम आणि विकास साधलेला असतो. एका विचारांतून दुसरा विचार कसा निघतो हें दाखविलेलें असतें. सर्व मुद्दे मांडून शेवटीं निष्कर्ष काढला जातो.

निबंधाची ही कामगिरी फार मोठी आहे. जीवनामध्यें आपल्याला अनेक वेळां उपस्थित पुराव्याचा किंवा मुद्द्यांचा विचार करून त्यावर निर्णय घ्यावा लागतो पुष्कळ वेळां आपले निर्णय चुकतात. कारण पुरावा अपुरा असतो; कधीं एकांगी असतो तर कधीं चुकीचा असतो. पुराव्याच्या आधारावर आपण जो तर्क करतों, अनुमान काढतों त्या सांखळींतसुद्धां एखाद्दुसरा दुवा दुबळा असतो. निबंध नीट विचार करून सर्व बाजूचा पुरावा लक्षांत घेऊन कसा निर्णय घ्यायचा हें आपल्याला शिकवितो. निबंधाच्या या कार्यासाठीं इतिहासाचें क्षेत्र फार उपयोगी पडतें. आपल्याला आपल्या जीवनांत जसे महत्त्वाचे निर्णय घेण्याचे प्रसंग येतात तसे ऐतिहासिक व्यक्तींनासुद्धां आले होते. त्यावेळीं ते कसे वागले, तसे कां वागले, त्यांच्या हातून काय चुका घडल्या, या गोष्टी निबंधानेंच व्यक्त होऊं शकतात; छोटया छोट्यां प्रश्नांनीं व्यक्त होणार नाहींत. तेव्हां प्रश्नपत्रिकेंतून निबंध घालवूं नयेत, एखाद्दुसरा निबंध अवश्य असावा, इतकेंच नव्हे तर मागें सुचविल्याप्रमाणें दर तिमाहीस मुलांकडून एक निबंध अवश्य लिहून घ्यावा.

निबंधवजा उत्तरें मुलें पाठ करून येतात हें खरें आहे. पण त्यामुळें निबंधपद्धतीच सदोष आहे असें म्हणतां येणार नाहीं. एखाद्या चांगल्या गोष्टीचा आपण वाईट उपयोग करूं लागलों तर तो दोष आपला आहे, त्या चांगल्या गोष्टीचा नाहीं. शिक्षकानें प्रामाणिकपणानें आणि मन लावून काम केलें तर घोकंपट्टीसारख्या वाईट संवयी मुलांना जडणार नाहींत. त्यानें वर्गात फळ्यावर पाठाचें टिप्पण लिहिलें आणि मुलांना घरून त्या टिपणाचा विस्तार करून आणण्यास सांगितलें तर मुलें घोकंपट्टीकडे वळणार नाहींत. जें शिकविलें आहे

तेंच विचारायचें असें एकदां ठरलें म्हणजेसुद्धां भलतेसलते प्रकार घडणार नाहींत. शिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कीं आपण पूर्वी **ठराविक भाषेंत ठराविक प्रश्न** विचारीत होतों तें बंद करावें. नुसती कारणें द्या असें म्हणण्याऐवजीं एखादी विशिष्ट परिस्थिति प्रश्नामध्यें मांडावी आणि तिचा उकल कसा करावा हें विचारावें. प्रश्नांची भाषा बदलावी, मुरड घालावी, मोघम प्रश्न न विचारतां ते विशिष्ट स्वरूपांत विचारावे म्हणजे विद्यार्थ्यांचे 'वाटाडे' घरीं बसतील.

**छोटे प्रश्न** : गेल्या पन्नास वर्षांपासून निबंधांना आस्ते आस्ते प्रश्नपत्रिकेंतून घालवून लावण्यांत आलें आहे. त्यांची जागा लहान लहान प्रश्नांनीं घेतली आहे. इतिहासाच्या प्रश्नपत्रिकेंत सहा लांबलचक निबंध लिहिण्याऐवजीं आतां मुलांना तीस चाळीस, कधीं कधीं त्यांहूनहि अधिक छोट्या प्रश्नांचीं छोटीं उत्तरें द्यावीं लागतात. हीं छोटीं उत्तरें अक्षरशः छोटीं असतात. फार झालें तर एका वाक्यांत पण बहुधा दोन तीन शब्दांतच तीं उत्तरें देतां येतात. पूर्वी शब्द सोडलेले घडे असत. त्यामध्यें कांहीं विशिष्ट शब्दांची जागा रिकामी ठेवीत आणि मुलांना त्या रिकाम्या जागा भरून काढण्यास सांगत. अलीकडे या छोट्या प्रश्नांत कधीं कधीं अशीहि सोय करण्यांत येते. सबंध वाक्यांत एखाद्दुसऱ्या ठिकाणीं रिकामी जागा ठेवतात आणि तेथें अवश्य तो शब्द किंवा सन मुलांना लिहावा लागतो. या छोटया प्रश्नपद्धतींत हेतु एकच आहे. मुलांना शक्य तेवढें लेखी काम कमी द्यायचें. त्यांच्या भाषाज्ञानाला किंवा अज्ञानाला यत्किंचितहि संधि द्यायची नाहीं. कांहीं कांहीं प्रश्न तर असे असतात कीं त्यांत कांहींच लिहायचें नसतें. नुसत्या खुणा करायच्या असतात. किंवा परीक्षकानें उत्तरांसाठीं तीन चार शब्द दिले असतील त्यांतील बरोबर असेल तो शब्द ठेवायचा, बाकीचे शब्द पेन्सिलीनें खोडून टाकायचे. या पद्धतीमुळें वाटेल तितके प्रश्न विचारतां येतात आणि वर्षभरांत शिकविलेल्या सर्व गोष्टींची चांचणी घेतां येते. बरें, एक दोन शब्दांत किंवा शब्दांवांचून उत्तरें द्यायचीं असल्यामुळें नेहमींच्या विद्यार्थ्यांच्या 'वाटाड्या'ला तेथें गडबड करतां येत नाहीं आणि वाट दाखवितां येत नाहीं. या प्रश्नपद्धतींत घोकंपट्टीला सहसा वाव नसतो. आणि समजा, मुलांनीं संभाव्य असे अशा प्रकारचे पन्नास साठ प्रश्न घोकले तर त्यांत आनंदच आहे. कारण ठरलेले निवडक प्रश्न घोकण्याऐवजीं मुलांनीं जर सबंध वर्षांत झालेला अभ्यास घोकला तर त्यांत वाईट वाटण्याजोगें कांहींच नाहीं.

इतकी प्रस्तावना करून आपण आतां या छोट्या प्रश्नांच्या वेगवेगळ्या प्रकारांकडे वळूं.

[ १ ] खरें – खोटें कसोटी : या कसोटींत लहान लहान वाक्यांत अनेक विधानें केलेलीं असतात. त्यांतील इतिहासदृष्ट्या खरीं कोणतीं आणि खोटीं कोणती हें मुलांनीं सांगायचें असतें. जें विधान खरें असेल त्याच्या डोक्यावर अधिक चिन्ह आणि खोटें असेल त्याच्या डोक्यावर उणें चिन्ह द्यावयाचें. या कसोटींत विषयाचें ज्ञान आणि निर्णयशक्ति दोन्हींची परीक्षा होते.

[ २ ] 'अनेकांत एक' कसोटी : ही कसोटी पहिल्या कसोटीपेक्षां अधिक चांगली आहे. पहिल्या कसोटींत मुलांना एकेक विधान खरें आहे का खोटें आहे एवढेंच सांगायचें असतें. या कसोटींत अनेक पर्यायी विधानांपैकीं एक खरें असतें. बाकीचीं खोटीं असतात. मुलांनीं खरें विधान शोधून काढायचें असतें. या 'अनेकांतील एक' कसोटीचा इतिहासाच्या परीक्षेंत मोठ्या प्रमाणांत उपयोग केला जातो. या कसोटीचीं कांहीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

( १ ) सनाबद्दलची कसोटी.

(अ) पानिपतची तिसरी लढाई १८०२, १७६१, १६६४, १७४०मध्यें झाली.

(ब) शिवाजीचा जन्म १५५२, १७०७, १६०२, १६३० या सालीं झाला.

( २ ) ऐतिहासिक व्यक्तींच्या स्वभावाची पारख.

( अ ) शिवाजी दुष्ट, शूर, नम्र, विद्वान होता.

( ब ) इंग्लंडचा पहिला जेम्स राजा शूर, दृढनिश्चयी, भाविक होता.

( ३ ) ऐतिहासिक घटनांची कसोटी.

( अ ) महादजी शिंदे हा प्रधान, राजा, सेनापति होता.

( ब ) शिवाजीनें अफजलखानास पुणें, आग्रा, प्रतापगड, रायगड येथें मारलें.

( क ) संभाजीस वाई, सातारा, संगमेश्वर येथें पकडण्यांत आलें.

( ४ ) निर्णयशक्तीची पारख.

( अ ) मराठे पानपतच्या युद्धांत हरले,

कारण —

त्यांना अन्नाची टंचाई जाणवली;

त्यांची फौज कमी होती;

त्यांचा सेनापति नादान होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ................ नों: दि: ................



( ब ) १७०७ नंतर मोगल राजवटीला उतरती कळा लागली;
कारण —
औरंगजेब त्या सालीं मेला,
इंग्रज हे त्यांचे जबरदस्त शत्रू ठरले.
मोगल साम्राज्य फार अवाढव्य झालें होतें.
औरंगजेबानंतरचे पातशहा नादान होते.

[ ३ ] 'पूर्ण करा' कसोटी: ही कसोटी सर्वांत चांगली. इंग्रजी शिकवितांना खालच्या वर्गांत आपण 'रिकाम्या जागा भरा' अशा स्वरूपाचे प्रश्न घालतों, तोच हा प्रकार. या कसोटींत पूर्वी सांगितल्याप्रमाणें एक किंवा अनेक वाक्यें देतात. कधीं कधीं तर सबंध परिच्छेद देतात. या वाक्यांत किंवा परिच्छेदांत कांहीं महत्त्वाचे शब्द गाळण्यांत येतात किंवा वाक्यें अपूर्ण असतात आणि मुलांना तीं पूर्ण करण्यास सांगतात. खालच्या वर्गांत ही कसोटी विशेष उपयोगी पडते. या कसोटीचीं कांहीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

(१) शिवाजी........ या सालीं जन्मला.
(२) अकबर......... या सालीं मेला.
(३) वांदिवाशची लढाई इंग्रज आणि ......... यांमध्यें ......... या सालीं झाली.
(४) भोपाळची लढाई.........यांच्या सेनापत्याखालीं मराठे आणि...... यांच्यामध्यें ......... या सालीं झाली. या लढाईत......... यांचा पराभव झाला.
(५) औरंगजेब दक्षिणेमधें...... वर्षे लढला. परंतु मराठ्यांनीं आपल्या ......लढण्याच्या पद्धतीमुळें त्याला दाद दिली नाहीं.
(६) इंग्लंडमध्यें पहिला सुधारणा कायदा......... या सालीं झाला. या कायद्यानें...... यांना मतदानाचा हक्क मिळाला. दुसरा सुधारणा कायदा..... या सालीं झाला. या कायद्यानें...... यांना मतदानाचा हक्क मिळाला. आणि...... या सालीं झालेल्या तिसऱ्या सुधारणा कायद्यानें...... यांना मतदानाचा हक्क मिळाला.
(७) पहिल्या महायुद्धानंतर कांहीं नवीन देश निर्माण झाले; ते असे—

[ ४ ] जोड्या जुळविण्याची कसोटी: या कसोटींत दोन याद्या असतात आणि

त्या परस्परांच्या समोर मांडलेल्या असतात. दोन्ही याद्यांत मुद्दामच अनुक्रम पाळलेला नसतो. त्यांतील गोष्टी इतस्ततः एकाखालीं एक असतात. या कसोटींत पहिल्या यादींतील गोष्टीला दुसऱ्या यादींतील गोष्टीची जोड शोधून काढायची असते. पहिल्या यादींत व्यक्ति आणि घटना असल्या तर दुसऱ्या यादींत त्यांचे सन असतात. कधीं पहिल्या यादींत शोधकांचीं नांवें असलीं तर दुसऱ्या यादींत त्यांनीं लावलेल्या शोधांचीं नांवें असतात. पहिल्या यादींत सेनापति असले तर दुसऱ्या यादींत त्यांनीं जय मिळविलेल्या लढायांचीं नांवें असतात. खालील उदाहरणांवरून या कसोटीची कल्पना येईल. इ. स.

| | | |
|---|---|---|
| (१) | वांदिवाशची लढाई | १७५१ |
| | फत्तेपूर शिक्रीची लढाई | १७६० |
| | अर्काटचा वेढा | १७५७ |
| | प्लासीची लढाई | १५२७ |
| (२) | औरंगजेबाचा मृत्यु | १८०० |
| | बुद्धाचा मृत्यु | ११९२ |
| | पृथ्वीराज चव्हाणाचा मृत्यु | १५३० |
| | नाना फडणीसाचा मृत्यु | १७०७ |
| | बाबरचा मृत्यु | खिस्तपूर्व ४८३ |
| (३) | कोलंबस | ऑस्ट्रेलिया |
| | वास्को द गामा | अमेरिका |
| | मॅगेलन | द. ध्रुव |
| | कॅप्टन कुक | पॅसिफिक महासागर |
| | अमुंडसेन | हिंदुस्थान |

[५] कालक्रमाची कसोटी : या कसोटींत ऐतिहासिक व्यक्ति आणि घटना यांच्या कालक्रमाच्या ज्ञानाची परीक्षा होते. खालील उदाहरणें पाहा.

(अ) खालील नांवें कालक्रमानें फिरून लिहा.

बाबर

नादिरशहा

शिवाजी

अकबर

शेरशहा

अल्लाउद्दीन बहामनी.

(ब) खालील उदाहरण गोष्टीरूप इतिहास शिकणाऱ्या लहान मुलांसाठीं आहे. हीं नांवेंसुद्धां कालक्रमानें परत लिहावयाचीं आहेत किंवा त्या नांवांच्या मागें कालक्रमानुसार क्रमांक लिहावयाचा आहे.

राणा प्रताप

राममोहन रॉय

कबीर

हर्ष

बुद्ध

वनराज चावडा

अक्बर

व्यक्तींप्रमाणें घटनांचाहि कालक्रम लिहिण्यास सांगावें. उदाहरणार्थ,

दिवाणीची सनद

वसईचा तह

मेकॉलेचें मिनिट

प्लासीची लढाई

या नव्या कसोट्यांची एवढी माहिती पुरे. या कसोट्यांचे काय फायदे आहेत तें पूर्वीं सांगितलेंच आहे. या कसोट्यांत भाषाज्ञानाची छाप पडत नाहीं. घोकंपट्टीला वाव मिळत नाहीं. थोड्या वेळांत पुष्कळच गोष्टींच्या ज्ञानाची परीक्षा घेतां येते आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या नव्या पद्धतींत पेपर तपासणें फार सोपें. उत्तरें माहिती असलीं तर कोणीहि बेलाशक पेपर तपासावेत, चूक होणार नाहीं, कमीजास्त गुण दिले जाणार नाहींत. अशी सोय या पद्धतींत आहे.

या छोट्या प्रश्नांचेहि दोष काढणारे आढळतात. या नव्या पद्धतींत कांहीं लोक खालील चुका दाखवितात.

(१) या नव्या कसोट्या तयार करणें फार कठीण आहे. सहा ठराविक निबंध विचारण्याऐवजीं या कसोट्यांत पुष्कळच प्रश्न विचारावे लागतात हें खरें पण तें तयार करणें अशक्य नाहीं. कदाचित् आरंभीं जड जाईल पण संवय

झाली म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे छोटे प्रश्न सहज तयार करतां येतील. कांहीं कसोट्यांप्रमाणें प्रश्न तयार करणें थोडें कठीण जाईल. विशेषतः 'अनेकांतून एक' 'स्वभावगुण' शोधून काढायचा असल्यास जे अनेक स्वभावगुण निवडायचे त्यांच्या बाबतींत दक्षता बाळगावी लागेल. उदाहरणार्थ शिवाजी हा शूर, विद्वान, नम्र होता असें म्हटलें तर शिवाजीच्या स्वभावांतून नम्रता कशी काढायची ? शिवाजी वडिलांच्या पुढें नम्र होता, शत्रूपुढें शूरहि होता. मनुष्याचें मन साधें नसतें. त्यांत अनेक स्वभावगुण आढळतात. चारपांच गुणांची यादी दिल्यास त्यांतील एकच गुण माणसांत असेल आणि बाकीचे कोणतेच नसतील अशी हमी देतां येणार नाहीं. येथेंच मुलाला आपल्या निर्णयशक्तीचा वापर करावा लागेल. यादींतील कदाचित् दोन किंवा तीन गुण त्याला ऐतिहासिक व्यक्तींत आढळले तर त्यानें दोन्ही तिन्हींत सर्वांत ठळक गुण कोणता याचा निर्णय केला पाहिजे. अर्थात् परीक्षकानें अशी कसोटी तयार करतांना शक्यतों-पर्यंत अनवस्था प्रसंग येणार नाहीं याची दक्षता बाळगली पाहिजे.

या नव्या कसोट्यांवर जो दुसरा आरोप करण्यांत येतो तो असा कीं फारसें किंवा अजिबात लिहावें लागत नसल्यामुळें ज्या पद्धतींत नुसत्या खुणांवर वेळ मारून नेतां येते तिच्यांत उत्तर माहीत नसतांना नुसता अंदाज करतां येतो. हा आक्षेप सर्वस्वीं नाहीं तरी बराचसा खरा आहे. खऱ्याखोट्याची कसोटी आणि 'अनेकांतून एक' या कसोटींत अंदाजाला स्थान नाहीं असें नाहीं. मला स्वतःला या कसोट्या फारशा पसंत नाहींत. यांच्याऐवजीं एका वाक्यांत उत्तर मिळणारे साधे स्पष्ट प्रश्नच विचारावे. शिवाजी १५५२, १७०७, १६०२, १६३० यांपैकीं कोणत्या सालीं जन्मला असें न विचारतां शिवाजी केव्हां जन्मला असा स्पष्ट प्रश्न टाकावा. नेमक्या उत्तराची अपेक्षा करणारे छोटे छोटे अनेक प्रश्न बहुतेक नव्या कसोट्यांपक्षां अधिक उपयोगी पडतील.

नव्या कसोट्यांवरचा तिसरा आरोप म्हणजे या कसोट्यांत विचार करणें, अनुमान करणें आणि निर्णय घेणें या मानसिक क्रियांना फारसें स्थान नाहीं. हा आरोप फारसा लागू पडत नाहीं. कांहीं कांहीं कसोट्यांमध्यें मुलांना या मानसिक क्रियांचा वापर अवश्य करावा लागतो. तथापि एवढें खरें कीं अशा छोट्या प्रश्नांच्या छोट्या उत्तरांत वरील मानसिक क्रियांना पुरेसा वाव नाहीं. म्हणजे या नव्या कसोट्या निबंधाची जागा घेऊं शकत नाहींत. नव्या कसोट्यां-

प्रमाणेंच निबंधांचीहि नव्या परीक्षेंत आवश्यकता आहे हें आपण मान्य केलें पाहिजे. एवंच, इतिहासाच्या परीक्षेंत एकाच प्रकारचे प्रश्न घालून चालणार नाहीं. वेगवेगळ्या गोष्टींची योग्य चांचणी होण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारचे प्रश्न मुलांच्या वयोमानाप्रमाणें घालावे लागतील; त्यांचा येथें फक्त निर्देश करतों.

( १ ) एक दोन वाक्यांत उत्तरें मिळणारे छोटे प्रश्न;
( २ ) नव्या कसोटयांचे कांहीं निवडक प्रश्न;
( ३ ) सन आणि कालक्रम यांचें ज्ञान पारखणारे प्रश्न;
( ४ ) ऐतिहासिक आशय भरावयाचा नकाशाचा एखादा प्रश्न;
( ५ ) छोटे छोटे निबंधवजा एक दोन प्रश्न.

• • •

## परिशिष्ट १

# पाठांचे कांहीं नमुने

या परिशिष्टांत वेगवेगळ्या प्रकारच्या पाठांचे कांहीं नमुने 'सुचविले' आहेत. सुचविले हा शब्द मी जाणूनबुजून लिहीत आहें. माझी अपेक्षा आहे कीं हे पाठ तयार करतांना मीं बरेंच डोकें खाजविलें त्याप्रमाणें शिक्षकांनींहि आपलें स्वतःचें डोकें खाजवावें आणि पाठ तयार करावे. माझें डोकें किंवा माझी खाजविण्याची क्रिया त्यांच्या उपयोगीं पडणार नाहीं. शिक्षकांनीं आरंभीं संवय होईपर्यंत पाठाचीं टांचणें सविस्तर अशीं लिहावीं. त्यांत विचारावयाचे प्रश्न, फळ्यावरील टांचण, वर्गांत सांगावयाचीं कामें, दाखवायचीं चित्रें या सर्वांचा निर्देश असावा. परंतु संवय झाल्यावर आणि आत्मविश्वास वाढल्यावर टांचणें त्रोटक, संक्षिप्त व सूचक एवढींच असावींत. त्यांत पाठांतील सर्व पायऱ्यांचा निर्देश असावा; परंतु सर्व प्रश्न लिहून ठेवण्याचें कारण नाहीं. कांहीं सूचक व व महत्त्वाचे प्रश्न मात्र लिहावेत. या दृष्टीनें या परिशिष्टांतील थोडेच पाठ सविस्तर व बाकीचे संक्षिप्त असे ठेवले आहेत. पाठांत उपोद्घाताला महत्त्व आहे. एकाच पाठाचा अनेक प्रकारें प्रस्ताव करतां येतो हें मुद्दाम एका पाठाचे दोन प्रस्ताव देऊन दाखविलें आहे.

## पाठ पहिला

## प्रागैतिहास

विषय : फार फार वर्षांपूर्वी

इयत्ता ३री वय ८–९ वेळ ३०–३५ मि.

पूर्वज्ञान : रामायण-महाभारतांतील गोष्टी

**प्रस्ताव :**

मुलांनों, तुम्हांला मी आज जुन्या जगांत घेऊन जाणार आहे. प्रवास फार लांबीचा आहे. आपल्याला २०–२५ हजार वर्षे मागें पायचें आहे. त्यावेळचें जग पाहण्यासाठीं तुम्हांला आजचें सारें जग विसरलें पाहिजे. आज जें जें कांहीं आहे तें त्या वेळीं नव्हतें. फक्त होतें आकाश, पर्वत, नद्या आणि अफाट जंगल. आणि भयंकर अक्राळविक्राळ प्राणी.

त्यावेळीं आजचीं गांवें, शहरें, रस्ते नव्हते. घरें नव्हतीं. तुम्ही आज प्रवास कसा करतां ? आगगाडींतून, बसमधून, सायकलवरून किंवा आपल्या बैलगाडींतून. हें पूर्वी कांहींच नव्हतें. तुमच्या अंगावर कपडे आहेत. कशाचे बरें आहेत ते ? सुताचे, लोकरीचे किंवा रेशमाचे. पण पूर्वी सूत नव्हतें, लोकर नव्हती, रेशीम नव्हतें. अर्थात् आजच्यासारखे कपडेच नव्हते.

प्रश्न : तुम्ही रोज काय काय खातां ?

उत्तर : भाकर, चपाती, भात, वरण, भाज्या, फळें इत्यादि.

पूर्वी हें कांहींच नव्हतें. कारण हीं सर्व धान्यें आहेत आणि जुन्या जगांतील माणसाला धान्य माहीतच नव्हतें. कारण त्याला शेतीच माहीत नव्हती.

प्रश्न: तुमच्या घरांत भांडीं कशाचीं आहेत ?

उत्तर: पितळेचीं, जस्ताचीं, तांब्याचीं, स्टेनलेस स्टीलचीं किंवा कदाचित् चिनी मातीचीं.

पूर्वी हें कांहींच नव्हतें. आतां सांगा बरें पूर्वी हें कां नव्हतें ? बरोबर; धातूच सांपडल्या नव्हत्या तेव्हां धातूंचीं भांडीं आढळणार कुठून ? मात्र आजचीं गाडगीं-मडकीं आणि रांजण पूर्वी होते. आजचे पाटे-वरवंटेसुद्धां पूर्वी होते.

अशा जगांत आज आपल्याला जायचें आहे. काय काय नसलेलें तें जग होतें सांगा बरें!

उत्तर: गांवें, शहरें, घरें, रस्ते नाहींत; कपडे नाहींत; भांडीं नाहींत; खायला भाकर, चपाती, भात नाहीं. असें हें जग होतें.

या जुन्या जगांत खूप खूप पाऊस पडत होता. कदाचित् बारा महिने पडत असेल. नद्या, नाले तुडुंब भरलेले असत.

प्रश्न : खूप पाऊस पडला म्हणजे काय उगवतें ?

उत्तर: मोठमोठीं झाडें.

बरोबर आहे. त्या जुन्या जगांत जिकडे जाल तिकडे जंगलच जंगल. सूर्य दिसत नसे. या जंगलांत हत्तीपेक्षांहि मोठे प्राणी होते. त्यांपैकीं एकाचें हें चित्र पहा.

वर्गांत डिनॉसर ( dinosaur ) चें चित्र दाखविणें. हा हत्ती नाहीं, हा त्या वेळचा प्रचंड सरडा आहे बरं का !

अशा या जंगली जगांत माणसें राहत होतीं. जंगलांत राहणें धोक्याचें म्हणून शक्य तर नद्यांच्या कांठीं झाडी तोडून माणसें राहात. भित्रीं मुलें अंधारांत आईला बिलगतात तशीं हीं भित्रीं माणसें नद्यांना बिलगून राहत असत. कोणी गुहांत राहात तर कोणी झाडावर.

प्रश्न : त्यांचे कपडे कसे असतील बरें ? कपाशी नाहीं, लोकर नाहीं, रेशीम नाहीं मग कपडे कसले असतील ? ओळखा बरें ? नाहीं सांगतां येत ? रामायण वाचलें आहे ना ? मग वनवासांत जातांना रामानें कसले कपडे घातले होते ?

वल्कलें, बरोबर. म्हणजे झाडांच्या सालींचे कपडे. तो जंगलांतला युनिफॉर्मच. रामाला जंगलांत जायचें होतें, हिंडायचें होतें. तेथें रेशमाचें काय काम ?

प्रश्न : आतां हीं जुनीं माणसें काय खात असतील ?
उत्तर : फळें, झाडपाला.

होय. तीं माणसें फळें, झाडपाला, कंद खात असतील. पण तेवढ्यावरच काय भागणार आहे ? रोज एकादशी करून कसें चालेल ? कांही तरी भरगच्च पोटांत गेलेंच पाहिजे. मग आणखी काय खात असतील ते ? सांगा बरें !

बरोबर. प्राण्यांचें मांस. ते कसें त्यांना मिळत असेल ? शिकार करूनच. हीं माणसें शिकार कशीं करीत असतील ?

चुकलांत. त्या वेळीं बंदुका नव्हत्या. इतकेंच काय, बंदुका आणि तोफा पांच सहाशें वर्षांपूर्वीच आल्या. त्यापूर्वी होते भाले, तलवारी आणि धनुष्यबाण. पण भाला किंवा तलवारीला लोखंड लागतें. तें जुन्या जगांत नव्हतें. मग या जुन्या जगांत हत्यारें कसलीं असतील ? सारीं दगडाचींच. दगडाला धार द्यायची आणि तलवार, भाले बनवायचे. अणकुचीदार दगड बाणाला लावून काम भागवायचें. सारीं हत्यारें, अवजारें दगडाचीं. विळा, कोयता, कुऱ्हाड मांस खरवडून काढण्याचीं साधनें – सारीं दगडाचीं.

हे जुने लोक मांस भाजून खायला शिकले. त्यांच्या झाडासमोर, गुहेसमोर, झोंपडीसमोर विस्तव पेटवलेला असायचा. विस्तवांत मांस भाजायचे, त्या शेकोटीभोवतीं बसायचे, गोष्टी सांगायचे, गाणीं म्हणायचे, नाचायचे.

विस्तवाचा दुसरा एक फार मोठा उपयोग त्यावेळीं होता. सांगा पाहूं ? खाजवा थोडें डोकें. नाहीं येत ? माणसाच्या भोंवतीं त्यावेळीं अक्राळविक्राळ प्राणी होते ना ? त्यांनीं गरीब बापड्या दुबळ्या माणसांना केव्हांच मटकन् खाऊन टाकलें असतें. पण — पण काय, सांगा बरें आतां ?

शाबास. ते विस्तवाला भीत होते. बरोबर. विस्तवाजवळ जात नव्हते. म्हणून जुन्या जगाचा अग्नि हा पहिला देव–तो रक्षण करीत होता, ऊब देत होता. मांस छानदार भाजून देत होता. त्याच्या उबेंत नाचगाणें सुचत असे.

## उपसंहार :

बस्स. आज एवढें पुरे. आतां माझ्या प्रश्नांचीं उत्तरें द्या. किती वर्षांपूर्वीच्या जुन्या जगांत आपण गेलों ? आजचें काय काय तेव्हां नव्हतें ? खूप पाऊस पडल्यामुळें काय होत होतें ? जुन्या माणसाचे कपडे कसे होते ? तो काय खात

असे ? त्याला शिकार कशी मिळायची ? त्याचीं हत्यारें कोणतीं ? अवजारें कोणतीं ? अग्नीचा त्याला काय उपयोग होत असे ? अग्नि हा त्याचा पहिला देव असें मी कां म्हटलें ?

चला आतां आपल्या या पाठाचें मी फळ्यावर टाचण लिहितों. तुम्ही तुमच्या वह्यांत डाव्या बाजूस आठवणीनें एकेका मुद्दयावर तीन चार ओळी लिहून काढा.

## फळ्यावरील टांचण

जुनें जग— सुमारें २५ हजार वर्षांपूर्वी

(१) मुसळधार पाऊस. जंगलच जंगल. अक्राळविक्राळ प्राणी.
(२) जुन्या माणसाचे कपडे–वल्कलें. कां ?
(३) त्याचें खाणें – फळें, कंद मांस. कां ?
(४) शिकार – हत्यारें व अवजारें भांडींकुंडीं.
(५) अग्नि – पहिला देव. कां ?

## पाठ दुसरा

## विषय : भगवान् गौतम बुद्ध

इयत्ता ४ थी वय ९ ते १० वेळ ३५ मिनिटें

साहित्य : बुद्धाचीं चित्रें. ( १ ) ध्यानस्थ बुद्ध

( २ ) संन्यस्त बुद्ध, त्याची पत्नी व मुलगा.

**पूर्वतयारी :**

मुलांना ध्यानस्थ बुद्धाचें चित्र दाखविणें व त्याच्या शांत गंभीर व पवित्र अशा ध्यानस्थ मूर्तीबद्दल प्रश्न विचारणें.

**हेतुकथन :**

मुलांनों, हा ध्यानस्थ बसलेला ऋषि राजपुत्र होता. खूप वैभवांत लोळत होता. सारें वैभव व सुख सोडून असा त्यानें संन्यास कां घेतला ती गोष्ट फार मजेदार आहे. तुम्हांला ती खास आवडेल.

**प्रतिपादन :**

( १ ) बुद्धाचें घराणें, आईबाप. बाप कांहीं गांवांचा राजा. म्हणजे आजकालचा एखादा सुखी जहागिरदार. शुद्धोदन घरीं शेती करी.

( २ ) गौतमाचा जन्म आणि बालपण.

( ३ ) गौतम बापाबरोबर शेती करी. त्यावेळचा नांगरणीचा उत्सव. उत्सवाचें नांव वप्पमंगल. सारे गांवकरी छान कपडे घालीत, बैलांना सजवीत, राजाच्या वाड्यासमोर जमत, वाजत–गाजत राजाच्या शेताकडे जात, तेथें नांगर तयार असत. राजाचा नांगर–चांदीचा, छानदार चकचकीत. राजा प्रथम आपल्या नांगरानें शेत

नांगरी, मग शेतकरी आपापल्या शेताची नांगरणी करीत आणि एकत्र येऊन आनंदानें वनभोजन करीत.

छानदार आहे का नाहीं हा उत्सव ? आपल्याकडे असे कोणते उत्सव आहेत ? सांगा बरें ? पोळ्याची माहिती.

(४) गौतमाचें दुःख. तो सुखांत होता पण जगाच्या दुःखानें कष्टी होता– माणसांचे आजार, माणसांचें दारिद्र्य, माणसांचे मृत्यु.

(५) तो सुखाचा शोध करूं लागला. त्याला झोंप येईना, अन्न गोड लागेना, जे साधुपुरुष भेटतील त्यांच्या तो पायां पडे आणि विचारी–मला सुखाचा मार्ग सांगा ! सारें जग कसें सुखी होईल, काय केलें म्हणजे होईल ?

(६) शेवटीं गौतमानें सुखाच्या शोधासाठीं घर सोडलें. मुलगा झाला होता, सुंदर होता, गांवभर मिठाई वांटली होती, वाड्यांत आनंदीआनंद झाला होता, गाणेंबजावणें झालें होते. सारे झोंपले होते. गौतमाची बायको यशोधरा आणि लहान बाळ राहुलसुद्धां गाढ झोंपेंत होतीं. गौतमानें क्षणभर त्यांच्याकडे पाहिलें, दोन अश्रु ढाळले, ओठ घट्ट मिटले आणि घोड्यावर बसून तो चालता झाला. रानांत घोडा सोडला, दागिने टाकले, सुंदर कपडे सोडले, तलवारीनें केस कापले आणि तप करण्यास चालता झाला.

(७) सुखाचा शोध – गौतमानें खूप तप केलें. सात वर्षे तप केलें. अस्थि-पंजर झाला. तो एका पिंपळाच्या झाडाखालीं विचार करीत बसला होता. एकदम डोक्यांत प्रकाश पडला. सुखाचा मार्ग सांपडला. म्हणून त्या झाडाला बोधिवृक्ष म्हणजे ज्या झाडाखालीं गौतमाला बोध झाला तो वृक्ष असें म्हणतात. गौतमहि बोध झाल्यामुळें बुद्ध या नांवानें प्रसिद्ध झाला.

(८) उपदेश आणि मृत्यु : चाळीस वर्षे गौतम बुद्ध उपदेश करीत हिंडला. त्याची बायको आणि मुलगासुद्धां त्याला शरण आलीं. हें पहा त्यांचें चित्र. हजारों लोक त्याचे शिष्य झाले. तो सांगत असे – यज्ञ करूं नका, धर्माच्या नांवाखालीं हत्या करूं नका. घर सोडूं नका. विनाकारण जें दिसेल त्याचा लोभ ठेवूं नका. तो ८० वर्षांचा होऊन अडीच हजार वर्षांपूर्वी मरण पावला.

**उजळणी :**

झालेल्या पाठावर प्रश्न विचारणें.

## फळयावरील टांचण

### गौतमबुद्ध

( १ ) आईबाप– शुद्धोदन आणि मायादेवी. बाप राजा.
( २ ) गौतमाचा जन्म व बालपण
( ३ ) सण वप्पमंगल.
( ४ ) सुखाचा शोध
( ५ ) मार्ग सांपडला; चाळीस वर्षे उपदेश आणि मृत्यु.

● ● ●

## पाठ तिसरा

[ एकाच विषयाचे पाठ अनेक प्रकारें घेतां येतात. विशेषतः पाठांचे प्रस्ताव अनेक प्रकारें करतां येतात. गौतम बुद्धावरच्या वरील पाठांत चित्राच्या साह्यानें प्रस्ताव केला. तोच पाठ दुसऱ्या प्रकारें प्रस्ताव करून घेतां येईल. त्याचें एक उदाहरण येथें देतों. ]

### प्रस्ताव म्हणजेच पूर्वतयारी

महात्मा गांधींच्या वर प्रश्न विचारणें. त्यांच्या अहिंसा वृत्तीबद्दल माहिती सांगणें. ते इंग्रजांशीं झगडले परंतु इंग्रजांचा त्यांनीं द्वेष केला नाहीं. अशा प्रकारें अहिंसेचा धडा अडीच हजार वर्षांपूर्वी आपल्या देशांत एका महापुरुषानें आपल्याला दिला; त्याचें नांव गौतमबुद्ध. त्याची गोष्ट आज मी तुम्हांला सांगणार आहे. (पुढील पाठ नं. २ प्रमाणें )

● ● ●

## पाठ चौथा

# बुद्ध आणि त्याचा धर्मपंथ

इयत्ता १० वी  वय १६ ते १७  वेळ : ४५–५० मि.

**विषयप्रवेश :**

आर्य पूर्वेकडे जात जात बिहारजवळ थांबतात – त्यांच्या यज्ञयागांना बंगाल – बिहारकडे विरोध – तिकडे पन्नास साठ वेगळे आणि विरोधी धर्मपंथ खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास उदयास येतात – या पंथांचे प्रचारक प्रचार करीत हिंडतात. महावीर त्यांपैकीं एक, बुद्ध दुसरा. जैन व बौद्ध धर्म टिकतात; बाकीच्या-पैकीं कांहीं काळाच्या उदरांत व इतर हिंदुधर्माच्या विशाल पोटांत गडप होतात.

**हेतुकथन :**

इतर पंथ गेले, बुद्धधर्म टिकला; इतकेंच नव्हे तर तो जगभर कां पसरला याचा आपण आज विचार करूं.

**प्रतिपादन :**

( १ ) आर्येतरांचा यज्ञयागास विरोध; कारण : यज्ञयाग बड्या लोकांचे उत्सव –, अनेक वर्षें टिकणारीं सत्रें – त्यांत हजारों गरीब प्राण्यांची विशेषतः शेतीच्या उपयुक्त गुरांची हत्या – या संदर्भात रंतिदेव आणि चर्मण्वती ( चंबळा ) नदी यांची गोष्ट सांगणें – बहुजनसमाजाचा या सत्रांना विरोध आणि असंतोष – कारण त्यांच्या गुरांची हत्या.

( २ ) बुद्धकालीन समाज मांसाहारी – मांसाहार निषिद्ध नव्हता – बुद्धाचें धर्माच्या नांवाखालीं चालणाऱ्या हत्येविरुद्ध बंड

( ३ ) बुद्ध आणि वर्णाश्रम धर्म आणि जातिभेद – बुद्धाच्या काळींच व्यवसायानुसारी जातींचें अस्तित्व – जाति लवचिक – बुद्धानें वर्ण आणि जाति यांविरुद्ध प्रत्यक्ष प्रचार केला नाहीं. आचरणांत आणि संघाच्या बांधणींत त्या दोघांचें महत्त्व नाहींसें केलें. सर्व जातींच्या लोकांना संघांत समान दर्जा – बुद्धाचा एक मोठा शिष्य उपालि न्हावी जातीचा होता. याशिवाय संघांत उशिरां कां होईना पण स्त्रियांचा प्रवेश – यासाठीं बहुजनसमाजाचा आणि कमी जास्त प्रमाणांत क्षत्रियांचा बुद्धाच्या पंथास पाठिंबा.

( ४ ) बुद्धाचा धर्मपंथ भारतांत हजार वर्षें टिकण्याचें कारण : बुद्धानें आपलें पीठ स्थापन केलें नाहीं. आपला वारस नेमला नाहीं; संघ हाच वारस – संघ हाच सर्वाधिकारी; धर्मक्षेत्रांतल्या एक प्रकारच्या लोकशाहीचा हा अभिनव प्रयोग. बुद्धानें संघास मोकळें सोडलें नाहीं – सर्व प्रकारचे नियम घालून देऊन त्याची भक्कम बांधणी केली.

( ५ ) संघाची बांधणी – भिक्षु भिक्षिणी– अपरिग्रह व्रत– भिक्षांदेहि –अखंड पदयात्रा– दोन रात्रीं एका ठिकाणीं मुक्काम वर्ज्य – विहार – पावसाळ्यांतील मुक्काम– विहार हीं चातुर्मासांतील ज्ञानसत्रें व शिबिरें. संघाची आपसांत चर्चा– अपराध्यांना दंड – पुढील मार्गदर्शन – विहारांतील अमर कला – बुद्धधर्माचा मोठा वारसा.

## उपसंहार :

बुद्धधर्म भारतांतून नाहींसा झाला हें खरें का ? हिंदुधर्म या नांवाखालीं तो आज आसेतु हिमाचल नांदत आहे. नांव गेलें पण लक्षण राहिलें– कसें तें सांगा.

• • •

## पाठ पांचवा

## विषय – गांधींच्या गोष्टी

इयत्ता ४ थी   वेळ ३० मिनिटें

**साहित्य** – गांधींचें चित्र.

**प्रस्ताव व हेतुकथन (एकच):**

गांधीजींना तुम्हीं सारेजण ओळखतां. हें त्यांचें चित्र. त्यांच्याबद्दलच्या मोठ-मोठ्या गोष्टी तुम्ही मोठे झाल्यावर वाचाल. आज तुम्हांला त्यांच्या छोट्या छोट्या पण छानदार गोष्टी मी सांगणार आहे. बसा देवासारखे आणि ऐका कान देऊन.

**निवेदन**

हा फोटो नीट पाहिलात? सांगा बरें महात्माजींच्या अंगावर काय काय कपडे आहेत? डोकीवर काय आहे?

उत्तर: गुडघ्यापर्यंतचा पंचा. अंगावर खादीचें पांघरूण. डोकीला कांहीं नाहीं. पायांत चपला. हातांत रिस्टवॉच नाहीं.

प्रश्न: गांधीजी मोठे होते ना? मग त्यांचे असे भिकार कपडे का? त्यांना चांगले कपडे मिळत नव्हते?

उत्तर: मिळाले असते. पण त्यांनाच ते नको होते.

प्रश्न: कां रे नको होते?

उत्तर: त्यांना गरिबांचे कपडे आवडत.

वा! छान! चांगलें उत्तर दिलेंस. महात्माजींनीं गरिबांसारखे कपडे घालण्यास कशी सुरवात केली तीच गोष्ट आधीं सांगतों.

पहिली गोष्ट — ओरिसांतला दौरा – महात्माजींच्या प्रचंड सभा–फक्त पुरुष–बायका कां नाहींत ? त्यांना नेसायला धड लुगडीं नव्हतीं. महात्माजी रडले. त्यांनीं आपले कपडे टाकले. पंचा व लहानसें उपरणें; कधीं तेंहि नाहीं.

दुसरी गोष्ट – कपडे थोडे, खादीचे, पण अगदीं स्वच्छ. महात्माजींना स्वच्छतेची, टापटिपीची भारी आवड. खोली स्वच्छ, खोलींतील सामान स्वच्छ. ते हिंदुस्थानांत आले आणि राष्ट्रसभेच्या बैठकीला गेले. तेथें संडास घाण, गटारें तुंबलेलीं, खोल्यांत धूळ. महात्माजींनीं हातांत झाडू घेतला, सफाई केली. सारे लाजले.

महात्माजी एकदां तुमच्यासारख्या मुलांच्या शाळेंत आमंत्रणावरून गेले. शाळेला वसतिगृह होतें, महात्माजी शाळेच्या सभागृहांत, जेथें सारीं मुलें व शिक्षक त्यांची वाट पाहत बसले होते तेथें, गेले नाहींत. गेले वसतिगृहांत. जिकडे तिकडे घाण, कचरा, उशाच्या खोळी घाण, चादरी मळकट, खोल्यांत कचरा, पुस्तकें अस्ताव्यस्त. सारें पाहिलें आणि सभागृहांत गेले व म्हणाले, ‘ मुलांनों, तुम्ही माझ्या परीक्षेंत नापास झालात.

प्रश्न : महात्माजींची परीक्षा कोणती आणि तिच्यांत मुलें नापास कशीं झालीं ? सांगा.

उत्तर : महात्माजींची परीक्षा स्वच्छपणाची, मुलांच्या खोल्या अस्वच्छ, म्हणून ते नापास.

प्रश्न : अगदीं बरोबर. आतां सांगा मला. लाजूं नका. महात्माजी तुम्हांला आवडतात ना !

उत्तर : हो, आवडतात.

प्रश्न : फार फार आवडतात ?

उत्तर : फार फार आवडतात.

वा. छान. मग महात्माजींच्या परीक्षेंत तुम्ही कितीजण पास झालात ? ( मुलें खालीं पाहतात, एकमेकांकडे पाहतात. )

महात्माजींच्या परीक्षेचे प्रश्न सांगतों. फळ्यांवर लिहितों. उतरून घ्या. मग मीच महात्माजींच्यातर्फे परीक्षा घेईन.

प्रश्न १. सकाळीं दांत स्वच्छ घासायचे. स्वच्छ तोंड धुवायचे.

प्रश्न २. आपली खोली आपण झाडायची. आईला किंवा गड्याला ती झाडूं द्यायची नाहीं.

प्रश्न ३. स्वच्छ स्नान करायचें. मग व्यायाम करायचा.

प्रश्न ४. दूध प्यायचें. चहा नाहीं. कॉफी नाहीं.

प्रश्न ५. पुस्तकें नीट ठेवायचीं. त्यांना पुठ्ठे घालायचे. पुस्तकांत, वह्यांत उगीच रेघोट्या ओढायच्या नाहींत. कांहीं तरी चितरायचें नाहीं.

प्रश्न ६. अगदींच विसरलों. उठल्याबरोबर आधीं परसाकडे जायचें. चहा प्यायल्यावर नाहीं! हो. आणखी एक प्रश्न राहिला. नखें काढायचीं, नखांतील मळ काढायचा.

आज एवढेच प्रश्न पुरेत. आणि गांधीजींच्या या दोन गोष्टीच पुरे. पुढच्या पाठांत गांधीजी मुलांबरोबर कसे खेळत, एका छोट्या मुलीच्या तोंडांतला उकडलेला बटाटा त्यांनीं कसा खाल्ला तें सांगेन.

मुलें– गुरुजी, गुरुजी; ती बटाट्याची तेवढी गोष्ट आजच सांगा ना?

शि: छे. तो बटाटा गरम आहे. निवल्यावर देईन तुम्हांला.

**उपयोजना**

आतां गांधीजींच्या परीक्षेची तयारी करूं या. आपला वर्ग स्वच्छ झाडूं. तीं कोपऱ्यांतली कोळिष्टकें काढूं. चला. करा सुरुवात.

● ● ●

## पाठ सहावा

## विषय : श्रीशिवछत्रपति

( उजळणीचा पाठ )

इयत्ता ७ किंवा ८ वी  वय १३-१४  वेळ ४०–४५ मि.

**विषयप्रवेश :**

आपण शिवाजीमहाराजांचें चरित्र आणि त्यांचा उद्योग व त्यांत त्यांना मिळालेलें यश यांचा येथवर अभ्यास केला. आतां पुढें मजल मारण्यापूर्वी आपण शिवाजीमहाराजांच्या चरित्रांतील व्यक्ति, राज्यकर्ते, सेनापति या अंगांचें परीक्षण करूं आणि त्यांच्या योग्यतेचा अंदाज घेऊं.

( अ ) शिवाजीमहाराज: **एक व्यक्ति या नात्यानें :**

| | |
|---|---|
| (१) प्रेमळ व आज्ञाधारक पुत्र | (१) जिजाबाई आणि शिवाजी यांच्या शिवाजीच्या बाल-पणच्या परस्परसंबंधावर प्रश्न विचारणें. |
| (२) स्त्रीजातीविषयीं आदर | (२) प्रश्न : कल्याणच्या सुभे-दाराच्या सुनेविषयींचा प्रसंग-"आमच्या मासाहेब अशा देखण्या असत्या तर आम्हीहि असेच देखणे झालों असतों." |

(३) नोकरचाकर, शिपाई-प्यादे यांच्याविषयीं काळजी

(४) प्रजेची काळजी आणि सहानुभूति

(३) व (४) वर प्रश्न विचारणें.

(५) जागृत धर्मबुद्धि—धर्म हीच जीवनाची मुख्य प्रेरणा

(५) प्रश्न – रोहिडेश्वराच्या देवळांत घेतलेली प्रतिज्ञा : "हें राज्य देवां-ब्राह्मणांचें. हें राज्य व्हावें हें श्रीच्या मनांत फार आहे."

प्रत्येक आणीबाणीच्या प्रसंगीं भवानीमातेची पूजा व प्रार्थना यांवर प्रश्न विचारणें. अनेक सत्पुरुषांची सेवा आणि उपदेशग्रहण – प्रश्न विचारा.

(६) इतर धर्मांविषयीं सहिष्णुता, कुराणाचा आदर, मशिदींना संरक्षण

(ब) शिवाजीमहाराज : **शूर योद्धा आणि कुशल सेनापति**

(१) गनिमी काव्याची युद्धकला

(१) गनिमी काव्याच्या युद्धप्रसंगांवर प्रश्न विचारणें.

(२) घोडदळ, पायदळ व आरमार यांची उभारणी व संघटना

(२) प्रश्न विचारणें.

(क) शिवाजीमहाराज : **यशस्वी राज्यकारभार आणि कुशल मुत्सद्दीपणा**

| | |
|---|---|
| (१) राज्यकारभार – अष्टप्रधान-पद्धति आणि त्यांच्या कामाचें वांटप | (१) प्रश्न विचारणें – अष्ट-प्रधान, त्यांचीं कामें व शिवाजीचे त्यांच्याशीं संबंध |
| (२) महसूल-वसुलाच्या कार-भारांतील मक्तेदारी बंद केली. प्रत्यक्ष रयतेकडून वसुली | (२) या मक्तेदारी पद्धतीविषयीं चर्चा करा. या पद्धतींत जो जास्त रक्कम बोलेल त्याला त्या त्या प्रदेशाची वसुली करण्याचा कुल-अखत्यार – या पद्धतींतील दोष आणि शिवाजीच्या पद्धतीचे फायदे. |
| (३) किल्ल्यांचें महत्त्व आणि व्यवस्था-जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती त्यांच्या कडा बेलाग केल्या. नवे किल्ले. दारू-गोळा. धान्याची तरतूद. किल्ल्यांचा कारभार | (३) किल्ल्यांच्या कारभारावर प्रश्न. हवालदार मराठा, सबनीस ब्राह्मण आणि कारखानीस कायस्थ प्रभु, अशी जातवार अधिका-ऱ्यांची योजना व तिच्या-मागील धोरण – यांवर प्रश्न विचारा. – त्या काळीं किल्ल्यांचें महत्त्व कां ? बंदोबस्त व कारभार यांवर प्रश्न. करावयाच्या नोकरी-साठीं देण्यांत येणाऱ्या किंवा उत्तम कामगिरी बजावली म्हणून देण्यांत येणाऱ्या पिढीजात जहा-गिऱ्या; या पद्धतींतील दोष आणि पगारी नोकरीं-तील फायदे. |

(४) लष्करी किंवा मुलकी अधिकाऱ्यांना जहागिऱ्या दिल्या नाहींत; नक्त पगार

(५) लष्करी आणि मुलकी कारभारावर प्रत्यक्ष देखरेख, लढाईत स्वतः सर्वांपुढें

(५) निरनिराळे किल्ले आणि प्रदेश यांच्या कारभाराची तपासणी करण्यासाठीं अचानक भेटी. कडक शिस्त आणि ताकीद–पत्रें. शिवाजीचें चिपळूणच्या लष्करी अधिकाऱ्यास पाठविलेलें पत्र वाचून दाखविणें.

**फळ्यावरील टांचण**

**शिवाजीमहाराज**

| | |
|---|---|
| (१) व्यक्ति या नात्यानें | प्रेमळ आज्ञाधारक पुत्र; सहानुभूति बाळगणारा आणि काळजी घेणारा धनी; धर्मनिष्ठ; स्त्रीजातीचा आदर; इतर धर्मांविषयीं सहिष्णुता. |
| (२) योद्धा व सेनापति या नात्यानें | शूर आणि कुशल; धाडसी; लढायांत दाखविलेलें धाडस आणि पराभवांत दाखविलेलें चातुर्य. |
| (३) राज्यकर्ता व मुत्सद्दी या नात्यानें | अष्टप्रधान पद्धति; किल्ल्यांचा कारभार; महसूल-पद्धति; जहागिरी बंद; कडक शिस्त आणि वैयक्तिक देखरेख |

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............... वि ...................
क्रमांक ..................... नों. दि ...............

### पाठ सातवा

## इंग्रजी शिक्षणाचा भारतांत प्रवेश

इयत्ता ११ वी वय १७ वेळ ४५-५० मिनिटें

**विषयप्रवेश :**

सध्यां चालू असलेला इंग्रजी भाषेच्या स्थानाबद्दलचा झगडा – आज इंग्रजी उच्च शिक्षणाचें माध्यम – कोर्ट-कचेऱ्यांची भाषा–संसदेची भाषा – सरकारी कामकाजाची भाषा–इंग्रजी विरुद्ध हिंदी आणि प्रादेशिक भाषा.

**हेतुकथन :**

असाच भाषांचा झगडा सव्वाशें वर्षांपूर्वी आपल्या देशांत झाला आणि इंग्रजी शिक्षणाचा प्रवेश झाला – इतिहासाची पुनरावृत्ति कशी होते याचें हें एक उदाहरण – तो झगडा आज आपण पाहूं – कदाचित् इतिहासांतल्या या पूर्वी होऊन गेलेल्या घटनेमुळें आजच्या वादांत आपल्याला मार्गदर्शन मिळेल. इतिहास याचसाठीं वाचायचा असतो.

**प्रतिपादन :**

(१) **पूर्वस्थिति** (अ) संस्कृत, फारशी आणि अरबी याच भाषांतून पाठशाळांतून आणि मकतबांतून शिक्षण – देशी भाषांना शिक्षणांत स्थान नाहीं. इंग्रजीचें शिक्षण फक्त मिशनऱ्यांच्या खाजगी शाळांत.

(ब) सरकार-दरबारची भाषा फारशी. म्हणून देशभर फारशी आणि पारस-नवीस (म्हणजे फारशी जाणणारे) यांना महत्त्व.

( २ ) इंग्रजांचे दोन पक्ष – संस्कृत आणि फारशी शिक्षणाचे अभिमानी-इंग्रज विरुद्ध इंग्रजी भाषेचे अभिमानी – त्यावेळचे कांहीं इंग्रज अधिकारी मोठे संस्कृत पंडित – एकानें शाकुन्तलाचें इंग्रजी भाषांतर केलें; दुसऱ्यानें बावीस वर्षें खपून अशोकाच्या शिलालेखांतील लिपि वाचली. या पक्षाचें प्रामाणिक मत या प्राचीन भाषा प्रगल्भ – त्यांत ज्ञान आणि वाङ्मय भरपूर – भारतीयांची शैक्षणिक आणि सांस्कृतिक गरज भागविण्यास या भाषा समर्थ. दुसरा पक्ष इंग्रजीचा – आधुनिक ज्ञान आणि विज्ञान केवळ इंग्रजी ग्रंथांतच – भारतीयांना आधुनिक शिक्षण देणें अवश्य – त्यासाठीं इंग्रजी अवश्य. संस्कृत-मधल्या भाकड, असंभवनीय, दह्या-दुधांच्या समुद्रांच्या कथा काय कामाच्या – सबब भारतीयांना इंग्रजींतून आधुनिक शिक्षण देणें इष्ट.

( ३ ) राजा राममोहन रॉय–इंग्रजीवाल्यांना पाठिंबा – त्यांचे त्यावरचे लेख, भाषणें व सरकारला केलेलीं निवेदनें – त्यांनीं इंग्रजी शिक्षण देणाऱ्या ' हिंदु कॉलेज ' ची केलेली स्थापना.

( ४ ) वस्तुस्थिति – सरकार खूप शिष्यवृत्त्या देई पण संस्कृत पाठशाळांना आणि मकतबांना विद्यार्थि मिळेनात. उलट सरकारची यत्किंचित् मदत नसलेल्या खाजगी मिशनरी व बिनमिशनरी शिक्षणसंस्थांत विद्यार्थ्यांची गर्दी. आपल्या पुण्यास मोठें वय होईपर्यंत केवळ संस्कृत शिकलेल्या कृष्णशास्त्री चिपळूणकर या थोर पंडिताला त्याच्या गुरुनें सांगितलें, " बाबा, आतां संस्कृतचे दिवस गेले, शालजोडी टाक आणि इंग्रजी शिकायला लाग. "

( ५ ) मेकॉलेचें भारतांत आगमन, त्याचा अहवाल बेंटिंक मान्य करतो. परिणाम – संस्कृत, फारशी, अरबी शिक्षणास मिळणारी सरकारी मदत बंद– फारशीच्या ऐवजीं इंग्रजी सरकारची भाषा – या घटनेचा परिणाम – फारशी शिक्षणाचें महत्त्व कमी झालें – मुसलमानांची पीछेहाट.

**सारांश :**

इंग्रजी इंग्रजांनीं आपल्यावर लादलें नाहीं. तें आपणच मागितलें – दुसरी गोष्ट – मेकॉलेच्या वेळीं झगडा झाला तो इंग्रजी आणि संस्कृत यांमध्यें; तो झगडा इंग्रजी आणि प्रादेशिक भाषा यांमध्यें नव्हता; कारण त्यावेळीं प्रादेशिक भाषांना शिक्षणक्षेत्रांत स्थानच नव्हतें. आजचा मामला वेगळा – आज वाद

एका बाजूस इंग्रजी आणि दुसऱ्या बाजूस हिंदी ही राज्यभाषा व प्रादेशिक भाषा यांच्यांत आहे. पूर्वी ज्याप्रमाणें इंग्रजी – संस्कृतच्या झगड्यांत प्रादेशिक भाषांकडे दुर्लक्ष झालें त्याप्रमाणेंच सध्यां इंग्रजी – हिंदीच्या झगड्यांत त्या प्रादेशिक भाषांकडे दुर्लक्ष होण्याचा धोका फार. तेव्हां आपण मेकॉलेच्या वेळच्या या भाषिक प्रश्नापासून बोध घेतला पाहिजे आणि आपल्या प्रादेशिक भाषा म्हणजेच मातृभाषा – यांना शिक्षणक्षेत्रांत, सरकारदरबारांत योग्य स्थान मिळेल असें पाहिलें पाहिजे.

## उपयोजना :

आपल्या देशांत यापुढें इंग्रजी हिंदी आणि प्रादेषिक भाषा यांना शिक्षणक्रमांत आणि अन्यत्र काय स्थान असावें याचें सविस्तर विवेचन करणारा निबंध घरून लिहून आणा.

• • •

## पाठ आठवा

## विषय : १८५७

इयत्ता ११  वय १७  वेळ– पन्नास मिनिटांचे **तीन** पाठ

( सूचना– हें तीन पाठांचें मिळून टांचण आहे. सराव झाल्यावर शिक्षकानें महत्त्वाच्या प्रश्नांवर ( topics ) पाठ देतांना असें एक टांचण तयार करावें व त्यावर अवश्य तेवढे पाठ द्यावेत. या टांचणांत प्रश्न लिहिले नाहींत. नुसते मुद्दे आहेत. एकएका मुद्दयावर विवरण करितांना शिक्षकानें प्रश्न विचारावेत, चर्चा करावी, सद्यस्थितीशीं समन्वय जोडावेत आणि १८५७ वरील साधनें वाचून दाखवावींत. विशेषत: सुरेंद्रनाथ सेन यांचा इंग्रजी ग्रंथ '१८५७' व न. र. फाटक यांची मराठी 'शिपाई-गर्दी' यांचा उपयोग करावा. योग्य वातावरण निर्माण होण्यासाठीं मुलांना विष्णुशास्त्री गोडशांचें 'माझा प्रवास' हें सुंदर पुस्तक वाचण्यास द्यावें, )

### प्रस्ताव :

१९५७ मध्यें साजरी झालेली १८५७ ची शतसंवत्सरी — प्रकाशनें – दोन टोकें, स्वातंत्र्ययुद्ध विरुद्ध शिपायांचें बंड. आपण या घटनेचा अभ्यास करूं व आपला निर्णय घेऊं.

### १ प्रतिपादन :

१ आजवर या घटनेस शिपायांचें बंड म्हटलें जात होतें तें ब्व्हंशीं बरोबर; कारण जेथें जेथें उठाव झाले तेथें तेथें शिपाईच पुढें, त्यांचाच उपक्रम. इतर पुढें मागें सामिल.

बंगाल ( त्यावेळच्या बंगाल इलाख्यांत आजच्या आसाम, बंगाल, ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश इतक्या प्रदेशांचा समावेश होत होता. ) फौजेंतील शिपाई

अयोध्या बिहार या सलग प्रदेशांतले ब्राह्मण, राजपूत व मुसलमान. हे लोक शूर पण धर्मभोळे, सोवळे, सनातनी वृत्तीचे.

**२ उठावाची व्याप्ति :**

अयोध्या (पूर्व उत्तर प्रदेश) दिल्ली, बिहार, बुंदेलखंड, रोहिलखंड, माळवा व मध्यभारत. पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, बंगाल, महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, तामिळनाड, केरळ शांत व स्वस्थ.

**३ कारणें :**

(अ) **सामान्य :** ( i ) सामाजिक कायदे : सति, विधवाविवाह, धर्मांतर केलेल्यांना वारसा इ.

(ii) यंत्रयुगाचा प्रवेश – आगगाड्या, तारायंत्रे.

(iii) डलहौसीनें खालसा केलेल्या राज्यांतील बेकारी, असंतोष व संताप.

(iv) मिशनऱ्यांचे शाळांत, तुरुंगांत, फौजेंत, चव्हाट्यावर धर्म-प्रचार व प्रसार व त्यास सरकारी मदत.

(ब) **शिपायांच्या असंतोषाचीं कारणें :**

( i ) समुद्रप्रवासास नकार. त्यामुळें छळ.

(ii) भत्त्याबाबत असंतोष.

(iii) धार्मिक आचरणावर अतिक्रमण – शेंडी, दाढी, गंध, डोकीस चामड्याची पट्टी लावलेल्या टोपीची सक्ति. जुन्या पागोट्यास, पटक्यास मनाई-यांत शेवटची भर काडतुसांची.

(iv) वरिष्ठ जागा अनुपलब्ध.

**४ इतर पुढाऱ्यांचें १८५७ च्या घटनेंतील स्थान व कार्य :**

( अ ) बादशहा बहादूरशहा. म्हातारा, दुबळा, निरुपद्रवी, हुक्का ओढीत कविता करून वेळ घालवणारा. कर्तृत्वशून्य. परंतु बादशाही तक्तास देशभर मान. जेथें जेथें शिपाई उठले तेथें तेथें गोऱ्या अधिकाऱ्यांना मारून त्यांनीं दिल्लीचा रस्ता धरला. बादशहा नामधारी-जबरदस्तीनें पुढारी.

( ब ) नानासाहेब – बाजीरावाचा १८५१ मध्यें मृत्यु – पेन्शन बंद – पेशवाई शिक्क्यास मनाई – जमिनी खालसा, दिवाणी, फौजदारी अधिकार काढले – भारतांत व विलायतेंत खटपट – नानांचे कानपूरच्या इंग्रजांशीं मैत्रीचे संबंध – भेटीगाठी मेजवान्या. कानपूरच्या बराकी सोडतांना इंग्रज नानांच्या ताब्यांत तिजोरी करतात. शिपायांचा उठाव, दिल्लीस कूच, पण परत कानपुरास येतात. यापुढें नाना पुढारी – सामना – नानास बादशहा मान्य.

( क ) राणी लक्ष्मीबाई – अकालीं वैधव्य – दत्तक नामंजूर, राज्य खालसा, पेन्शनमधून कर्जापोटीं कपात – नानासाहेबाप्रमाणेंच भारतांत व विलायतेंत खटपटी – अपयश, निराशा, असंतोष.

कंपनीच्या शिपायांचें बंड व गोऱ्यांचे बायकामुलांसह खून – राणीकडून पैका व दारूगोळा वसूल करतात व दिल्लीस जातात. अर्थात् राणी या बंडखोरांची पुढारी नाहीं. कदाचित् तिचा बाप मोरोपंत सामिल अगर सहानुभूति. राणी किल्ल्याचा ताबा घेते. फौज व दारूगोळा जमवते – चढाव करून आलेल्या बुंदेल्या संस्थानिकांशीं सामना देते – इंग्रजांना वारंवार परिस्थिति कळवते, मदत मागते – इंग्रज जाहीरनामा काढून राणीकडे तात्पुरतीं झांशी राज्याचीं अधिकारसूत्रें देतात. प्रादेशिक अधिकारी राणीच्या बाजूचे पण गव्हर्नर जनरल विरुद्ध – रोजची चढाई व वेढा – राणीचा पराक्रम – काल्पीस घोडदौड – पराभव – ग्वालेरीचा मुकाबला व मृत्यु – ‘ साऱ्या बंडखोरांत एकच व्यक्ति श्रेष्ठ व ती स्त्री होती.

( ड ) तात्या टोपे – खंदा शिपाई, शूर, त्याचा कोणताच स्वार्थ नव्हता – केवळ स्वामिभक्ति व धर्मनिष्ठा याच प्रेरणा.

## ५ १८५७ च्या ठिकठिकाणच्या घटना :

शिपायांचे पराक्रम – लढत मेले – पुढारी नाहींत, युद्धकलेचें पुढाऱ्यांस मिळणारें शिक्षण नाहीं – संघटना – एकी व शिस्त नाहीं.

## १८५७ चे निष्कर्ष

( i ) व्याप्ति थोडी

( ii ) पुरभय्ये राजपुत व उ. प्रदेशांतले मुसलमान हेच मुख्य.

(iii) सरहद्दीवरचे पठाण, पंजाबांतले शिख, मराठे, मद्रासी तटस्था किंवा इंग्रजांकडचे. शहाजाद्यांना दिल्लीच्या रस्त्यांत गोळी घालून मारलें तेव्हां शिख आनंदानें नाचले. धर्मगुरूंच्या छळाचा सूड.

(iv) मध्यवर्ती कट किंवा पूर्वयोजना नव्हती. मात्र शिपायांच्या ठिकठिकाणच्या पलटणींत सल्लामसलत, चिठ्या-चपाट्या. बंडांत प्रसिद्धि पावलेल्या बड्या माणसांचे परस्परांशीं संबंध कट सहकार्य नाहीं.

(v) शिपायांनीं पेटवलेला वणवा पसरला. त्यांत असंतुष्टांनीं उडी मारली–कांहींनीं ( लक्ष्मीबाई ) फार उशीरा.

## ६ मग १८५७ काय होतें ?

राष्ट्र ही कल्पना नाहीं. धर्म हीच प्रेरणा. म्हणून हें एका अर्थानें धर्मावर आक्रमण करणाऱ्या इंग्रजांना हुसकून लावण्यासाठीं धर्मयुद्ध. स्वार्थानें आरंभीं प्रेरित झालेले पुढारीसुद्धां लढले व मेले धर्मासाठीं.

## ७ परिणाम :

(i) सबंध राष्ट्र निःशस्त्र केलें.

(ii) ब्राह्मणांना फौजेंत बंदी; आणि लष्करी व बिनलष्करी जाती असा भेदभाव व त्याप्रमाणें पठाण, शिख, गुरखे इत्यादींना फौजेंत महत्त्व.

(iii) संस्थानिक, जमींदार इत्यादि वर्गांना संरक्षण.

(iv) धर्माच्या बाबतींत अलिप्तता व सामाजिक कायद्यांबाबत त्यानंतर औदासीन्य.

(v) अधिकार व्हिक्टोरिया राणीकडे म्हणजे पार्लमेंटकडे जातो.

## ८ उपयोजना :

१८५७ चा उठाव यशस्वी झाला असता व इंग्रज भारत सोडून गेले असते तर त्याचे राजकीय, सांस्कृतिक व इतर परिणाम काय झाले असते याचें त्या वेळच्या परिस्थितीचा विचार करून कल्पनाचित्र काढा, म्हणजे निबंध लिहा.

● ● ●

[illegible]

# परिशिष्ट दुसरें

# कालरेषा व आलेखांचे

# कांहीं नमुने

## जीव सृष्टीची कालरेषा


५००० · इतिहास सुरू
१२००० · नवे अश्मयुग
२५००० · जुने अश्मयुग
२००,००० · आदिमानव
५०,०००,०००.
५००,०००,००० प्राण्यांचा जन्म
वनस्पतीचा जन्म ·
१,५००,०००,०००. पाण्याची वाफ
२०००,०००,०००. पृथ्वी सूर्यापासून अलग होते

## शिवछत्रपति – कालरेषा



## — अकबर – कालरेषा —


१५४२
अकबराचा जन्म
१५५२
पानिपतचें दुसरें युद्ध, राज्यारोहण
बहिरामखानास दूर केले
१५६२
माळवा काबीज, रजपुतांशीं लढा सुरू
जिझिया कर रद्द
चितोड हस्तगत
१५७२
गुजराथ काबीज
हळदीघाटची लढाई प्रतापचा पाडाव
१५८२
दिन इलाही स्थापना
१५९२
ओरिसा काबीज ( सिंधही काबीज )
अहमदनगरचा पाडाव
१६०२
इंग्लंडच्या राणीकडून भारतास व्यापार परवानगी
अकबर मृत्यु

## मराठे — औरंगझेब


१७ वे शतक
१६१०
१६२०
१६३०
१६४०
१६५०
१६६०
१६७०
१६८०
१६९०
१७००
१७१०
मालोजीचा मृत्यू
शिवाजी जन्म
निजामशाहीचा अंत
शहाजी विजापूरकरांची नोकरी पत्करतो
रोहिडेश्वरची प्रतिज्ञा
शाहिस्ताखानवर हल्ला
आग्र्यास कैद
राज्याभिषेक
मृत्यू
संभाजीचा वध
राजारामाची जिंजीहून सुटका
राजारामाचा मृत्यू
ताराबाईचा पराक्रम
औरंगजेब जन्म
दक्षिणची सुभेदारी
राज्यप्राप्ति
जजिया कर लादला
रजपुतांशी युद्ध
दक्षिण स्वारी
औरंगजेब मृत्यू

## परिशिष्ट तिसरें

# कांहीं वाचनीय पुस्तकें

### मराठी

| | |
|---|---|
| १ महाभारताचा उपसंहार | चिं. वि. वैद्य |
| २ मध्ययुगीन भारत, भाग १, २, ३ | चिं. वि. वैद्य |
| ३ भगवान बुद्ध, भाग १।२ | धर्मानंद कोसंबी |
| ४ प्राचीन महाराष्ट्र | डॉ. केतकर |
| ५ वाकाटक नृपति आणि त्यांचा काल | वा. वि. मिराशी |
| ६ मराठ्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या | वा. ना. सहस्त्रबुद्धे |
| ७ मराठी रियासत: १ शहाजी २ शिवाजी ३ संभाजी ४ राजाराम ५ शाहू भाग १, २, ३ ( बाळाजी, बाजीराव, नानासाहेब ) ६ माधवराव | गो. स. सरदेसाई |
| ८ राजपुतांचा उदय व अस्त | |
| ९ विजयनगर स्मारक ग्रंथ | भारत इतिहास संशोधकमंडळ |
| १० आधुनिक भारत | शं. द. जावडेकर |
| ११ मराठे आणि इंग्रज | न. चिं. केळकर |
| १२ मुसलमानपूर्व महाराष्ट्र, खंड १।२ | वा. कृ. भावे |
| १३ पेशवेकालीन महाराष्ट्र | वा. कृ. भावे |
| १४ दोस्तांची श्रीरंगपट्टणवर मोहिम | द. वि. आपटे |
| १५ मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास | द. वि. आपटे |
| १६ शिवचरित्र प्रदीप (साधन ग्रंथ) | द. वि. आपटे व स. म. दिवेकर |

| | |
|---|---|
| १७ शिवभारत ( समकालीनानें लिहिलेलें संस्कृत चरित्र. मराठी भाषांतरासह ) | स. म. दिवेकर |
| १८ शिवचरित्र निबंधावली | शिवचरित्र कार्यालय |
| १९ १८५७ ची शिपाई–गर्दी | न. र. फाटक |
| २० 'माझा प्रवास' ( विष्णुशास्त्री गोडसे ) | संपादक–न. र. फाटक |
| २१ सभासदाची बखर | |
| २२ चिटणिसाची बखर | |
| २३ मराठ्यांची बखर | ग्रांट डफ |
| २४ भाऊसाहेबांची बखर | |
| २५ राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास | ह. वा. देशपांडे |
| २६ इतिहास – प्रवेश (हिंदी) भाग १।२ | जयचंद्र विद्यालंकार |
| २७ राजपुतान्याचा इतिहास (हिंदी) भाग १, २, ३, ४ व ५. | गौरीशंकर ओझा |
| २८ मालवामें युगान्तर (हिंदी) | रघुवीरसिंह |
| २९ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १।२ | शिवचरित्र कार्यालय |
| ३० नाट्यरूप महाराष्ट्र | वि. द. घाटे |

## इंग्रजी

| | |
|---|---|
| 1 Anthropology | R. R. Marett ( Home U. Library ) |
| 2 The Story of Civilization – Vol I Our Oriental Heritage; Vol II The Life of Greece; Vol III Ceasar & Christ; Vol IV The Age of Faith; Vol V The Renaissance; Vol VI The Reformation | Will Durrant |
| 3 An outline History of the World. | H. A. Davies |
| 4 The Story of Civilizatioh. | C. C. M. Joad |
| 5 The story of Mankind. | Van Loon |

| | | |
|---|---|---|
| 6 | A Pageant of World History. | R. G. Ikin |
| 7 | An outline History of Civilization. | F. G. Pearce |
| 8 | The Cambridge History of India Volumes 4, 5 and 6. | |
| 9 | The History and Culture of the Indian People.<br>Vol I The Vedic Age<br>Vol II The Age of Imperial Unity<br>Vol III The Classical Age<br>Vol IV The Age of Imperial Kanauj<br>Vol V The struggle for Empire | Bharateeya Vidya Bhavan Bombay |
| 10 | An Advanced History of India. | R. C. Majumdar<br>H. C. Raychaudhary<br>K. Datta. |
| 11 | The Vakatak – Gupta Age | R. C. Majumdar<br>A. S. Altekar |
| 12 | The Pre-historic civilization of the Indus Valley. | K. N. Dikshit |
| 13 | Administration and Social Life under the Pallavas. | C. Minakshi |
| 14 | Studies in Chola History & Administration. | K. A. Nilkanth Shastry. |
| 15 | The Rashtra Kootas and their Times. | A. S. Altekar |
| 16 | Rise of the Maratha Power. | M. G. Ranade |
| 17 | New History of the Marathas. | G. S. Sardesai |
| 18 | Shivaji & His times. | Jadunath Sarkar |
| 19 | The Grand Rebel. | Dennis Kincaid |
| 20 | English Records on Shivaji. | शिवचरित्र कार्यालय |
| 21 | Rise of the Christian Power in India. | Major Basu |

| | | |
|---|---|---|
| 22 | Aurangzeb. | Jadunath Sarkar. |
| 23 | History of the Sikhas ( 1739–1768 ) | Hari Ram Gupta |
| 24 | The Oxford Student's History of India. | V. Smith<br>H. C. Rawlinson |
| 25 | A concise history of the Indian People. | H. C. Rawlinson |
| 26 | A Junior History of India. | R. D. Banerji |
| 27 | 1857. | S. Sen |
| 28 | A Survey of Indian History. | Sardar Pannikar |
| 29 | The Pageant of Indian History. | Gertrude Sen |
| 30 | History of India. Vols I and II. | Nilkanth Shastry |
| 31 | The Religious Policy of the Mughul Emperors. | Shri Ram Sharma |
| 32 | Panipat. | T. Shejwalkar |
| 33 | Mughul Empire in India. Three Volumes. | S. R. Sharama |
| 34 | History of Europe. | H. A. L. Fisher |
| 35 | English Social History. | G. M. Trevelyan |
| 36 | History of England. | G. M. Trevelyan |
| 37 | British History in the 19th Century. | G. M. Trevelyan |
| 38 | Parliament. | Courtnay Ilbert |
| 39 | Piers Plowman's History ( Junior & Senior ) | E. H. Spalding |
| 40 | The New Approach. | J. C. Hill |
| 41 | The Heritage of History Series. | Mc Dougall |
| 42 | The Head way Histories. | Pol Kinghorne |

ठाणे. स्थापित.
अनुक्रम ... दि. ..................
क्रमांक .................... नों. दि. ..................

## अनुक्रमणिका :


| | | |
|---|---|---|
| १ | इतिहास म्हणजे काय ? | ५ ... १३ |
| २ | इतिहास : शास्त्र कीं कला ? | १४ ... १८ |
| ३ | इतिहासाचें उद्दिष्ट आणि फळ | १९ ... ३१ |
| ४ | इतिहासाचे प्रकार | ३२ ... ४३ |
| ५ | इतिहासाचे अभ्यासक्रम | ४४ ... ५२ |
| ६ | अभ्यासक्रमाचे कांहीं नमुने | ५३ ... ६५ |
| ७ | इतिहासाचें विवेचन | ६६ ... ७१ |
| ८ | इतिहासाचें अध्यापन – प्रथम श्रेणी | ७२ ... ८० |
| ९ | इतिहासाचें अध्यापन – द्वितीय श्रेणी | ८१ ... ८८ |
| १० | इतिहासाचें अध्यापन – तृतीय श्रेणी | ८९ ... ९७ |
| ११ | इतिहासाचा शिक्षक | ९८ .. १०६ |
| १२ | इतिहासाचें पाठ्यपुस्तक | १०७ ... ११३ |
| १३ | इतिहासाची प्रयोगशाळा | ११४ ... ११८ |
| १४ | काळाची जाण | ११९ ... १२९ |
| १५ | ऐतिहासिक साधनांचा उपयोग | १३० ... १३८ |
| १६ | इतिहासाचें नाट्यीकरण | १३९ ... १४९ |
| १७ | समन्वय | १५० ... १६३ |
| १८ | जीवन – शिक्षण व समन्वय | १६४ ... १६९ |
| १९ | इतिहासाची परीक्षा | १७० ... १८१ |
| | परिशिष्ट १ पाठांचे कांहीं नमुने | १८२ ... २०६ |
| | परिशिष्ट २ कालरेषा व आलेखांचे कांहीं नमुने | २०७ ... २११ |
| | परिशिष्ट ३ कांहीं वाचनीय पुस्तकें | २१२ ... २१५ |

REFBK-0009960